श्री अनसूया अत्रि । श्री पार्वती परमेश्वर । श्री लक्ष्मी नारायण । श्री सीताराम । श्री राधेश्याम ।



# श्री सुंदरदत्त चरितम्

## प. पू. ब्रम्हश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे प्राकृत ओवीबद्ध दर्शन



।। श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः।।

# ।। श्री सुंदरदत्त चरितम् ।।

## प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे प्राकृत ओवीबद्ध दर्शन

卐


-ओवीबद्ध रचनाकर्ती -

**सौ. योगिनी हरेश शृंगारपुरे**

(संकलन : 'श्रीदत्ताश्रम' जालना)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस :

माघ कृष्ण ६, शके १९३२
बुधवार, दि. २३ फेब्रुवारी २०११

मुखपृष्ठ :


विक्रांत पावसकर
सुरेन्द्र शिंदे

मुद्रक :


रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२२३२९१०३४

प्रकाशक :


श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२-२३६८०५




श्री सुंदरदत्त तथा सौ. लक्ष्मी आई साहेब व प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर
(सहस्त्र चंद्रदर्शन प्रसंगी)



प. पू. श्री. वक्रतुंड महाराज कवीश्वर (श्रीं चे आजोबा)



सौ. सरस्वती आईसाहेब व
प.पू. श्री. धुंडीराज महाराज कवीश्वर (श्रीं चे माता पिता)



प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर,
प.पू. श्री. वामनरावजी गुळवणी महाराज (श्री गुरु महाराज)
व प.पू. श्री. भालचंद्रशास्त्री उप्पनबेटगिरी (धारवाड पाठशाळेतील श्रीं चे गुरुबंधू)



श्रीं ची सहस्त्रचंद्रर्शन शांती - मुख्य सभा, पुणे


डावीकडून बसलेले - प.पू. श्री. भालचंद्रशास्त्री उप्पनबेटगिरी (धारवाड)

प. पू. श्री. शंकराचार्य महाराज, श्री क्षेत्र द्वारकापीठ

प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर, प.पू. सौ. ताईमहाराज चाटुपळे (जालना)

प. पू. सौ. लक्ष्मी आईसाहेब कवीश्वर, प.पू. श्री. शंकराचार्य महाराज, स्वामी विद्या शंकरभारती करवीर पीठ, कोल्हापूर

प. पू. श्री. किशोरजी व्यास



श्रीं चा सहस्त्रचंद्रर्शन सोहळा, पुणे
रौप्य तुलादान प्रसंगी तुलेमध्ये श्री महाराज व बाजूला उभ्या सौ. लक्ष्मी आईसाहेब




श्री दत्त आश्रम जालना श्री दत्तयाग प्रसंगी
प.पू. सौ. ताईमहाराजांनी बांधलेली श्रीं ची पूजा (सुक्या मेव्याचे अलंकार)
प.पू. सौ. ताईमहाराज श्रीं ना वंदन करताना



प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर व सौ. लक्ष्मी आईसाहेब,
रेणुकानिवास पुणे



जालना येथील श्री दत्त आश्रमात श्री पादुकारुपात स्थिरावलेले
श्री महाराज



श्री दत्त आश्रम जालना




श्री दत्त आश्रम जालना - राघवालयातील श्रीरामप्रभू

# प्रस्तावना...

आपल्या भारत देशात प्रात:स्मरणीय अशा अनेक व्यक्ती होऊन गेल्या. त्यापैकी एक म्हणजे विद्यावाचस्पती प. पू. दत्त महाराज कवीश्वर. श्रीमद्भगवतगीतेत वर्णन केलेल्या दैवी संपत्तीचे त्यांच्याठायी सदैव दर्शन घडत असे. अशा श्रीदत्तमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र सौ. योगिनी श्रृंगारपुरे हिने लिहीले आहे. त्या लेखनामागचे प्रेरणा स्थान आहेत. प. पू. ताईमहाराज.

जालना येथील ''श्रीदत्ताश्रम'' ही वास्तू प. पू. ताईमहाराजांनी १९९४ मध्ये उभी केली. श्रीताईमहाराजांचा नामस्मरण आणि अन्नदान ह्यावर प्रचंड भर आहे. दत्ताश्रमातील पहाट भगवंताच्या नामस्मरणाने उजाडते. राघवालय, संतधाम, पादुकामंदिर येथील शांती तिथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनावर संस्कार करुन जाते. प. पू. दत्तमहाराजांचे पिताश्री श्रीधुंडीराजमहाराज हे प. पू. ताईमहाराजांचे दीक्षागुरु ! श्रीदत्तमहाराज ताईमहाराजांचा उल्लेख 'साक्षात जगदंबा' ह्या शब्दात करीत असत. ''प. पू. ताईमहाराजांच्या तप:प्रभावाने जालन्याचे 'श्रीदत्ताश्रम' हे स्थान एक फार मोठे पारमार्थिक केंद्र होणार आहे'' ह्या प. पू. दत्तमहाराजांच्या शब्दांचा प्रत्यय आज सर्वांना येतोच आहे.

प.पू. दत्तमहाराज आणि प. पू. ताईमहाराज ह्यांच्यासारख्या संत सज्जनांविषयी बोलताना शब्द मावळून जातात. श्रीज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचे तर

''ते आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर।
की महाबोधे विहार। केले जैसे।
ते विवेकाचे गांव। की परब्रह्मींचे स्वभाव।
नातरी अलंकारले अवयव। ब्रह्मविद्येचे।।

(श्रीज्ञानदेवी – ५ : १३८, १३९)

प्रस्तुत ग्रंथात प. पू. दत्तमहाराजांच्या जीवनातले प्रसंग अत्यंत रसाळ पद्धतीने सौ. योगिनीने निवेदन केले आहेत. ते वाचतांना आपल्यासमोर एक आदर्श जीवनपद्धती उभी राहते. लेखिका परम आदराने, प्रेमभावाने आणि अत्यंत आत्मीयतेने आपल्या गुरुंविषयी लिहीते. तिचे शब्द वाचकाला अंतर्मुख करतातच आणि 'आपुलीया बळे नाही मी बोलत' हा तिचा भावही प्रत्ययाला येतो.

आध्यात्मिक प्रगतीचा चित्तशुद्धीशी फार जवळचा संबंध आहे. चित्तशुद्धीशिवाय आध्यात्मिक प्रगती संभवत नाही. ''श्रीगुरुदेवचरित्राच्या'' प्रस्तावनेमध्ये प. पू. दत्तमहाराजांनी, ''वीतरागविषयं वा चित्तम'' या योगसूत्रकारांच्या आदेशाप्रमाणे जीवन्मुक्तमहानुभावांच्या चरित्राचे समालोचन हे चित्तस्थैर्यसंपादक असते'' असे म्हटले आहे. तेव्हा या दृष्टीने ही पोथी फार मोलाची वाटते. ही पोथी वाचून आपणा सर्वांचा जीवनपथ आत्मप्रकाशाने उजळून जावा ही श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना.

**डॉ. सौ. माधुरी पणशीकर**
११, गुडवील बिल्डींग,
मनमाला टँक रोड, माहीम–मुंबई–१६.

।। श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः।।

# "माझे दोन शब्द -"

अनसूयाऽत्रि संभूतो दत्तात्रेयो दिगंबरः ।
स्मर्तृगामी स्वभक्तानाम् उध्दर्त्ता भव संकटात् ।।

स्मरण मात्राने भक्ताला पावणारे वेदगेय, नामरूपातीत प्रभू भक्तवत्सल श्री दत्तात्रेय भगवान भक्तांच्या उद्धारासाठी अनेक वेळा या भूमीवर अवतार घेऊन लीला करते झाले आहेत. प.प. श्रीमद् नृसिंह सरस्वती स्वामी महाराज, प.प.श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज, प.प.श्रीनृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी महाराज, प.पू.श्री वक्रतुंड महाराज कवीश्वर, प.पू.श्री धुंडीराज महाराज कवीश्वर. अशी ही थोर दत्तगुरु परंपरा या भरतखंडाला लाभलेली आहे. निर्लेप निर्गुण नामरूपातीत परब्रह्म केवळ भक्तांसाठी गर्भवासी होऊन मानव देह धारण करून आपल्याला दर्शन देतात. हे केवढे उपकार आहेत. याच थोर परंपरेचे मुकुटमणि विद्यावाचस्पति ब्रह्मश्री प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर हे महान सत्पुरुष प.पू.श्री धुंडीराज महाराज व प.पू.सौ. सरस्वती आईसाहेब यांच्या पुत्ररूपाने अवतरले. या महान विभूतीचे हे ओवीबद्ध चरित्र वर्णन आहे. त्यांच्या वडिलांनी प.पू.श्री धुंडीराज महाराजांनी त्यांच्या जवळ असलेल्या एका ग्रंथराजावर "मंत्रमहार्णव" या ग्रंथावर असे लिहिले आहे - "न्यायिनः सिद्धिः". याचा वरपांगी अर्थ असा की, जो न्यायाने, सदाचरणाने वागेल त्याला या मंत्राची सिद्धि होईल. पण याचा गर्भितार्थ असा आहे कि परार्थासाठी, दुसऱ्यांसाठी या मंत्राचा उपयोग करायला हवा. स्वतःचे, स्वकुलाचे कल्याण कोणीही करू शकेल पण जगदोद्धारासाठी, जगाच्या कल्याणासाठी अविरत रत असणे हा कवीश्वर कुळाचा वारसा आहे. विद्वान्, संत व परमपुरुष पिढ्यानूपिढ्या या कुळात जन्माला येतील असा मयूरेश्वर श्री गजाननाचा या कुळाला आशिर्वाद आहे.

संत तुलसीदासांनी म्हटले आहे 'हरि अनंत हरिकथा अनंता'. हे लेखन कार्य सुरु करताना शंका उपस्थित झाली; या 'अनंत हरि' चे

गुणवर्णन संपूर्ण समग्र करता येण्यासारखे नाहीच मुळी. भक्तपरिवार मोठा आहे. कित्येकांना परमार्थाकडे वळवले, कितीतरी भक्तांना संकटातून तारले आहे. कित्येकांच्या जीवनात चमत्कारपूर्ण अनुभव आले आहेत. ते सगळे आपल्याला कसे कळावे. त्याचा समावेश या ग्रंथात कसा व्हावा. म्हणजे हे चरित्र अपूर्णच राहणार. या विचाराने मनांत अस्वस्थता निर्माण झाली.

पण याचे उत्तर प.पू.महाराजांच्याच प्रवचनांत सापडले. म्हणजे प.पू.महाराजांनीच सत्कृप होऊन मनाच्या शंकेचे समाधान केले, हे म्हणणे जास्त योग्य होईल. श्री गुरुचरित्रावरील निरूपणात प.पू.महाराज म्हणतात; "श्री गुरुचरित्र हे अगाध आहे. अनंत आहे. नित्य नवे भक्त–शिष्यगण दर्शनाला येत असतील. कितीतरी भक्तांवर कृपाप्रसाद झाला असेल. ते काही सर्व वर्णन कोणी करू शकत नाही. श्रीपादांचेही चरित्र यांत संक्षिप्त रुपानेच आलेले आहे."

दुसरा विचार हा की प.प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामींच्या शब्दांत 'व्यष्टीभूत किंचिज्ज्ञा' कडून 'समष्टयाभिमानी सर्वज्ञ' परमेश्वराचे वर्णन करणे म्हणजे गांडुळाने शेषभगवानाला गिळण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. तसा अधिकारच नाही. पण या कार्याचा संकल्प भक्तांच्या कल्याणासाठी प.पू.भगवती सौ. ताईमहाराजांचा आहे. त्या प्रत्यक्ष कुंडलीनी जगदंबा आहेत आणि या चरित्ररुप साधन मार्गाने त्या भ्रूमध्यस्थित प.पू.दत्तमहाराज या परमूज्योती परब्रह्मापर्यंत आपल्याला नेणार आहेत. ॐकार स्वरूप नाद ब्रह्मातून अक्षर, शब्द आणि भाषा निर्माण झाली. त्या भाषेचा उपयोग करून त्या नादब्रह्माचेच गुणवर्णन म्हणजे सृष्टीकर्त्याला वाहिलेले तुलसीदल. पण हेच तुलसीदल त्या ईश्वराला अत्यंत प्रिय आहे.

गीता ईश्वरु भोळा, ले व्यासोक्ति कुसुममाळा ।
परि माझिया दुर्वादिला, ना न म्हणे की ।।

– संत ज्ञानेश्वर

ज्याप्रमाणे बालकाचे बोबडे बोल मातेला अत्यंत आनंददायक वाटतात त्याप्रमाणे या बोबड्या बोलांनी प.पू.महाराजांचे स्तवन करून कृतार्थ होण्याची ही संधी प.पू.ताईंच्या कृपेने आपल्याला मिळाली आहे.

असंख्य वदने असंख्य भाषा, सकळांची मज एकच आशा ।

श्रीरामांचा चरित्र गौरव त्यांनी सांगावा. महापुरुषांनी सांगितले आहे कि भक्ताचा 'भाव' देवाला आवडतो. उपचार गौण आहेत, हृदयातली भावना मुख्य आहे. 'पत्र पुष्पं फलंतोय..' अशा वचनांनी प्रत्यक्ष भगवानांनीही याचा उलगडा केलेला आहे.

संत कबीरजी म्हणतात–

पोथी पढ पढ मुवा, पंडित भया न कोय ।<br>
ढाई आख्खर प्रेम का, पढे सो पंडित होय ।।

भावांचा भुकेला श्रीहरी भक्तांच्या प्रेमासाठी आतुर असतो. या भावनेच्या गंगेने आपण श्री दत्तमहाराजांच्या शिरकमलावर गुणवर्णनरूपी वेदघोष करून अभिषेक करूया आणि प्रार्थना करूया –

संत सद्‌गुरु स्वरूपांत हे, भेटले दत्त कवीश्वर ।<br>
भक्ति भाव दे हेचि मागतो, माथा ठेवूनी श्री चरणांवर ।<br>
जन्मोजन्मी संग तुझा दे, गर्भवासी मग सुखाने कर ।<br>
स्मरण तुझेचि अखंड होवू दे, ऐसे करी रे गुरु परमेश्वर ।।

या चरित्र लेखनांत असंख्य भक्तांचा सहयोग झाला आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार. काही ग्रंथांचाही उदाहरणार्थ प्रयाग, प. पू. दत्तमहाराजांचे प्रवचन सुमन 'बोल अमृताचे' इत्यादिंचाही विशेष लाभ झाला. ही अल्प सेवा श्रीगुरुचरणी फुल ना फुलाची पाकळी म्हणून अर्पण असो.

।।अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त ।।<br>
।।भगवती जगदंबा प.पू.सौ.ताई महाराज की जय ।।<br>
।।श्री सद्‌गुरु दत्तकवीश्वर चरणार्पणमस्तु ।।

'श्रीदत्ताश्रम' जालना<br>
दि. २३–२–२०११

ओवीबद्ध रचनाकर्ती<br>
**सौ. योगिनी हरेश शृंगारपुरे**

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

# ॥ श्री सुंदरदत्त चरितम् ॥

## * अनुक्रमणिका *


| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | तीन |
| | दोन शब्द | चार |
| १ | प्रस्तावना : कुळ परिचय | १ |
| २ | १. माता-पित्यांचे वर्णन, जन्म<br>२. श्री टेंब्ये स्वामींचा आशिर्वाद | ४ |
| ३. | बालपण-<br>१. आईची परीक्षा<br>२. मौंज<br>३. भोवऱ्यातून श्रीदत्तप्रभूनी वाचविले | ८ |
| ४. | १. प. पू. श्री दीक्षित स्वामींची कृपा<br>२. प्रथम भागवत सप्ताह | १२ |
| ५. | १. अध्ययन<br>२. शिक्षण | १५ |
| ६. | सन्मान, मानपत्रे, गौरव | १९ |
| ७. | विवाह-सोहळा | २२ |
| ८. | १. पुण्यात संसार<br>२. श्री गुळवणी महाराजांचा सहवास<br>३. अध्यापक म्हणून नोकरी | २८ |
| ९. | १. अपत्य प्राप्ति<br>२. चि. शोभेचे निर्वाण<br>३. श्री गुळवणी महाराजांचे वात्सल्य<br>४. पानशेत धरण फुटले | ३१ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १०. | बांधकामे जीर्णोद्धार- १<br>१. श्री वासुदेव निवास<br>२. श्री वामन निवास<br>३. श्रीक्षेत्र अमरेश्वर मंदिर + घाट<br>४. श्रीदत्तमहाराजांचे घर (वाडी) | ३४ |
| ११. | वाङ्मयीन कार्य<br>१. श्री मोठ्या महाराजांचे वाङ्मय<br>२. श्री मोठ्या महाराजांचे चरित्र<br>३. सर्वदर्शन संग्रह टीका<br>४. वेदान्त पारिजात सौरभ | ३७ |
| १२. | श्री वासुदेव निवासात प्रथम भागवत सप्ताह<br>श्री गुरुमहाराजांकडून सज्जनगडावर शक्तिपातदीक्षा<br>पिताजींकडून व श्रीगुरुमहाराजांकडून दीक्षेचा अधिकार | ४१ |
| १३ | १. मातोश्रींची समाधी<br>२. पू. श्रीगुरुमहाराजांचे महानिर्वाण | ४५ |
| १४. | प. पू. श्रीधुंडीराज महाराजांचे महानिर्वाण<br>श्रीदत्तमहाराजांचे प्रमुख उपदेश | ४८ |
| १५. | शिक्षक म्हणून भरीव काम<br>अमृत महोत्सव, सहस्त्र चंद्रदर्शन शांति | ५१ |
| १६. | रौद्री शांति महोत्सव<br>हत्तीवरुन मिरवणूक | ५४ |
| १७. | पू. श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी महाराज<br>पू. श्री आत्माराम शास्त्री नेरे<br>पू. सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांची सहस्त्रचंद्रदर्शन शांति<br>प. पू. सौ. ताई महाराजांची वारुणीशांति | ५७ |
| १८. | जगदंबस्वरुप सौ. ताई महाराज<br>दत्तआश्रम जालना – पादुका व श्रीराम स्थापना | ६० |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १९. | १. पू. सौ. आईसाहेबांची पंढरी वारी<br>२. पू. महाराजांचे दत्तस्वरुप दर्शन<br>३. पू. सौ. आईसाहेबांचे देवीरुप दर्शन | ६३ |
| २०. | भवसंसारी त्रासलेले आर्त कुटुंब | ६६ |
| २१. | श्रीशैल्य यात्रा (भक्त परीक्षा) | ६९ |
| २२. | भगिनीस दुसऱ्या रुपाने येऊन दर्शन दिले<br>(वासुदेव निवास)<br>निद्रिस्त असता नीट केलेल्या आसनावर येऊन<br>बसून खडीसाखरेचा प्रसाद देऊन गेले. | ७२ |
| २३. | अंत्ययात्रा दिसणे, स्वप्नात दर्शन,<br>प्रत्यक्षात स्वप्नातल्या खुणा | ७५ |
| २४. | १. लाडक्या भक्तास दूर ठेवतात<br>२. प. पू. सौ. ताई कृष्णामाईला साडी नेसविण्याचा कार्यक्रम (श्रींचे विमानातील दर्शन)<br>३. पूजेसाठी ठेवलेली राशी पाद्यपूजेसाठी कामास आली. | ७८ |
| २५. | भयकृत्भयनाशन परमात्मा | ८१ |
| २६. | प्रवचन सुरु असताना, नुकतेच प्रवेश करित असलेल्या भक्ताला नेमके शंकानिरसनपर उपदेश | ८४ |
| २७. | पू. कलावती आईंचे भक्त परिवाराला दर्शन<br>(स्वप्नांत आणि प्रत्यक्ष) | ८७ |
| २८. | वरील भक्तास अनुग्रहदीक्षा. गुरुतत्व अभेद | ९० |
| २९. | १. आज्ञाकारी भक्ताच्या मुलाची मुंज श्रीक्षेत्र वाडीस<br>२. बटूस सौ. ताईंचे आशिर्वाद | ९३ |
| ३०. | १. भावुक भक्ताची पाद्यपूजेची इच्छा पूर्ण केली.<br>२. दीक्षेच्या २४ वर्षानंतर (दोन तप झाले जागा हो) | ९६ |
| ३१. | प्रयाग-काशी यात्रा (त्रिस्थळी) | ९८ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३२. | गोकर्ण क्षेत्री शिव (सलोकतामुक्ती) | १०१ |
| ३३. | गणेशदत्तरूप एकत्व (गणपतीचा मंत्र दिला) | १०४ |
| ३४. | १. सेकंदास तीन वेळा रामनाम जप<br>२. स्वप्नांत भागवत कथन | १०७ |
| ३५. | श्रींच्या उपदेशाचे सार | ११० |
| ३६. | श्रींच्या उपदेशाचे सार | ११३ |
| ३७. | आधुनिक विचारांच्या नास्तिक स्त्रियेचे हृदय परिवर्तन | ११६ |
| ३८. | गुरुप्रसाद (योगभ्रष्ट महात्मा) | ११९ |
| ३९. | मोहिनी घालून कुटुंबातील सर्वांना निद्रिस्त करुन<br>घरात मंगल करुन गेले. | १२२ |
| ४०. | १. मंगळवार व्रत<br>२. शिष्येचे संकटात रक्षण (फोटोतून प्रतिमा नाहीशी होणे) | १२५ |
| ४१. | ब्राह्मण पती पत्नीस सद्गती<br>तीर्थ अंगाऱ्यास स्पर्श करुन दिले-<br>अर्धांग वायू बरा झाला. | १२८ |
| ४२. | अनन्य शरणागताचे इहपर कल्याण | १३० |
| ४३. | वरील भक्ताचे घरी आगमन. स्वव्यवसाय सुरुवात.<br>व्यवसायातील अडचणी दूर केल्या.<br>बँक मॅनेजर अंहेतुक सहाय्य. | १३५ |
| ४४. | १. यंत्र चैतन्यरुप<br>२. वानरास उद्देशून प्रेमळ बोलणे<br>३. श्रीगुरुमहाराजांच्या फोटोचा हार नीट करणे<br>४. अमानित्व | १३९ |
| ४५. | त्यागार्थ गुरु | १४२ |
| ४६. | पंकज | १४४ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४७. | श्रीशंकराचार्य व श्रीडोंगरेमहाराजांनी महाराजांचा मोठेपणा दाखवून दिला. | १४७ |
| ४८. | १. दर्शनास येणाऱ्या भाविक भक्तांचे मनोगत<br>२. प्रवचन श्रवण करणाऱ्या भक्तांचे मनोगत<br>३. श्रीवासुदेव निवासाची मुख्य द्वारे उघडतच नव्हती. | १५० |
| ४९. | १. रेणूकानिवासात शोकेस ठेवली.<br>२. श्रीगुरुमहाराजांच्या पाद्यपूजेत बाहेर बुटांच्या ढिगाजवळ<br>३. राष्ट्रपती सन्मान (नवीन धोतर काय करायचे)<br>४. संहिता वाचनाची दक्षिणा गुरुजींनी घेतली नाही म्हणून देवासमोर ठेऊन दिली.<br>५. महाभारत सरस्वतीचे रुप. | १५३ |
| ५०. | १. कलियुगात षोडशांश भाग देवासाठी<br>२. राष्ट्रपतींनी दिलेले मानधन मिळाले नाही. मिळाल्यावर ७ चेक बनवून श्रद्धास्थानांना अर्पण<br>३. चांदीची उपकरणे–ब्रह्मश्री राजेश्वरशास्त्रींना दिली.<br>४. मी या शब्दाचा वापर कधीच केला नाही. (अमानित्व) | १५६ |
| ५१. | १. मलकापुरास भागवत सप्ताह (अंतर्यामित्व)<br>२. देऊळगांवकरांना सहस्त्र चंद्रदर्शनशांति (भक्तास बोलावून प्रसाद)<br>३. दत्तमूर्ति मुद्रांकित मुद्रा दिली.<br>४. श्रीमंत गरीब भेद नाही. गरीब पण भाविक भक्तांवर विशेष प्रेम | १५९ |
| ५२. | बीडचे देशमुखांची कथा | १६३ |
| ५३. | वेदशास्त्र शिक्षक<br>छात्र वात्सल्य<br>विदेशी छात्रांवरही कृपा<br>सर्व भाषांचा निर्माता परमेश्वर | १६७ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५४. | १. अपारशास्त्र निष्ठा<br>२. व्याकरणादिशास्त्रे अगाध आहेत.<br>३. पंडित सभांमध्ये झळकलेली अपूर्व विद्वत्ता<br>४. जरी वेदान्तनिपुण तरी व्यवहार पातळीवर योग्य उपदेश (योग्यतेप्रमाणे) | १७० |
| ५५. | १. य:क्रियावान् स पंडित: अश्वत्पूरचा हृद्य प्रसंग<br>२. प. पू. श्री नाना महाराज तराणेकरांना भागवत कथन<br>३. प. पू. सौ. ताईविषयी आदर<br>४. श्रीगुरुमहाराजांचा श्रीदत्तमहाराजांविषयी आदर | १७४ |
| ५६. | देहात्मवृत्ती नाहीशी.<br>१. कॉफीत साखर नाही.<br>२. प्रयागक्षेत्रातील अनुभव<br>३. जिन्यावरुन पडले | १७७ |
| ५७. | जालन्यास विष्णुयाग मुद्रिकातुला जिथे उद्याची भ्रांत नाही. | १८० |
| ५८. | १. अन्नामलाई विद्यापीठाची पदवी अग्राह्य ठरलेली पुन्हा ग्राह्य झाली.<br>२. चष्म्याच्या घरात पत्त्याची चिठ्ठी (भाडेकरुने घर सोडले) | १८३ |
| ५९. | संकट निवारण :<br>१. अगोदर सावध केले.<br>२. पेट्रोल नसता गाडी चालली.<br>३. मुंबई महापूर भक्तास वाचविले. | १८६ |
| ६०. | भजनाची गोडी 'वासुदेव भजनी मंडळी' | १८९ |
| ६१. | १. आम्ही वाफ घेतली बरं का !<br>२. खिडक्या उघडा.<br>३. डॉ. तळवळकरांचे अनुभव | १९२ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६२. | १. व्याधि निवारण<br>२. हॉस्पीटलमध्ये दुसऱ्या रुपाने येऊन गेले.<br>३. साई हॉस्पीटलमध्ये अगोदरच भक्तभगिनीचे नांव नोंदविले.<br>४. कॅन्सर घालविले. | १९५ |
| ६३. | पत्र पोहोचण्याचे चमत्कार !<br>पुण्याहून त्याच दिवशी पत्र.<br>खडर्याहून मुंबईला दुसऱ्या दिवशी मिळाले.<br>पत्र समोरच्या पेटीत टाकायला सांगितले. (आज्ञापालन) | १९८ |
| ६४. | गुरुंजवळ काय मागावे ?<br>१. कन्येच्या घटस्फोटाचा हट्ट<br>२. दत्तमंदिर स्थापनेचा हट्ट<br>३. महाराज रात्रभर कण्हतात. | २०१ |
| ६५. | १. गुरुचरित्रपारायण समाप्तीस दर्शन<br>२. पवित्र ही गंगा तुझ्या पायापाशी (फोटोवर पाण्याचे थेंब)<br>३. अर्थसल्लागार भक्तास स्वप्न दृष्टांत (उद्या अमुक व्यक्ति येणार आहे.) | २०३ |
| ६६. | भक्त कामकल्पद्रुम– श्रींसोबत पंक्ति भोजन कुळधर्माचा प्रसाद | २०६ |
| ६७. | हरिहरेश्वर गुरुचरित्रसप्ताह<br>१. संन्यासी सर्वोपरी<br>२. आमचे गुरुमहाराज नाहीत असे आम्हाला वाटतच नाही.<br>३. कुरवपूर भागवत सप्ताह<br>४. कृष्णामाई चरणस्पर्शास आली. | २०८ |
| ६८. | १. सामान्य वेदज्ञ ब्राह्मणाचे घरी भागवत सप्ताह<br>२. वांझ गाय सुफलित झाली. | २१० |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६९. | १. दत्तयाग गांवी जाऊ (देव उपाशी राहतील.)<br>२. भक्त महाराजांसोबत कृष्णामाईत स्नान करण्यास इच्छुक. श्री नारायण स्वामींची कथा सांगितली.<br>३. उंचीवस्त्र दिले की वाडीची आठवण. वाडीवर अतिशय प्रेम.<br>– गुरुदर्शनाचे पुण्य कार ला मिळाले.<br>– धुंडीराज महाराजांची आठवण – जुना पिंपळ.<br>– वाडीला श्वासाचा त्रास झाला.<br>– आम्ही वाडीला जातो ते सिलेंडरच्या भरवशावर नव्हे. | २१३ |
| ७०. | १. खरी कामं उत्सव झाल्यावर असतात.<br>२. रांजणगांवचा उंदीर<br>३. श्री वामननिवास बांधकाम. भक्ताच्या त्रासाबद्दल खेद. | २१६ |
| ७१. | १. श्री. अशोक महाराज आईसाहेबांवर रागावले.<br>२. कृतघ्नाने घर बळकावले.<br>३. जेजे भेटिजे भूत ते मानिजे भगवंत<br>४. एकनाथ महाराज कसे होते तर दत्तमहाराजांसारखे होते. | २१९ |
| ७२. | १. कुरवपूर भक्तांना पाण्यातून परत आणले.<br>२. पांचशे माणसांना भुरळ पडली. (सोसायटी आम सभेत) | २२२ |
| ७३. | मंत्र अनुग्रह घेण्याची तळमळ निर्माण झाल्यावर भक्ताच्या गावी येऊन अनुग्रह देऊन तेजोमय स्वरूपाचे दर्शन. | २२५ |
| ७४. | आम्ही आहोत नां ! | २२९ |
| ७५. | श्रींच्या जामातांचे अनुभव | २३२ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ७६. | श्रींची सगुणभक्ति–<br>१. देवावर निष्ठा<br>२. खीर नैवेद्यावर वाढायची राहिली.<br>३. नवरात्र उत्सव<br>४. देवांना काशीयात्रा<br>५. परतीच्या प्रवासात पूजा राहिली.<br>६. श्रीगुरुमहाराज नाहीत असे आम्ही मानत नाही.<br>७. श्रीनागनाथ स्वामी समाधीदर्शन हत्तरवाट<br>८. गणेशदर्शन | २३५ |
| ७७. | सत्यसंकल्प<br>दुसऱ्याची अक्कल आणि दुसऱ्याची नक्कल | २३८ |
| ७८. | विविध गांवीजाता तिथले अनुभव–<br>१. कळमनूरी भागवत सप्ताह<br>२. काश्यां तु मरणान्मुक्तिः<br>३. दौंडवाडी वरुणदेवतेला नैवेद्य<br>४. गोंदवले– आवाज बसलेला असतानाही प्रवचन<br>५. नागपूर– इतक्या प्रदक्षिणा कां घालता. | २४१ |
| ७९. | संचार– अनुग्रहासाठी पत्र. | २४४ |
| ८०. | १. भक्ताचे ऋण स्वतः फेडले.<br>२. स्वतःची नोकरी इमानेइतबारे करणे हीही आमची सेवाच.<br>३. त्यांची मने फार मोठी आहेत. (साधी वस्त्रे) | २४६ |
| ८१. | १. कोणी कोणास अनुग्रह द्यावा हे ईश्वर ठरवितो. (पॉल ब्रंटन चे उदाहरण)<br>२. तीर्थक्षेत्राचे स्मरण हे तीर्थयात्रेइतकेच पुण्यप्रद आहे. | २४८ |
| ८२. | विनोदी प्रसंग–<br>१. नवीन गुरुजींना दक्षिणा दे.<br>२. आता पेढे तर संपलेत.<br>३. तेथे काही वेणीदान नाही.<br>४. आम्ही आमच्या मंडळींना दोन दागिने केले.<br>५. त्यांच्या ऐवजी सुपारी ठेवली तर नाही कां चालणार ?<br>६. आमच्या मंडळींस दोन इंजेक्शन<br>७. वाडीत राहण्याबद्दल विनोद करुन सुचविले.<br>८. तुमच्या प्रमाणे आम्हाला उद्या रविवारची सुटी नाही. | २५० |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ८३. | १. प्रवचनात झोप घेऊ नये.<br>२. आज नका जाऊ. दुकान बंद असेल.<br>३. आम्ही मुलीकडच्या बाजूनीच आहोत. | २५४ |
| ८४. | १. अहो तिथे कुठलीच कमतरता नाही.<br>२. गुरुंना दक्षिणा सवाईनं द्यावी.<br>३. गाडीतून स्टूलावर बसवून आणले.<br>४. नापास झालं की त्या विषयाचा अभ्यास पक्का होतो.<br>५. भाड्याने घर मिळाले, चांगल्या माणसांची लवकर बदली होती नाही.<br>६. साबळे शेट येणारेत. | २५७ |
| ८५. | १. जप करुन घ्या म्हणजे काय ? केला पाहिजे नां !<br>२. काशीयात्रेत गाडीत चढवले.<br>३. पंढरीची वारी.<br>४. श्रींचे विविध फोटो काढले.<br>५. सौ. ताईंचा फोटो.<br>६. आम्ही सामान्य मर्त्य आहोत. | २६० |
| ८६. | १. दीक्षा<br>२. स्वप्न-किडनी ऑपरेशन<br>३. वाचन पूर्ण करुन घेतले.<br>४. कुंडीत आपोआप औदुंबर उगवला.<br>५. उभयता पती पत्नींस एकाच वेळी स्वप्न-<br>एकाला श्रीनृसिंहसरस्वती रुपाने<br>दुसऱ्याला दत्तमहाराजांच्या रुपाने<br>६. मैत्रिणीच्या मुलीचे मोडलेले लग्न जमून सर्व ठीक झाले. | २६४ |
| ८७. | १. श्री श्रीधरस्वामींची पोथी.<br>२. सौ. ताईंनी हळदीकुंकवाचे करंडे दिले.<br>३. यांना पुऱ्या वाढा. हे फराळ करुन आलेत.<br>४. स्वप्नांत दर्शन देऊन महासमाधीची सूचना. | २६७ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ८८. | १. प्रत्येक गुरुद्वादशीला वाडीला जा.<br>२. उद्या ॲडमिशन झाल्यावर पुन्हा इथे या.<br>३. उठा असे बसू नका ! काहीतरी वाचन करा.<br>४. काशीला जाणे झाले. कुरवपूरला सेवा घडली.<br>५. गाणगापूर यात्रा. परतल्यावर सौ. ताईंनी साडी पाठवली.<br>६. आपले कर्मभोग आहेत. | २७० |
| ८९. | १. पुण्याला जाऊ नका. पैशांचा अपव्यय होईल.<br>२. खडाखडी गुण दे.<br>३. महाराजांना अधिकाचे वाण.<br>४. खूप पाऊस पडला. (श्रींचा कौल मिळाला.) | २७३ |
| ९०. | १. वाडी व इतर अनेक तीर्थस्थान यात्रेत नेले. नेहमी सोबत ठेवले.<br>२. स्वत: वाढायला आले.<br>३. तुमच्या मुळे आम्हाला इथे लवकर जेवायला मिळते.<br>४. आमचा तर आता बंद झाला आहे. तुमचे पहा ! | २७६ |
| ९१. | १. सरस्वतीच्या मंदिरात गेलेल्यांची पादत्राणे राखण्याचे काम माझे आहे.<br>२. मिनिटस् रेकॉर्ड ठेवायला हवा.<br>३. मेंदूवर लेख (सकाळ मधला) | २७८ |
| ९२. | पौराणिक भूगोल व त्यावरुन पृथ्वीची रचना. | २८१ |
| ९३. | श्रींचे कृपेने विसरलेला प्रयोग पुन: प्राप्त झाला. ईशेच्छाच सर्व करविते. | २८४ |
| ९४. | १. ग्रंथ उघडल्याबरोबर केरळी डॉक्टरांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले.<br>२. भक्तांचे प्रश्न व श्रींची उत्तरे. | २८६ |
| ९५. | श्रींच्या उपदेशाचे सार | २८९ |
| ९६. | श्रींच्या उपदेशाचे सार | २९२ |
| ९७. | श्रींच्या उपदेशाचे सार | २९५ |

| अध्याय क्रमांक | ग्रहित विषय | संदर्भ पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ९८. | १. चार महावाक्ये<br>२. काव्यातून उत्तर (लीला समस्त अजित) | २९९ |
| ९९. | १. बुटके दार डोक्याला लागले.<br>२. श्रींचे घरी आगमन.<br>३. पत्रावर फक्त "सौ. ताई महाराज" | ३०३ |
| १००. | १. तुमच्याकडची गणेशमूर्ति फार छान आहे.<br>२. तुमच्या मनाप्रमाणे झाले ना.<br>३. नोकरी सोडू नका. (स्वत: होऊन पत्र पाठवले.)<br>४. ब्राह्मण दक्षिणेने संतुष्ट होतात. | ३०६ |
| १०१. | श्रींचे ठिकाणी विश्वरूप दर्शन. | ३०९ |
| १०२. | मुला-सुना-नातवंडांना शिकवण. | ३११ |
| १०३. | सौ. आईसाहेब कशा आहेत. (सामान्य अवलोकन) | ३१३ |
| १०४. | श्री कसेआहेत ? (जीवनसूत्र) | ३१७ |
| १०५. | १. ज्यांच्या वाडीला पादुका आहेत ते हे प्रत्यक्ष आहेत.<br>२. गुळवणी महाराज व श्री यांचे समत्व | ३२१ |
| १०६. | अभिचार प्रयोग | ३२४ |
| १०७. | सौ. आईसाहेब व श्रींचे महानिर्वाण | ३२७ |
| १०८. | श्रीनंतर कोण ?<br>१. अंत्यदर्शनाचे वेळी निळी शाल पांघरून दर्शन.<br>२. श्री अशोक महाराजांना आवाज ऐकू आला.<br>३. पोस्ट ऑपरेटिव्ह केयर युनिट मध्ये भक्त पत्नीला दर्शन<br>४. श्रीनंतर कोण ? धावा करताच आग्यामोहोळ पळाला.<br>५. केदारनाथ श्रींचे दर्शन<br>६. जालन्याचे महत्व<br>७. उपसंहार | ३३० |
| | श्री दत्तमहाराजांची आरती (संस्कृत) | ३३३ |
| | श्री दत्तमहाराजांची आरती (मराठी)<br>(आरती दत्तराजयांची धुंडीराज सुपुत्राची) | ३३४ |
| | परिशिष्ट - १ | ३३५ |

# अध्याय - १

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

ॐ नमोजी गणनायका । विश्वस्वरूपा विश्वनायका ॥
प्रणवस्वरूपा ज्ञानदायका । वक्रतुण्डा तुज नमो ॥१॥
जय जय माता सरस्वती । श्रुती जिला निरंतर स्तविती ॥
श्वेतांबरधारी भारती । तुझ्या चरणांसी वंदिते ॥२॥
ऐसे शारदा लंबोदर । नमन तयांसी वारंवार ॥
तुम्हीच बालिकेसी बुध्दि देणार । शब्द रचनेसी प्रेरणा द्यावी॥३॥
ऐसे मंगलाचरण करून । आरंभ केला ग्रंथ महान ॥
जरी मतिमंद पामर जाण । कर्ता करविता श्री गुरुदत्त ॥४॥
आता वंदन गुरुचरणांसी । सांभाळावे बालिकेसी ॥
शक्ति नसेचि तुज स्तविण्यासी । महत्पातकी मतिमंद ॥५॥
परि तू हातासी धरिले । मूढपण सर्व गेले ॥
शब्दज्ञान मजसी दिधले । तुझे गुण गावयासी ॥६॥
कैसी जरी असले मी। आम्हा आपुले म्हटले तू स्वामी ॥
मग कैसे हीनपण, कैसे तू-मी । आता ग्रंथ रचून घ्यावा ॥७॥
यस्य स्मरण मात्रेण । जन्म संसार बंधनात् ॥
विमुच्यते नमस्तस्मै । विष्णवे प्रभविष्णवे ॥८॥
ऐसे व्यास मुनींचे वचन । जाणोन घ्यावे सप्रमाण ॥
स्मरण होताच हरीचे जाण । सारे भवबंधन क्षणात तुटती ॥९॥
प्राणीमात्रांसी दुःखदायक । कष्टाचे मूळ तापदायक ॥
संसारबंध हाचि एक । त्यातून मुक्त होणे जरी ॥१०॥
तरी स्मरावे ईश्वरासी । निर्गुणासी अथवा सगुणासी ॥
निर्गुणरूप दुर्बोध जाणसी । तरी सगुण रूपासी भजावे ॥११॥
भक्त जनांते उध्दाराया । अनेक लीला करावया ॥
आला रमा-रमण अवतार घ्याया । अनेक वेळा भूलोकी ॥१२॥

अति पवित्र भारत भूमी । देव संतांची जन्म भूमी ।।
अवतरलासे ब्रम्हाण्डस्वामी । अनेक वेळा तियेवरी ।।१३।।
त्रेतायुगात श्रीराम । द्वापारात श्रीकृष्णश्याम ।।
अवतरला सह बलराम । आनंदधाम सृष्टिकर्ता ।।१४।।
तैसे या कलियुगात । आले श्रीगुरुस्वरूपात ।।
प्रत्यक्ष देव जगन्नाथ । श्री दत्त कवीश्वर अभिधाने ।।१५।।
संत पुरुषांच्या घराण्यात । सत्पुरुषांची परंपरा राखत ।।
आले कवीश्वरांच्या कुळात । सद्गुरु श्री दत्त प्रभू ।।१६।।
त्यांचे गुणवर्णन करावया । भक्ता आनंद द्यावया ।।
सगुण भक्तिचा स्वाद घ्यावया । लेखन प्रपंच हा केला ।।१७।।
मी मूढ अज्ञानी मंदमती । नेणे काव्य-लेखन-स्तुती ।।
श्रेय पूर्णपणे त्या ज्ञानाधिपती । माझे काहीच नाही त्यात ।।१८।।
मुंगी म्हणे करीन भूप्रदक्षिणा । छाया म्हणे झाकीन सूर्यनारायणा ।।
तैसेच प्रयत्न हे जाणा । अशक्यप्राय वाटतसे ।।१९।।
परि तू मूका करिसी वाचाळ । पांगळा लांघविसी हिमाचळ ।।
ऐसी तुझी ख्याति अविचळ । म्हणोनी तुजवरी टाकिते भार हा ।।२०।।
श्रीकृष्णे अर्जुनासी दिली दिव्य दृष्टी । स्वकृपे दाखविली निज सृष्टी ।।
तशीच कृपेची मजवरी वृष्टी । करी प्रार्थना ऐसी असे ।।२१।।
श्री दत्तांची राजधानी म्हणावी । नरसोबाची वाडी ख्याती पावी ।।
त्याच श्री दत्तप्रभूंच्या गावी । या चरित्राची सुरूवात ।।२२।।
अनेक सत्पुरूषांची जन्मभूमी । दिव्य द्रष्ट्यांची कर्मभूमी ।।
जेथे राहिले सद्गुरु यतिवर स्वामी । ऐसी ती नृसिंह वाटिका ।।२३।।
श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंहयति । सद्गुरु श्री नारायण यति ।।
आणिक अनेक संतांची गणती । करू न शके ही जिव्हा ।।२४।।
श्री रामचंद्रयोगी स्वामी । सांगावे म्हणती गोपाळस्वामी ।।
जेव्हा सदेह श्री नारायणस्वामी । जाती वैकुंठ लोकांस ।।२५।।
सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती । तैसेच श्रीनृसिंह दीक्षित यति ।।
या सर्व दिव्य आगळ्या विभूती । करिती कृपा कवीश्वरांवर ।।२६।।

मांडवगणे नगर जवळी। या कवीश्वर कुळाची मुळी ॥
आडनाव सप्तर्षी असे कुळी । गोत्र उपमन्यु असतसे ॥२७॥
शुक्ल यजुर्वेदी ब्राम्हण । माध्यंदिन शाखा जाण ॥
शास्त्र पंडित धर्म परायण । संत पुरुषांचे घराणे हे ॥२८॥
पणजोबा श्री दत्त कवीश्वरांचे । नांव दाजी दीक्षित त्यांचे ॥
वाईस स्थायिक असती साचे । धर्म कर्म शास्त्र प्रवीण ॥२९॥
साताऱ्याच्या दरबारात । निर्णय देण्या आमंत्रित ॥
धर्म विरूध्द निर्णय न देता त्वरित । स्थान त्याग तो केला ॥३०॥
नरसोबाचे वाडीस घोड्यावरून । आले स्थान त्याग करून ॥
धर्मपरायणतेची ही खूण । पिढीजात दिसतसे ॥३१॥
ते नित्य देवापुढती । स्तोत्र रोज नूतन करिती ।
यतीश्वरा काव्य आवडती । नांव जाहले कवीश्वर ॥३२॥
यांचे घरी सद्गुरु कृपेने । जन्म घेती श्री इच्छेने ॥
श्री दत्त आले पोटी सगुणे । अभिधाने सुंदर वक्रतुण्ड ॥३३॥
रेणुका माता कुलस्वामिनी । प्रसन्न वदने राहती सदनी ॥
गणेश–भक्ति परंपरेनी । होतसे या कुळात ॥३४॥
आचार निष्ठता आणिक । भक्ति आचरती सकळीक ॥
संत कृपेने प्रसन्न देवादिक । ऐसे थोर कवीश्वर सकल ॥३५॥
तयांचे गुण वर्णाया । मति द्यावी गुरुराया ॥
जन्म दत्ताचा पुढील अध्याया । माता पितरांचे वर्णन ॥३६॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पहिला अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - २

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

## पद

जय गजानना गिरिजा वरा । तुज चरणी नमन निरंतरा ॥१॥
चतुर्भूज पाशांकुशधरा । प्रिय तुजला दुर्वांकुरा ॥२॥
ज्ञान भक्तिचा दाता रे तू । तव पूजन आवडे कवीश्वरा ॥३॥
रिध्दि-सिध्दीचा स्वामी अससी । नेसलासी रक्तांबरा ॥४॥
रक्तपुष्पांने पूजिले तुज । शोभे वरती दुर्वा-तुरा ॥५॥
मोरगांवचा सिध्दि विनायक । दादा दीक्षिता देई वरा ॥६॥
स्वयंभू तुझी सुंदर मूर्ती । देसी तयांना विघ्नहरा ॥७॥
दुर्वांकुर भक्षुनी आचरीली । उपासना तव लंबोदरा ॥८॥
तपः प्रभावे पुत्र प्रसविले । ब्रम्हरूप कुळ कवीश्वरा ॥९॥
गुण वर्णाया बुध्दि द्यावी । मतीहीन मज पामरा ॥१०॥
सद्गुरु सेवा करूनी घ्यावी । वर्णुनी संत परंपरा ॥११॥

## ओवी

ऐसे करिता स्तवन । श्रीगजानन झाला प्रसन्न ।
रूप जयाचे ॐकारप्रधान । सद्गुरु स्वरूपची असे जो ॥१॥
शब्द-ब्रम्ह गणपती । आणि वागीश्वरी सरस्वती ।
सद्गुरु श्री नरसिंह यति । ग्रंथ रचनाकार पै ॥२॥
वक्रतुण्ड कवीश्वर । प्रवचन करीती भारतावर ।
आणि ग्रंथराज भागवतावर । श्रोते मंत्रमुग्ध होती ॥३॥
तयांसी नसे संतती । म्हणोनी मनांत खंती ।
संन्यासाचा हट्ट धरिती । श्री गोविंदस्वामी जवळ ॥४॥

तयांनी दीधला 'दत्तूबाळ'। म्हणे करी याचा सांभाळ ।
ही दत्त मूर्तीच तुमचे बाळ । साश्रु नयनी स्वीकारले ॥५॥
शुभ पाउले दत्तूबाळाची । कूस उजवळी सावित्रीची ।
माता ती परम भाग्याची । प्रसविलीसे पुत्र रत्न ॥६॥
धुंडीराजशास्त्री नामाभिधान । ईश्वर भक्ति परायण ।
झालासे वेद शास्त्र निपुण । पुराण सेवा करी वाडीसी ॥७॥
हणमसागर कन्येशी । विवाह झाला शुभदिवशी ।
गंगूची सरस्वती होशी । होता गृहलक्ष्मी सुंदर ॥८॥
श्री वासुदेवानंद यति । प्रसन्न असती या दंपती ।
होत नव्हती संतती । करवी उपासना 'धर्म-सिंधूतील' ॥९॥
प्रदक्षिणा वाडीस घालित । नेम सासुबाईचा चालवित ।
अतिथी सेवा मनोभावे करित । करी सरस्वती धर्माचरणा ॥१०॥
भ्रमण करी पतिसहवर्तमान । परमार्थासी ओपिले जीवन ।
जे वासुदेवांचे श्री वाङ्मय सधन । उत्तम स्त्रीयांनी वाचणे ॥११॥
ते नेतसे बरोबरी । तयांचा ती प्रचार करी ।
म्हणे हे वाचा हो नारी । वाढवी ईश्वर निष्ठेची तळमळ ॥१२॥
ऐसे सत्वशील माता-पिता । जन्म घेई जगत् पिता ।
यांच्या पोटी तत्वता । आश्चर्य नसे तयांत ॥१३॥
सर्वेपि सुखिन: सन्तु । उद्देश्य पूर्वजांचा हाच सतत् ।
वैयक्तिक उपासनेचा हेतू । सर्व-कल्याण जाणावा ॥१४॥
न्यायिन: सिध्दि: म्हणून । श्रीवक्रतुण्ड बुवांनी लिहिले वचन ।
परहितार्थ सर्व ईशसेवन । परंपरा त्यांची हीच असे ॥१५॥
समष्टि कल्याणाकरिता । कुळाची उपासना जी तत्वतां ॥
पिढीजात झटणे परहिता । त्या करिता संत जन्मले ॥१६॥
शुध्द बीजाचे उदरी । प्रचूर घेऊन रस माधुरी ।
फळे उपजती गोजिरी । याचीच प्रचीती येतसे ॥१७॥
डोहाळे लागले सरस्वतीला । गर्भ दिव्य आला कुशीला ।
कृपाप्रसाद गुरूंचा लाभला । पोटी आले श्री दत्त ॥१८॥

माघ वद्य षष्ठी ही तिथी । सर्व ग्रहांची उत्तम स्थिती ।
बुधवारी 'दत्तूबाळ' जन्म घेती । उष:काली सहा वाजता ॥१९॥
लोभसवाणे रूप सुंदर । बाळा दृष्ट लागेल फार ।
लिंबलोण उतरती नार । गाली तीट लाविला ॥२०॥
आनंदले मातेचे मन । पाहुनी सुहास्य वदन ।
वात्सल्ये भरले अंत:करण । नामकरणाचे वेळी ॥२१॥
गोविंद घ्या बाई गोपाळ । पाळण्यात ठेविला बाळ।
'दत्तात्रेय' नाम ठेविले रसाळ । दिव्य पुत्र रत्नाचे ॥२२॥
देवादिक आले दर्शना । नभी दुंदुभी करी गर्जना ।
नर्तन करिती नृत्यांगना । गंधर्व अप्सरा पातल्या सदनी ॥२३॥
सर्व देवादिक थांबती । मनोभावे श्रवण करिती ।
माता प्रेमे पाळणा गाती । बाळा दत्तात्रेयासी जोजवी ॥२४॥

## पाळणा

जो जो जो जो रे । सुकुमारा ॥ दत्तात्रय अवतारा ॥
जो जो जो जो रे ॥धृ॥

वाडी क्षेत्राला । जन्मला । सरस्वती कुशी आला ।
तेज आगळा । फाकला । दिशा दाही धुंद झाल्या ॥१॥
धुंडीराज पिता । प्रसन्न । पाहुनी पुत्र वदन ।
अंतरीची खूण । पटून । पावले समाधान ॥२॥
दिव्यत्वाचे हो । त्या लेणे । वैराग्य भूषणे ।
ईश-मायेचे । खेळणे । वेदांची कंकणे ॥३॥
सर्व विश्वाचा । तू पिता । तुजला जोजवी माता ।
देवकार्यासी । तत्वता । जन्म घेसी तू त्राता ॥४॥

## ओवी

ऐसे गाऊनी प्रेमभरीत । माता पाळणा डोलवीत ।
मध्ये दत्त बाळ हासत । पाहुनी गंमत भूतळीची ।।२५।।
एके दिवशी सुप्रभाती । बाळा घेऊनी सरस्वती ।
ओटीवरती बसली होती । पडती कानी दिव्य स्वर ।।२६।।
मुखी दिगंबरा म्हणत । आले वासुदेव यति दत्त ।
तयांना बघुन त्वरित । दुपट्यावरी दत्ता ठेविले ।।२७।।
आसन देउनी यतीश्वरा । जाई माता आंत घरा ।
फळे आणण्या गुरुवरा । बैसले यति बाळा सन्निध ।।२८।।
घेतले मांडीवरी बाळासी । म्हणे वक्रतुंडा आलासी ।
हर्ष होऊनिया मानसी । वदती श्री वासुदेवानंद ।।२९।।
जरी देह असती दोन । तरी तुम्ही आम्ही समान ।
आम्ही भगवे वस्त्र केले परिधान । तुमचे श्वेत वस्त्र असती ।।३०।।
हे असे म्हणोनी हासत । वदन बाळाचे अवलोकित ।
हे दृश्य पाहुनी अद्भुत । माता चकीत जाहली ।।३१।।
जाणिले खरे स्वरूप । दत्तात्रेयाचे आपोआप ।
हर्ष झाला मनी अमाप । माता-पिता आनंदले ।।३२।।
धुंडीराज कवीश्वर । थोर संत अमर ।
मराठवाड्याचे गुरुवर। थोर पुत्र तैसाची ।।३३।।
माता-पिता बाळा जपती । पुत्राची जाणोनी ख्याती ।
एकेरी हांक कधी न देती । म्हणती रूप यतीश्वरांचे ।।३४।।
ऐसा हा दिव्य बालक । अवतरला विश्व चालक ।
दिन-रात वाढे क्रमिक । कृष्णामाईचे अंकावरी ।।३५।।
बाळलीला गुण वर्णन । तैसेच त्यांचे शिक्षण ।
पुढील अध्यायी वर्तमान । रसाळ चरित्र आघवे ।।३६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
दुसरा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

अहो माहात्म्यं ते, शुक जनक आहात्र हिं महा।
बले शादासिन्धोरुभय तटसंस्थेषु बहुषु ॥
महातीर्थेष्वग्र्यं, नृहरिपुरी तीर्थाष्टिकमिदं ।
नमः श्री कृष्णे ते जय शमित तृष्णे गुरुमते ॥१॥ – कृष्णालहरी

कृष्णामाईचे रम्य तीर । यतीश्वरांच्या पादुका मनोहर ।
कृपा साऊली देणार औदुंबर । ऐसी अनुपम नरसोबा वाडी ॥२॥
दिव्य विभूतिंची परंपरा । अखंड चालत सुंदरा ।
श्रेष्ठ संन्यासी योगीवरा । वास केला ये स्थळी ॥३॥
राजधानी श्री दत्ताची । ऐसी महिमा वाडीची ।
जरी उपमा तिला द्यायची । म्हणावे भूलोकीचे वैकुंठ ॥४॥
निसर्गरम्य ये स्थळी । नित्य रममाण वनमाळी ।
खेळे दत्तूबाळ बाल्यकाळी । तियेच्या मांडीवर ॥५॥
आईची चाले प्रदक्षिणा । कट्यावर खेळे दत्तराणा ।
मातेची परीक्षा पाहण्या । आगळा प्रसंग जाहला ॥६॥
अर्धी झाली प्रदक्षिणा । दत्तात्रेय पडला कृष्णेच्या पाण्या ।
जरी पाही माता नयना । अविचल भाव तियेचा ॥७॥
प्रदक्षिणा करूनी पुरी । नरसिंह यतीसी नमस्कारी ।
मग धावली तिरावरी । पुत्रास आपल्या पहावया ॥८॥
बाळास काढुनी तिरावरी । घेतलासे अगोदरी ।
पोहणाऱ्या लोकांनी तरी । मातेने अंकी घेतले ॥९॥
परीक्षेत उतरली माता । संतोष जाहला जगन्नाथा ।
ऐसी माता ऐसा पिता । धर्मपरायण भक्ति निष्ठ ॥१०॥
असो या दत्तूबाळाचे । मौजीबंधन जाहले साचे ।
आठव्या वर्षी वयाचे । अनुपम सोहळा तो सुंदर ॥११॥

भरविला सरस्वतीने ग्रास । मातृभोजनाच्या समयास ।
कौतुक केले त्याचे खास । तये वेळी आजीनी ।।१२।।
मांडीवरी बैसला पुत्र । धुंडीराज सांगती गायत्री मंत्र ।
जमले द्विजवर सह कलत्र । थाट मोठा जाहला ।।१३।।

## मुंजीचे गीत

गायत्री चा द्रष्टा ऋषीश्वर, अवतरला या भूवरी ।
द्विज होवोनी पुनश्च सुंदर, ब्रम्हचर्या स्वीकारी ।।१।।
वेद, पुराणे आणि उपनिषदे, स्वये प्रगटली या भूमीवरी ।
त्यांचे श्रवण पुनः कराया, दत्त झाला ब्रम्हचारी ।।२।।
यज्ञोपवीत धारण करूनी, शिखेचे बंधन करी ।
पितयाला त्या गुरु करूनी, गायत्री मंत्र श्रवण करी ।।३।।
नरसिंह यतीश्वर ज्याप्रमाणे, मौंज त्यांची झाल्या उपरी ।
मौन त्यागुनी करिते झाले, वेद घोष ते उच्च स्वरी ।।४।।
त्याप्रमाणे पूर्ण भिनले, वेद-शास्त्र्यांच्या शरीरी ।
लोकहितार्थ साऱ्या लीला, संस्कृती अपुली जतन करी ।।५।।
बटु दत्तात्रेय शोभे सुंदर, वामन अवतारापरी ।
ब्रम्हज्ञानाचे तेज फाकले, विनयाची परी वृत्ती बरी ।।६।।
आम्रवृक्षी फळे लागली, फांद्या झुकल्या पृथ्वीवरी ।
नम्रतेचे लेणे लेउनी, ज्ञानियांचे भूषण ठरी ।।७।।
जन्मा येता ब्राम्हण एक, सूर्य स्वतः गोदान करी ।
मौंजीबंधन दुसरा जन्म, म्हणोनी द्विज हे नाम उरी ।।८।।
जन कल्याणा जन्म जयांचा, शास्त्रशुध्द आचरण करी ।
वळण लावण्या सकल जनांना, स्वतःच तैसे वर्तन करी ।।९।।
वंदन त्यांच्या चरणी करूया, दीनांचा उद्धार करी ।
बटुकेश्वर दत्तात्रेय अमुच्या, कृपाहस्त तू ठेव शिरी ।।१०।।

## ओवी

बटु बाळ ब्रम्हचारी । ॐभवती उच्चारी ।
आनंद भरला चराचरी । ज्ञान-वैराग्याची भिक्षा मिळता ।।१४।।
आधीच अंगीचे देवपण । त्यात दिव्यत्वाची खूण ।
केले यतींचे कृपामृतपान । अधिकाधिक चैतन्य फुलला ।।१६।।
जन्मतःच शुद्ध हिरा । वेद शास्त्रांचे पैलू सुंदरा ।
पडोनी चमचमला बरा । शोभला अध्यात्म्याच्या शिरी ।।१७।।
मुंजीबंधन झालिया उपरी । जेरे स्वामींच्या पाठशाळे भीतरी ।
संस्कृताचे अध्ययन करी । काव्य आणि व्याकरण ।।१८।।
श्री गुरुचरित्राचे वाचन । करी नित्य अध्ययन ।
सातवी पर्यंत शिक्षण । झाले नरसोबाचे वाडी ।।१९।।
श्री नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी । मंत्रोपदेश देई समागमी ।
वृत्ती होती ईश्वर गामी । ब्रम्हज्ञान जाहले ।।२०।।
ऐलतीरी पादुका मनोहर । पैलतीरी श्रीदत्त अमरेश्वर ।
चौसष्ट योगिनींचे स्थान सुंदर । तट कृष्णेचे पवित्र ऐसे ।।२१।।
दोन्ही ठिकाणी असे भक्तिभाव । श्रीगुरुदर्शनाची हाव ।
पैलतीरी दीक्षित यति राव । ओढ मनाची तिकडे असे ।।२२।।
वाटे वारंवार जावे । सद्गुरुंना भेटावे ।
हितगूज तयांसमवेत करावे । मनसोक्त प्यावे कृपामृत ।।२३।।
आईवडील जाती देऊळ गांवी । आजी समवेत राहती वाडी गांवी ।
व्यंकटेश शास्त्री अभ्यंकर या नावे। सांगलीस असती वेदशास्त्र प्रवीण ।।२४।।
त्यांचेकडे व्याकरण । शिकले दत्तमहाराज आपण ।
तरल सूक्ष्मबुध्दि जाण । सर्व आत्मसात करितसे ।।२५।।
शिकावया गेले सांगलीस । आले होते वाडीस ।
गुरुभेटीची मोठी आस । आजीस म्हणे जातो औरवाडी ।।२६।।
आजी म्हणे असे अधिक महिना । आहेत ब्राम्हण भोजना ।
जरी केलेत औरवाडी गमना । परत येणे न होई वेळेवर ।।२७।।

दत्तात्रेय म्हणे मी निश्चित । येईन योग्य वेळेपर्यंत ।
गुरुभेटीची तळमळ नितांत । घरी थांबू देईना ।।२८।।
जावयाचे जरी अमरेश्वरी । पोहून जावे लागे पैलतीरी ।
उडी घेतली कृष्णेच्या पूरी। तरून गेले सद्‌गुरु जवळी ।।२९।।
तेथे शोभिवंत यतिमूर्ती । प्रसन्न वदने दर्शन देती ।
प्रेमे विचारपूस करिती । कौतुक करिती शिष्याचे ।।३०।।
म्हणे आलेत पोहून । देती कोरडे वसन ।
नेसावया लागून । उपरणे घालिती अंगावरी ।।३१।।
गुरु म्हणे जा प्रसाद घेऊन । दत्त म्हणे आजी पाहील वाट म्हणून ।
सद्‌गुरुंचा निरोप घेऊन । निघाले दत्तात्रेय शास्त्री ।।३२।।
सद्‌गुरुंच्या दर्शनाने । स्नेह पूर्ण स्पर्शाने ।
सुहास्य मधुर शब्दाने । भारावलेले अंतःकरण ।।३३।।
त्या नादात पोहती जळी । भोवऱ्याच्या गेले जवळी ।
सापडले त्यात बुडती अगाध जळी । खोल खोल जाऊ लागले ।।३४।।
मनांत म्हणती घरी ब्राम्हण भोजन । विपरीत न घडावे जाण ।
जातो नदी तळी आपण । तोच दिव्य दर्शन झाले ।।३५।।
प्रत्यक्ष भगवान श्री दत्तात्रेय । होऊ न देता काही अपाय ।
हात देवून तारिती गुरुराय । प्रकाश सर्वत्र पसरला ।।३६।।
सद्‌गुरुंचा कृपा प्रसाद । मिळाला असे निर्विवाद ।
भक्त रक्षणाचे ब्रीद । कैसे विसरेल भगवंत ।।३७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
तिसरा अध्याय गोड हा
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ४

॥ श्री गणेशदत्तगुरूभ्योनम: ॥

मंत्रगुरू धुंडीराज महाराज । मोक्षगुरू दीक्षित यती महाराज ।
थोर विभूती योगीराज* । दत्तमहाराजांचे दीक्षा गुरू ॥१॥
उत्तम संस्कार थोर ज्ञान । दृढ वैराग्य शम-दम साधन ।
सतत ईश्वराचे अनुसंधान । दया-क्षमा निर्विकार वृत्ती ॥२॥
मुख्य सद्‌गुरूचे लक्षण । आधी पाहिजे विमल ज्ञान ।
निश्चयाचे समाधान । स्वरूप स्थिती ॥३॥ - दासबोध
हे सर्व गुण केले आत्मसात । यांच्या नित्य सहवासात ।
ब्रम्हज्ञान साठविले अंतरात । सामान्य व्यवहार जनांत दावी ॥४॥
नरसिंह सरस्वती दीक्षित यति । मोठे महाराजही त्यांचे गुण गाती।
आम्हाहून कांकणभर सरस म्हणती । दत्तमहाराजांवरी त्यांचे प्रेम ॥५॥
बालपणी त्यांच्या समवेत । तीर्थयात्रा केल्या समस्त ।
कृष्णा पंचगंगा क्षेत्रात । पंचक्रोशी यात्रा झाल्या ॥६॥
त्यांचे अनेक बालभक्त । त्यांना फार प्रिय असत ।
निघाले गुरूंचे भजन करीत । कृष्णेतून जाती नौकेवरी ॥७॥
कोल्हापूरी यात्रा येता । पालक आले मुलांना नेण्याकरिता ।
मुले सर्व रडू लागता । स्वामी महाराज गहिवरले ॥८॥
ऐसी बाल भक्तांची प्रीति । सद्‌गुरूही तयांवर कृपा करिती ।
त्यांत दत्तात्रेय मुकुटमणी असती । स्वामींचे प्रिय शिष्य ॥९॥
औरवाडी स्वामी परत येता । म्हणती या ठिकाणी आता ।
भागवत सप्ताह तत्वतां । केला पाहिजे ये वेळी ॥१०॥
बोलाविले दत्तात्रेय शास्त्र्यांसी । अत्यानंद झाला मानसी ।
म्हणती वाचा मूळ ग्रंथासी । ऐसी आज्ञा करीत ॥११॥
लहानगे दत्तात्रेय शास्त्री । नुकतीच संस्कृताध्ययनी सुरूवात म्हणती ।
संहिता वाचण्यास श्रीगुरू आज्ञापिती। तरी त्यांचे कार्य ते करवितील ॥१२॥

---

* श्री गुळवणी महाराज

बालशास्त्री संहिता वाचत । दीक्षितस्वामी जवळी बैसत ।
कृपादृष्टी ठेविती सतत । सप्ताह आनंदे पूर्ण झाला ।।१३।।
संतोष झाला दीक्षित स्वामीसी । हात फिरवुनी पाठी दत्तात्रेयासी ।
वदले आनंदुनी मानसी । मोठा ज्ञानी होशील ।।१४।।
तू माझा प्रिय भक्त । होशील जगद्विख्यात ।
असा आशीर्वाद देत । दत्तूबाळासी प्रेमाने ।।१५।।
शाल पांघरली अपुल्या हस्ते । रजत संध्यापात्र दिले गुरुनाथे ।
म्हणे आता मिरवणूक काढू समस्ते । म्हणून नौका सजविली ।।१६।।
नौकेत बैसले श्रीगुरु । भक्तकामकल्पतरु ।
दत्तात्रेय त्यांचे लेकरू । जवळी बैसलेसे ।।१७।।
हातात भागवत ग्रंथ महान । प्रेमाश्रूंनी भरले नयन ।
सगळे करिती 'दिगंबरा' भजन । कृष्णेच्या पाण्या नौका डोले ।।१८।।
दोन्ही तीरावरी लोक । मिरवणूक पाहती अलौकिक ।
नेत्र झाले सार्थक । कौतुक केले गुरुवरे ।।१९।।
गुरु सांगती दत्तात्रेयासी । माझ्या संगे येण्या इच्छिसी ।
परी माझे कार्य करीसी । करी सेवा बड्या बापजींची ।।२०।।
येथे क्षेत्र अमरेश्वरी । माझे सद्गुरु वास करी ।
तयांचे स्थान हे मनोहरी । योगिनींच्या समवेत ।।२१।।
प्रतिवर्षी भाद्रपद मासी । वंदन करूनी गुरु पादुकांसी ।
भागवत सांग लोकांसी । सप्ताह करूनी मंगल ।।२२।।
भागवत ग्रंथ वाचण्याचा । त्यावरी निरूपण करण्याचा ।
आरंभ येथून झाला साचा । श्री दत्तात्रेय शास्त्र्यांचा ।।२३।।
अनेक स्थानी मनोरम । भागवत सप्ताह झाले अनुपम ।
लोककल्याणार्थ परम । योजना श्री यतिवरांची ।।२४।।
चाळीस वर्षे अमरेश्वरी । भागवत सप्ताह सेवा करी ।
योगीराज गुळवणी आज्ञा करी । पुढे वासुदेव निवासी होती सप्ताह ।।२५।।
भागवत पुराण अत्युत्तम । व्यासादिकांचे तयावरी प्रेम ।
श्रीकृष्णभक्ति होते सुगम । श्रवण तयाचे केल्याने ।।२६।।

बाळपणी दत्तूबाळाने । सोडून सर्व क्रीडा साधने ।
हातात उचलली गीता क्षणे । त्यावरूनच ओळखावे ।।२७।।
जन्मतःच दृढ भक्ति । ईश्वरावरी अति प्रीति ।
ब्रम्हज्ञान त्यांची मति । आत्मसात करिती जाहली ।।२८।।
या प्रसंगी दीक्षित स्वामींना । दिसत होती पुढील ईश्वरी योजना ।
दत्तात्रेय शास्त्र्यांच्या प्रवचना । श्रोते सहस्त्रावधी लुब्ध होतील ।।२९।।
पुढील ईश्वरी कार्य करविण्या । आशीर्वाद देई यतिराणा ।
संस्कार बालभक्तावरी करण्या । सप्ताह भागवताचा करविला ।।३०।।
दीक्षित स्वामींचा सहवास । त्यांच्या कृपेचा हव्यास ।
त्यांच्या दर्शनाचा ध्यास । हे सर्व दत्तात्रेया घडविती ।।३१।।
मजसी नको पाठशाळा । लागला सद्गुरूंचा लळा ।
पोचवा तयांचे पदकमळा । म्हणोनी रडला बालभक्त ।।३२।।
अर्ध्या यात्रेतून । वडीलांनी आणले ओढून ।
कष्टी होऊन रूदन । केले बालभक्ताने ।।३३।।
ही तळमळ जाणोन । यात्रेवरून परतोन ।
त्यांचे केले पाचारण । सोहळा अलौकिक घडविला ।।३४।।
आता दत्तात्रेयांचे अध्ययन । विद्यार्जनाचे व्यसन ।
वेदान्त शास्त्रज्ञान केले संपादन । पुढील अध्यायी कथाभाग ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौथा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

नमन सरस्वतीचे चरणी । जी वेद विद्या प्रदायिनी ।
बैसली श्वेतांबर नेसोनी । हंसावरी जी माता ॥१॥
हाती धरिली पुस्तक वीणा । कृपामृत भरले नयना ।
तिच्या वात्सल्याचा पान्हा । मिळता अज्ञान कैसे राही ॥२॥
गुरुंचे करणे गुणगान । हे कार्य कठिण महान ।
यास्तव तुजसी आवाहन । करिते चरणांसी वंदुनी ॥३॥
सद्‌गुरुंचे हे चरित्र । रसाळ आणि परम पवित्र ।
मेरु पुढे रेणू मात्र । बुद्धि अल्प मम त्यापरी ॥४॥
ग्रंथ हा काव्यात्मक । दावुनी तुझ्या शक्तिचे कौतुक ।
उत्तम करूनी प्रासादिक । राही निवसोनी तयातचि ॥५॥
विद्यास्वरुप ब्रम्हाणी । लक्ष्मी जी धनस्वामिनी ।
गौरी शक्तिरुपिणी । त्रिरुपांत एक "शशिकला" ॥६॥
जालन्यांत जी वसे । भक्तांस वर देतसे ।
तिच्या संकल्पेच होतसे । या ग्रंथाचे लेखन ॥७॥
या ग्रंथाच्या श्रवणे । भक्ती, वैराग्य आणि ज्ञाने ।
भरावी श्रोत्यांची मने । ऐसे करी गे माते तू ॥८॥
कवीश्वरांच्या कुळात । भक्ती तुझी पिढीजात ।
त्यांच्या ग्रंथी आशीर्वादे । आई असावे कृपावंते ॥९॥

परमपूज्य श्री दत्तात्रेय । वेदाभ्यासी रमती जरी लहान वय ।
संपादिले परम पावित्र्य । व्रत, उपोषण, तपश्चर्ये मुळे ॥१॥
पुण्य नगरीत तयांचे । 'मीमांसाविद्यालये' शास्त्रांचे ।
जवळ श्री सुब्बाशास्त्र्यांचे । अध्ययन पूर्ण जाहले ॥२॥
वेदान्त, अलंकार तथा । धर्मशास्त्राचिया ग्रंथा ।
अभ्यास करोनि तत्वतां । पदव्या मिळवी परीक्षा देवूनी ॥३॥

वेदान्त अभ्यासणे जरी । साधन चतुष्टय संपत्ती बरी ।
बाणवावी अंगी खरी । त्यालाच आहे अधिकार ।।४।।
शमादि षट् संपत्ती । इहामूत्रफलभोग विरक्ती ।
विवेक नित्यानित्य वस्तू प्रति । तीव्र मुमुक्षुत्व आणिक ।।५।।
या चारी आत्मसात करणे । तैसेच बोलणे तैसेच राहणे ।
ऐसे जयाचे वागणे । त्यानेच वेदान्त अभ्यासावा ।।६।।
अद्वैत वेदान्त शास्त्र । तसेच न्याय शास्त्र ।
अभ्यासिले मिमांसा शास्त्र । श्री दत्तमहाराजांनी ।।७।।
तसा त्यांचा अधिकार । होता बुध्दिचा प्रसार ।
तरल सूक्ष्मतम विचार । म्हणोनी शास्त्र सर्व अंगीकारी ।।८।।
उपनिषदातील सिध्दांत । रहस्यमय ते नितांत ।
प्रतिपादन करी वेदान्त । या विविध सिध्दांतांचे ।।९।।
अद्वैत वेदान्त दर्शन । सर्व वेदांचे सार जाण ।
ईश्वराचे रूप चिरन्तन । तया माजी वर्णिले असे ।।१०।।
ईशावास्य,केन,ऐतरेय । मांडुक्य, छांदोग्य, तैत्तिरीय ।
वेदांचे अनेक उपनिषद होय । त्यावर आचार्य भाष्य करी ।।११।।
उपनिषदांवरील भाष्य । आणिक ब्रम्हसूत्र भाष्य ।
तैसेच गीता भाष्य । हे वेदान्ताचे मुख्य ग्रन्थ ।।१२।।
ईश्वर कैसा निराधार । अनादि अनंत निराकार ।
व्यापिलेसे चराचर । हे वर्णन वेदान्ती ।।१३।।
तैसेच गूढ न्यायशास्त्र । नि:श्रेयस प्राप्तीचे हे शास्त्र ।
वस्तुतत्वाची परीक्षा मात्र । तर्कसहाय्ये ह्यात केली ।।१४।।
पृथीव्यादि नऊ द्रव्ये असती । तयांचे विविध गुणधर्म निश्चिती ।
एकमेकांशी त्यांची व्याप्ती । अव्याप्ती देखील वर्णिती ।।१५।।
वेदान्ताचे ज्ञान सुगम होणे । हे न्यायशास्त्राचे उपयोग जाणणे ।
सांगोपांग अध्ययन त्या कारणे । महाराजांनी त्याचे केले ।।१६।।
ज्ञानकांड, कर्मकांड हे दोन । श्रुतीचे भाग असती समान ।
कर्मकांड वेदांचे पूर्वखंड जाण । ज्ञानकांड हे उत्तरखंड ।।१७।।

यासाठी कर्मकांडासी । पूर्वमीमांसा संज्ञा जाणसी ।
तैसेच ज्ञानकांडासी । उत्तरमीमांसा म्हणती ॥१८॥
तर्कवाद म्हणजे मीमांसा । वेदमंत्रातील विरोधाभासा ।
दूर करण्याचे कार्य सहसा । मीमांसा शास्त्र करीतसे ॥१९॥
दत्तमहाराज प्रवीण नैय्याकरणी । तैसेच वेदशास्त्र निपुणी ।
तैसेच पारंगत व्याकरणी । वेदांगांचेही ज्ञानी झाले ॥२०॥
आपण सामान्य जनांसी । वेदांचा 'व' ही न जाणसी ।
कैचे जाणावे गूढ रहस्यांसी । हे तो थोर पुरूषांचे कार्य ॥२१॥
शास्त्रकारांचे काय सांगणे । हे अध्ययनी अचूक जाणणे ।
ते संपूर्ण ह्दयी बाणणे । हे तयांचे वैशिष्ट्य ॥२२॥
शास्त्र एकच एका जन्मी । आर्य विद्येच्या या नियमी ।
अपवाद कवीश्वर स्वामी । सर्व शास्त्री पारंगत ॥२३॥
धारवाड क्षेत्र कर्नाटक प्रांती । मराठीयांची मोठी वस्ती ।
शंकराचार्यांची पाठशाळा असती । शतकाहून ही प्राचीन ॥२४॥
पं. नागेशशास्त्री उप्पिन बेट्टीगिरी । ब्रम्हविद्येचे अधिकारी ।
वैदिक परंपरेने विद्यादान करी । विद्यागुरू ब्रह्मर्षि दत्तमहाराजांचे ॥२५॥
त्यांचेकडे महाराजांचे । अध्ययन झाले न्यायशास्त्राचे ।
म्हणती अलौकिक शिष्य आमुचे । सर्वगुण संपन्न विद्यार्थी ॥२६॥
अनेक विद्वत सभांमध्ये । तैसेच ब्रम्हविद्या परिषदे मध्ये ।
मुग्ध झाले सर्व वाक्सुधे । श्री दत्तमहाराजांच्या ॥२७॥
विषयाची सोपी मांडणी । श्रोत्यांच्या मने समाधानी ।
समजे ते पूर्णपणी । पांडित्यही खुलून दिसे ॥२८॥
विद्वत्सभा – धर्मसभा । अनेक स्थानी वेदसभा ।
जगद्गुरू शंकराचार्यांची सभा । अनेक पंडितांनी भरी ॥२९॥
दत्तमहाराजांची विद्वत्ता । त्याहून त्यांची सविनयता ।
आचरणातील सात्विकता । गंभीरता पाहुनी होती अचंबित ॥३०॥
त्यांच्या विद्वतेचे कौतुक । आचार्य परात्परगुरू आणिक ।
सामान्य श्रोतेही आपसुक । करिती सर्वदा सर्वकाळ ॥३१॥

अनेक वेळा अनेक स्थानी । वर्णिली त्यांची गुणखाणी ।
गौरव मानपत्रे सुवर्णकंकणी । भूषविले श्री दत्तराजां ।।३२।।
सावधान व्हावे श्रोते जना । चरित्र ऐका देऊनी कान मना ।
सर्व दुरित पाप नाशना । जीवन सरिता श्री गुरुंची ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पाचवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

गुरु हा परमात्मरूप । सच्चिदानंदघन ईशस्वरूप ।
भवबंध तुटती आपोआप । अनुग्रह तयांचा होता ॥१॥
श्री गुरुचरित्री गुरुगीता । त्यात महती गुरुंची सांगता ।
म्हणती गुरु तारी शिव रुसता । गुरु रुसता कोणी न तारी ॥२॥
त्यांचे वर्णन कराया । मिळाले चरित्र लिहाया ।
परम भाग्य आले उदया । संतकृपे या कार्या निमित्त मी ॥३॥
त्यांची लीला तेच जाणती । भाषा-ज्ञान अपुरे पडती ।
तरी एका संतांची उक्ति । योग्य कराया गुणवर्णन ॥४॥
गुरुगोविंद दोऊ खडे । काके लागू पाय ।
बलिहारी गुरु आपकी । गोविंद दियो बताय ॥५॥
ऐसे सद्गुरुंचे गुण उत्तम । वर्णिताती निगमागम ।
मी मतिमंद पातकी अधम । चरणधुली स्पर्शासिही अयोग्य ॥६॥
ब्रम्हर्षि दत्तमहाराज । समर्थ सद्गुरु योगीराज ।
सगुणरूपी अवतरला अजन्मा*। कार्य महान संपन्न करण्या ॥७॥
प्रत्यक्ष ते ज्ञान-सिंधू । श्रुती शास्त्र पारंगत निर्विवादु ।
त्यांच्या पांडित्याचा सुगंधू । पसरला सर्व भारतवर्षी ॥८॥
शृंगेरी, व्दारका, कांचीकामकोटी । येथील जगद्गुरु मठाधिपति ।
प्रसाद देऊन गौरविती । सन्मान केला अलौकिक ॥९॥
शंकराचार्य चंद्रशेखरेंद्र सरस्वती । बीजवाडी विद्वसभा आयोजिती ।
निमित्त होते शंकर जयंती । वेदान्तावर बोलती दत्तमहाराज ॥१०॥
भाषणावर मुग्ध झाले आचार्य । सर्वांस झाले सहर्ष आश्चर्य ।
आसनावरूनी उठोनी शंकरावतार शंकराचार्य।गेले दत्तमहाराजांजवळी ॥११॥

---

*ज्याला जन्म नाही तो - अजन्मा

स्वकंठी होता बेलपत्रांचा हार । तो दत्तमहाराजांस घालुनी केला सत्कार।
सर्वांनी केला जयजयकार । अभूतपूर्व प्रसंग घडला ।।१२।।
धारवाडी करीत असता अध्ययन ।
अद्वैत ब्रम्हविद्या परिषदेचे झाले आयोजन।
वेदान्तावर केले सुंदर निरूपण । विरूपाक्षशास्त्रींनी गौरव केला ।।१३।।
पूर्वोत्तर पक्ष जिंकून । सभेस निरुत्तर केले म्हणून ।
मुक्तकंठे जयजयकार करून । सर्वांनी सत्कारिले महाराजांसी ।।१४।।
वृत्तांत ऐकुनी परिषदेचा । हर्ष झाला आचार्ये कामकोटीच्या ।
गौरव केला दत्तमहाराजांचा । सुवर्ण कंकण पाठवूनी ।।१५।।
वस्त्र हार श्रीफल । पाचशे रुपयांचे वर्षासन सकल ।
गौरव केला हा विशाल । अनुग्रह केला श्रीप्रसाद देउनी ।।१६।।
तिरुपती विजयवाडा–चेन्नई बंगलोर । म्हैसूर मुळगुंद गोकाक साण्डूर।
केडगांव तसेच उगार । अनेक ठिकाणी होती विद्वत्सभा ।।१७।।
तेथे झाले गौरव सन्मान । अनेक विद्यापीठांनी केला बहुमान ।
गौरव करिती भारत शासन । तीन वेळा राष्ट्रपतींच्या हस्ते ।।१८।।
भारताचे पहिले राष्ट्रपती । डॉक्टर राजेन्द्रप्रसाद विख्याती ।
पदवी देती विद्यावाचस्पती । १९६१ साली ।।१९।।
राष्ट्रीय संस्कृत पंडित ही पदवी । वार्षिक मानधन देउनी भूषवी ।
१९७० साली गौरवी । राष्ट्रपती वराहगिरी स्वहस्ते ।।२०।।
शंकरदयाळ शर्मा नामक । जे जाहले राष्ट्रपती आणिक ।
येऊन पुण्यनगरीत कौतुक । सन्मान केला महाराजांचा ।।२१।।
जगद्गुरु द्वारकेचे । प्रभावित होऊनी साचे ।
महामहोपाध्याय पदवीचे । दान करिते जाहले ।।२२।।
सर्व सन्मान होती जरी । अविचल स्थिती अंतरी ।
ब्रम्हज्ञानाचा मेरू ज्यापरी । कुठल्याही वादळे न चळे ।।२३।।
अत्यानंदाचे क्षण । तसेच अतीव दुःखांचे क्षण ।
शांत दोन्ही स्थितीत जाण। लक्षण जीवनमुक्त पुरुषाचे ।।२४।।
श्रीराम चरित्री गौरी । रामप्रभूंची परीक्षा करी ।
सीता विरहे राम फिरी । वनोवनी तिथे जाय ।।२५।।

सीतेचे रूप धरून । उभी राम तियेसी पाहून ।
सीते म्हणून रडी फिरोन । घडले असे वारंवार ।।२६।।
शेवटी हात जोडोनी म्हणे । जगन्माता तू उगीच शिणे ।
मानव देह जरी धरणे । त्याप्रमाणे राहणे भाग ।।२७।।
बायको हरविली प्राणप्रिया । मग रडणे भाग, आदिमाया ।
मनुष्याची धरिली ही काया । आचरण त्याप्रमाणे करावे ।।२८।।
असो हेच सत्य असे । महत्कार्य करण्या प्रभू अवतरतसे ।
लीला सामान्यांपरी दावितसे । तरी लपते काय ईश्वरत्व ।।२९।।
दत्तमहाराज भगवत्स्वरूप । प्रगटे जरी झाकिती मूळरूप ।
सहज अनुग्रह आपोआप । निज भक्तांवरती करी ।।३०।।
परंपरा भारतवर्षाची । वेदशास्त्र उपनिषदांची ।
गंगोत्री ती ईश्वरज्ञानाची । पुरस्कार करण्या तियेचा ।।३१।।
केले तियेचे अध्ययन । पुनः केले अध्यापन ।
प्रसार केला वेदान्ताचा आपण । ईश्वर कार्य हे केले ।।३२।।
श्री जगद्गुरू शंकराचार्य पाठशाळा । शंभर वर्षाहुनी जुनी ही शाळा ।
तियेवर आली आर्थिक अवकळा ।
तेव्हा विशाल गुरुदक्षिणा देती ।।३३।।
हस्ते परहस्ते देणगी बरवी । पाठशाळेस देववी ।
गुरुप्रेमे आघवी । वेदसेवा ऐसी करी ।।३४।।
विद्याध्ययनाचे व्यसन । अथवा हरिसेवेचे व्यसन ।
त्याहून दुसरा व्यासंग न जाण । श्री दत्तमहाराजांच्या ठायी ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सहावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ७

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

पिताजी धुंडीराज महाराज । पुराण प्रवचनाचे काज ।
गावोगावी फिरती योगिराज । बार्शीसही जाती त्यामुळे ॥१॥
भगवंताचे बार्शी ग्राम । अनेक वेळा मुक्काम ।
धुंडीराजांचा होई, काम । जनजागृतीचे अखंड होई ॥२॥
एका भक्ताने दक्षिणा म्हणोन । घर दिले तयांसी नूतन ।
निवास आईसाहेब करोन । प्रबोधन करिती स्त्रियांचे ॥३॥
तेथे भगवंतराव पाठक । गृहस्थ राहती सात्विक ।
संसार बार्शीत सुरेख । तयांचा असे चाललेला ॥४॥
तयांची कन्या अनुपम । 'सुंदरा' तियेचे नाम ।
कवीश्वर कुळी तिचे आगम । झाले वधू म्हणोन ॥५॥
रम्य मनोहर ती कथा । दत्तात्रेयांच्या विवाहाची गाथा ।
आनंद होईल सांगता । सावधान चित्ते श्रवण करावे ॥६॥
सरस्वती आईंचे मनी । सुंदरा कन्या भरोनी ।
म्हणे वधू होवोनी । घरी यावी ही लक्ष्मी ॥७॥
देऊळगांवाहून धुंडीराजांचे । आगमन होते व्हावयाचे ।
ठरले स्टेशन वरूनी आणायचे । टांगा करूनी पाठकगृही ॥८॥
असे तैसेच मानसी । चार अन्य वधू पितयांसी ।
चार टांगे उभे स्टेशनासी । म्हणे लग्न ठरवूनच घ्यावे ॥९॥
काका सुंदरा कुमारिकेचे । प्रथम क्रमांक लागले तयांचे ।
टांग्याला चरण लागले महाराजांचे । घरी आले पाठकांच्या ॥१०॥
म्हणती आईसाहेबांना । कन्या पसंत ही सुलक्षणा ।
पत्रिका ही जुळे छत्तीस गुणा । तेव्हा आज बैठक करावी ॥११॥
वदती धुंडीराज त्यांसी । मानपान नको आम्हांसी ।
लग्न करून द्या वाडीसी । अटी काहीच नाहीत ॥१२॥

सुंदरेचे लग्न ठरले । इतर वधूपितयांना दुःख न झाले ।
उलट आनंदच जाहले । म्हणे ईश्वरी कृपा जाहली ।।१३।।
जन्म झाला नरसिंह वाडी । मुंजीबंधनही नरसिंह वाडी ।
आता विवाह ही नरसोबाचे वाडी । काय ही ईश्वरी योजना ।।१४।।

।। श्रीगणेश ।।

श्रीमन्मंगलमूर्त्यखंडकृपया शाके खबाणाष्टभू – ।
युक्ते फाल्गुनमासि भार्गवंदिने कृष्णा चतुर्थी तिथिः ।।
तस्यां ज्येष्ठ सुतस्य सत्परिणयो दत्ताभिधेयस्य वै ।
सुंदर्याख्यिवधू स्तु पाठककुलोत्पन्ना सुभाग्यैषिणी ।।१।।
विज्ञप्ति स्तत्रभवान् सकुटुंबोऽवश्यमेत्य परिवारैः ।
समलंकरोतु मंगलविवाहकार्यं सदाशीर्भिः ।।२।।

सप्रेम विनंती विशेष

आमचे घरीं श्रीगणेशकृपेंकरून आमचे ज्येष्ठ चिरंजीव वक्रतुंड दत्तात्रेय याचा विवाह मिति फाल्गून वद्य ४ शके १८५० शुक्रवार ता. २९।३।२९ इ रोजीं दिवसा घ. २५ प. २८ स्टँ.टा. ४।४५ वाजतां निश्चित केला आहे. शरीरसंबंध वे. भगवान धोंडिबा पाठक बार्शीकर यांची कन्या सौभाग्यकांक्षिणी चि. सुंदराताई इजला वधू नेमस्त केली आहे. हे मंगलकार्य श्रीनरसिंहवाडी क्षेत्रीं श्रीदत्तचरणाजवळ होणार आहे. कार्य सिद्धीस नेणार श्रीसमर्थ आहेत. तरी आपण सकुटुंब सहपरिवार अगत्य येऊन कार्यसिध्दी करावी. आपण आल्याने कार्यास विशेष शोभा येउन आम्हास आनंद होणार आहे. कळावे हे विनंती.

श्रीक्षेत्र नरसिंहवाडी — आपला
ता.८।३।२९ — ढुंढिराज वक्रतुंड कवीश्वर

सूचना – श्रीनरसिंहवाडीस येणेचें तें एस्.एम्. रेल्वेनें व्हाया मिरज जयसिंगपूर स्टेशनहून यावें. मोटारीची सोय आहे.

शिवशक्तिचे मीलन । लक्ष्मीस वरे नारायण ।
अथवा प्रकृती-पुरुषाचे बंधन । ऐसा हा विवाह सोहळा ।।१५।।
मंडप रंगीत उभारिले । आम्रपत्राचे तोरण लावले ।
केळीचे खांब शोभले । बोहले रंगविले सुंदर ।।१६।।
रंगवल्लीका शोभायमान । मंगल वाद्यांचे होते वादन ।
आनंदले नरनारींचे मन । अलौकिक हे मंगल कार्य ।।१७।।
देवही जमले विमानी । गंधर्व रमले गायनी ।
नर्तन करिती सुंदर रमणी । पुष्प वर्षती आकाशे ।।१८।।
भरजरीत वस्त्रे नेसून । पुष्पमाला लेऊन ।
सुवर्णालंकार घालून । येती लग्नासी देवस्त्रिया ।।१९।।
सर्व मंडळींचा सत्कार करून । स्वागत मोठे केले जाण ।
मधुपर्के वरपूजन । करून समारंभ केलासे ।।२०।।
ऋत्वीज उच्च स्वरी । मंगलाष्टके उच्चारी ।
विष्णु-लक्ष्मी मधे उभारी । अंतर पाट मनोहर ।।२१।।

## मंगलाष्टके

शुभ दिवस आज हा उगवला । चतुर्थी माघ माही ।।
कूळ दैवत वक्रतुण्ड रेणुका । प्रसन्नपणे पाही ।।
दत्तात्रेय अमेय दोही प्रसन्न । उणे नसे ते काही ।।
यक्ष किन्नर देव आणि अप्सरा । कौतुक विमानी पाही ।।
हास्य वदन सुवासिनी जमल्या । आनंद झाला त्याही ।।
कार्य मंगल श्री कृपेने जमले । कुर्यात् सदा मंगलम् ।।१।।

दत्तात्रेय धुंडीराज शास्त्री । वर श्रीरामासम ।।
'सुंदर' कन्या पाठकांची सजली । वधू जानकी सम ।।
सोळा श्रृंगार करूनी शोभतसे । लक्ष्मी ती अभिराम ।।
वरमाय सरस्वती हर्षिती । झालीसे पूर्णकाम ।।
शिवशक्ति मिलन अनुपम । कुर्यात् सदा मंगलम् ।।२।।

थोर कुळ कवीश्वरांचे घराणे । दैवत नृसिंहयति ।।
वाडी क्षेत्री शुभ कार्य योजिले । श्रींच्या कृपेने होती ।।
हळदीकुंकू साखरेचे सडे । आनंद झाला किती ।।
मंगलकांक्षिणी 'सुंदर' ही वरिते । वैराग्यपूर्ण पति ।।
सौभाग्य अखंड लाभो तुजसी । कुर्यात् सदा मंगलम् ।।३।।

## ओवी

मंगलपरिणय असे जाहले । नभ दुंदुभी नादे भरले ।
कन्यादान करूनी हर्षिले । भगवंतराव पाठक ।।२२।।
पाच दिवसांचा झाला सोहळा । आनंद झाला वधूपित्याला ।
दिव्य हा जामात लाभला । विद्याव्यासंगी अनुपम ।।२३।।
निरोप घेतला साश्रुनयनी । आता कन्या आपली म्हणोनी ।
परत निघाले वाडीहुनी । काय म्हणती बार्शीस जाता ।।२४।।

## विहीण

अर्पण केली लाडकी 'सुंदर' दुहिता ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।
विना आईच्या झाली लहानची मोठी ।
वात्सल्य मातेचे दिसले न तिज दिठी ।।
परि कष्टाने झालो पालनकर्ता ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।१।।
वय कोवळे, समज नसेचि तिजला ।
परि संस्कार शुध्द तन–मनाला ।।
अपराध घालुनी पोटी सांभाळा आता ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।२।।

वस्त्राभरणे शोभित लक्ष्मी जैसी ।
कुळविभवासी साजे तुमच्या ऐसी ।।
परमभाग्याने जोडिले ह्या नात्या ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।३।।
परम पवित्र कवीश्वर कुळ लाभे ।
लक्ष्मी–नारायण जोडा ऐसा शोभे ।।
अभिमान मजला विव्दान असे जामाता ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।४।।
पूर्ण सौभाग्य लाभो शुभ कन्येसी ।
धन धान्यही मिळो ऐश्वर्य तिजसी ।।
कृपाप्रसाद व्हावा गुरूंचा आता ।
आईसाहेब तुम्हीच व्हा तिची माता ।।५।।

## ओवी

अशी विनवणी करूनी । गेले वधुपिता बार्शी लागुनी ।
गृहस्थाश्रमी प्रवेशुनी । संसार करिती दत्तात्रेय ।।२५।।
वाडीतच वैवाहिक जीवन । मंगल सुरू होऊन ।
श्री सद्‌गुरूंचे सेवन । आईसाहेब करिती ।।२६।।
पतीच्या आज्ञेवरून । प्रदक्षिणा पादुकांसी घालुन ।
श्री दत्तमाहात्म्याचे वाचन । धून वासुदेवांच्या ओवरीत सांगती ।।२७।।
सासू सासरे कौतुक । करिती सुनेचे आणिक ।
सासरची वृत्ती धार्मिक । बाणविती अंगी लक्ष्मीबाई ।।२८।।
आईसाहेबांनी सुनेसी । शिकविले कुलधर्मासी ।
नित्य केले जप वाचनासी । छत्र लाभले सत्पुरुषांचे ।।२९।।
लग्नानंतर माहुरासी । जावुनी केले आराधनेसी ।
पिताजी आईसाहेब सोबतीसी । आणिक गुळवणी महाराज ।।३०।।

थोर सत्पुरुष गुळवणी महाराज । सद्गुरु समर्थ योगीराज ।
गुरु तयांचे वासुदेवानंद यतिमहाराज ।
युग पुरुष हे पुण्यनगरीचे ॥३१॥
वाडीवर त्यांचे अतिशय प्रेम । बांधिले सभामंडप अनुपम ।
घाटाचा जीर्णोध्दार होऊन सुगम । झाले स्नान प्रदक्षिणा ॥३२॥
असे वामनराव गुळवणी । सहवास त्यांचा लाभुनी ।
अखंड प्रेमे सांभाळुनी । दत्तासी* मानस पुत्रापरि वागवी ॥३३॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
सातवा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

---

*दत्तमहाराजांना

## अध्याय - ८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

आजीसह पुण्यात । बिऱ्हाड आपले मांडत ।
गुरुकुलात मुलांना शिकवित । नातूंच्या वाड्यात राहती ॥१॥
सेवा विद्यार्थ्यांची प्रेमे । करिती लक्ष्मीबाई नियमे ।
तेही आईसाहेब म्हणती सप्रेमे । सर्व काम आनंदे करिती ॥२॥
नातूंचा असे जिव्हाळा । कवीश्वरांवर आगळा ।
भाडे न घेती त्या काळा । दत्तमहाराजांकडून ॥३॥
तयांसी हे न रुचती । भाडे घेण्यास सुचविती ।
श्री नातू ते मान्य न करिती । सोडले त्या वाड्यासी ॥४॥
आगाश्यांच्या वाड्यात । सदाशिव पेठेत ।
संसार अपुला हलवित । व्यवहार चोख पाळती ॥५॥
आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
संतवचनाचे कौतुका । दाविती स्वयेचि आचरोनी ॥६॥
व्यवहाराचा सर्व भार । सोपविती लक्ष्मीवर ।
आपण विद्यादाना रमती पुरस्सर । स्वधर्माचरणी रत ॥७॥
श्री शंकराचार्य शिरोडकर स्वामी ।
मठात पाठविती शिकविण्याच्या कामी ।
तीस रुपये मिळती पगाराच्या नामी । मुंजोबाच्या बोळीत ॥८॥
श्री शंकराचार्यांच्या ओळखीने । जागा मिळाली अनुक्रमे ।
वर्तकांच्या वाड्यात समाधाने । संसार साधा चालविला ॥९॥
मुळात अनासक्त वृत्ती । समाधाने राहण्याची प्रवृत्ती ।
धर्म-ध्येयाची प्राप्ती । पद्मपत्रापरी अलिप्तपण ॥१०॥
प्रथम अपत्य पुत्र झाला । परि चार वर्षाचा होऊनी गेला ।
दुःख आजोबांच्या मनाला । तसेच आईसाहेबांसी झाले ॥११॥
त्यानंतर दुहिता । नांव 'सुमन' ठेविले तत्वता ।
तिच्या पाठी मुलगा होता । आनंद झाला सर्वांना ॥१२॥

अशोक त्याचे नांव ठेविले । शोकाचे हरण त्याने केले ।
त्याच्यासाठी नवस केले । होते आजीने सश्रध्द ॥१३॥
म्हणे होऊ देत पुत्रा । जावळ करू त्याचे माहुर क्षेत्रा ।
जिथे निवसे रेणुका पवित्रा । कुलदेवी अभिनव ॥१४॥
हे श्रीदत्ताचे जन्म स्थान । पवित्र असे अनुपम ।
श्री गुळवणी महारांजासह सर्वजण । जाती ऐशा क्षेत्राला ॥१५॥
विष्णुदासांच्या आश्रमात । सर्व मंडळी राहत ।
गुरुराज वामन आधार देत । सर्व प्रकारे महाराजांसी ॥१६॥
माता पितरांवर भक्ति । तैसीच गुरुचरणी अति प्रीति ।
अतिशय विनयशील वृत्ति । सद्‌गुण श्री दत्तमहाराजांचे ॥१७॥
तीन मास औरवाड क्षेत्री । अनुष्ठान केले गायत्री ।
भोजन घेऊन नदीच्या पात्री । सोवळ्यांत जाती लक्ष्मीबाई ॥१८॥
वाडीत असल्या पासून । कृपा करिती गुरु वामन ।
संबंध वाढिला पुण्यात येऊन । सतत जाणे येणे असे ॥१९॥
बहीण मानीत सरस्वती आईस । भाऊबीज घालिती दिवाळीस ।
ऊन पाणी देई स्नानास । दिवाळीला अभ्यंगे आईसाहेब ॥२०॥
१९४५ सालात । टिळक महाराष्ट्र विद्यापीठात ।
अध्यापक म्हणूनी नियुक्ती होत । श्रीदत्तात्रेय शास्त्र्यांची ॥२१॥
न्याय व मीमांसा शास्त्र । हे विषय शिकवित ।
निरपेक्ष वृत्तीने राहत । संसार करित काटकसरीने ॥२२॥
गीताकोश पुण्यात लिहिता । फक्त तीस रुपये आले हाता ।
नागपुरी प्रवचन होता । मिळाले अडीचशे रुपये ॥२३॥
दोन्ही प्रसंग सारखे जाणत । श्री दत्तमहाराज म्हणत ।
सरस्वतीचे दरबारात । कमी जास्त कुणा नसे ॥२४॥
तेथील कसर येथे भरत । ऐसा विचार मनी करत ।
साध्या राहणीने राहत । श्री दत्त कवीश्वर ॥२५॥
साधे धोतर उपरणे । फार तर शाल घेणे ।
पडशीत सामान ठेवणे । करणे उपरण्याचे गाठोडे ॥२६॥

त्यात रोजची पोथी । श्री टेंबे स्वामींची चित्रमूर्ती ।
असत म्हणोन कोणाचे हाती । न देती ते गाठोडे ।।२७।।
स्वावलंबने जीवन-यापन । आपले कार्य करावे आपण ।
अतिशय व्यवस्थित प्रत्येक कार्य जाण ।
स्वये प्रघात घालिती आचरणे ।।२८।।
पाणी आपले तापविणे । कपडे स्वत:चे धुणे ।
सामान आपले उचलणे । चालत जाणे पायीच ।।२९।।
ईश्वरी अवतार असत । म्हणून सर्व संतांना आवडत ।
कृपा वर्षावि सतत करत । श्री गुळवणी महाराज ही ।।३०।।
सकाळी फिरण्यास जात । नित्य दत्तमहाराजांकडे येत ।
स्वयंपाक घरात बसून करत । लेकरा बाळांची पृच्छा प्रेमे ।।३१।।
प्रेमळ शब्दांने विचारपूस । करिती सर्व लेकरांस ।
म्हणती करा नीट अभ्यास । बोलती प्रेमे सूनबाईस ।।३२।।
बाहेरगांवी जाती दत्त । वामन प्रभू सुनेस म्हणत ।
काही लागल्यास जा कळवित । असा आधार सतत देती ।।३३।।
म्हणे गुंतवू नका मालका । संसाराच्या मायेत फुका ।
काही अडचणी असता निका । चला, मला सांगत ।।३४।।
एक गोष्ट करी सूनबाई । दत्तमहाराजांस त्रास होई ।
ऐसे वागू नको काही । ज्ञान संपन्न विवेकी आहेत ।।३५।।
मुलांस सांगती शिक्षणाचे । असे ते मला सांगा साचे ।
कार्य महान आहे त्यांचे । त्यांना गुंतवू नका तुम्ही ।।३६।।
संक्रांत पाडवा सणवारी । जाती सर्वजण गुरुमहाराजां घरी ।
प्रेमळ उपदेश ते करी । कवीश्वरांना सतत ।।३७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
आठवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

चालविती संसार संयमाने । स्वधर्माचरण करिती नियमाने ।
सर्वेचि करिती अनुक्रमाने । तपाचरण अध्ययन सतत ॥१॥
मोठ्या मोठ्या सभा होत । तेथे लक्ष्मीबाई न जात ।
संसार काटकसरीने करत । सांभाळत वात्सल्ये गुरुमहाराज ॥२॥
चि. अशोकच्या पाठीवर । जाहले पाच कन्या कुमर ।
नांवे त्यांची ठेविली सुंदर । सुलभा, शोभा, शैला, अनिल, अजित ॥३॥
गेले महाराज अमरेश्वरी । प्लेगची साथ पसरे पुण्याभीतरी ।
आजारी पडले सर्व घरी । आजारी जास्त चि. शोभा ॥४॥
गुळवणी महाराज धीर देत । लक्ष्मीबाईंना आधार मिळत ।
सल्ल्याने चिकित्सकांच्या म्हणत । रुग्णालये ठेवू शोभेसी ॥५॥
श्री गुळवणी महाराज स्वत: । शोभेस रुग्णालयात नेत ।
धीराचे बोल बोलत । आईसाहेबांसी भरून आले ॥६॥
दुर्दैवे वियोगली कन्या । नसे जवळी कोणी अन्या ।
श्री गुळवणी प्रभू अनन्या । होते तियेचे जवळी ॥७॥
दु:ख झाले अतिशय त्यांना । म्हणे बरे नसे सर्व मुलांना ।
दैवापुढे काही चालेना । धाडिती मनुष्य सुनेकडे ॥८॥
लक्ष्मीस दु:ख झाले अनिवार । गुरुमहाराज म्हणे धीर धर।
आजारी घरी सर्व लेकरं । जा तयांचे जवळी तू ॥९॥
या उपर काय सांगणे । ऐसे दुर्लभ गुरु मिळणे ।
सतत भक्तांस सांभाळणे । व्रत हेचि अखंड त्यांचे ॥१०॥
म्हणती दत्तमहाराज नाहीत जरी । त्यांची उणीव न ठेविता तरी ।
उत्तरक्रिया करितो सारी । घरी जा तू शांत चित्ते ॥११॥
मृदु अंत:करणे बोलत । प्रेमे लक्ष्मीस समजावित ।
धीर आला तिच्या चित्तात । दत्तमहाराज ही परत आले ॥१२॥

दु:ख झाले अनिवारी । वार्ता ऐकून दु:खद परी ।
विवेक धरिला अंतरी । थोर योगी पुरुषाने ।।१३।।
म्हणे खेळ सांगितला आणण्या । आलो तसाच घेतल्या विना ।
अधिकच शोक वेदना । झाल्या असत्या त्या पाहून ।।१४।।
संयम शक्ति अफाट । विवेक अंतरी दाट ।
ब्रम्हज्ञानाची गोडी अवीट । हृदयी असे कोंदिली ।।१५।।
याच काळात आचार्यांनी । गौरव केला कंकण देऊनी ।
कन्या गेली तरी कीर्ति रूपानी । परत आली म्हणे लक्ष्मीबाई ।।१६।।
दोन्ही प्रसंगी निर्विकार । राहती दत्त कवीश्वर ।
सुख दु:खाचा परिणाम मनावर । नसे होत तयांच्या ।।१७।।
सुखदु:खे समे कृत्वा । लाभालाभौ जयाजयौ ।
श्रीकृष्णाचे वचन सविनयो । आचरणात आणिती ।।१८।।
श्री गुरुमहाराजांस जेव्हा कळले । उभयतांस जेवाया बोलाविले ।
दत्त कवीश्वरांचे सत्कार केले । आचार्यांद्वारे सत्कार होता ।।१९।।
ओटी भरली शालू देऊन । भारावली त्यांची सून ।
गुरु कृपेची ही खरी खूण । मनांत भरून राहिली ।।२०।।
असो सर्व बाबतीत । गुरु महाराज लक्ष पुरवित ।
सर्व कौटुंबिक कार्यात । असती सतत सहभागी ।।२१।।
वैरागला जाऊन । स्वत: मुलगी पाहून ।
श्री धुंडिराजांसह वर्तमान । विवाह अशोकचा जमविला ।।२२।।
साखरपुडा झाला आश्रमात । अशोक-सविता यांचा उत्साहात ।
लक्ष्मीबाईंसी गुरुमहाराज म्हणत । सासूबाई झालीस भली ।।२३।।
चि. अशोकला मुलगा होत । धुंडीराज महाराज पुण्यास येत ।
सुवर्ण फुलांने पणतू पूजन करत ।
गुरुमहाराज आणिक पणजोबा ।।२४।।
हा कार्यक्रम ही केला आश्रमी । ऐसी प्रीति अभिरामी ।
होती कवीश्वर कुळी अनुपमी । श्री गुळवणी महाराजांची ।।२५।।

पुत्रवत मानती दत्त कवीश्वरा । आधार देती त्यांच्या संसारा ।
कृपा तयांवर अपरंपारा । करिती श्री गुरुमहाराज ।।२६।।
द्वैत रूपात दोन भासत । गुरुशिष्य एकरूप असत ।
म्हणोन धुरा त्यांच्या हाती देत । आपल्या अलौकिक कार्याची ।।२७।।
असावे आश्रम गुरुमहाराजांचे । असे मनी दत्तमहाराजांचे ।
पुढे कारण ही घडले त्याचे । पानशेतचे धरण फुटले ।।२८।।
पाणी आले गळापर्यंत । गोवईकरांच्या चाळीत ।
देव, पोथी, प्रसाद-पादुका राहत । पाण्यात त्या बुडोनी ।।२९।।
भक्तांनी श्रीगुरुमहाराजांसी । आणले सिद्धमाता मंदिरासी ।
पाणी ओसरता सामानासी । मातीतून शोधून आणिले ।।३०।।
आता देवांची व्यवस्था व्हावी । तैसीच येणाऱ्या भक्तांची व्हावी ।
सोय राहण्या भजनाची बरवी । म्हणोन दत्तमहाराज विनविती ।।३१।।
श्री दत्तमहाराजांनी संकल्प केला । श्री वासुदेव निवास उभा राहिला ।
भक्तकाजासिया भला । पुण्य नगरीत पावन ।।३२।।
भजन कथा कीर्तन । तैसेच होत प्रवचन ।
भागवत सप्ताहादि उत्सव जाण । होती श्री वासुदेव निवासी ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
नववा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १०

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

श्री गुरुंसाठी आश्रम बांधणे । हे तो अतिशय पुण्यप्रद जाणणे ।
म्हणोन श्री दत्त कवीश्वरांचे सांगणे । श्री गुरु महाराजांसी ।।१।।
परि म्हणती गुळवणी योगीराज । आमुच्या नावाचा साज ।
नको आश्रमास महाराज । त्याऐवजी द्या श्री टेंबे स्वामींचे ।।२।।
भव्य वास्तू उभारिला । भक्त कल्याणार्थ भला ।
श्री वासुदेव निवास नावाला । अत्यंत शोभिवंत ।।३।।
तैसेच महाराजांच्या संकल्पे । श्री वासुदेव निवास समीपे ।
श्री वामन महाराजांच्या रूपे । उभी राहिली दुसरी वास्तू ।।४।।
श्री गुरुमहाराजांच्या जन्म शताब्दिस । श्री वामन स्मरणास ।
बांधिला वामन निवास । दत्तमहाराजांच्या संकल्पे ।।५।।
श्री वासुदेव निवास । अर्पित यति वासुदेवास ।
तैसेच श्री लोकनाथ तीर्थयतींस । केला असे अर्पण ।।६।।
म्हणोन श्री गुळवणी महाराजांच्या नावे । आश्रम व्हावे आघवे ।
श्री वामन निवास वास्तू बरवे । उभारीले पुण्यभूमित ।।७।।
महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यात । फिरोन सप्ताह भागवताचे करीत ।
तैसेच गुरुचरित्र सांगत । द्रव्य जमविती या कार्यासी ।।८।।
पुनः त्याचे कर्तृत्व । न घेती ऐसे अमानित्व ।
म्हणती हे सर्व कर्तृत्व । आहे श्री गुरुमहाराजांचे ।।९।।
तेथे ग्रंथालय-औषधालय । राहण्यास उत्तम सोय ।
कथा-कीर्तन अन्य सोय । उपलब्ध सर्व जाहल्या ।।१०।।
तेथे तुळजाभवानी आरोग्यधाम । केला सुंदर उपक्रम ।
मायबहिणींसाठी अनुपम । आरोग्य सेवा रुग्णांसी ।।११।।
श्री गुळवणी महाराजांची । श्री वासुदेवांवर भक्ति साची ।
तैसीच श्री दीक्षित स्वामींची । भक्ति निःसीम गुरुचरणी ।।१२।।

वास्तव्य या गुरुशिष्यांचे । सन्निध श्री नृसिंहवाडीचे ।
जवळ स्थाना योगीनींचे । जेथे आहे विश्वेश्वर ।।१३।।
श्री दत्त अमरेश्वर क्षेत्र । पावनातिशय पुण्यक्षेत्र ।
चौसष्ट योगिनी पवित्र । नरसिंहयतींस भिक्षा घाली ।।१४।।
त्यात मुख्य योगिनी । नांव तियेचे यक्षिणी ।
गाणगापुरास जाता क्षणी । अज्ञापिती तियेसी श्रीगुरु ।।१५।।
येथे करून काही काळ वास । जाय तू माणगांवास ।
तेथे टेंबे कुळी जन्मास । येईल मूर्तिमंत श्रीदत्त ।।१६।।
या योगिनींचे ऐसे महात्म्य । अमरेश्वर मंदिराचे स्थापत्य ।
दीक्षित यति योगिनीं स्मृतिप्रीत्यर्थ ।
आठ योगिनी प्रतिमा स्थापिती ।।१७।।
या स्थानी श्री वासुदेवांचे । स्मरणार्थ स्थान निर्मिले साचे ।
सद्गुरु श्री दत्तमहाराजांचे । हे श्रध्दास्थान प्रमुख ।।१८।।
दीक्षित स्वामींच्या आज्ञानुसार । भागवत सप्ताह प्रति संवत्सर ।
केला चाळीस वर्षे निरंतर । या दत्त अमरेश्वरी ।।१९।।
त्याचा व्हावा जीर्णोध्दार । असे मनी कवीश्वरांच्या फार ।
भक्तांस व्हावा सुखकर । ऐसा वास्तू उभारावा ।।२०।।
शिष्यांस निमित्त करून । भव्य वास्तू बांधून ।
श्रीदत्त अमरेश्वराचे स्थान । मोठे उभारिले कृष्णातिरी ।।२१।।
भजन पूजन कथा कीर्तन । तैसेच उत्सव मोठे होऊन ।
होते विपुल अन्नदान । राहण्याचिही सोय झाली ।।२२।।
कृष्णेस बांधिला घाट । झाला दत्त अमरेश्वराचा थाट ।
दोन्ही तीरांवरी प्रगट । भक्ति मंदिर जाहले ।।२३।।
श्री गुळवणी महाराजांनी । श्री मनोहर पादुकांच्या स्थानी ।
घाट सभामंडप बांधुनी । केली सेवा यतिवरांची ।।२४।।
तीच परंपरा चालवून । अमरेश्वराचा जीर्णोध्दार करून ।
ईश्वर संकल्प मानून । महत्कार्य हे केले ।।२५।।

तसेच नरसोबाचे वाडीस । घर होते प्राचीन सरस ।
श्री वक्रतुंड महाराजांचा वास । झाला होता त्या गृही ।।२६।।
दत्तमहाराजांचे जन्मस्थान । तेथेच झाले मौंजीबंधन ।
विवाह आणि शिक्षण । त्याच वास्तूत जाहले ।।२७।।
देऊळगांवराजाच्या भक्तांनी । अत्यंत भाव भक्तिनी ।
त्याचा जीर्णोध्दार करूनी । बांधले नूतन घर ।।२८।।
त्यात गृहप्रवेश करून । केले वास्तुशांत पुण्याहवाचन ।
लक्ष्मीआईसह वर्तमान । श्री दत्तमहाराजांनी ।।२९।।
त्या स्थानाचा ट्रस्ट केला । म्हणती येणाऱ्या भक्तांला ।
जागा होईल उपासनेला । ज्या स्थानी संतवास्तव्य झाले ।।३०।।
ही सर्व कार्ये महान । ईश्वराच्या योजने वरून ।
भक्त कल्याणार्थ करून । सेवा केली श्री गुरूंची ।।३१।।
कुठल्याही कार्याचे । म्हणती कर्तृत्व श्री गुरूंचे ।
आपल्याकडे कर्तृत्व त्याचे । कधी न घेती दत्तमहाराज ।।३२।।
असेच लेखनाचे काम । केले सुंदर अनुपम ।
वर्णन त्याचे पूर्णकाम । असे पुढील अध्यायी ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
दहावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरूचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय -११

॥श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

वाङ्मयक्षेत्री योगदान । दिले करूनी लेखन ।
तैसेच केले संपादन । बहुविध ग्रंथांचे ॥१॥
वासुदेव यतीश्वरांवर । पूर्ण भक्ति निरंतर ।
त्यांचे अमर वाङ्मय अपार । अति कष्टे संपादुनी प्रकाशिले ॥२॥
श्री गुळवणी महाराजांचे मार्गदर्शनावरून।
समग्र वाङ्मय यतीश्वरांचे मिळवून ।
गांवोगावी ठिकठिकाणी हिंडून । हस्तलिखिते जमविली ॥३॥
अधिकांश साहित्य संस्कृत भाषेत । काही असे भाषा प्राकृत ।
आत्मीयतेने केले संपादित । अतिशय श्रम घेऊन ॥४॥
निर्दोष रहावे प्रकाशन । हे तयांचे यत्न ।
शास्त्री पंडितांसी संपर्क साधून । घेतली मदत तयांची ॥५॥
वाङ्मय नसे हे नुसते । श्रीयतींच्या ज्ञान सत्ते ।
ग्रंथरूप दत्तांचे दिसते । या समस्त वाङ्मयी ॥६॥
श्री गुळवणी महाराजांचे । तसेच विविध शास्त्र्यांचे ।
विविध प्रांतांच्या पंडिताचे । घेतले मत त्यावरी ॥७॥
स्वतः पूर्णज्ञानी असून । दुसऱ्यांना मान देऊन ।
दाविती अजातशत्रुत्व सौजन्य । श्री दत्तमहाराज ॥८॥
म्हणती आपल्या संपादनात। काही दोष राहत ।
त्यासाठी क्षमा मागत । ग्रंथकृद्रूपी श्रोतृरूपी दत्तांची ॥९॥
बारा खंडात संपूर्ण । वाङ्मयाचे केले प्रकाशन ।
स्तोत्र, ग्रंथ आणि कवन । श्री वासुदेव यतीश्वरांचे ॥१०॥
जगत्कार्य संचालक ईश्वर । त्याचे शुध्द-सबल रूप मनोहर ।
त्याच्या साधनाचे गौण मुख्य फलगोचर ।
प्रमाण त्यासी जाणण्याचे ॥११॥

हे सर्व विशद करून । मनुष्यास घेता यावे जाणून ।
असे यतींचे वाङ्मय लेखन । संपादन तयाचे महत्कठिण ।।१२।।
ऐसे वदत दत्तमहाराज । हे यतींचे ग्रंथराज ।
त्यांसी मंत्रग्रंथाचा साज । दिला या महापुरुषाने ।।१३।।
पुढे चरित्र टेंबे स्वामींचे । लिहिले अतिशय रम्य साचे ।
समग्र गुणविशेष यतीश्वरांचे । तशीच दिव्य तपश्चर्या ।।१४।।
सर्व वर्णिली यथार्थ । जीवन कैसे त्यांचे परार्थ ।
शिकविले कैसा परमार्थ । अवतार स्वये श्री दत्तप्रभूंचे ।।१५।।
अशा प्रकारे वाङ्मय सेवा । परमगुरुंची केली तेधवा ।
भक्तांसी आनंदाचा ठेवा । तैसाच मार्ग परमार्थाचा लाभे ।।१६।।
सर्व दर्शनि संग्रह नावे । ग्रंथ लिहिला सायण माधवे ।
जेव्हा असे शतक पंधरावे । भारतीय तत्वज्ञानाचे भंडार ।।१७।।
त्याचे भाषांतर सुगम । करून मूलगामी विवरण ।
ज्ञान सर्व शास्त्रांचे परिपूर्ण । म्हणोन हे कार्य जाहले ।।१८।।
भारतीय तत्वज्ञानात । सहा आस्तिक दर्शने असत ।
न्याय,वैशेषिक,सांख्य,वेदान्त । योग, मीमांसा आणिक ।।१९।।
चार्वाकि,योगाचार,माध्यमिक । वैभाषिक,सौत्रान्तिक ।
बौध्द,जैन आणिक । नास्तिक दर्शने सहा जाणावी ।।२०।।
व्यतिरिक्त पाणिनिदर्शनि । तसेच प्रत्यभिज्ञादर्शनि ।
या शिवाय रसेश्वरदर्शनि । यांची ओळख करी हा ग्रंथ ।।२१।।
सूत्रमय संस्कृत लेखन । त्याचे मराठीत अनुवाद कठिण ।
पूर्ण ज्ञानी महाराज आपण । तेच करू जाणती ।।२२।।
प्रत्येक अनुवादा नंतर । त्याचे विवेचन सुंदर ।
केवळ नसे ते भाषांतर । उलगडून दाविती सर्व रहस्ये ।।२३।।
शास्त्रातील गंभीर अर्थ । साध्या शब्दांत सांगती यथार्थ ।
व्यवहारातील अनुभव उदाहरणार्थ । देती वाचन सुखकर होण्या ।।२४।।
मुख्य विषयास न सोडिता । मूळ सिध्दांतास बाध न आणिता ।
सुगम्य विवेचन रुक्ष न वाटता । शास्त्रशुध्द लेखन समजून येई ।।२५।।
वेदान्त पारिजात सौरभ । हा ग्रंथ ही सुगम सुलभ ।

श्री निंबार्काचार्यांच्या ग्रंथाचा शोध । यात केलेला असे ।।२६।।
ब्रह्मसूत्रावरील भाष्ये । हे या ग्रंथाचे विशेषे ।
त्याचा अनुवाद मराठी भाषे । केला दत्त महाराजांनी ।।२७।।
सव्वाशे पानांची विस्तृत भूमिका । मांडिली या ग्रंथास निका ।
एक श्रेष्ठ संशोधनात्मका । प्रबंध असे तो निर्धारी ।।२८।।
दर्शन, शास्त्र या शब्दांपासून । भूमिकेची सुरूवात करून ।
सर्व दर्शनांची माहिती देऊन । त्यांचे सार वर्णिती ।।२९।।
प्रत्येक दर्शनाचा विषय । त्याची प्रमाणे काय ।
काय असे त्याचे ध्येय । मार्ग त्यासाठी कोणते ।।३०।।
हे सर्व करण्या उद्धृत । सूत्र-भाष्य-टीका ग्रंथातून घेत ।
शास्त्रांचा परस्पर विरोध नसत । अंतर्गत समन्वय दाविती ।।३१।।
उद्देश्य या सर्व दर्शनांचा । आध्यात्मिक मार्ग मानवाचा ।
सुगम व्हावा हेतू याचा । असे वैशिष्ट्य दाविले ।।३२।।
भागवताचा घेऊन आधार । सर्व दर्शनांचे एकच सार ।
सिद्ध करूनी, पुरस्कार । भागवताचा केलासे ।।३३।।
वाङ् मय मूर्ती ईश्वराची । या भागवते परीक्षा शास्त्र प्राविण्याची ।
या निकषावर योग्यता महाराजांची । कळून येतसे ।।३४।।
माहिती देताना दर्शनांची । प्राकृत संस्कृत पाली भाषेची ।
अवतरणे सुंदर वेची । श्री दत्तमहाराज ।।३५।।
फाह्यान मेगॅस्थेनीस प्राचीन । टिळक, ललित कृष्ण गोस्वामी अर्वाचीन ।
रोमा बोस, राहुल सांस्कृत्यायन । पंडित बलदेव उपाध्याय तसेच ।।३६।।
उल्लेख केला या ग्रंथकारांचा । तसेच यांच्या ग्रंथांचा ।
यावरून प्रचंड बुध्दिमत्तेचा । व्यासंगाचा ही उलगडा होय ।।३७।।
न करिता अध्ययन । भारतीय दर्शनाला नावे ठेवून ।
जाती पाश्चात्य मार्गावरून । याचे त्यांना वाईट वाटे ।।३८।।
भारतीय ज्ञानाचा पुरस्कार करण्या । मुमुक्षुंचे कल्याण साधण्या ।
योग्य मार्ग त्यांना दाखविण्या । केले लेखन श्री गुरूंनी ।।३९।।

द्वैताद्वैत सिध्दांताचा पुरस्कार । केला ग्रंथातून सविस्तर ।
कारण हा योग्य मार्ग भक्तिपुरस्सर । सुपंथ दावी विश्वाला ॥४०॥
सर्व परित्याग करून भिक्षु होणे । तसेच जगत हे मिथ्या जाणणे ।
हे तो सर्वसामान्यासी न झेपणे । म्हणोन भक्तियोग सर्वश्रेष्ठ ॥४१॥
यात असे जगाचे हित । निंबार्कार्चार्यांच्या ग्रंथी विहित ।
विश्वमांगल्याची भावना त्यात । त्याचा पुरस्कार म्हणून केला ॥४२॥
त्यांच्या प्रवचन लेखनातून । योग्य त्याप्रमाणे मार्गदर्शन ।
प्रत्येकाला होत जाण । असे हे अत्यंत अनुपम ॥४३॥
भक्तांस जे केले मार्गदर्शन । प्रवचन प्रश्नोत्तरादि माध्यमातून ।
त्यांचे सुंदर संकलन । पुस्तक रूपाने उपलब्ध असे ॥४४॥
हे सद्‌गुरुंचे ग्रंथरूप असत । त्यांच्या वाचने सान्निध्य लाभत ।
भक्तांना योग्य मार्ग ही सापडत । श्री गुरुंच्या कृपेने ॥४५॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
अकरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १२

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः।।

## "भावाष्टक"

प्रसन्न मुद्रा विनम्र वृत्ति । अखंड भरिली हृदयात शांति ।
कृपा प्रसादे तारी भक्ताला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।१।।
अत्यंत शुद्ध जयांचा आचार । मनःशुद्धि करिती ज्यांचे विचार ।
महामहोपाध्याय ज्ञानेश्वराला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।२।।
मन स्थिर करी भवदुःख हरी । ज्ञान-भास्कर अज्ञान वारी ।
वाचस्पति राष्ट्रीय पण्डिताला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।३।।
साधी सहज जो पुरुषार्थ चारी । ज्ञानी असोनी गुरुभक्ति करी ।
अलिप्त ब्रह्मर्षि योगेश्वराला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।४।।
स्वात्मानुबोध भक्तांस देई । शक्तिपाताने उद्धार होई ।
मर्मज्ञ ऐशा मम सद्गुरुला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।५।।
लक्ष्मीपति जो कृष्णावतार । सुहृद भक्तांचा दयेचा सागर ।
सौन्दर्य चन्द्र मन चातकाला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।६।।
वेदान्त विद्या विप्राचे धन । त्यांत असे जो अतिशय सधन ।
पवित्र प्रयाग त्रिवेणी तीर्थाला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।७।।
आम्हास देई परिपूर्ण भक्ति । पद धूली तुझ्या भुक्ति व मुक्ति ।
वैद्य जो वारी भवरोगाला । नमस्कार दत्तात्रेय कवीश्वराला ।।८।।
भावाष्टक हे तुजसी वाहिले । तुझ्या कृपेचे धन जोडिले ।
प्रसन्न होई मज वर देई । शुध्द बुध्दिने तुजसी वंदिले ।।९।।

वासुदेव निवासात सप्ताहो । भागवताचा अति उत्साहो ।
करविती गुळवणी गुरुरावो । श्री दत्तमहाराजां कडून ॥१॥
अतिशय आपुलकीने । गुळवणीप्रभु हौशीने ।
षष्ठ्यब्दीपूर्ती प्रेमाने । करविती प्रिय शिष्याची ॥२॥
एका बाजूला गुळवणी योगिराज । दुसऱ्या बाजूला धुंडीराज महाराज ।
साठी शांत करिती आज । श्री दत्तमहाराजांची ॥३॥
कोणत्याही समारंभात । न बोलती अजीबात ।
ते श्री गुरुमहाराज हातात । ध्वनि विस्तारक घेऊन बोलती ॥४॥
आशीर्वाद देऊन । म्हणती आता जबाबदारी संपूर्ण ।
आश्रमाची आहे, आपण । धुरा ती हातात घ्या ॥५॥
भारावलेली दत्तमूर्ति । गुरुंचे कृपामृत प्राशन करिती ।
दृष्ट काढविली स्त्रीभक्ता हाती । गुरुमहाराजांनी तयांची ॥६॥
सज्जन गडावरी श्रीधरस्वामी । असता उत्सव दासनवमी ।
पाचारिती दत्त गुरुराज स्वामी । अंगी ताप असता जाती ॥७॥
तिथल्या राममय वातावरणात । पहाटे झाला दृष्टांत ।
श्री गुळवणी महाराज 'बसा' म्हणत । भ्रूमध्यावर स्पर्श केला ॥८॥
क्रिया होऊ लागल्या परम । झाला सुंदर प्राणायाम ।
जोरदार रेचक पूरक सुगम । कुंभक होऊ लागला ॥९॥
असे ही ईश्वरी योजना । श्री गुरुमहाराजांची मनोकामना ।
रामदासांच्या सन्निधाना । जाहली शक्तिपात दीक्षा ॥१०॥
गुरु शिष्य झाले समान । व्दैतपण लोप पावून ।
एकचि गुरुतत्व जाण । दोहो ठाई प्रगटले ॥११॥
देऊळगांवहून धुंडीराजांचे । हृदयस्पर्शी पत्र आले साचे ।
सेवेत श्री गुरुमहाराजांचे । आपले मनोगत कळविती ॥१२॥
म्हणती आमच्या दत्तात्रेयांना । पदरात घेतले याचे समाधाना ।
शब्दांत वर्णिता वर्णवेना । कुळ धन्य झाले संतकृपे ॥१३॥
स्वये निवृत्तिनाथ बोलत नसत । ज्ञानेश्वरांकडून ज्ञान वदवित ।
तैसे श्री गुरुमहाराज करवित । श्री दत्तमहाराजांकडून प्रवचन ॥१४॥
श्रीमद्‌भागवत परमपवित्र । पाचवा वेद श्री गुरुचरित्र ।

प्रवचन करिता दत्तात्रेय तत्र । सर्व देव ऐकाया येती ।।१५।।
श्री गुळवणी महाराजांकडून । दीक्षेचा अधिकार मिळून ।
मंत्रोपदेशाधिकार पिताजींकडून । मिळाला श्री दत्तमहाराजां ।।१६।।
वासुदेव निवासाचे प्रधान विश्वस्त ।
पिताजींच्या संस्थानाचे प्रमुख विश्वस्त ।
श्री दत्तमहाराज असत । दोहोंचे ही उत्तराधिकारी ।।१७।।
पुणे तैसेच देऊळगांवी समस्त । परंपरा परमार्थाची वाहत ।
ओघ त्याचा दत्तमहाराजांप्रत । वाहुनी आला वारश्याने ।।१८।।
पुढे पुण्या-मुंबईतील भक्तांसी । हे गुळवणी प्रभू असे भासी ।
मराठवाड्यातील भक्तांसी । वाटती धुंडीराज महाराज ।।१९।।
पिताजी श्री दत्तमहाराजांचे । सहा महिन्यांनी थोर साचे ।
पेक्षा श्री गुरुमहाराजांचे । म्हणोन त्यांचे उत्सव ।।२०।।
सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा । रौद्री शांती सोहळा ।
दिव्य तसाच आगळा । श्री धुंडीराज महाराजांचा ।।२१।।
श्री दत्तमहाराजांच्या मार्गदर्शनात । पार पडले समस्त ।
श्री देऊळगांवराजा प्रत । मोठे झाले उत्सव ।।२२।।
बरोबर षण्मासा नंतर । श्री गुरुमहाराजांचे उत्सव सुंदर ।
झाले पुण्य नगरी भीतर । सूत्रसंचालन दत्तमहाराजांचे ।।२३।।
सर्व धार्मिक विधि नैमित्तक । विद्वान पंडितांचे पाचारण आणिक ।
सर्वांचे मानसन्मान संयुक्तिक । केले श्री दत्तमहाराजे ।।२४।।
आर्त जनांसी सांभाळून । दु:ख त्यांचे दूर करून ।
परमार्थ मार्गी प्रगति करून । देणे, तो लोकसंग्रह ।।२५।।
श्री गुळवणी महाराजांचा । श्री धुंडीराज महाराजांचा ।
लोकसंग्रह प्रचंडसाचा । तो सर्व सांभाळिला ।।२६।।
आणि त्या व्यतिरिक्त । कित्येक मुमुक्षु जनांप्रत ।
नेले भक्ति मार्गाने सतत । शक्तिपात दीक्षा ही दिल्या ।।२७।।
कोणाचे ऐहिक सांसारिक । दु:ख वारिले आणिक ।
अपत्य सुखे निपुत्रिक । धन दिधले वित्त हीनासी ।।२८।।
उगारस्वामी, द्रविडशास्त्री। श्री भालचंद्र उप्पिनबेट्टीगिरी शास्त्री ।

ऐसे जे अधिकारी पवित्री । ब्रम्हज्ञानी तया केले ।।२९।।
प्रत्येकाच्या वाटत मनासी । दत्तमहाराजांचे प्रेम आपणासी ।
आपणावर कृपा त्यांची विशेषी । प्रत्येकासच ऐसे वाटे ।।३०।।
प्रत्येकाच्या हृदयात । श्रीगुरु निवास करत ।
भौतिक आध्यात्मिक समस्यांत । आधार देती ऐसे प्रभू ।।३१।।
या सर्व महत्कार्याचा भार । सोपविला त्या ईश्वरावर ।
म्हणती कर्त्ता करविता सर्वेश्वर । विघ्नहर्त्ता त्राता तोचि ।।३२।।
कोणी करो मान कोणी अपमान । अंतरी अखंड समाधान ।
सुखदु:ख दोही समान । शांति हृदयात विसावली ।।३३।।
अपरिग्रही वृत्ति अनासक्त । स्वात्मानंदी निमग्न सतत ।
मोठा पसारा व्याप सांभाळत । जगाच्या कल्याणार्थ श्रीगुरु ।।३४।।
कोणाची भेट कोणाचे धन । कधीच न घेत आपण ।
सद्‌गुरुप्रीत्यर्थ अर्पण । अथवा पिताजींना अर्पण करीत ।।३५।।
संताची ऐसी जाती । निरपेक्ष भावे करिती प्रीती ।
सर्वेऽपि सुखिन: सन्तु मागती । हेचि मागणे परमेश्वराजवळ ।।३६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
बारावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १३

।। श्री गणेशदत्तगुरूभ्योनमः ।।

अंतर्बाह्य शुचित्व । अपरिग्रह निर्ममत्व ।
अहेतुकी कृपाभक्तांप्रत । श्री दत्तमहाराजांचे गुण ।।१।।
थोर माता सरस्वती । पिताजी थोर योगीपुरूष असती ।
तैसीच अनेक महत्संतांची संगती । हा तो मांगल्याचा ठेवा ।।२।।
मातोश्री परम भाग्यवंत । महान पतिव्रता असत ।
कडक धर्माचरण करत ।
शिवलीलामृत व्यंकटेश स्तोत्र नित्य पठण ।।३।।
वाचित श्री गजानन विजय । श्री सखाराम महाराजांची पोथी नित्य ।
परमार्थास ओपिली काय । धरोहर हीच घराण्याची ।।४।।
वानप्रस्थापरी पात्रादिक दान करून । गेल्या उत्सवास लोणी लागुन ।
सुलतानपुरास येता ताप येऊन । व्याधीग्रस्त जाहल्या ।।५।।
अहेवपणी झाले देहावसान । घडले त्यांच्या इच्छेप्रमाणे ।
दु:ख झाले दत्तराजांस गहन । अग्नि दिला धुंडीराजांनी ।।६।।
मातोश्री आईसाहेब सरस्वती । औषधे देती घरगुती
भक्तांच्या आजारपणा वरती । प्रेमलातिशय वात्सल्यमयी ।।७।।
दहनानंतर अग्निने । परत केली प्रेमाने ।
सर्व सौभाग्य वायने । जोडवी, मंगळसूत्र, बांगड्या ।।८।।
हा तो मातेचा ठेवा । प्रसाद म्हणूनी तेधवा ।
श्री महाराजांजवळ मेवा । आईची दौलत म्हणून ठेविला ।।९।।
महानिर्वाणानंतर ही । त्यांचे अनुभव लोकांही ।
येत असत लवलाही । देऊळगांवराजाचे उदाहरण ।।१०।।
जगनशेट धन्नावत । धुंडीराजांचे शिष्य त्यांप्रत ।
अनुभव आईसाहेबांचा येत । पत्नीस रोग दुर्धर झाला ।।११।।
पांथरीचा जडला विकार । शस्त्रक्रिया मुंबईत दुर्धर ।
परी पोट फाडता चिकित्सकवर । म्हणती रोग अतिशय वाढला ।।१२।।

पोट पूर्ववत टाकले शिवून । नशिबावर भार टाकून ।
आले स्वगृहा लागून । पत्निसह जगनशेट ॥१३॥
रात्री आईसाहेब स्वप्नात । येऊन चौकशी करत ।
काळजी करू नका म्हणत । बऱ्या होऊनी जातील म्हणे ॥१४॥
आशीर्वाद दिला पत्नीला । लगेच रोग बरा झाला ।
त्या उपरी त्रास न काही तिजला । ऐसी कृपा मातोश्रींची ॥१५॥
ताईंनी समाधी बांधली सुलतानपुरी ।
तुळशी वृंदावनरूपी, वर चौथरा छतरी ।
माघ पौर्णिमेस पुण्यतिथी साजरी ।
करिती मळ्यात अभिषेक अन्नदान ॥१६॥
असो श्री गुळवणी महाराज । वाडीवर प्रेम करिती निर्व्याज ।
जीर्णोद्धार करूनी केले भक्त काज ।
येथेच मातोश्रींना प्रसाद पादुका मिळाल्या ॥१७॥
ट्रस्ट पन्नास हजारांचा करूनी । दिधला प्रतिवर्षी दुरूस्ती लागुनी ।
शाल, श्रीफळ भेट देऊनी । सन्मान करिती पुजारी गण ॥१८॥
पादुकांवर पाणी घालण्या । दिली परवानगी ती गुरुप्रेरणा ।
झाला संतोष यतिराणा । सेवा गुरुंची पूर्ण झाली ॥१९॥
शेवटचे पर्व आयुष्याचे । दिवस संपूर्ण वात्सल्याचे ।
सर्वांवर वर्षती मेघ अमृताचे । कृपेचे श्रीगुरुमहाराजांच्या ॥२०॥
सर्वांना मुक्त हस्ते दीक्षा देती । कोणास थांबा न म्हणती ।
मुंबईस ही जाती येती । परी प्रकृती बिघडली ॥२१॥
श्री दत्तमहाराजां पाठविले नागपुरी । आपण त्यागिले इहलोक शरीरी ।
ब्रम्हतेजात विलीन श्रीहरी । जाहले श्री गुरुमहाराज ॥२२॥
इच्छापत्री हेतू अंतरीचा । लिहून ठेविला असे साचा ।
अधिकार शक्तिपात दीक्षेचा । उत्तराधिकार दिले दत्तमहाराजां ॥२३॥
साधन चतुष्टय संपन्न । विवेक वैराग्ययुक्त अंत:करण ।
हे उत्तराधिकाऱ्याचे लक्षण । पूर्ण बाणले होते त्यां ठायी ॥२४॥
अस्थिकलश श्री गुरुमहाराजांचा । आश्रमी जोवर होता साचा ।
तोवर गुरुत्वाच्या अधिकाराचा । वापर केला नाही त्यांनी ॥२५॥

प्रयागला अस्थिकलश नेऊन । केले अस्थिविसर्जन ।
मग तेथे एका दांपत्या लागून । दीधली संकल्प दीक्षा ।।२६।।
यातून विनम्र भाव । प्रगटवी श्रीगुरुराव ।
जोवर श्री गुरुमहाराजांचे अस्तित्व अभिनव ।
तोवर दीक्षा गुरुत्व न घेतले ।।२७।।
श्रीमत्शंकराचार्य कांची कामकोटीचे ।
उद्‌गार श्री दत्तमहाराजां विषयी त्यांचे ।
विद्वतजनांचे सत्कार नेहमीचे । करितो जे आपण ।।२८।।
सन्मान श्री दत्तात्रेय शास्त्रींचा । तो नसे केवळ विद्वत्तेचा ।
त्यांच्या असाधारण विनयवृत्तीचा । असे हा सन्मान ।।२९।।
अंगी असे अकर्त्तेपण । म्हणती स्वत: काही करावयाचे म्हणोन ।
वेगळेच घडते ते जाण । सोपविता गुरुंवर घडते योग्य ।।३०।।
वामन निवासाच्या बांधकामावेळी । नितांत श्रध्दा अनन्यता गुरुंजवळी।
पैशाअभावी काम बंद पडते वेळी । म्हणती ''महाराज पाहतील'' ।।३१।।
अनपेक्षितपणे त्यांप्रत । मोठ्या रकमेचे चेक येत ।
उत्साहाने काम पूर्ववत । होई वामननिवासाचे ।।३२।।
श्री गुरुमहाराज भक्त दयाळे । त्यांवर भार सोपवून व्हा मोकळे ।
ऐसे शिकवित दिव्य आगळे । आध्यात्मिक उन्नतीचे तत्व ।।३३।।
ब्रम्हज्ञान ठासिले मनांत । म्हणून वैराग्ये राहत ।
परि लाड सर्वांचे पुरवित । कनवाळू, कृपाळू दत्तप्रभू ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
तेरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

प्रथम गुरु माता । मंत्र गुरु पिता ।
हे सत्य जयांसाठी तत्वतां । श्री दत्तमहाराजां सारखे भाग्यवान ॥१॥
त्रिविधतापे तापले नर । अतिगहन हा संसार ।
तापशमन करण्या ईश्वर । धुंडीराज अवतार घेई ॥२॥
लोकांची स्थिर करूनी मने । भक्तिची गोडी तयां लावणे ।
ऐसे लोकहित कारणे । श्रम केले माता-पितरांनी ॥३॥
नाममंत्राचे साधन देत । जनांस उपदेश करत ।
म्हणती चला नाम घेत । वैखरीने सर्वदा ॥४॥
देहानी करिती अनुष्ठाने । तीर्थयात्रा पूजा पारायणे ।
परि नाम न घेती मनाने । तैसे करू नकाचि ॥५॥
नाम हे ईश्वराचे स्वरूप । ते घेता आपोआप ।
भक्ती रस चाखाया अमाप । मिळेल ईश्वर सान्निध्य ॥६॥
'सतत राहावे नामात' । ऐसाचि उपदेश करत ।
सोपे नाही जितके वाटत । पध्दत ऐसी उपदेशाची ॥७॥
सौरीशांति झाली संपन्न । त्यानंतर परब्रम्ही झाले विलीन ।
पितृशोक दत्तात्रेयांस देऊन । श्री धुंडीराज महाराज ॥८॥
पिताजींवरी अतीव निष्ठा । असे या गुरुश्रेष्ठा ।
त्यांचे समोर सर्व कनिष्ठा । मानत, न बसत तयांसमोर ॥९॥
दोन्ही दीक्षा विधींचे अधिकार । मिळाले मान पुरस्सर ।
पुत्रासी, हे बघण्याचे भाग्य थोर । लाभले त्या संतपुरुषा ॥१०॥
पुत्राचे पारमार्थिक वैभव पाहून । मनांत पूर्ण तृप्त होऊन ।
देह ठेविला परमानंदे पावन । समाधी स्थान देऊळगांवी ॥११॥
संगमरवरी मूर्ति सुंदर । स्थापिली असे मनोहर ।
बालाजीच्या गांवी निर्झर । भक्तिचा शांत वाहतसे ॥१२॥

या देऊळगांव राजा स्थानी । प्रतिसंवत्सरी प्रेमभरोनी ।
सप्ताह केला दत्तमहाराजांनी । झरा संतवाणीचा वाहविला ॥१३॥
सप्ताह नसती हे ज्ञान-यज्ञ । जो विश्वसाक्षी ईश्वरज्ञ ।
त्याच्या मुखकमलातून प्राज्ञ । गंगा भक्तिची वाहतसे ॥१४॥
गांवोगावी खेडोपाडी । ही गंगा कुमार्गास मोडी ।
दुर्वृत्ती लोकांची दवडी । वाढवी सदाचरण सद्धर्म ॥१५॥
दत्तमहाराज परम भागवत । अनासक्तिने संसारात रत ।
मायेत न गुंतता माया करत । घरादारावरी निरतिशय ॥१६॥
जरी वेदान्ती दार्शनिक । तरी नाही अरसिक ।
थोर संगीतज्ञ जरी तत्त्वचिंतक । आवडी फार नाद ब्रम्हाची ॥१७॥
कित्येक भाषा जाणत । विनोद ही सरस करत ।
प्रवचनात ही हसवित । एखादे वेळी विनोदे ॥१८॥
दुसऱ्यांना देती मोठेपण । स्वये सान होती आपण ।
लहान बाळासही बोलती "तुम्ही" जाण ।
कोणासही अरे-तुरे न करिती ॥१९॥
म्हणती प्रवचनात लोकानुरंजन । न करविती आपण ।
मुख्य ज्ञानच सांगावे सोदाहरण । श्रोत्यांची चित्तशुध्दी व्हावी ॥२०॥
मी सांगता न होई सांगणे । हे तो हृदयस्थ परमात्म्याचे बोलणे ।
सावध चित्ती श्रोतृ जने । श्रवण कीजे निरंतर ॥२१॥
म्हणती आपल्या प्रवचनांत । कर्मानुष्ठाना संगे सतत।
उपासना व भक्ति आचरित । त्यांचे कर्म "सांग" होती ॥२२॥
शेवटी सारे कर्म जाण । ईश्वरास करावे अर्पण ।
सतत त्याचे करावे स्मरण । श्रध्दा असावी अंत:करणी ॥२३॥
कर्माची प्रेरणा देणारी शक्ति। तसेच कर्मफल देणारी शक्ति।
ती एक परब्रम्ह असती । भावना दृढ मनी धरा ॥२४॥
काही आपले व्हावे कल्याण । म्हणोन जावे संतांना शरण ।
त्यांची परीक्षा न कीजे आपण । त्यांची प्रसन्नता संपादावी ॥२५॥
आपण जे कर्म करतो । फळ त्याचे मिळण्यास वेळ जातो ।
परि तो कधी निष्फल न होतो । पुण्य अथवा पाप असो ॥२६॥

देवाला न द्यावा दोष । तयावरी न करावा रोष ।
आपल्या कर्मांचे फळ नि:शेष । भोगतो आपणच ।।२७।।
इंद्रियांचा निग्रह करावा । संतांचा उपदेश ऐकावा ।
त्याप्रमाणे वर्तन कीजे तेव्हा । विवेक होईल निर्धारे ।।२८।।
ईश्वराचे मातेसमान । वात्सल्य भक्तांवरी जाण ।
अनन्य भावे येता शरण । निरीक्षण दोषांचे न करी ।।२९।।
ईश्वराकडे वळता अंत:करण । काही अपेक्षा न करता आपण ।
उपकार करितो भक्तांवर जाण । सुहृद नियामक सर्वांचा ।।३०।।
म्हणोन भक्तांचे ईश्वरावर । प्रेम असे निरंतर ।
भक्तांच्या दोषांचा विचार । न करीत तो अनंत ।।३१।।
विषयातून संसारातून । बाजूला करावे आपले मन ।
तसेच या शरीरातून । बाजूला त्यासी करावे ।।३२।।
हाच असे विवेक जाण । त्याने होईल इंद्रियसंयन ।
ते येता संतोष वृत्ति आपण । येईल संसारामाजी ।।३३।।
दया सर्व प्राण्यांवर । सतत स्मरावा ईश्वर ।
फल अपेक्षा न ठेविता आचार । शुध्द करावा निरंतर ।।३४।।
संसारातच राहून । विषयासक्ति सोडून ।
धर्माधर्म विवेक करून । विवेक मनी उत्पन्न करावा ।।३५।।
करावे निष्काम कर्म । हे तो बंधनमुक्तिचे वर्म ।
आचरावा नित्यस्वधर्म । ईश्वरार्पण बुध्दिने ।।३६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौदावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

स्वतः सर्वज्ञ असून । प्रत्येकाच्या योग्यते प्रमाण ।
करावे त्यांचे मार्गदर्शन । हेतोगुरुत्व सिध्द असे ॥१॥
अज्ञानाचा नाश करणे । हे गुरुंचे कार्य जाणणे ।
तयासाठी पूर्णपणे । जन्म तयांचा जाहला ॥२॥
टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या उपक्रमात ।
श्री बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयात ।
भारतीय विद्याविशारद व पारंगत।
हे अभ्यासक्रम संस्कृत अध्यापनी॥३॥
अनेक वर्षे शास्त्री म्हणोन । अध्यापिले शास्त्र व्याकरण ।
या विद्यालयी दत्तात्रेय शास्त्रीनी जाण ।
परि विनम्र व ऋजुत्व स्वभाव ॥४॥
अनेक प्रतिभावंत शिष्यांप्रत । शिकविले शास्त्र वेदांत ।
तयांवरी प्रेम ही उत्कट करीत । कल्याणार्थ करिती विद्यादान ॥५॥
कोणी केली निंदा नालस्ती । कोणी शत्रुत्व धरिती ।
तरी कारुण्यपूर्ण मति । तयांवर किंचितहि रोष नसे ॥६॥
चालते बोलते वेदान्त । जगी सर्वांसी धरिले समत्व ।
मग कसले मित्रत्व-शत्रुत्व । समदृष्टि तयांची असतसे ॥७॥
शिष्य वर्गास असे शिकवित । त्यांचे पूर्ण कल्याण साधित ।
कापूस पिंजून काढावा तद्वत । विषय पिंजून संशय नुरविती ॥८॥
असे मोठा शिष्यवर्ग त्यांचा । त्यांची काया-मने-वाचा ।
भक्ति अमित, भाव साचा । गुरुजींचे ठाई सतत॥९॥
झाले अनेक शिष्योत्तम । गुरुजींचे मोठे केले नाम ।
केले महान समाजाचे काम । त्यांच्या विद्यार्थी श्रेष्ठांनी ॥१०॥
कोणी अष्टाध्यायीचे प्रकाशन । केले इंग्रजी भाषेतून ।
संस्कृत कोषाचे कार्य महान । केले त्यांच्या शिष्योत्तमाने ॥११॥

कोणी चालविती देवस्थान । कोणी गुरुचरित्र पारायण संस्थान ।
कोणी वेदामध्ये डॉक्टरेट करून । सायण, भाट्टभाष्य संपादन करी॥१२॥
कोणी स्थापिले संस्कृत विद्यालय । कोणी करिती उच्चपदी कार्य ।
निर्माण केले महत्पण्डित्य । धर्म, श्रध्दा प्रसार ही केला ॥१३॥
कधी पाणउतारा विद्यार्थ्यांचा न करी । अतिशय प्रीति धरी अंतरी ।
वात्सल्य, कणव असे उरी । मनापासून हाताळीत विषय ॥१४॥
हे तयांचे महत्कार्य । वेदज्ञान पुरस्कारिले भारतीय ।
त्यांचा गौरव शिक्षण मंत्रालय । करी मानपुरस्सर ॥१५॥
असे गुणग्राहित्व मौलिक । इतरांचा मान मनःपूर्वक ।
करिती शिष्यांच्या प्रज्ञेचे कौतुक । वत्सल किंतु स्पष्ट वाणीत ॥१६॥
ऐशा सद्गुरुंचा सन्मान । सर्वांना वाटे करावा म्हणोन ।
त्यांचे विविध सत्कार जाण । केले शिष्य वर्गाने ॥१७॥
श्री गुळवणी प्रभू तैसैची। श्री धुंडीराज महाराजांची ।
व्यवस्था सहस्त्रचंद्रदर्शन रौद्री शांतीची । केली श्री दत्तमहाराजांनी ॥१८॥
तेव्हा श्री गुरुमहाराजांनी । उद्गार काढिले शिष्ये लागुनी ।
हे उत्सव श्री दत्तमहाराजांचे नी । होतील विशाल प्रमाणात ॥१९॥
तद्वत श्री वासुदेव निवास स्थानी । अमृत महोत्सव शुभदिनी ।
भैमरथी शांती करूनी । केला भक्ते अति उत्साहे ॥२०॥
यजन आणि अन्नदान । महत्पंडितांचे व्याख्यान ।
महान विभूतिंचे सन्मान । झाला मोठा सोहळा ॥२१॥
ही होती सत्तरी शांती । तैसीच सहस्त्रचंद्रदर्शन शांती ।
जेव्हा वय ऐंशी वर्षे पूर्ण होती । तेव्हा केली वासुदेव निवासे ॥२२॥
हा ही अतिशय मोठा सोहळा । झाला सात दिवसांचा आगळा ।
हवन कुंकुमार्चन तये वेळा । झाले अनेक कार्यक्रम ॥२३॥
महान ऋत्विज ब्राम्हण । तैसेच अनेक विद्वद्जन ।
आले या समारंभा लागून । पुण्यनगरीत तये वेळी ॥२४॥
केले कुमारिका पूजन । सवत्स धेनूचे केले दान ।
होती भजन कीर्तन प्रवचन । वेदमय वातावरण जाहले ॥२५॥
आई साहेबांसी सौभाग्य वायन । महाराजांची रजत तुला करून ।
सर्वांनी तयांचे केले सन्मान । नेत्रदीपक समारंभात ॥२६॥

जिज्ञासू भक्त उपासक । तैसेच मुमुक्षू साधक ।
यांसी हे महापर्व पुण्यकारक । म्हणोन हा सोहळा झाला ॥२७॥
या उत्सवा निमित्त । ऋग्वेद संहिता स्वाहाकार होत ।
प्रस्थानत्रयी आदि ग्रंथाचे पारायण होत । गुरुसेवा घडतसे मोठी ॥२८॥
श्री दत्तमहाराजांचे आशिर्वचन । सर्वांना लाभले निमित्त करून ।
दोन्ही उत्सवांच्या वेळेस दत्तभगवान । बोलती सर्व सभेसी ॥२९॥
या उत्सवाच्या मिषाने । गुरु आणि धर्म सेवाभाव खुणे ।
प्रगट झाली पूर्ण पणे । मिष केवळ हा महोत्सव ॥३०॥
एक विप्र अंकिंचन असत । त्यासी सर्व प्रशंसित ।
परि निमित्ताने धर्मसंवर्धन होत । संहिता स्वाहाकार यागादि कर्मे ॥३१॥
तीन बाबी दुर्लभ अत्यंत । मनुष्यत्व आणि मुमुक्षत्व ।
सार्थक जीवन महापुरुषांची संगत । हे तो अत्यंत भाग्याचे ॥३२॥
या उत्सवाच्या निमित्ताने । लाभ झाला आशिर्वचने ।
महापुरुष वेदविद्वत्जने । दर्शनि त्यांचे जाहले ॥३३॥
धर्मशील मंडळीनी भक्ति भावे । योजिली ही उत्सवे ।
पुण्यांश तयांना बरवे । यातून मिळणार ॥३४॥
संतांचे दर्शन न जाती फुकट । त्याने ज्ञानाची गोडी अवीट ।
धर्मामार्गाची ही वाट । नीट येई आक्रमिता ॥३५॥
व्हावीत कार्ये मंगल । सर्वांना मिळो लाभ सकल ।
संकल्प संतांचे केवल । निमित्त मात्र आपण ॥३६॥
होईल दुरित प्रतिबंध नाश । ऐसा मनी ठेवा विश्वास ।
सश्रध्द तळमळीने संतांची धरा कास । उध्दरितील तेच आपणा ॥३७॥
धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं । सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिं ।
भावासक्तिं चाखिलानंद मूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मानमस्ते ॥३८॥
ऐसे करून स्तवन । दिले सर्वांस आशिर्वचन ।
विनये सद्गुरुंसी केले नमन । दत्तमहाराजांनी तेधवा ॥३९॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंधरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

जो असे सच्चिदानंद घन । त्या सद्गुरुचे धरिले चरण ।
परम भागवत जो दयाघन । नमन त्या कवीश्वरासी ॥१॥
तूच अनंत ब्रम्हांड नायक । अघटित घटनाकारक ।
जगत्कर्ता नियामक । सर्वज्ञ सर्वसाक्षी तूचि ॥२॥
तूच हव्य तूच हवन । तूच ज्ञाता तूच ज्ञान ।
पालन संहारकर्ता जाण । रचयिता विश्वाचा तूचि ॥३॥
तूचि असशी भयकारक । त्राता तूचि भयहारक ।
स्तव्य स्तवन तूच एक । विद्या विनय भूषित ॥४॥
तूच माता तूच पिता । तूच कर्ता करविता ।
आप्तस्वकीय तूच आता । नमन वारंवार तुजसी ॥५॥
श्री सद्गुरु दत्तात्रेय । प्रसन्न वदन तेजोमय ।
दर्शनि त्यांचे होता, भय । भवसिंधूचे नाश पावे ॥६॥
जेवढी करावी त्यांची स्तुती । ती कमीच असे निश्चिती ।
सर्व भक्तजनांची मती । भारावली तव भक्तिने ॥७॥
देऊळगांवराजा बालाजीचे । प्राचीन स्थान लक्ष्मी व्यंकटेशाचे ।
तिरुपती देवस्थानाच्या बरोबरीचे । हे स्थान अत्युत्तम ॥८॥
सद्भक्त तेथे धुंडीराजांचे । तैसेच परंपरेने दत्तमहाराजांचे ।
रौद्रीशांती करावी मनी त्यांचे । श्री दत्तमहाराजांची ॥९॥
पत्र त्यांचे कार्यक्रमाचे । निमंत्रण अतिशय अगत्याचे ।
भाव ओळखून मनीचे । स्वीकारीले महाराजांनी ॥१०॥
मराठवाडा क्षेत्री सुंदर । उत्सव झाला मनोहर ।
पंचकुंडात्मक अध्वर । विष्णुयाग जाहला ॥११॥
रौप्य तुला आणिक । विधि सर्व धार्मिक ।
गोप्रदान अन्नदान प्रमुख । हे कार्यक्रम जाहले ॥१२॥

भूमि ही वाडवडिलांची । आजोबांपासून भक्तांची ।
परंपरा मोठी, बालाजींची । कृपा या घराण्यावर ॥१३॥
धरिले छत्र शिरावर । ललकारिती भालदार चोपदार ।
घरापासून मिरवणूक सुंदर । काढीली देवस्थानापर्यंत ॥१४॥
देवस्थाना तर्फे महावस्त्र । दिधले अनेकांनी मानपत्र ।
गौरव पर भाषणे तत्र । जाहली अनेकांची ॥१५॥
रेशमी फेटा, धोतर, उपरणे । महाराजांना केली अर्पणे ।
सोहळा पाहून अंत:करणे । भारावली सर्वांची ॥१६॥
कंठी घालून पुष्पहार । केला सर्वांनी सत्कार ।
संतोषे काढिले उद्‌गार । श्री दत्तमहाराजांनी तेधवा ॥१७॥
पुण्याई असे वडिलांची । तशीच्च श्रीसद्‌गुरूंची ।
ओढ होती मातोश्रींची । करावे महापुरुषांना वंदन ॥१८॥
मातोश्रींच्या पुण्याई कारणे । सत्पुरुषांचा सहवास घडणे ।
असे महत्‌भाग्य लाभणे । कृपा सर्व ही मम आईची ॥१९॥
कंठ आला दाटुनी । म्हणे रौद्रीशांती या ठिकाणी ।
पिताजींची जाहली म्हणोनी । भक्तमंडळींनी केले महत्कार्य ॥२०॥
यज्ञयाग सर्व प्रकारचे । समारंभ रौद्रीशांतीचे ॥
मन संतोषे स्वर्गस्थ मातापितयांचे । वाटते असे आम्हासी ॥२१॥
या सर्व,यज्ञाचे फळ । सर्व हितासाठी केवळ ।
प्रार्थना अशी देवाजवळ । केली श्री दत्तमहाराजे ॥२२॥
तेथील लोकांची भक्ति उत्कट । भाव तयांचा मोठा अनेक पट ।
आपले गुरु हे देवचि प्रगट । घट्ट श्रध्दा त्यांच्या मनी ॥२३॥
समारोपे महाराजांचे सत्कार । तैसेच आप्तेष्टांचे सत्कार ।
न वगळले बरोबरचे नारी नर । लेकरांचा ही मान केला ॥२४॥
ऐसे त्यांचे हृदय विशाला । असो निघाले महाराज जालन्याला ।
ताई माउली धन्य झाल्या । दत्तमंदिरी येता श्रीगुरु ॥२५॥
अति उत्साहे केले स्वागत । पुढे महाराज हिंगोलीस जात ।
संस्कृत सम्मेलन तेथे होत । पारायणे श्री गुरुचरित्राची ॥२६॥

एक भक्त घराणे हिंगोलीचे । दुसरे घराणे देऊळगांवचे ।
पिढ्यान पिढ्या दत्तभक्तिचे । वारसे लाभले तयांसी ।।२७।।
नारायण स्वामींचे पुण्यतिथीला । श्री एकमुखी दत्तमंदिरात लीला ।
वर्णीली यतिवरांची, सर्वांला । मिळाला प्रवचनाचा आनंद ।।२८।।
मुक्त हस्ते दीक्षा देती । दर्शनासी अनेक भक्त येती ।
महाराजांना वस्त्रे अर्पिती । श्रध्दा भक्ति युक्त मने ।।२९।।
हिंगोलीत हत्तीवरून । मिरवणूक महाराजांची काढून ।
केला त्यांचा बहुमान । झाले गुळवणीप्रभूंच्या इच्छेप्रमाणे ।।३०।।
शेगावच्या गजाननाचा । हत्ती आणविला साचा ।
गजर अवधूत चिंतनाचा । झाला महाराज अंबारी बसता ।।३१।।
गुरुचरित्र ग्रंथाच्या पालखी समवेत ।
मिरवणूक काढिली गुलाल उडवित ।
वाद्यांचा जयघोष करीत । सोहळा झाला स्वर्गीय ।।३२।।
यापुढे बीड, वैराग, बार्शीवरून । आले परत पुण्यालागून ।
तेथे ही रौद्रीशांती करून । तुलादान केले तीन वेळा ।।३३।।
प्रकृती स्वास्थ्य नव्हते उत्तम । परी कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम ।
या न्याये सर्व अनुपम । कार्यक्रम पडती पार ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सोळावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

स्वधर्म आचरिती संत । करिती अज्ञानाचा अंत ।
पाणपोई परमार्थाची चालवित । ज्ञानदान करिती मुक्त हस्ते ।।१।।
ज्योतीस ज्योत मिळता । तेज दिव्य फाकता ।
आपणा सारिखे करिती तत्वतां । शिष्योत्तमांना तत्काळ ।।२।।
श्रीगुरूंचे जीवन कार्य । पुढे चालविती हे आर्य ।
शिष्यरत्न आणि गुरुवर्य । असत सुवर्ण साखळी परी ।।३।।
यति नारायणानंद सरस्वती । उगार स्वामी नामे प्रख्याती ।
महाराजांच्या सान्निध्यांत अभ्यासिती । वेदान्त शास्त्र उत्तम ।।४।।
शिष्य धुंडीराजांचे असती । गुरु स्वतः नम्रपणे वागती ।
बहुमान देती या संन्यस्तयती । ऐसी महती जयांची ।।५।।
श्री गणेशाचे परम भक्त । अतिशय तपःपूर्ण जीवन यापित ।
श्री गणेश यांना दर्शन देत । गणपति मंत्रा सिध्द केले ।।६।।
मंगलमूर्ति विघ्नहरा । दुरित नाशना कृपा करा ।
सिध्द मंत्र हे यतिवरा । दीधले सर्वांना स्वहस्ते ।।७।।
श्री गुळवणी महाराजांचे विषयी । प्रेम त्यांचे उचंबळोन येई ।
श्री दत्तमहाराजांस आनंद होई । सत्संग त्यांचा लाभता ।।८।।
समर्थांच्या दृष्टांतावरून । गरुडेश्वरी गुरु भेटून ।
राहिले संन्यास घेऊन । दूध, फळे, पीठ सेवन करिती ।।९।।
कडक जरी आचरण । उरी भक्ति प्रेमाची खाण ।
करिती सुंदर कवन । स्तवन संस्कृत भाषे करिती ।।१०।।
असे उत्तम वैद्यकीय ज्ञान । येणाऱ्यांस देती औषध म्हणोन ।
कितीएक त्यांच्या संनिधान । येती रोग निवारणार्थ ।।११।।
शंकराचार्य चंद्रशेखर सरस्वती । कांची पीठाचे अधिपति ।
उगार स्वामींवर त्यांची अति प्रीति । अत्यंत प्रेम श्रीं* चे त्यांवरी ।।१२।।

*श्री – श्री दत्तमहाराज, अनेक ठिकाणी श्री दत्तमहाराजांचा उल्लेख 'श्री' म्हणून केला आहे.

असो, प.पू. श्री आत्माराम शास्त्री । जेरे कुटुंबे वाडी क्षेत्री।
जीव त्यांचा पादुकांवरती । ब्रम्ह साक्षात्कारी भक्त श्रेष्ठ ।।१३।।
प्रत्यक्ष श्रीकृष्णे । भागवत श्लोक गायने ।
प्रकाश रूपे दर्शन देणे । घडले ऐसे अद्भुत ।।१४।।
यती पादुकांची सेवा पिढीजात । श्री दत्तमहाराजांवरी प्रीत ।
श्री गुळवणी प्रभूंचे चरणी रत । प्रेम परस्पर दोघांचे ।।१५।।
गायनाची अत्यंत आवड । भक्तीची वाहिली कावड ।
ज्ञानदान करोन आधार वड । जाहले बंधु बांधवांसी ।।१६।।
गुरुमहाराज दत्तमहाराज आणिक । आत्माराम शास्त्री एक ।
तिघे एकत्र येता सकळिक । ब्रम्हानंदे न्हाऊन निघती ।।१७।।
ब्रह्मर्षि भालचंद्र शास्त्री ऊप्पिनबेट्टीगिरी । वेदविद्येचे अधिकारी ।
दत्तमहाराजांचे शिष्यां भितरी । थोर रत्न उत्तम ।।१८।।
महाराजांचे सहस्त्रचंद्रदर्शनशांति प्रसंगी । पाचारिले या शिष्यास वेगी ।
पत्रातून, जे प्रेमरंगी । रंगले असे श्रीहृदयापरी ।।१९।।
युधिष्ठिराच्या राजसूयी । आला श्रीकृष्ण शेषशायी ।
व्यवस्था सर्व जातीने पाही । त्यापरी येऊन तुम्ही पहा ।।२०।।
ऐसा यांचा अधिकार । विद्याभ्यास्त भक्त साचार ।
हे सर्व शिष्य भंडार । वारंवार नमन सर्वांना ।।२१।।
दत्तमहाराजांची अर्धांगिनी । श्री महालक्ष्मी लावण्यखाणी ।
सद्धर्मीरत ही गृहिणी । आई प्रेमळ सर्वांची ।।२२।।
गोकुळा सारिख्या घरांत । हर्षभरे नांदत ।
नातू-पणतूंमधे खेळत । गृहस्थाश्रम चालवी ।।२३।।
शिवशक्ति नसे भिन्न । प्रकृती-पुरुष आहेत समान ।
आदिशक्ति ही परम पावन । केली सहस्त्रचंद्रदर्शन शांति ।।२४।।
चैत्र मासी मंगल दिनी । तांदुळाने तुलादान करोनी ।
सन्मान केला सौभाग्यवायनी । सोहळा अद्भुत जाहला ।।२५।।
गुळवणी महाराजांस सुनेचे कौतुक । देती तिला आधार सकळिक ।
वासुदेव निवासी कार्यक्रम होता आणिक।
समाधान झाले असेल त्यांना ।।२६।।

श्री दत्तमहाराज हे । सामान्य पुरुष नोहे ।
दत्तप्रभूंचे अवतार आहे । जगद्गुरु शंकराचार्य वदती ।।२७।।
आदिशक्ति अनघा देवी । लक्ष्मी बाई शोभे तेवी ।
आंगात शोभे चंद्र-रवी । तेज अपूर्व असे तियेचे ।।२८।।
या दोघांनी माता-पितरांपरी । प्रेम केले ताई महाराजांवरी ।
वारूणी शांती कौतुके करी । केले तुलादान अद्भुत ।।२९।।
या दिव्य आगळ्या विभूति । न आकळे आपणांस ती ।
शरण जाणे हेच आपल्या हाती । वंदन यांसी त्रिवार ।।३०।।
सौ. ताईमहाराज गुरुभगिनी । पुढील अध्याय त्यांचे चरणी ।
अल्पसे सेवा सुमन म्हणोनी । केले असे अर्पण ।।३१।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सतरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

## स्तुती

नमो आदिमाया शक्तिस्वरूपा । जगदंब तूचि जगज्जननी ॥१॥
जालन्याची ताई त्वरे धाव घेई । माय तू माझी विश्वस्वामिनी ॥२॥
गुरुचरित्राची पूर्णता तू करी । एकवीरा तूचि कुलस्वामिनी ॥३॥
काजळकर सुता भक्तांची तू माता । देई बुध्दि आता गुणवर्णनी ॥४॥
दत्तमहाराज नमस्कारिती तुज । देवी भगवती तू म्हणोनी ॥५॥
उभयतांची उभयी श्रध्दायुक्त भक्ति । दत्तात्रेय रेणू माहुरस्थानी ॥६॥
धुंडीराज शिष्या महापतिव्रता । देई आशीर्वादि या स्तवनी ॥७॥
प्रेमाचा पाझर दयाघन हृदयी । केलेसी कृतार्थ अमृत वर्षोनी ॥८॥

## ओवी

श्री दत्तमहाराज हिते । प्रत्यक्ष भगवती झाले संबोधिते ।
वात्सल्याची मूर्ति तीते । नमस्कार वारंवार ॥१॥
पुण्य नगरीला सर्व कार्यात । सहभागी सतत असत ।
जालन्यास बांधिले पुनीत । स्थान "श्री दत्ताश्रम" नावे ॥२॥
सरस्वती आईसाहेबांवर । तिचे प्रेम निरंतर ।
श्रीक्षेत्री सुलतानपुर । बांधिली समाधी भक्तिपूर्वक ॥३॥
श्री दत्तमहाराजांच्या गुरुभगिनी । परी सदैव लीन त्यांचे चरणी ।
महाराजांस मानिती गुरुस्थानी । ऐशा सौ.ताईमहाराज ॥४॥
प.पू.श्री काजळकर महाराज । गुरु त्यांचे धुंडीराज महाराज ।
नाम यज्ञे रत हे योगीराज । संत मराठवाड्याचे थोर ॥५॥
सांगती उपासना जनांस । त्यांसाठी स्वतः ही व्रत वाचनास ।
करिती लीला अजस्त्र । मूर्तिमंत स्थान करुणेचे ॥६॥

त्यांची कन्या सुगुणा । वर्णन तिचे करवेना ।
परि तिची भक्ती गुरुचरणा । त्याची बरोबरी कोणास न जमे ।।७।।
कैसी गुरुभक्ति करावी । ताईंकडून ती शिकावी ।
तन-मन-धन-प्राण ही ओपावी । श्री गुरुसेवा प्रीत्यर्थ ।।८।।
संसार करूनी परमार्थ । केला त्यांनी यथार्थ ।
देव ही तिचे परीक्षार्थ । मार्ग करी खडतर ।।९।।
देवाची जी संपत्ती । दान करिता वाढे ती ।
म्हणोन दान करण्याची प्रवृत्ती । अन्न-वस्त्रादि सतत।।१०।।
कणातून झाला हिमालय । झाले गुरुंचे आलय ।
गुरु घरी कमी पडेल काय । संसार मांडिला देवाचा ।।११।।
कवीश्वरांचे कुटुंबी जन । महाराजांचे शिष्य साधक जन ।
कृपा वर्षावि त्यांवर करून । कार्य महान चालविले ।।१२।।
तुझ्या भजकांची सेवा । घडो मज केशवा ।
हाच तिच्या आनंदाचा ठेवा । सन्मार्गी लाविले अगणित ।।१३।
भक्तांची वांच्छा पुरवोन । संकटातून त्यांना तारून ।
लाविले भजना लागून । निष्कामी सकामातून वळविले ।।१४।।
वात्सल्यमयी मातेपरी । भक्तांचा सांभाळ करी ।
जयाची जी आवडी अंतरी । तयासी सेवा देई तीच ।।१५।।
प्रपंच हिचा असे महान । सहस्त्रावधी शिष्यगण ।
परि गुरुभाव न घेतला जाण । देववी दीक्षा महाराजांकडून ।।१६।।
दत्तमहाराज ही अनुग्रहितां । ताईंकडे पाठविता ।
या भक्तांचे उत्तरदायित्व आता । सांभाळावे म्हणताती ।।१७।।
या सर्वांचे साधण्या कल्याण । वाढविण्या गुरुंची महती जाण ।
केले स्थान मोठे निर्माण । श्री दत्ताश्रम म्हणोनी ।।१८।।
रामभक्ति काजळकरांची । गुरुभक्ति सौ.ताईंची ।
साकार झाली या ठिकाणेचि । महती वर्णावी ती काय ।।१९।।
श्री दत्तमहाराजांची उक्ति । गुरुंच्या नावे बांधणे आश्रम ती ।
अतिशय पुण्यकारक कृति । म्हणोनी परिश्रमीली अविरत ।।२०।।

'अन्नपूर्णा' अन्नदानासी । 'राघवालय' श्री रामचंद्रासी ।
'संतधाम' सर्व गुरुजनांसी । बांधिले असे अत्युत्तम ।।२१।।
'शिवालयी' उमा-महेश्वर । अयुतचंडीची प्रतिमा मनोहर ।
रूपे भासे लक्ष्मीआई सुंदर । नमन चरणांसी शतवार ।।२२।।
दश वर्षांचे अनुष्ठान । अयुतचंडीचे आरंभोन ।
केले महान अनेक यजन । लोकहितार्थ सर्व ही ।।२३।।
''दिगंबरा'' नामाचा गजर । घुमतो आसमंती मधुर ।
कणी कणीं ब्रम्हतेजाचा पाझर । परम पुनीत स्थान हे ।।२४।।
श्री पादुका मंदिरात । औदुंबर तळी विख्यात ।
दत्तप्रभूंच्या पादुकां स्थापित । अर्पण स्वप्राण केले त्यांसी ।।२५।।
भक्तिची गंगा वाहे येथे । येणाऱ्यांस करी कृतार्थे ।
जगज्जीवन ईश्वर परार्थे । स्वतपाचरणाने पाचारिला ।।२६।।
भक्तियुक्त अंत:करणे । जाईल जो जालन्याला शरणे ।
त्याची मनोकामना होईल पूर्ण । हे तो त्रिवार सत्य असे ।।२७।।
ऐसे पुण्य क्षेत्र जालना गावे । तेथे निर्गुणेश्वर आकार पावे ।
वंदन त्यासी मनोभावे । प्रणाम श्रींचे पादुकांना ।।२८।।
या हो या मुमुक्षुजन । महाराजांना या शरण ।
लुटा त्यांचे कृपामृत पूर्ण । कृतार्थ व्हा सर्वोपरी ।।२९।।
सर्वधारी नाम संवत्सर । अश्विन मास शनिवासर ।
पादुका स्थापिल्या मनोहर । रामचंद्रासी स्थापिले ।।३०।।
गुरुव्दादशीचा शुभ दिन । प्राणप्रतिष्ठा झाली जाण ।
अध्याय हा श्री गुरुंसी सान । अर्पण केला येच दिनी ।।३१।।
आनंदाचा हा दिवस । आनंदाचा वर्षे पाऊस ।
बहरली संतकृपेची तुळस । हळुवार औदुंबर डोले ।।३२।।
भजा भजा हो श्री गुरुंसी । समाधान होई मानसी ।
शांति सदैव मनी लाधसी । भक्ति गुरुंची आचरिता ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

महाराजांचे चरित्र अनाकलनीय । न बोलती किंचित स्वाविषय ।
भक्तांचे अनुभव सुश्राव्य । त्यावरून कल्पना ये थोडी ॥१॥
अनुग्रह निज शरणागतांवर । केला असे वारंवार ।
त्यातून त्यांचे रम्य मनोहर । चित्र रेखिले जाईल ॥२॥
म्हणोन ये अध्यायी पासून । गुरुचरित्र अतिरसाळ जाण ।
भक्तानुभव रूपे करून । कथन केले असे पै ॥३॥
श्रोते व्हावे सावधान । ऐका देऊन कान मन ।
कथा गुरूंची परम पावन । पाप विनाशिनी गंगा जी ॥४॥
अर्धांगिनी लक्ष्मीबाई । वाटे पंढरीला जावे पाई ।
योग सुंदर जुळला त्याही । वारीसाठी सांगावा झाला ॥५॥
पतिराज म्हणती तयांला । जा श्रींच्या दर्शनाला ।
पैसे पंढरीच्या वारीला । भरले असे येवेळी ॥६॥
पाच-सहा मैत्रिणी सोबत । आळंदीस प्रथम जात ।
फार गर्दी तेथे असत । चहाची सोय नव्हती तेथे ॥७॥
हॉटेल मध्ये चहा घ्यावे । हे आईसाहेबांस न मानवे ।
निर्धारे आचार पाळावे । नियम मोडावा तो कैसा ॥८॥
साऱ्या चहासाठी तळमळे । परि त्यांना चहा न मिळे ।
डोके दुख्खु लागे त्यामुळे । पालखी निघण्याची ही वेळ होय ॥९॥
"श्री ज्ञानेश्वर माऊली तुकाराम" ऐसा । दुमदुमला उच्च स्वरे परियेसा ।
गजर होता त्या क्षणी सहसा । माऊली एक प्रगटली ॥१०॥
हातात होता गडवा एक । म्हणे सस्नेहे माऊली अनामिक ।
चहा तुम्हास हवा आणिक । आणिलासे प्राशाया ॥११॥
म्हणे आईसाहेबांसी प्रेमभावे । निःशंक मने चहा घ्यावे ।
प्रसन्न झाले स्त्रीवर्ग आघवे । संतोष झाला चहा घेऊन ॥१२॥

एवढ्यात नाहीशी झाली । माऊली ती कोठेच न दिसली ।
वारीहून येता कथिली। हकीगत महाराजांसी सर्व ।।१३।।
म्हणती दत्तमहाराज तयेवेळी । चहा देण्या गोपाल वनमाळी ।
प्रत्यक्ष आला तुम्हा जवळी । पाय त्याचे धरिले का हो? ।।१४।।
उभयता स्वधर्म आचरिती । म्हणोन देवच धावोन येती ।
भक्त परायणतेची प्रचीती । असे ही सुंदर ।।१५।।
प्रत्यक्ष दत्तात्रेय अवतार । आईसाहेब अनघा देवी निर्धारि ।
पाही सगुण दर्शनि समोर । घडले असे भक्ताला ।।१६।।
श्री वासुदेव निवास स्थानी । औदुंबर तळ सन्निधानी ।
बैसले असता भक्ताभिमानी । दत्त महाराज तयेवेळी ।।१७।।
प्रत्यक्ष दिसती दत्त भगवान । षड्भुज रूपी सन्निधान ।
नमस्कारिता मिळे आशीर्वचन । जागतेपणी भक्तासी एका ।।१८।।
तैसेच जगदंबा स्वरूप । आईसाहेबांचे आपोआप ।
बसता देव्हाऱ्याच्या समीप । नवरात्रात अष्टमीचे दिवशी ।।१९।।
दिवस असे मंगळवार । दिसे रूप देवी अवतार ।
जागेपणी दर्शनि मनोहर । भक्तांस दिधले स्वकृपे ।।२०।।
सुवर्ण किरीट विराजमान । वस्त्रे भरजरी केली परिधान ।
पुष्पमालादि अलंकार लेऊन । श्री महालक्ष्मी बैसलीसे ।।२१।।
ठेवीले चरणी मस्तक । हस्त पाठीवरी एक ।
कंकण युक्त ठेऊनी सुरेख । आशीर्वादि दीधला पै ।।२२।।
मूल स्वरूपात येता । हे काय विचारता ।
दर्शनाचे वर्णनि कथिता । "खरे असे" म्हणती स्वये ।।२३।।
विष्णुस्वरूप दत्तात्रेय । आईसाहेब श्री महालक्ष्मीमाय ।
भक्तकाजे ही काय । धरिली दयाघने कलीयुगी ।।२४।।
काय वर्णावि तयांचे गुण । अल्पमति मी जाण ।
त्वद् भक्तांचे जे कथन । तेच चरित्र तुझे गवसे ।।२५।।
महान तुझ्या अवताराचे । किंचित् ज्ञान होई साचे ।
हे प्राजक्त सुमन वेचे । गुरु अंगणातील सड्यातून ।।२६।।

अनेक ठिकाणी अनेकांवरी । कृपा केली असेल गुरुवरी ।
मौक्तिक ते शिंपल्याभितरी । अथांग सागरात डुल्लत।।२७।।
पैकी काही थोडे मोती । श्रीकृपेने ये हाती ।
त्यावरून श्री गुरुतेज प्रगट होती । प्यावे ते नेत्री सुखार्थ ।।२८।।
हाचि तो आनंदाचा ठेवा । चिंतन होई गुरुंचे तेधवा ।
श्रवण तसेच स्मरण भक्तिचा मेवा । मिळे रसपिपासू जनांसी ।।२९।।
कोणास संकटातून तारी । कोणास ज्ञान देई अंतरी ।
कोणास न सांगता जे अंतरी । असे ती वांच्छा पुरवितसे ।।३०।।
सर्वांतिर्यामी सर्वज्ञ असे । जड मतिसी सामान्य भासे ।
परि खूण पटता कृपाविलासे । श्रध्दा दृढतर गुरुंवर होय ।।३१।।
विष्णुकविंचे वचन । योग्य कराया वर्णन ।
गुरुंच्या करुणेची खूण। पटते त्याद्वारे मानसी ।।३२।।
सदा प्रसन्न मुख विराजे । वंदिती देव ऋषि राजे ।
भक्तांच्या धावे जी काजे । क्षणही न लावी विलंबा ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणिसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

भगवंताचे भक्त । चार प्रकारचे असत ।
अर्थार्थी अन् आर्त । जिज्ञासू, मुमुक्षू त्यापरि ॥१॥
अनेक असती मनोरथ । मन वांच्छे काहीतरी सतत ।
कामना पुरी होता आनंद होत । त्यासाठी देवास शरण रिघे ॥२॥
करीती नवस-सायास । म्हणती पुरवी मनाची आस ।
त्याकरिता धांवा खास । देवाचा करिताती ॥३॥
देवही कृपाळू-कनवाळू । अर्थार्थी भक्ताचा तात्काळू ।
पुरवोनी काम केवळू । वळवे मन भक्तिकडे ॥४॥
संसाराचा मार्गक्रमिता । संकटे भयावह उभी ठाकता ।
म्हणती दया करी वो रघुनाथा । सोडवी यातून तात्काळ ॥५॥
ऐसा भक्त असे आर्त। करुणपणे स्वोध्दारार्थ ।
विनवी देवास उपकारार्थ । संकटांना भिवोनी ॥६॥
पांडव माता कुंती । मागे त्या कमलापती ।
दे सदा मज विपत्ती । आर्ततेने भाकीन करुणा ॥७॥
प्रतिबंध वाटती संकटे । परि त्या योगे देव भेटे ।
आर्त-भक्तिच्या वेगे लोटे । भाव अंतःकरणी सतत ॥८॥
ऐसाच भक्त परिवार एक । महाराजांवर श्रध्दा असे आणिक ।
प्रपंच करिता एका-एक । वादळ उठले संकटांचे ॥९॥
कारुण्यपूर्ण ती कथा । द्रवेल हृदय तत्वतां ।
ऐकून त्यांची विपदा-गाथा । परि आधार देती गुरु ॥१०॥
अंधार असता भयाण । दिशा एक ही न दिसे जाण ।
संकटात तळमळे अंतःकरण । बाहेर पडण्या त्यातून ॥११॥
तोच आधाराचा किरण । येई गुरुवरांकडून ।
ईशकृपेची ती खूण । भक्तीमयी गुरु भगिनी भेटली ॥१२॥

फोटो समोर महाराजांच्या । कथन केला उद्वेग मनीचा ।
समाधान त्या प्रश्नांचा । केला महाराजांनी भगिनी मार्फत ।।१३।।
दु:खी कष्टी परिवारासी । कृपा करून वेगेसी ।
दूर पळविले संकटांसी । वेग भक्तिचा वाढविला ।।१४।।
मायेतून सोडविण्या मन । जडातून करण्या उच्चाटन ।
आर्तता केली निर्माण । जाणावी कृपा ईश्वराची ।।१५।।
भाव मनी उमलता ऐसा । परमपदाची जिज्ञासा ।
भरे मनांत ती सहसा । उद्देश्य कृतीचा तोच असे ।।१६।।
या परिवाराचे हेच भाव । म्हणे दु:खमय हा सर्व भव ।
सोडवी त्यातून तो गुरुराव । वावडे विपदांचे नाही आता ।।१७।।
वाचिती महाराजांचे प्रवचन । करिती त्यांचे मनन चिंतन ।
परमानंदात असती मग्न । स्थिती ऐसी जाहली ।।१८।।
मायेत भुलून ईश्वरास । विसरे मानव तेव्हा त्यास ।
दु:ख देऊन माया पाश । तोडी कृपाळू भगवंत ।।१९।।
ऐसे गुरूंचे महिमान । जो तयांस जाई शरण ।
सुटे त्याचे जन्म-मरण । कबीरदास ही तेच म्हणती ।।२०।।
गुरु कुम्हार सिस कुंभ है । गढगढ कोढे खोट ।
अंतर हात सहार दै । बाहर मारै चोट ।।२१।।
म्हणती सातसमुद्राची करावी शाई । लेखणी करावी सर्व वनराई ।
धरणीचे कागद लवलाही । तरी वर्णन त्यांचे पूर्ण न होय ।।२२।।
कृपाळू आमचा गुरुराव । पाहोनिया मनीचे भाव ।
अनुग्रह करी अभिनव । भक्तास धरी करी आपुले ।।२३।।
हे न घडे एकाच्याच विषयी । अगणित त्यांना शरण जाई ।
त्या सर्वांसि ही समदृष्टीने पाही । सर्वांवर करी उत्कट प्रेम ।।२४।।
अपराध घालून पोटी । म्हणे लेकरे माझी गोमटी ।
जरी आहेत थोडी हट्टी । परी वळतील भजनालागी ।।२५।।
या सर्वांचा व्हावा उद्धार । हाच तयांचा निर्धार ।
जन्मोजन्मी देऊन आधार । भवसिंधूतून तारीती ।।२६।।

तत्सन्नीध उभे राहून । करावी प्रार्थना हात जोडून ।
पाहे तो कृपेने दयाघन । मन वांछित पुरवितसे ।।२७।।
कल्पवृक्ष कामधेनू । मागता पुरवी मनकामनू ।
त्याहूनही श्रेष्ठ गुरुमाय जाणू । न मागता सर्व मिळे ।।२८।।
जयजया परमोदारा । भवसमुद्रातून उध्दारा ।
देई चरणांपाशी आसरा । यःकश्चित् भक्तास ।।२९।।
तुझा भक्त म्हणावया । लाज वाटे गुरुराया ।
वासनेत लिडबिड ओंगळ काया । पापयुक्त हीन मति जाणावी ।।३०।।
परी तू समर्थ खरोखर । पापविनाशी निर्झर ।
नारायण तू आमचा ईश्वर । तारी-तारी लवलाही ।।३१।।
नाही आचार-विचार । मनांत भरला संसार ।
न ये मुखी नामोच्चार । कैसी घडेल तुझी भक्ति ।।३२।।
काही पूर्व सुकृत म्हणोन । भेटलासी तू नारायण ।
येई आता धांव घेऊन । छेदन करी विषायासक्तीचे ।।३३।।
आम्ही दीन बालके । आनंदलो तुझ्या कौतुके ।
आता मागणे इतुके । स्मरण निरंतर तुझे राहो ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
विसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २१

।। श्री गणेशदत्तगुरूभ्योनम: ।।

शिव शंकरू आणि गुरू । तत्व एक निर्धारु ।।
कल्याणकारक ईश्वरू । सात्विक शुध्द आनंदरूप ।।१।।
हे अभिन्नत्व जाणण्या । ऐक्य गुरू-शिवाचे पाहण्या ।
कथा ही श्रवण करण्या । द्यावे लक्ष एक चित्ते ।।२।।
अनंत जन्मांत जीवाचे । ज्या स्वरूपाशी नाते साचे ।
भक्त म्हणून, त्याच स्वरूपाचे । करविती अर्चन श्री गुरू ।।३।।
एक भक्त ब्राम्हण । त्यास शिवोपासना शिवपूजन ।
सांगती महाराज वाचन । शिवलीलामृताचे करण्या ।।४।।
एकदा वाटे ब्राम्हणांस । रजत शिवलिंग असावे खास ।
नित्य पूजा पंचायतनास । गुरू निरोपिती अभिनव ।।५।।
घरी तुझ्या कपाटात । आहे शोधून काढ त्वरित ।
ऐसे श्री गुरू आज्ञापित । ठेवून विश्वास शोधी तो ।।६।।
सापडले लिंग खरोखरी । गुरू स्पर्शे चैतन्य संचारी ।
शिवांश त्या लिंगा भितरी । पूजोन ठेविला देव्हाऱ्यात ।।७।।
एकदा मानसोपचाराने । श्री गुरूंसी पूजिले ब्राम्हणाने ।
प्रत्यक्ष पूजण्या सर्व साधने । पुष्प अत्तरादि नेतसे ।।८।।
म्हणती श्री गुरू तयाप्रत । आत्ताच पूजिले साग्रसंगीत ।
गंधपुष्प अत्तर सहित । पुन: पुन: कायसे पूजा ।।९।।
साश्चर्य हर्ष झाला ब्राम्हणा । सर्वज्ञ माझा गुरूराणा ।
करण्या वाडीस उपासना । महाराजां समवेत राहिला ।।१०।।
म्हणे सात दिसांमाजी । काय उपासना करावी जी ।
आज्ञापिती गुरूराजी । ११ पारायण शिवलीलामृत वाची ।।११।।
कधीतरी थोडे वाचन । करीतसे हा ब्राम्हण ।
गेला असे घाबरून । म्हणे कधी एवढे न वाचिले ।।१२।।

विनवी गुरुंस काकुळतीने । कैसे होईल हे वाचणे ।
''त्यांचे ते करवून घेतील'' म्हणे । नि:शंक मने करी सुरूवात ॥१३॥
येथे केलेल्या अनुष्ठानाचे । कोटी गुण फळ आहे साचे ।
म्हणोन संशय सोडून मनाचे । करी वाचन भक्तिभावे ॥१४॥
श्री कृपेने पारायण । होऊन संतोषला ब्राम्हण ।
यात्रे श्रीशैल्य मल्लीकार्जुन । एकदा जाई गुरु समवेत ॥१५॥
एकट्यास गाभाऱ्यात । बसोन व्हावी पूजा समस्त ।
अभिषेक व्हावा ऐसे इच्छी मनांत । तळमळ तीव्र लागून राहे ॥१६॥
आले आधी हैद्राबादेस । तेथून जाण्या श्रीशैल्यास ।
वाहन ठरे परी अन्य शिष्यास । गुरु चलण्यास आज्ञापिती ॥१७॥
जागा नसे वाहनात परी । आधले दिवशी गुरु आज्ञा करी ।
श्रीशैल्यास तू प्रस्थान करी । आत्ताच आणि एकट्याने ॥१८॥
पुढे जाऊन श्री गुरुंची । व्यवस्था सर्व करायची ।
कठिण परीक्षा शिष्याची । वाटे त्या ब्राम्हणास ॥१९॥
असे तो अपरिचित प्रांत । भाषा न कळे अपरिचित ।
फलक न वाचता येत । मोडके तोडके बोलून जाई ॥२०॥
मिळाले शेवटी वाहन । प्रवासे चिंता करी गहन ।
करी महाराजांच्या पुस्तकाचे वाचन । पाहे प्रवासी शेजारी ॥२१॥
आंध्र देशी मराठी भाषी । बोलणारा न मिळे मनुष्यी ।
खात्री असे ब्राम्हणाच्या मानसी । तरी घडले अपूर्व एक ॥२२॥
शेजारी बसलेला प्रवासी । हर्ष होऊनिया मानसी ।
करी विप्राची चौकशी । म्हणे मी शिष्य महाराजांचा ॥२३॥
आहे वेदपाठी ब्राम्हण । नित्य सेवितो मल्लिकार्जुन ।
ही महाराजांची योजना जाण । श्रीशैल्यासच राहतो मी ॥२४॥
आस्थेने देई आश्वासन । होईल सर्व व्यवस्थापन ।
गेले श्रीशैल्या लागून । हर्ष भरीत उभय द्विज ॥२५॥
आपणाहून सहप्रवासी । नेई ब्राम्हणास स्वगृहासी ।
म्हणे सोडू सोमवारासी । विनवितसे साचार ॥२६॥

पुढे घडले आश्चर्य एक । मित्र म्हणे विप्रा ऐक ।
जरी करायचा अभिषेक । श्री मल्लीकार्जुनास तुजसी ।।२७।।
तरी उठोन प्रातः समयी । चल लवकरच शिवालयी ।
उषा उगवली आनंदमयी । शिवलिंगाजवळ बसे विप्र ।।२८।।
मनासारखी पूजा होऊन । झाले अभिषेक अर्चन ।
आनंदे कंठ दाटून । येई तयेवेळी विप्राचा ।।२९।।
श्रीशैल्यपूजक विप्राने । श्री गुरुंच्या व्यवस्थापने ।
एक गृह करुन सुशोभने । सज्ज करुन दिधले ।।३०।।
पहाटे दोघे द्वारावरी । श्री गुरुंची प्रतीक्षा करी ।
येता श्री गुरु विचारी । झाले मनासारखे का हो ।।३१।।
ऐसी कृपा श्री गुरुंची । इच्छा जाणोन मनाची ।
न मागता पुरवी साची । भक्तकाम कल्पद्रुम ।।३२।।
तंतुकास लिंगस्थानी । दर्शन देऊन केले समाधानी ।
ऐशा श्री शिवगुरु लागुनी । प्रणाम शतशः चरणांवर ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकविसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २२

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

अंबरीष राजावरी दुर्वास । कोपता देती शाप खास ।
स्वभक्ताला वाचविण्यास । शाप घेतला स्वतः वरी ॥१॥
पुनः पुनः या भूवरी । देहधारण करोन अवतरी ।
जगद्कार्यार्थ श्रीहरी । शाप तो वर होई भक्तांसाठी ॥२॥
प्रत्येक अवतार कार्यात । भक्तांना सवे घेई भगवंत ।
दास्य-सख्य-शिष्य भावे वागवित । लीला करी तयांसह ॥३॥
श्री महाराजांचे ही चरित्रात । अनेक ऐशा विभूति असत ।
अनुभवे त्यांच्या संशयरहित । दर्शन परब्रम्हाचे होई ॥४॥
श्री वासुदेव निवासात । औदुंबराच्या सावलीत ।
श्री दत्तात्रेय प्रभूंच्या स्वरूपांत । देती दर्शन महाराज ॥५॥
तैसेच देव्हाऱ्या समोर । जगन्माता मनोहर ।
दिसती आईसाहेब सुंदर । देवी रूपांत शिष्येसी ॥६॥
या ब्राम्हण कन्येसी । दर्शन देती गुणराशी ।
विशेष प्रेमे करोन तियेसी । वागविती लहानपणापासून ॥७॥
पूर्वी सविस्तर प्रसंग । कथिला हा सांगोपांग ।
त्यांचे पुढील सत्संग । आता वर्णिले सकल ही ॥८॥
पुसता "काय करू उपासना" । म्हणे तियेस श्री गुरुराणा ।
कृपा तुम्हावर पूर्ण जाणा । श्री गुरुंची निरंतर ॥९॥
त्यांस अवतार असेपर्यंत । आणि महासमाधी नंतर ही सतत ।
प्रत्यक्ष दर्शनादि अनुभवांत । सान्निध्य लाभले महाराजांचे ॥१०॥
पुढील प्रसंगात भक्ताधीनत्व । श्री महाराजांचे दिसून येत ।
तळमळ जाणोनि मनाची त्वरित । अनुभूति महान दाविती ॥११॥
श्री वासुदेव निवासात । सायंकाळी महाराज येत ।
नित्य ठराविक वेळेपर्यंत । तेव्हा भक्तांचे दर्शन होई ॥१२॥

ब्राम्हणजा नियमित येई । सद्गुरुंचे दर्शन घेई ।
एकदा प्रसंग विलक्षण होई । श्रोते ऐका सावधान ।।१३।।
त्या दिवशी भूक लागली । आश्रमी जाण्याची वेळ टळली ।
विलंबे आश्रमा प्रति आली । परि न दिसले महाराज ।।१४।।
हुरहुर मनास वाटे । परि नित्याच्या परिपाठे ।
सेवा नित्याची करिता ओठे । नामस्मरण करित राहे ।।१५।।
पहिल्या मजल्यावर तियेसी । श्रवणी येई ऐकावयासी ।
श्रीगुरु आले कार्यालयासी । ऐसे घडले कधीच नसे ।।१६।।
एकदा जाता घरी परत । सहसा महाराज परत न येत ।
ऐसे कसे घडले अवचित । मानसी विचारी शिष्योत्तमा ।।१७।।
जिना उतरून खाली येता । खुर्चीत बैसले जगत्पिता ।
जवळी उभी वहिनी सविता । सद्गृहस्थ ही एक होते ।।१८।।
सर्वत्र असे शांतता । पुढे जाऊन नमस्कारिता ।
साखरेची पुडी दिली हाता । दर्शन झाल्या उपरी भक्तासी ।।१९।।
काम झाले! चला! म्हणत । आश्रमा बाहेर पडत ।
दर्शन एका दंपतीस देत । वाहनातून जाती श्रीगुरु ।।२०।।
हे प्रत्यक्ष दर्शन घडले । नंतर चौकशीत कळले ।
श्रीगुरु दुसऱ्यांदा नव्हतेच आले । सविता वहिनी ही नच आल्या ।।२१।।
दर्शन चुकल्याची मनी तळमळ । श्रीगुरु कृपासागर केवळ ।
पुरवूनी मनोकामना सकळ । भक्ताधीनत्व दाविती ।।२२।।
खडीसाखरेच्या पुडीची खूण । त्यावरून अनुभव खरा जाण ।
स्वप्नांतही होते दर्शन । हे तर प्रत्यक्ष जागेपणी ।।२३।।
असेच एकदा यागाकारणे । श्रीगुरुंचे जाहले राहणे ।
एका देवस्थानांत, होता प्रयाणे । पुढील कार्यक्रमासाठी त्यांचे ।।२४।।
येई सारखी आठवण । तळमळे शिष्येचे अंतःकरण ।
कधी पुन: भेटे दयाघन । विचार मानसी करितसे ।।२५।।
उद्योग काहीतरी हातास । म्हणोन महाराजांच्या बैठकीस ।
गादी नीट करूनी त्यास । ताठ चादर करूनी ठेवली ।।२६।।

मग ब्राम्हण कुमारी । चटई टाकोन निद्रा करी ।
बैठकीच्या शेजारी । जाग येई कालांतरे ॥२७॥
चटई जवळ दृष्टीगोचर । असे उशाशी पुडी खडीसाखर ।
महाराज जी देती हातावर । पायी मस्तक ठेविता ॥२८॥
बघता महाराजांच्या बैठकीवर । मधे खोलगट सुरकुते चादर ।
जैसे होते महाराज उठोन गेल्यावर । तैसी झालेली आढळे ॥२९॥
निजण्या आधी ते आसन । नीट करोनी झोपलो आपण ।
श्रीगुरु येऊन गेल्याची ही खूण । मनी वाटे बहुत हर्ष ॥३०॥
आठवण येई आपणासी । भगवंत तू हे मनी जाणसी ।
येऊन दिधले प्रसादासी । ही महिमा न वर्णवि ॥३१॥
उत्कट भाव मनी वसे । तिथे प्रत्यक्ष देव दिसे ।
भक्तासाठी धांवतसे । भगवंत तत्काळ हे सत्य ॥३२॥
कृपा करी गुरु राया । करोन दूर अपुली माया ।
मनी भाव, भक्ति-काया । देई म्हणोन विनविते ॥३३॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
बावीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – २३

॥ श्री गणेशदत्तगुरूभ्योनमः ॥

भक्ति जडतां श्रीगुरू चरणी । आपले मन आणिक करणी ।
शुध्द असावे, या उदाहरणी । समजून येई स्पष्टत्वें ॥१॥
मागील अध्यायी ब्राम्हण कन्या । श्रीगुरूंस भजतसे अनन्या ।
भक्ते सावधान असावे या विषया । अनुभव एक वर्णिला ॥२॥
एकदा राहत्या घरासमोर । रस्ता पाहून करी विचार ।
'अंत्ययात्रा' कधी यावर । आजवर ती न पाहिली ॥३॥
दुसऱ्याच दिवशी तियेसी । अंत्ययात्रा दिसे नेत्रांसी ।
विचार करी ती मानसी । हें काय चित्ती चिंतिले ॥४॥
भार घातला श्री गुरूंवरी । तो भक्तकल्पद्रुम निर्धारी ।
मनी वासना उठता तरी । शुभ-सात्विक त्या असाव्या ॥५॥
त्याहून ही असे बरवे । वासना वन पूर्ण जाळावे ।
चांगले वाईट काहीच नुरावे । मनांत विचार आपुल्या ॥६॥
हे तो जरी न घडे । तरी मनां करी एवढे ।
हरिगुण चिंती बापुडे । सदा सर्व समयासी ॥७॥
ब्राम्हणजा ऐसे चिंतुनी । राहता वर्तमान एके दिनी ।
घडले विलक्षण, तियेस स्वप्नी । दिसले घटनाचक्र एक ॥८॥
स्वप्नांत जे पाहिले । पुरावे प्रत्यक्ष त्यास दिसले ।
ऐसे विलक्षण हे घडले । स्वप्नाच्या खुणा दिसती समोर ॥९॥
आहोत आपण श्री वासुदेव निवासी । दुसरे कोणीच नसे सोबतीसी ।
निशा भासे भयंकरसी । शुकशुकाट असे सर्वत्र ॥१०॥
बाहेर सोसाट वाहे वारा । घनघोर बरसती पाऊसधारा ।
एवढ्यात थाप ऐकू येई दारा । म्हणे ये वेळी असेल कोण ॥११॥
ऐसा करीत विचार । कन्या उघडी ते दार ।
तो महाराज दिसती समोर । आत येऊन बैसले ॥१२॥

म्हणे महाराज शिष्येसी । एकटीच होती आश्रमासी ।
सोबत म्हणून या समयासी । आश्रमी आपण पातलो ॥१३॥
वारा येई धडकन । खिडकी वाजे खडकन ।
कांच फुटली खळकन । तुकडे पसरले भूवरी ॥१४॥
एवढ्यांत स्वप्न संपले । विशेष मानसी वाटले ।
दुसरे दिनी जाऊन पाहिले । उत्सुकतेने आश्रमी ॥१५॥
तो रात्रीच्या वादळाचे । चिन्ह समोर दिसे साचे ।
तुकडे पसरले भूवरी काचे । जैसे पाहिले स्वप्नांत ॥१६॥
असेच एक स्वप्न पडले । आरती साठी जाणे घडले ।
आश्रमांत रात्रौ भले । तो तेथे कोणी नाही ॥१७॥
एक सद्विप्र गाभाऱ्यात । बसोन पाठ आपुले म्हणत ।
दिसता कन्या, तियेस सांगत । बहु बरे तुम्ही आता आल्या ॥१८॥
मी बसलो पाठाला । उठता येईना मला ।
सोवळ्यांत करून भला । स्वयंपाक अतिथींस वाढा हो ॥१९॥
आलेत कोण अतिथी । उत्सुकता त्याची होती ।
हात पाय धुवून आत जाती । तो तेथे तेजस्वी असती तीन ॥२०॥
भस्माचे त्रिपुंड्र लाऊन । रुद्राक्ष माळा लेऊन ।
बैसले जणू त्रिमूर्ती येऊन । त्या मधल्या खोलीत ॥२१॥
अतिथी देवांस केले वंदन । ते पाहती सुहास्य वदन ।
कन्या करी मनी विचारण । स्वयंपाक कैसा करावा हो ॥२२॥
आश्रमांत ये वेळी पर्यंत । स्वयंपाकाची वेळ न येत ।
कधीच ब्राम्हण कन्ये प्रत । चहा वगैरेच केवळ करी ॥२३॥
तथापि स्त्रीधर्म अनुसरुन । तिने केले तेथे स्नान ।
सोवळ्यातील वस्त्र परिधानोन । पाक करण्यास सिध्द झाली ॥२४॥
शेजारच्या फळ्यांवरून । दोन डबे घेतले काढून ।
ते पाहिले उघडून । एकात कणीक, तांदुळ दुसऱ्यांत ॥२५॥
शिजवोनी उत्तम अन्न । ब्राम्हणांस वाढिले भोजन ।
आवरा-सावर मागची करून । ठेविल्याचे दिसे स्वप्नी ॥२६॥
एवढ्यावर संपले स्वप्न । दुसरे दिनी केले गमन ।

आश्रमासी नित्य नेमे करून । स्वप्न आठवून मानसी ।।२७।।
चहा करण्यासाठी जात । ब्राम्हणजा स्वयंपाक घरात ।
तो ओट्यावरती दिसत । दोन डबे पत्र्याचे ।।२८।।
पाहिले ते डबे उघडून । मनी आश्चर्य आले दाटून ।
त्या डब्यांत आले आढळून । तांदुळ, कणीक स्वप्ना सारिखे ।।२९।।
सेवकांस तिने पुसिले । हे डबे येथे का ठेविले ।
कां येथेच असती भले । तो सेवक करी आश्चर्य ।।३०।।
म्हणे सेवक, आचाऱ्याने । स्वयंपाकाची शिधा सामाने ।
रात्रीच गॅरेज मधे ठेवणे । ऐसे सर्व जाहले ।।३१।।
तेथे मोठे स्वयंपाक घर । आश्रमाचे असे, खरोखर ।
सकाळपासून आचारेश्वर । डबे शोधितो ही दोन ।।३२।।
येथे कैसे हे आले? । कोणी आणून ठेविले? ।
मला काही न कळे यातले । कोणासही न आठवे त्या विषयी ।।३३।।
ब्राम्हण कन्येस आश्चर्य झाले । नवलच सर्व जाहले ।
स्वप्न की हे खरे घडले । भिक्षा वाढली दत्तप्रभूंस ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
तेविसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक होता प्रेमळ भक्त । सतत सन्निध राहण्या इच्छित ।
ते न घडे परी वरचेवरी येत । समीप श्री दत्त महाराजांच्या ॥१॥
त्यांपासून दूर जाणे । त्याला वाटे जीवघेणे ।
परी नियती पुढे काय चालणे । बापुड्या नराचे तेथे हो ॥२॥
पुण्य नगरीहून इतरत्र । राहण्याची वेळ येत ।
मन त्याचे व्याकुळ होत । विरहाच्या कल्पनेने पाई ॥३॥
सायंकाळी तुळशी बागेत । काही बाजार करण्या जात ।
मनी चिंती गुरूंस सतत । वाटे आत्ताच दर्शना जावे ॥४॥
बाजार अर्धवट टाकून । जाई श्री वासुदेव निवासा लागुन ।
श्रीगुरूंचे होते प्रवचन । गर्दीत अगदी दूर बसे ॥५॥
प्रवचन होते संपत आले । या भक्तास पाहून भले ।
महाराज त्या समयी बोलले । नेमके मर्म जाणोनी ॥६॥
"लाडका जो आपला भक्त । त्यास ठेवावे दूर देशाप्रत ।
त्याचे मन इकडे ओढ घेई सतत । लक्ष राही आपले ही त्याकडे" ॥७॥
ऐसेच दोन प्रसंगी । श्री महाराज त्यासी हेच सांगी ।
मन रंगावे स्मरण रंगी । उद्देश हाच श्रीगुरूंचा ॥८॥
सतत सहवासात जो राही । त्यास गुरूंचे विस्मरण होई ।
जो गुरूंपासून दूर जाई । भेटीच्या इच्छे करी स्मरण ॥९॥
ऐसे करून चिंतन । शांत झाले भक्ताचे मन ।
करे आता अनुदिन । स्मरण श्री महाराजांचे ॥१०॥
एकदा अपरोक्ष महाराजांच्या । ताई महाराज जालन्याच्या ।
समारंभ करी, कृष्णामाईच्या । पूजा आणि साडी नेसविण्याचा ॥११॥
फार मोठा हा सोहळा । कृष्णेच्या घाटावर जाहला ।
ऐलतीराहून पैलतीरी भला । नौकेतून झाला संपन्न ॥१२॥

नव्वदावर साड्या घेऊनी । कृष्णेस त्या नेसवुनी ।
क्षेत्रातील सुवासिनी बोलावुनी । एक-एक त्यां दान दिली ।।१३।।
अन्न-दान झाले विपुल । आनंदित जाहले सकल ।
सर्व आटोपून दुपारची वेळ । एक भक्त घेई विश्रांती ।।१४।।
डोळ्यापुढे आठवीत । सोहळा समस्त रसभरीत ।
तो एक दृश्य देखत । अचानक तये वेळी ।।१५।।
सोहळा हा पाहण्यास । संचारुन एका रथास ।
आक्रमुनी आकाश मार्गास । येती श्रीदत्त कवीश्वर ।।१६।।
आशीर्वाद देती श्रीगुरु । भक्त काम कल्पतरु
पाहुनी सोहळा सारा रुचिरु । ऐसे भक्त पाहातसे ।।१७।।
सांगे भक्त सौ ताईंना । ऐसे पाहिले म्यां नयना ।
ताई म्हणती हे सत्य जाणा । अनुभव पूर्ण खरा असे ।।१८।।
यावरून ये कळून । दत्तावतार महाराज आपण ।
शतशः करून प्रणाम । पुढील प्रसंग आता पाहू ।।१९।।
एका दंपतीच्या येई मना । पाद्यपूजा करावी आपणा ।
महाराजांस केली विचारणा । म्हणती आश्रमात करावी ।।२०।।
प्रसाद मिळेल सर्वांना । ऐसे म्हणे गुरुराणा ।
परंतु ही पूजा होईना । काही कारणे त्या वेळी ।।२१।।
पूजेसाठी जे होते धन । ते दिले बँकेत ठेवून ।
बाजूला राहावे हा विचार करून।
तो वरील प्रसंग कृष्णामाईचा आला ।।२२।।
संधी मिळाली दंपतीला । या उत्सवास जाण्याला ।
आनंद झाला फार मनाला । विचार केला त्याच वेळी ।।२३।।
करावी महापूजा वाडीस । ऐसे आले त्यांच्या मनांस ।
पैसे जे ठेविले पूजेस । ते घ्यावे काढून म्हणे ।।२४।।
गेले त्यासाठी बँकेत । रक्कम झाली दोनपट ।
परी खुणेची सही विसरत । केली चुकीची सही तेथे ।।२५।।
मॅनेजर जरी हे जाणत । तरी पैसे काढून देत ।
आनंद दंपतीस होत । जाती वाडीस मुक्कामाला ।।२६।।

मुख्य सोहळा होता पूर्ण । महापूजा वाडीस करून ।
अन्नदान करता, संपूर्ण । खर्च भागला 'त्या' धनातुनी ॥२७॥
श्रींनी जाणीव दिली करून । मनोहर पादुका आणि आपण ।
एकच दोन्ही आहोत जाण । करा पूजा कोठेही ॥२८॥
अनुभव ऐसे दावून । भक्तांचे दृढ करी मन ।
भक्तिची गोडी चाखून । तृप्त होतात सर्वही ॥२९॥
ऐसी ही स्मरण भक्ति । सतत लाभो आम्हाप्रति ।
चित्त माझे हेचि चिंती । भक्त दयाळा श्रीगुरु ॥३०॥
तुझी कृपा झाल्याविण । न घडेल पूजन-स्मरण ।
तरी पाही भगवान दयाघन । शुध्द मति दे श्रीगुरु ॥३१॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
चोविसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - २५

।। श्री गणेशदत्तगुरूभ्योनमः।।

श्री विष्णुसहस्त्रनामी परम पावन । एक देवाचे अभिधान ।
आहे "भयकृत भयनाशनः"। जाणावी लीला भगवंताची ।।१।।
भगवंताचे जे भक्त। त्यांचे पूर्व संचित ।
संकट होवून पुढे ठाकत । परिहार करी तो हरी ।।२।।
संकट आणणारा ही तोच । सहनशक्ति देणारा तोच ।
निवारण करणारा ही तोच । भयकृत् भयनाशन परमात्मा ।।३।।
म्हणोनी प्रार्थना सतत । करावी स्नेह निरत ।
तोच आपल्याला सांभाळित । आहे सर्वदा सर्वकाळ ।।४।।
ऐसाच एक अनुभव । आहे पूर्ण अभिनव ।
ऐका मनी धरूनी भाव । विघ्ने पळतील बारा वाटा ।।५।।
धुंडीराज महाराज सरस्वती आईंपासून । होते कृपा पात्र गहन ।
एका परिवारातील भक्त जन । दत्तमहाराज ही उतरती त्यांकडे ।।६।।
कार्यक्रमाचे ठिकाणी । पांघरोन आपली उपरणी ।
मांडीवरी बैसविती क्षणी । या परिवारातील बालकांना ।।७।।
आपुलकी वागण्यात । प्रेम करिती अत्यंत।
वडीलधारे घरातील वाटत । महाराज या सर्वांना ।।८।।
खरे स्वरूप कळू न देती । ऐसे महाराज राहती ।
आता येतसे खरी प्रचीती । महाराजांची प्रवचनादिकांवरून ।।९।।
थोर विभूतीचे सन्निध राहून । कोरडेच राहिलो आपण ।
ऐसे वाटे त्यांना जाण । परी कृपा न्यून न होई गुरूंची ।।१०।।
विनविता अनुग्रहासाठी आपण । म्हणती तुझ्या घरी येऊन ।
तुला अनुग्रह देईन । सत्यसंकल्प गुरुरायांचा ।।११।।
वास्तू जाहली नूतन । त्याच घरी येऊन ।
स्वतः आचार्य होऊन । पूजन करवून घेतले स्वतःचे ।।१२।।
अनुग्रह ऐसा दिधला । एकदा अध्वर योजिला।

यांचे गांवी हिवाळ्यात भला । श्री दत्तयाग म्हणोनी ।।१३।।
श्री महाराज आणि ब्रम्हवृंद । राहता यांच्या वास्तूत होई आनंद ।
रात्रौ महाराजांसमोर ब्रम्हवृंद । वेदपठण प्रार्थनापूर्वक करी ।।१४।।
पूर्णाहुतीचे आदले दिनी । या प्रार्थना वेद पठणी ।
निर्विघ्नतेसाठी काही मंत्र म्हणी । मुख्य आचार्य मंत्रज्ञ ।।१५।।
पूर्ण जाहली प्रार्थना । महाराज करती विचारणा ।
काय मागितले त्या लक्ष्मीरमणा । आचार्यवर्य आपण ।।१६।।
त्यावर काही बोलणे होऊन । म्हणती चुकलो आपण ।
गुरुराया अनुस्वाराची चूक होऊन । मंत्र चुकीचे बोलिलो ।।१७।।
म्हणती चुकलात तुम्ही जरी । चुकणार नाही तो हरी ।
फल मंत्राचे मिळणार तरी । ही निश्चित गोष्ट होय ।।१८।।
यजमानांस बोलावून । सांगती महाराज आपण ।
उद्या सकाळीच बाजारी जाऊन । ताडपत्र्या बहुत आणाव्या ।।१९।।
ताडपत्र्यांनी त्वरित । संपूर्ण मंडप करा आच्छादित ।
विघ्न न व्हावा निश्चित । पूर्णाहुतीचे समयास ।।२०।।
या दिवसांत पावसाचे । काहीच चिन्ह नसता साचे ।
आश्चर्य या सूचनेचे । वाटे यजमान भक्तासी ।।२१।।
तरीही गुरु आज्ञा प्रमाण । केले महाराजांचे सांगण्यावरून ।
दुसरे दिनी सारी सुरक्षा करून । प्रार्थिती सर्व ही देवासी ।।२२।।
पूर्णाहुती सुरू होता जोरदार । पाऊस पडला मुसळधार ।
देव नाही चुकणार । याचीच प्रचीती ही आली ।।२३।।
दैवी कवच रक्षणार्थ । पांघरिले होते यथार्थ ।
ताडपत्र्या लौकिकार्थ । खरे संरक्षण श्री गुरुंचे ।।२४।।
याग झाला निर्विघ्न । आचार्यांस पुसे यजमान ।
तयांच्या जिज्ञासेवरून । सांगती आचार्य सविस्तर ।।२५।।
काल रात्री प्रार्थने समयी । स्खलन झाले मंत्रात काही ।
एका अनुस्वाराची चूक होई । अर्थ पालटे मंत्रांचा ।।२६।।
त्यावरून विघ्न दारुण । बरसला घोर पर्जन्य ।
परी आपले गुरु वदान्य । त्यांनीच वाचविले आपणासी ।।२७।।

शब्द मंत्र ही तेच । मंत्राचे फल देणारे ही तेच ।
विघ्नापहार करणारे तेच । एक समर्थ दत्तगुरु ।।२८।।
भयकृत भयनाशन । हेच दत्त भगवान ।
महिमा त्यांचा अतिगहन । सामान्य वरून दिसती ते ।।२९।।
चूक आपल्या वागण्याची । न्याय निष्ठुरता ईश्वराची ।
समर्थता रक्षण करण्याची । त्याचीच असे पूर्णपणे ।।३०।।
हा प्रसंग अविस्मरणीय । कैसे वाचविले बरसता तोय ।
यागरक्षणासाठी होय । लीला सर्व ही तयांची ।।३१।।
आम्ही चुकलो जरी तरी काही । तू चुकू नको अंबाबाई ।
विष्णुदास प्रार्थिती लवलाही । कोणत्याही उपाये तारावे ।।३२।।
प्रार्थना भक्ताची ऐकून । धांव घेई नारायण ।
सोडवी तात्काळ आपण । गजेंद्रास जेवी सोडविले ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंचविसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २६

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

## पद

श्रीगुरु तू माझी आई । मज सांभाळी लवलाही ।।१।।
नेणे काहीच,ग ज्ञान । बालक मी तुझे सान ।।२।।
नेई हातासी धरूनी । खडतर मार्ग पाहोनी ।।३।।
मार्ग माझे चुकता बाई । सांभाळुनी घेई आई ।।४।।
भोगा संगे खेळलो । विषय मातीत लोळलो ।।५।।
अविचार तृषेने भिजलो । वासनेत लिडबिडलो ।।६।।
तमोंधकारे घाबरलो । आई तुला शरण आलो ।।७।।
रडणाऱ्या या बाळासी । नको रागवू धरी हातासी ।।८।।
सत्वाच्या पाण्याने धुवुनी । ज्ञानाचे वस्त्र नेसवोनी ।।९।।
परमानंद ग्रास भरवूनी । घेई कुशीत लपवोनी ।।१०।।
श्रुतीची गाऊनी अंगाई । समाधी निद्रा मजसी देई ।।११।।

## ओवी

एकदा मुंबईत श्रीगुरु । येतां त्या अवसरु ।
दर्शनांस भक्तवरु । जात होते अनुदिन ।।१।।
एकमेकांस कळवोनी । म्हणती घ्या लाभ जाऊनी ।
नगरीत आपल्या येऊनी । राहिले आहेत महाराज ।।२।।
निरोप एक असा । लाधला सुटीच्या दिवसा ।
आनंद झाला सहसा । एक भक्तासी तये वेळी ।।३।।
आज आहे मोकळा वेळ । सुटी व दर्शनाचा बसला मेळ ।
ही श्रीगुरुंची कृपा केवळ । लवकरच जाऊ आपण ।।४।।

ऐसे ठरवोनी असता । अचानक मनांत अशांतता ।
दाटोन मळभ येई चित्ता । मलिन विचार जाहले ॥५॥
टोचे त्याच्या मनांस । हे काही विचित्र खास ।
अमंगल विचार या समयास । का येतात न कळे ॥६॥
असाच वेळ किती गेला । काही कळले न त्याला ।
अचानक भानावर आला । धक्का विजेचा बसल्या परी ॥७॥
वेळ निघायची झाली । घड्याळ सांगे आपली ।
चित्तवृत्ती नाही चांगली । म्हणे नकोच जायचे ॥८॥
सूक्ष्म शक्तिने संचालित । तयार झाला यंत्रवत ।
घराबाहेर पडोनी येत । इष्ट स्थळी तयेवेळी ॥९॥
गांठले होते जंव द्वार । कानी महाराजांचा प्रेमळ स्वर ।
पडोन स्तंभित हो भक्तवर । प्रवचन सांगती श्रीगुरु ॥१०॥
परमेश्वर माता केवळ । पुनः पुनः स्वच्छ करी बाळ ।
मलिन होता विमळ । करी धुवून पुसून ॥११॥
मलिन अंतरातील दोष । करूनी कृपा विशेष ।
काढोन टाकी निःशेष । न कंटाळे पुनः मळता ॥१२॥
भक्तासाठी हे करी । आई कृपाळू श्रीहरी ।
दर्शनास न जाई तरी । करंटेपणा हा भक्ताचा ॥१३॥
ऐकोनी महाराजांचे वचन । भारावले अंतःकरण ।
येथवर आणले ओढून । दिव्य वचने सावरले ॥१४॥
ईशशक्ति याहून । कायसी असे भिन्न ।
शांत केले भक्ताचे मन । क्षणाचा वेळ न लागता ॥१५॥
तसा लहान वय भोळा । हा भक्त असे केवळा ।
तुलसीदासांचे प्रसंग एक वेळा । वाचले ह्याने कुठेतरी ॥१६॥
एकदा म्हणती तुलसीदास । जिव्हेने नाम घेता द्वैतास ।
वरतो, जेव्हा नाम अंतरास । उतरते तेव्हा अद्वैती होतो ॥१७॥
काही ग्रंथ वाचून । अर्धवट समज येऊन ।
म्हणे मी अद्वैती होऊन । राहिलो मनी नाम उतरता ॥१८॥

जप मनांतल्या मनांत । करणे म्हणजे अद्वैतात ।
वावरतो ऐसे विवेकरहित । चिंती भक्त तयेवेळी ।।१९।।
कायसी पूजा मज आता । कर्मादि सुटले निश्चिता ।
मी मोठा ऐसी अहंकारता । आली त्याच्या चित्तात ।।२०।।
अशाच एका उत्सवासी । पातला सर्वांसिह पुण्यासी ।
श्रीगुरु बैसले प्रवचनासी । तितक्यांत मंडळी पोहचे तेथ ।।२१।।
हातपाय धुवून । निघाले मंडपा लागून ।
कानाशी मोठ्याने बोलून । सांगावे तैसे ऐकिले ।।२२।।
जोवरी घेतो नाम । तोवरी द्वैतवादी आपण ।
द्वैताची पूर्णता साधून । घेतल्या विना न तो अद्वैत ।।२३।।
प्रवचनांत सांगती गुरु । द्वैताची परिसीमा साधल्यावरू ।
अद्वैत स्थिती ये, तोवरू । अद्वैती स्वतःस न म्हणावे ।।२४।।
या दोहो प्रसंगात । श्री गुरु नेमके निरोपित ।
हा जेव्हा तेथे पोहचत । कैसे हे घडले न उलगडे ।।२५।।
कोणत्या क्षणी हा भक्त । येणार समीप निश्चित ।
हे जाणोन उपदेश सांगत । अवधान न सोडता प्रवचनाचे ।।२६।।
हे न घडे सामान्यास । महाराज कायी दत्तप्रभूंचा वास ।
ईश्वरत्वांतर्यामित्व खास । प्रगटले तयांच्या ठाई ।।२७।।
आश्चर्य वाटते मनासी । कैसे जाणले नेमके त्यासी ।
काय चालले त्याच्या चित्तासी । हे ही कळले अचूक ।।२८।।
कोणास न कळो ऐसे । बोलले श्रीगुरु तैसे ।
ओघ प्रवचनाचा विनासायासे । वळविला त्याच्या उपदेशार्थ ।।२९।।
हे न घडे येऱ्या गबाळ्यासी । तैसेच प्रकांड पंडितासी ।
साजे हे सामर्थ्य प्रभूसी । ऐसेच दावितो प्रसंग हा ।।३०।।
नर नव्हे हा ईश्वरु । कृपाळू पणे होई श्री गुरु ।
भक्तकार्यार्थ अवतारु । धरी कनवाळूपणे जो ।।३१।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सव्विसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय -२७

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एकदा एक भक्त । श्री गुळवणी महाराजांसी पुसत ।
या जन्मी आपण भेटलात । अनुग्रह दिधला कृपाळूपणे ॥१॥
परी याच जन्मी । मुक्त न होता आम्ही ।
आलो फिरोन पुनः जन्मी । पृथ्वी वरी तेव्हा हो ॥२॥
तरी त्या जन्मी पुढच्या । चरणांप्रती कैसे तुमच्या ।
येऊ, घेऊ अनुग्रह कैसा । हे सांगा हो श्रीगुरु ॥३॥
गुळवणी महाराज तेव्हा सांगत । शोधून काढू तुम्हांप्रत ।
तुम्हांस काळजी नको याबाबत । काळजी ईश्वर वाहतो ॥४॥
याचे उदाहरण एक । परिसा हो सकळिक ।
जरी आहेत देह अनेक । गुरुतत्व एक असे ॥५॥
महाराष्ट्र-कर्नाटक प्रांती । सद्गुरु रुप विभूति ।
पू. कलावती आई प्रख्याती । दंपतीस या अनुग्रह त्यांचा ॥६॥
साल एकोणीसशे अठ्याहात्तर । देह ठेविला भूवर ।
कलावती आईंनी अवतार । कार्य जेव्हा संपविले ॥७॥
अतिशय दुःख दंपतीला । जाहले त्या वेळेला ।
कोण सांभाळील आम्हाला । मार्गदर्शन करेल कोण ॥८॥
रात्री-रात्री झोप न ये । राहती याच विचारात स्वये ।
आई सद्गुरु आता तू ये । प्रार्थिती सदैव ऐसेच ॥९॥
असेच असता एका रजनी । दिसतसे त्यांना स्वप्नी ।
हे उभयता रडत असोनी । येती एक वृध्द नर ॥१०॥
घातले धोतर उपरणे । पलंगावर झाले बसणे ।
आमच्या पाठीवर हात फिरवून म्हणे । रडू नका हो बाळांनो ॥११॥
देहाने जरी आई । तुम्हा जवळ आता नाहीं ।
तरी सतत तुम्हांस पाही । सूक्ष्मरूपे राहोनी ॥१२॥

आणि आम्ही आहोत ना । तुम्हास मार्गदर्शन करण्या ।
नका करू काळजी मना । ठीक होईल सर्व ही ॥१३॥
ऐसे देखोनी जाग आली । परी ओळख नाही पटली ।
ही व्यक्ति कोण पाहिली । स्वप्नांत भली आपण ॥१४॥
विस्मृती या स्वप्नाची । कालांतरे होताची ।
हाक शेजारच्या एकाची । ऐकिली या भक्ताने ॥१५॥
शेजारी म्हणे माझे गुरु । येणार आहेत त्या अवसरु ।
दर्शनेच्छा असतां यावे घरु । सुचविती ते शेजारी ॥१६॥
गुरु म्हणता पू.आईंची । स्मृती चाळवे, वृत्ती मनीची ।
त्यांवर स्थिरे, कोठे जाण्याची । इच्छा न होय तयेवेळी ॥१७॥
अकस्मात आईंचा उपदेश । आठवे त्या समयास ।
सत्पुरुषांच्या दर्शनाचे विशेष । कधीही चुकवू नये त्यासी ॥१८॥
गेले शेजारच्या घरी । दत्तमहाराज येती भीतरी ।
दर्शन होता, यां कुठेतरी । पाहिले ऐसे वाटतसे ॥१९॥
मनां वाटला तो भास । महाराज करिती विचारपूस ।
थोड्या थोड्या वेळाने खास । विचारिती या भक्तासी ॥२०॥
तुम्ही राहता कां येथेच । हे हो म्हणती, तेव्हाच ।
विचारिती, येथे शेजारीच । राहतो, याल कां आमुचेकडे ॥२१॥
ऐसे म्हणता एकदम । उठोन केला आगम ।
यांचे गृही पूर्णकाम । श्री महाराज बैसले ॥२२॥
पू.कलावती आईंचा फोटो पाहून । महाराज म्हणती या थोर जाण ।
कार्य मोठे भजन नामस्मरणातून । चालते यांचे निरंतर ॥२३॥
त्यांनी दिलेली साधना । करोनी त्यांचे अनुसरणा ।
होईल पूर्ण कल्याणा । ऐसे निश्चित जाणावे ॥२४॥
कधी मधे पुण्यास येऊन । करण्या शंका निरसन ।
यावे आम्हांस भेटण्या लागून । पत्ता सांगती महाराज ॥२५॥
आधी पत्र पाठवून । मगच यावे कारण ।
दौऱ्यावरही असतो आपण । निघाले ऐसे सांगोन ॥२६॥

आश्चर्य म्हणजे महाराज जात । आणि या भक्तास अकस्मात ।
स्वप्नांतले दृश्य स्मरत । हेच होते ते सत्पुरुष ।।२७।।
नांव पुसिले शेजाऱ्यासी । तो वदे त्या समयासी ।
अभिधान सुंदर गुरुरायासी । श्रीदत्त महाराज कवीश्वर ।।२८।।
महाराजांनी पुण्यास येण्याचे । सुचविले होते साचे ।
एक परिचित वदे वाचे । पेढे-हार घेऊन जावे ।।२९।।
हार ते न घालून घेत । फोटोस घाला सांगत ।
जरी स्वीकारले जाणोन हृद्गत । भाग्य मोठे प्रसाद लाभता ।।३०।।
सोमवारी उपवास भक्ताचा । सोडी सायंकाळी साचा ।
सकाळी निघता उशीर होई गाडीचा । घर शोधिता मध्यान्ह झाले ।।३१।।
गुरुंच्या घरी पोहचत । महाराज होते पत्र लिहित ।
हातपाय धुवून दर्शन घेत । म्हणे हार आणिलासे ।।३२।।
महाराज म्हणाले घाला फोटोसी । धीर करोनी म्हणे त्या समयासी ।
हार आणला असे आपणांसी । तरी स्वीकारावे श्रीगुरु ।।३३।।
काय जाहले वर्तमान । जाणण्या व्हावे सावधान ।
ऐका देऊन कान-मन । पुढील अध्याय श्रोते हो ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्तावीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय -२८

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

ऐकोन शिष्याची विनंती। श्रीगुरु किंचित हासती ।
हार स्वतःस घालून घेती । प्रसाद देती पेढ्यांचा ।।१।।
म्हणती महाराज शिष्याला । केले कां हो भोजनाला ।
शिष्य म्हणे आहे सोमवार मला । सायंकाळी सोडितो ।।२।।
मध्यान्हा नंतर उपवास । सोडता चालतो खास ।
बोलाविती सूनबाईस । वाढा जेवायास म्हणती यांसी ।।३।।
संकोच वाटे मनी । परी बैसले भोजनी ।
विचार करिती हर्षूनी । प्रसाद आपणासी मिळाला ।।४।।
अजून एक वर्ष उपासना । चालू ठेवावी साधना ।
आईंनी जैसी केली उपदेशना । येत जावे इकडेही ।।५।।
ऐसे प्रेमे बोलून । करीती महाराज बोळवण ।
असेच पाच-सहा वेळी दर्शन । जाहले या भक्तासी ।।६।।
पुढे एक वर्ष पर्यंत । स्वप्नांत देऊन दृष्टांत ।
आई मार्गदिर्शन करीत । आहार विहारादि संबंधी ।।७।।
जवळी येता दत्तजयंती । महाराज तयांस निरोपिती ।
परवा पौर्णिमेस तुम्ही दंपती । पहाटे स्नानादि आटोपून ।।८।।
पांच वाजता देवासमोर । बसा पू.आईंच्या फोटो समोर ।
वडिलधाऱ्यांस करोनी नमस्कार । कृपा महाराज करतील ।।९।।
उभयतांस दत्तजयंतीला । दीक्षा अनुग्रह झाला ।
'आनंदच' म्हणावे त्या अनुभूतिला । निराळा शब्द नाही त्यासी ।।१०।।
एवढे सर्वही होऊन । शंका मनांत ये दाटून ।
गुरु कोणास म्हणावे आपण । पू.आई का महाराज ।।११।।
भेद बुध्दि ऐसी होता । मनांस येई अस्वस्थता ।
महाराजांस हे विचारिता । शंका निवारिती श्रीगुरु ।।१२।।

देह जरी निराळे । गुरुतत्व आहे एकले ।
जरी देहाने गुरु न राहिले । नियुक्ति दुसऱ्याची तेथे होय ।।१३।।
होऊनी शंकेचे निरसन । शुध्द झाले भक्ताचे मन ।
या विषयीचे बोधवचन । महाराजांचे पुढे असे ।।१४।।
गुरु हे आहे तत्व । त्यासी न मानावे व्यक्तिमत्व ।
पूर्व योगानुसार होत प्राप्त । स्वरूपात वेगळाल्या आपणासी ।।१५।।
कालवशात हे स्वरूप जरी । अदृश्य होऊनी राहे तरी ।
तेच तत्व दुसऱ्या देहा भीतरी । राहून भक्तांस करी मार्गदर्शन ।।१६।।
भेद बुध्दि उभय रूपांविषयी । ठेवता ही योग्य गोष्ट न होयी ।
अपरिमित याने हानी होयी । शिष्याची, द्वैतबुध्दि ठेविता ।।१७।।
येथे राहावे फार सावध । तरच होईल निर्बाध ।
परतत्वाचा पूर्ण बोध । सावध ठेवावे बुध्दिसी ।।१८।।
दत्तात्रेय, ज्ञानेश्वर । शंकराचार्यादि संत वर ।
विभूति रूप हे अवतार । कार्य महान यांचे असे ।।१९।।
प्रयोजन यांच्या अवताराचे । संरक्षण करणे बुध्दिचे ।
संरक्षण सज्जनांच्या बुध्दिचे । ठेवणे बाजूला दुर्जन बुध्दि ।।२०।।
हे एक महत्कार्य । ईश्वरासच हे शक्य कार्य ।
रक्षावे सज्जन आर्य । नियामक शक्ति ही त्याची ।।२१।।
या नियामक शक्तिचे । कार्य एक दुसरे साचे ।
जीवांना आध्यात्म विद्या द्यायचे । उध्दार करणे गुरुस्वरूपात ।।२२।।
ईश्वराचे हे वात्सल्य । जीवांस करी परिपाल्य ।
गुरु होऊनी कैवल्य । प्राप्ती देई करवोन ।।२३।।
हे न घडे जन्मा एका । जन्मोजन्मी जीव निका ।
येई, तेव्हा स्वरूपे अनेका । धरून श्रीगुरु करी प्रतिपालन ।।२४।।
ईश्वराचा हा वात्सल्यभाव । वाढवी जनांत भक्तिभाव
बोट धरिता गुरुचे हा भव । शशशृंगापरी होय अदृष्य ।।२५।।
ईश्वराचे बुध्दि दातृत्व । सोडवी जीवाचे ममत्व ।
ऐसे हे गुरुतत्व । संपूर्ण शाश्वत केवळ ।।२६।।

स्वभक्ताचे योगक्षेम। वाही ईश्वर पूर्ण काम ।
प्रापंचिक तैसेच आध्यात्मिक काम । करी निरपेक्षपणे तो ।।२७।।
अनन्य भावे जाता शरण । ईश्वर करी रक्षण ।
गुरुरूप आपण होऊन । गुरुवीण ईश्वर न लाभे ।।२८।।
म्हणोनी सत्संगाचे महिमान । सांगती श्रुती आणि पुराण ।
दुजे नसे गुरुवीण । भवाब्धितून तारणारे ।।२९।।
भजा-भजा हो श्रीगुरुसी । सोडूनिया आळसासी ।
उपदेश त्यांचा सर्वांसी । तारणार निश्चित ।।३०।।
गुरुमाय कळवळोन । भक्ताचे लालन-पालन ।
सर्वोपरी सतत करून । ब्रम्हपदासी नेतसे ।।३१।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्ठाविसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - २९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

भक्ताचे परम हित । जाणोन श्रीगुरु सांगत ।
जो आज्ञा मानून वागत । सतत कृतार्थ होई तो ॥१॥
असाच एक गुरुभक्त । गुरुपदी नित्य युक्त ।
आज्ञा होई ते मानी त्वरित । शिरसावंद्य करोनी ॥२॥
एकदा जाई दर्शना । महाराज विचारिती प्रश्ना ।
"आठ वर्षाचा झाला आहे ना!" । चिरंजीव आपला हो ॥३॥
महाराज आज्ञापिती त्यासी । मौंज पुत्राची करावी वाडीसी ।
आम्ही तेथे उत्सवासी । जातो श्री नारायण स्वामींच्या ॥४॥
पुण्य उत्सव तिथी चैत्री अमावस्या । त्या पुढे आहे अक्षय्य तृतीया ।
मुहूर्त हाचि अतिशय योग्या । कार्य योजावे त्या दिवशी ॥५॥
महाराज सांगती शिष्याला । येईल भाग्य उदयाला ।
श्रींपुढे मुंज होता मंगला । कृपा प्रभूची होईल ॥६॥
तुमच्या नातेवाईकांस कदाचित । ही योजना न होईल पसंत ।
जे येतील त्यांस येऊ देत । परि देव असतील तेथे हो ॥७॥
म्हणोन काळजी न करावी । पत्रिका ही न छापावी ।
आशिर्वचन आम्ही स्वतःही । बटूस देऊ राहून तेथ ॥८॥
ऐसे ठरले मौंजीबंधन । महाराजांस द्यावे आमंत्रण म्हणून ।
महाशिवरात्रीस सर्व सामान । घेऊन जाई रेणुका निवासी ॥९॥
घेऊन नारळ पेढे हार । जाऊन केला नमस्कार ।
नारळ अक्षदा देऊन रीतसर । आमंत्रण प्रार्थनापूर्वक करी ॥१०॥
महाराज करिती प्रश्न । नारळ आहे का अजून ।
भक्त म्हणे आणतो जाऊन । नको घरात असतील म्हणे ॥११॥
ताई महाराज जालन्याच्या । आल्या आहेत उपस्थितीत त्यांच्या ।
मुंज होणे आवश्यक, आमंत्रण त्यांना । करा म्हणून निरोपिती ॥१२॥

बोलाविले सौ.आईसाहेबांस । नारळ आणविले खास ।
स्वतः घेऊन जाती भक्तास । सौ.ताईंच्या खोलीत ।।१३।।
पुढे होऊन करी वंदन । करी ताईंस आमंत्रण ।
प्रार्थून अक्षदा देऊन । नमन करी नम्रपणे।।१४।।
आईसाहेब कुंकू लावून । ताईंची ओटी भरून ।
कार्य व्हावे निर्विघ्न म्हणून । महाराज जप करणेंस सांगती ।।१५।।
मंगल कार्य असता घरी । जो सद्गुरुंस प्रार्थना करी ।
आणि अधिकाधिक जप करी । जबाबदारी घेती श्रीगुरु ।।१६।।
न ये अडथळा कोणताही । कार्य पार पडते त्याही ।
स्वतः महाराज सांगत लवलाही । आचरे भक्त तैसेच ।।१७।।
मौंज राहता दोन दिवस । कुटुंब येई कोल्हापुरास ।
नमन करून अंबाबाईस । तेथील आप्तांस सूचित केले ।।१८।।
जाणे होते वाडीस । आले बस स्थानकास ।
येईल आता वाडीची बस । प्रतीक्षेत बैसले तेथेच ।।१९।।
सामान जवळी होते बहुत । वाडीची बसच न येत ।
अंधार ही पडू लागत । जाणे होते लवकर ।।२०।।
शेवटी महाराजांस प्रार्थिती । त्यांचाच धावा करिती ।
सांभाळावे आता निगुती । महापूजा योजिली उदयीक ।।२१।।
आपण स्वतः पूजेस । तैसेच येणार प्रसादास ।
ऐसे दिधले आश्वासनास । सांभाळावे म्हणतसे ।।२२।।
तितुक्यात त्या मार्गावरून । एक रिक्षावाला येऊन ।
जवळी यांच्या रिक्षा उभा करून । वदे एक अनपेक्षित ।।२३।।
मी वाडीहून आलो होतो । आता तेथेच परत जातो ।
जायचे असेल तर चला म्हणतो । बस इतकेच देऊन भाडे ।।२४।।
महाराजांस मनोमन । शतशः नमस्कारुन ।
निघाले वाडी लागून । गेल्यावर वर्तमान कळले ।।२५।।
महाराजही 'त्या' समयास । करीत होते विचारपूस ।
उद्या योजिले महापूजेस । मंडळी अजून आली नाही ।।२६।।

महापूजा प्रसाद यथास्थित । मौंज कार्य झाले व्यवस्थित ।
स्वये श्रीगुरु उपस्थित । असता कमी पडेल काय ।।२७।।
बटूस भोजनोत्तर । घेतले मांडीवर ।
हात फिरवून पाठीवर । देई आशीर्वाद गुरुराणा ।।२८।।
भक्ताचा कंठ दाटून । हृदय सद्गतीत होऊन ।
म्हणे माझे भार वाहून । सद्गुरु मजसी सांभाळी ।।२९।।
पुढे या प्रसंगाविषयी । बोलतां म्हणती भगवती ताई ।
ओळख आमची नव्हती काही । महाराजांस विचारीले यावे कैसे ।।३०।।
तेव्हा म्हणाले गुरुनाथ । बटुला देणे आशीर्वाद ।
यात असे पुण्य बहुत । नसे हरकत परिचय नसता ।।३१।।
ताईंस श्रीगुरु वदे । आपल्या आशीर्वादे ।
कृतार्थ होईल बटू, पदे । आपल्या तो लागताचि ।।३२।।
ऐसे शिष्याचे हित । त्याच्या कुटुंबाचे ही निहित ।
सद्गुरु सर्व साधित । मार्ग दाखवून स्वयेचि ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणतिसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ३०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

दत्तात्रेय आहेत भावगम्य । भक्ताचे पुरविण्या काम्य ।
एखादे वेळी नाट्य रम्य । करितात महाराज ॥१॥
महाराजांचे दोन सेवक । एक होता भावुक ।
दुसरा करी जपणूक । त्रास न व्हावा म्हणून त्यांसी ॥२॥
एकदा भावुक भक्ताला । वाटले मिळावी पाद्यपूजा करायला ।
श्रीगुरु एकदा निघता प्रवासाला । याचे घरी गमन करते झाले ॥३॥
दुसरा जो सेवक प्रबुध्द । तो करी पूजेस निर्बंध ।
पूजेच्या पादुका नसती म्हणून बाध ।
आणी तो पहिल्याच्या विचाराला ॥४॥
इतक्यांत काय झाले । महाराज विश्रांतीस पहुडले।
चक्क तीन तास न उठले । पूजा न करावी म्हणे प्रथम सेवक ॥५॥
ब्राम्हण जे होते पाचारिले । पाद्यपूजा सांगण्यास भले ।
शेवटी त्यांस बोळविले । स्थितीस शरण जाऊन ॥६॥
भोजनाचा समय होता । महाराज उठती तत्वतां ।
पहिला सेवक जवळ नसता । विनवितसे भावुक भक्त ॥७॥
म्हणे जी महाराज । पाद्यपूजा करावी आज ।
असे फार वाटे मज । सिध्दता ही सर्व असे ॥८॥
व्हावे आपण प्रसन्न । करून घ्यावे पूजन ।
महाराज भक्तास करी प्रश्न । अवकाश किती हो भोजनासी ॥९॥
पाऊण तास अवकाश । होता तेव्हा भोजनास ।
निरोपिती श्रीगुरु भक्तास । पाद्यपूजन करावे ॥१०॥
आनंदला सेवक । परि अडचण आली एक ।
पूजा सांगण्या वैदिक । ब्राम्हण नाहीत आता ते ॥११॥
महाराज होता प्रसन्न । तेथे पडेल काय न्यून ।
सांगू पूजा स्वतः आपण । वदले ऐसे श्रीगुरु ॥१२॥
भरभर केली तयारी सकळिक । संकल्प गणेश शंख घंटादिक ।
स्वतःचे श्रीपाउलांवर षोडशोपचारादिक । पूजन स्वतः करविले ॥१३॥

मन भक्ताचे आनंदले । समाधान अतिशय जाहले ।
आणि रहस्य कळोन आले । श्रींच्या निजण्या मागील ।।१४।।
असाच एक भक्त । वयाच्या पस्तीशीत ।
दीक्षा झाली तयाप्रत । उत्कृष्ट साधना होई त्याची ।।१५।।
दोन-तीन वर्षातच । प्रगति जाहली बरीच ।
महाराजांची आज्ञा तोच । झाली विवाह करण्यासी ।।१६।।
त्याप्रमाणे विवाह झाला । प्रपंचात भक्त बुडाला ।
विसरला तो साधनेला । विसरे उत्तम अनुभव ।।१७।।
ध्यानांत रमता ही काया । विघ्न करी हरीची माया ।
मग प्रपंचात मन वाया । गुंतोन पडे सहज ।।१८।।
म्हणोन रहावे सावधान । हरीस जावे शरण ।
माया आवरी आपली आपण । म्हणोन प्राथवि तयासी ।।१९।।
असो सदर भक्ताला । चोवीस वर्षे दीक्षेला ।
झाली, न करी साधनेला । सुखे निद्रित एक रात्री ।।२०।।
श्रीगुरु येती स्वप्नांत । बोलती वचन कृपायुक्त ।
अरे! दोन तपे पूर्ण होत । जागा हो रे लवकर ।।२१।।
भक्त कोंबडीच्या पिल्लांपरी । जाता ते दूर तरी ।
बोलावून परत पंखांभीतरी । घेई माता पिल्लांसी ।।२२।।
तैसीच प्रेमळ गुरुमाउली । धरी कृपेची साउली ।
भक्त जरी गेला चुकीच्या पाउली । योग्यमार्गी परत आणी ।।२३।।
गच्छत: स्खलनं क्वापि । असे मानुनी नच हो कोपी ।
निज कृपा लेशा ओपी । आम्हावरी तू भगवंता ।।२४।।
भगवान दत्तात्रेयांप्रत । ऐसे विनवी वासुदेव यति दत्त ।
आपण ही आळवावी सतत । ही प्रार्थना नम्रपणे ।।२५।।
निष्काळजीपणे जरी । गेलो स्खलन मार्गावरी ।
श्रीगुरु त्यास न अव्हेरी । जागे करी निद्रेतून ।।२६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
तीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ३१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

सर्वही तीर्थराज । असती स्वतः महाराज ।
पवित्रतम यांस आज । वंदन करू भक्तिभावे ॥१॥
तीर्थयात्रेच्या विषयी । अनुभव सांगी अनुयायी ।
त्रिस्थळी करण्या जाई । महाराजां समवेत उत्तरी ॥२॥
तूच माझा मल्लिकार्जुन । तंतुक म्हणे श्रीगुरु लागुन ।
त्यास करविले दर्शन । बोल त्याचा यथार्थ करी ॥३॥
प्रगट करण्या क्षेत्र माहात्म्य । तीर्थयात्रेचा उद्यम ।
त्यांस यात्रेचे काय काम । सर्व तीर्थ चरणी त्यांच्या ॥४॥
असो या यात्रेत । प्रयाग-काशी यात्रा होत ।
जाणे होते गयेप्रत । पूर्ण करण्या त्रिस्थळी ॥५॥
अकस्मात एका भक्ताला । विघ्न पुढील यात्रेला ।
झाले, त्याच्या मातेला । व्याधीने ग्रासिले अचानक ॥६॥
भक्ताच्या मातेपाशी जाऊन । कृपादृष्टीने न्याहाळून ।
म्हणे तयांसी धीर ही देऊन । डॉक्टर 'आसपासचा' पाचारा॥७॥
काशीस मुक्काम जेथे असे । समोरच तिथे डॉक्टर रहातसे ।
अनपेक्षितपणे तो शिष्य असे । श्री गुळवणी महाराजांचा ॥८॥
डॉक्टर आले दर्शनास । संगे या भक्ताच्या, त्यास ।
म्हणती अलभ्य लाभास । दिधले गुरुदर्शन घडवुनी ॥९॥
असो शिष्यास निरोपुन । महाराज जाती गये लागुन ।
इतर भक्तांस घेऊन । आईपाशी हे दंपती थांबे ॥१०॥
जाणे न होई गयेस । म्हणोन दुःख वाटे मनास ।
परी सतत करी प्रार्थनेस । गुरु आज्ञा प्रमाण मानुनी ॥११॥
चिकित्सकांच्या औषधाने । फारच जलद गतीने ।
आराम पडून, रोगाने । हार खाल्ली लगेच ॥१२॥

होती थोडी अशक्तता । क्षेत्र उपाध्याय चौकशीस येता ।
म्हणती बरी तुमची माता । कुटुंब ही तुमचे आहे येथे ।।१३।।
तरी मातोश्रींस येथे ठेवून । तुम्ही पुढील यात्रेसाठी निघुन ।
जा, दुपारच्या गाडीची वेळ पाहुन । सांगती हे उपाध्याय ।।१४।।
या उपाध्यांचे घरी । मुक्काम होता यांचा तरी ।
ते सांगती जाऊन आज मुक्काम करी । पत्ता देतो तेथे जा ।।१५।।
उद्या तीर्थ विधि करुन । सायंकाळी या परत निघोन ।
राहू आम्ही लक्ष ठेऊन । तोपर्यंत मातोश्रींवर ।।१६।।
श्रीगुरुंस करून वंदना । पुढील मार्गक्रमणा ।
करिता संकट निरसना । तत्पर राहती महाराज ।।१७।।
अंधारात मार्गदर्शक । रिक्षेवाला भेटला एक ।
नेई तो इष्ट स्थानी आणिक । गयेचे क्षेत्रोपाध्याय उभे व्दारी ।।१८।।
जणू यांचीच वाट पाहत । यांनी न कळवताच करीत ।
विष्णुपदासाठी श्राध्दविधी प्रत । तयारी सर्वही अगोदरच ।।१९।।
जणू दिली पूर्व सूचना । व्यवस्था सर्व त्या प्रमाणा ।
होऊन झाले तीर्थयात्रा पूजना । घडवून आणले श्रीगुरुंनी ।।२०।।
इच्छी जर गुरुदेव । अनुकूल होई आपुले दैव ।
विघ्न न बाधी सर्वथैव । सदैव शरण त्यांसी जावे ।।२१।।
असो त्रिस्थळी पूर्ण करून । विधि सर्व आटोपून ।
महाराजांसह वर्तमान । परत काशीस ये भक्त ।।२२।।
असाच यात्रे संबंधित । एक दुसरा वृत्तांत ।
आहे फार बोधप्रद । श्रोते ऐका एकचित्ते ।।२३।।
एका भक्ताचे कुलदैवत । 'मंगेशी' हे गोव्यांत ।
हा नितांत शंकर भक्त । महाशिवरात्रीला यात्रेला जाई ।।२४।।
दत्तमहाराजांचा भक्त अनन्य । प्रतिवर्षी यात्रेपूर्वी येऊन ।
महाराजांस करी निवेदन । जाण्याचे दिवस इत्यादि ।।२५।।
महाराजांचे घेऊन आशीर्वाद । सहकारी गुरुबंधूस घेत ।
उतार वयात ही यात्रा करत । आजन्म ब्रम्हचारी साधक हे ।।२६।।

महाराज एकदा सांगती । जावे गोकर्ण महाबळेश्वराप्रति ।
करून गुरुबंधूंची संगती । जाती शिवदर्शनासी प्रतिवर्षी ।।२७।।
वर्ष १९९२ साली । महाशिवरात्री जवळ आली ।
पुण्यास जाऊन निवेदिली । यात्रेविषयीची माहिती ।।२८।।
"आहे तुमच्या सोबत कोण?" । श्रीगुरु करिती प्रश्न ।
नेहमी सोबत येई म्हणून । एका भक्ताचे नांव सांगती ।।२९।।
परत गेले गावी अपुल्या । सर्व वृत्तांत कथियेला ।
गुरुबंधू सोबतीला । तिकिटे ही दाखविली दोन ।।३०।।
त्या गुरुबंधूस नेमकी । कार्यालयीन अडचण होती ।
कैसे जावे यात्रे प्रति । ऐसी चिंती चित्तात ।।३१।।
परि गुरुंसी निवेदन । आपले नामे करून ।
आला शिवभक्त जाण । तेव्हा गेलेच पाहिजे ।।३२।।
ऐसा विचार करून । वरिष्ठांस दिला अर्ज लिहून ।
पुढे काय घडले नूतन । पुढील अध्यायी हे कथा ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकतिसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ३२

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

सद्गुरुंचा असता संकल्प । संसारातील विकल्प ।
न बाधिती किंचिदल्प । दाता भगवान सत्य संकल्पी ॥१॥
गुरुबंधूस वरिष्ठ अधिकारी । पाचारुन प्रश्न विचारी ।
कोणीकडे यात्रा करी । महाबळेश्वरी जातो म्हणे ॥२॥
आश्चर्य म्हणजे त्वरित । रजा त्याची मंजूर होत ।
वरिष्ठांचे आप्त कोणी असत। गोकर्णी, त्यांसाठी पार्सल दिधले ॥३॥
रजेचा प्रश्न सुटला । आरक्षित तिकिटांमुळे भला ।
प्रवास सारा सुकर झाला । पोहोचले गोकर्णी तीर्थयात्री ॥४॥
परतीच्या प्रवासाचे आरक्षण । करण्या जाता ये कळून ।
रविवारचा दिन म्हणोन । कार्यालय ते बंद होते ॥५॥
क्षेत्रोपाध्यायांकडे मुक्कामाची । जागा मिळाली सोईची ।
दर्शन घेऊन महाबळेश्वराची । प्रार्थना करून उभय परतले ॥६॥
वरिष्ठांचे पार्सल ते । अभिष्ठस्थानी केले पोचते ।
सुटीचा दिवस म्हणून निवांते । ओळख वगैरे केली त्यांसी ॥७॥
उपाध्यायांसी विचारित । क्षेत्र यात्रेची पध्दत ।
म्हणे श्रीकोटितीर्थ तलावात । स्नान प्रथम करावे ॥८॥
जल आणा तेथील भरून । श्री महागणपतीस अभिषेकून ।
शेष जल महाबळेश्वरा लागून । न्यावे अभिषेक करण्यासी ॥९॥
एऱ्हवी यात्रा नसता । या पध्दतीस असे सहजता ।
परि महाशिवरात्री महायात्रा भरता । कठिण वाटले हे सर्व ॥१०॥
क्षेत्रोपाध्याय म्हणती त्यांसी । दूरून घ्यावे दर्शनासी ।
गणपतीचे, मग महाबळेश्वरासी । जाऊन घाला पाणी म्हणे ॥११॥
मध्यम मार्ग ऐसा योजून । पहाटेच समुद्रस्नान करून ।
तेथील कलश भरून । पोहोचती गणपतीचे द्वारात ॥१२॥

पहाटे तीन पासून रांगेत । उभे अक्षरश: हजारो भक्त ।
लांबूनच दर्शन होईल या विचारात । असता अनपेक्षित घडले ।।१३।।
गणपतीच्या गाभाऱ्यातून । एक सिक्युरिटी गार्ड येऊन ।
या उभयतास बरोबर घेऊन । क्षणात गजाननापुढे उभे केले ।।१४।।
जलाभिषेक करून द्वारी । परतता पाहती माघारी ।
तो कुठेच न दिसे गार्ड भीतरी । आश्चर्य मनासी वाटले ।।१५।।
महाबळेश्वरी गर्दी काहीच नसून । शिवाचे पिंडीजवळ बसून ।
सावकाश पाणी घालून । मनसोक्त पूजा-अर्चना केली ।।१६।।
पूर्ण जाहले समाधान । गर्दी येई वाढून ।
बाहेर येती ते उठून । आनंदात मुक्कामी परतले ।।१७।।
थोडा केला फलाहार । इतक्यांत संकट भयंकर ।
उद्‌भवले अति गंभीर । छातीत दुखे शिवभक्ताच्या गहन ।।१८।।
जन सर्व धावले । कपाळी कुंकू लावले ।
कॉफीचे दोन घोट दिले । शरण गेले चिकित्सकास ।।१९।।
गाड्या तेव्हा सर्वही । लांब ठेविलेल्या यात्रेच्या पाई ।
मुश्किलिने नेले चिकित्सकगृही । तपासिती ते रुग्णास ।।२०।।
चिकित्सक तेव्हा उद्‌गारिले । यांनी देह ठेविले ।
कैसे अघटित जाहले । गुरुबंधू म्हणे तो सहयात्री ।।२१।।
महाशिवरात्री सोमवार । स्थान क्षेत्र महाबळेश्वर ।
विधियुक्त पूजन करून शरीर । त्यागिले शिवभक्ताने ।।२२।।
जाणारे सद्‌गतीस गेले । परि महासंकट ठाकले ।
पुढे गुरुबंधूच्या भले। कायच करावे गा म्हणे ।।२३।।
लोकांच्या महासागरात । एकच सुहृद तोही प्राणगत ।
बरोबरचे सर्वही निघून जात । निर्णय देता डॉक्टरांनी ।।२४।।
साथ देईना कोण । एवढ्यात झाली आठवण ।
वरिष्ठांच्या आप्तांची जाण । पार्सल ज्यांना पोचविले ।।२५।।
डॉक्टरांनीच दूरध्वनि करून । घेतले त्यांना बोलावून ।
तैसेच मृताच्या आप्तेष्टां लागून । कळवावे कैसे म्हणतसे ।।२६।।

एस.टी.डी. सेवा त्या दिनी । महाबळेश्वरांत सुरू होऊनी ।
सहाय्य तिचे घेऊनी । कळविले शिवभक्ताच्या आप्तांस ॥२७॥
श्रींची इच्छा होती म्हणून । सर्वांनी अंत्यसंस्कार उरकून ।
घेण्यास, दिली अनुमति जाण । क्षेत्र स्थानातच ते दिनी ॥२८॥
डॉक्टरांनीच चौघे जण । कोणी सैन्याधिकारी कोणी आप्तजन ।
कोणी नातलग ऐसे जमवून । विधि सर्व आटोपला ॥२९॥
या डॉक्टरांचा जाण । पूर्वजन्मीचा संबंध म्हणून ।
सर्व सहाय्य त्यांनी करून।घेती जबाबदारी मृत्यू प्रमाणपत्राची ॥३०॥
क्षेत्रातील एका पवित्र उदकांत । अस्थि केल्या विसर्जित ।
चित्रपटाप्रमाणे सर्व आठवित । परत आले गुरुबंधू ॥३१॥
महाराजांचे या प्रसंगा उपर । गुरुबंधूस पत्र आले स्नेह पर ।
या घटनेचा खुलासा सविस्तर । त्यात केला असे श्रीं नी ॥३२॥
महाशिवरात्रीस शिवक्षेत्रासी । या भक्ताने सोडिले देहासी ।
प्राप्त झाला तो शिवलोक कैलासासी।
सलोकता मुक्ती मिळाली त्यास ॥३३॥
ऐसे भाग्यवान जीव । विरळच भेटती, सदाशिव ।
नेवो पाहण्यास स्वविभव । शिवलोकी तुम्हा आम्हास ही ॥३४॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
बत्तीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ३३

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम : ।।

हा तेहतीसावा अध्याय । यात आपुली गुरुमाय ।
गणेश दत्तरुप एकत्व अभिनव । प्रगटवी एका भक्तांकरवी ।।१।।
प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीला । जो नमनांश असे लिहिला ।
श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः याला । लिहित महाराज स्वतः ही ।।२।।
श्री गजानन आणि श्रीदत्त। गुरु उभयतांसी नमित ।
हे लिहून सुरुवात करित । कोणत्याही लेखनाची ।।३।।
गणनायक बुद्धिदाता । या बुद्धि द्वारा "विद्या" मिळता ।
दत्तस्वरुप येई जाणता । एकरूप दोघांचे ।।४।।
'ग' कार हे गणपतीचे रूप । 'र' कार हे अग्निचे स्वरूप ।
'उ' कार हे विष्णुचे रूप । गुरु शब्दाचे स्पष्टीकरण ।।५।।
श्री गुरुचरित्रात बोधार्थ । वर्णिला गुरु शब्दाचा अर्थ ।
लाधती चार ही पुरुषार्थ । 'गुरु' या मंत्र प्रभावाने ।।६।।
एक महाराजांचा आर्त भक्त । संकट निवारण्यास करीत ।
प्रार्थना तेव्हा महाराज त्वरित । मंत्र त्यास एक देती ।।७।।
हृदय विकाराचे निदान । या भक्ताचे होऊन ।
"अँजियोग्राफी" चाचणी करून । घ्यावी म्हणती चिकित्सक ।।८।।
या संकटाचे निवारण । करण्या विनवी भक्त आपण ।
एका मंत्राचे नित्य पठण । पांच माळा निरोपिती श्रीगुरु ।।९।।
या मंत्राचा अर्थ पाहता । पूर्ण व्हावे भक्त मनोगता ।
सकृत् दर्शनी ऐसे भासता । मूळ अभिप्राय न जाणी तो ।।१०।।
आपल्या संकट समयासी । मंत्ररूपी आशिर्वादासी ।
पाठविले ऐसे मानसी । वाटले त्या भक्ताला ।।११।।
असो गुरुप्रदत्त मंत्राचे । पठण करिताच साचे ।
हृदयाच्या 'त्या' चाचणीचे । रिपोर्ट सर्व नॉर्मल येती ।।१२।।

आश्चर्य वाटे डॉक्टरांस । दृढ झाला भक्ताचा विश्वास ।
नित्य सुरू ठेवी मंत्र जपास । गुरुमंत्र त्यास मानुनी ।।१३।।
या भक्ताचा अल्पकाळाचा । परिचय श्री महाराजांचा ।
इतर बंधूंचा गुरू सहवासाचा । काळ दीर्घ होता पै ।।१४।।
म्हणती सर्व गुरुबंधू । श्रीगुरु हा दयासिंधू ।
जैसा सोनियास सुस्वाद सुगंधू । देवापेक्षाही गुरू श्रेष्ठ ।।१५।।
नवीन शिष्याचे संस्कार । वेगळे होते त्याचे विचार ।
गणपती आदिदेव म्हणोन भक्तवर।
म्हणे- वंदन आधी गजाननास ।।१६।।
आधी पार्वती नंदन । मग श्रीगुरुंस वंदन ।
ऐसे असता वर्तमान । नवल कळले त्यास एक ।।१७।।
श्री महाराजांनी जो मंत्र दिला । तो गणेशाचाच होता भला ।
द्वैतभाव भक्ताचा ओळखिला । तो घालविण्यास देती हा मंत्र ।।१८।।
परंतु एवढे कळेपर्यंत । सगुणरुप होई दृष्टीगत ।
महाराजांचे, त्यास वाईट वाटत । म्हणे निधाना दवडिले ।।१९।।
गुरु मंत्र हे गुरुचे नाव । हा त्याच्या मनीचा भाव ।
असता त्यासी अभिनव । कळले मंत्र हा गजाननाचा ।।२०।।
श्रीगुरुंनी हे स्पष्ट केले । गणेश आणि रूप आपले ।
हे एकच असती भले । द्वैत तेथे नाहीच ।।२१।।
हे त्यास कळण्या सकळ । कां लागला एवढा काळ ।
ही महाराजांची लीला केवळ । न वर्णवे ती मात ।।२२।।
जरी महाराज असता हयात । मंत्राचे गौप्य कळून येत ।
या भक्तास तेव्हा सर्वांप्रत । सांगता झाला असता ते ।।२३।।
अहो! माझे हृद्गत । महाराज सर्व जाणीत ।
माझ्या भावाप्रमाणे गुरुमंत्र देत । अंतर्ज्ञानी श्रीगुरु ।।२४।।
ही टाळण्या स्वस्तुती । त्यांस विशेष कळू न देती ।
मंत्राचा अर्थ निश्चिती । मनास हेच सत्य वाटे ।।२५।।
जोवरी गुरुदेव आपुले । सगुण रूपे दिसती भले ।
तोवरी आपणांस न कळे । खरे महिमान त्यांचे हो ।।२६।।

करू आपण हाच धावा । तारी मज गुरुदेवा ।
बैसवूनी अपुल्या कृपेच्या नावा । गावा भक्तिच्या नेई तू ।।२७।।
जे स्वरूप अमेय । तेच स्वरूप दत्तात्रेय ।
गुण त्यांचे ध्येय-गेय । म्हणोन स्तवन हे केले ।।२८।।
जय जया दत्तगुरो । जय रिद्धि-सिद्धि वरो ।
तुमचे विषयी भेद न उरो । यत्किंचित माझे मनी ।।२९।।
हे गणेश विघ्ननाशका । 'अविद्या' हेच विघ्न निका ।
मार्गी अमुच्या विनायका । निवारण तिचे करी तू ।।३०।।
निज कृपेची करी वृष्टी । गुरुस्वरूप दाखवी मज दृष्टी ।
तुझ्यावीण या सृष्टी । सद्बुद्धि कोण देईल ।।३१।।
कवीश्वर माझे गुरु । निवास तू त्यांचे घरु ।
करूनिया निरंतरु । कुळावरु प्रसन्न त्यांच्या ।।३२।।
दत्तराज आणि गिरिजानंदन । व्हावे आम्हा भक्तांस प्रसन्न ।
घालून कृपेचे अंजन । स्वात्मबोध प्रकाश नेत्रां दावी ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
तेहतीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ३४

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

श्वासे श्वासे प्रकुर्वीत, दत्तनामानुघोषणम् ।
तोषणं साधुवृंदानाम्, शोषणं भवपाथसाम् ।।१।।
रंगावधूत महाराज । आवर्जून सांगती हे गूज ।
नामस्मरणाचे महान् काज । करा श्वासाश्वासातुनी ।।२।।
नामात असता सारे घडे । नाम विसरता सर्व बिघडे ।
घालून नामाचे सांकडे । वळवेल तो दयाघन ।।३।।
नाम घेता नवविधा भक्ति । आपोआप साऱ्या घडती ।
स्मरण, वंदनादिंचे सार मिळती । नाम घेता श्रध्देने सतत ।।४।।
सर्व संत ही सांगती । नाम स्मरा हो स्मरा म्हणती ।
याहून या कलियुगाप्रति । दुसरे साधन नाहीच ।।५।।
महाराजांचा एक भक्त । वाचे रामदासांचे चरित ।
समर्थांनी बारा वर्षात । केला रामजप तेरा कोटी ।।६।।
ऐसे वाचता मांडे गणित । २.९१११ वेळा येत ।
जवळ–जवळ तीनदा एका सेकंदात । अशा गतीत केला हा जप ।।७।।
ऐसे सतत २४ तास । ३0 दिवस बारा मास ।
असेच चाले बारा संवत्सरास । हे तो अशक्य केवळ ।।८।।
समर्थ म्हणून त्यांना घडे । आपण काय जन बापुडे ।
कैसे करवेल गतीत एवढे । जप आपणांस सततही ।।९।।
ऐसे विचार करून । आपले नित्यकर्मा लागून ।
होई व्यस्त हा शिष्यजाण । तो एक दिनी घडे आश्चर्य ।।१0।।
एक महिना अखेरी । कार्यालयाचे काम पूर्ण करी ।
उशीर झाला जाया घरी । दिवसभर त्रासे श्वास विकारे ।।११।।
घरी येता त्रास त्याला । अधिकच होऊ लागला ।
दिवसभर काही न जेवला । कंटाळला शेवटी तो ।।१२।।

हाता घेऊन औषध-गोळी । बैसे महाराजांच्या फोटो जवळी ।
मन:पूर्वक प्रार्थना केली । निवेदिली सर्व हकीगत ।।१३।।
म्हणे जी महाराज । भूक असता न जेवता येई आज ।
औषध योजना कराया मज । डॉक्टर ही न भेटले ।।१४।।
औषधाची ही एकच गोळी । ती घेतो तुम्हासमक्ष यावेळी ।
पुढे तुमच्या मर्जीवर लवलाही । गोळी घेऊन भक्त निजे ।।१५।।
गाढ झोपी जाई वेगे । पहाटे कुणीतरी करी जागे ।
झोपेतच चहा घेई, परत गुंगे । तो त्यासी ऐकू येई राम नाम ।।१६।।
दुरून कोणीतरी नाम घेई । ऐसे तया ऐकू येई ।
वाटे अंत्ययात्रा जाई । राम नाम उच्चारे ।।१७।।
परी हळू-हळू नामाची गति । वाढून अत्यंत ती ।
वाटे कानाजवळच म्हणती । कोणीतरी मोठ्याने ।।१८।।
राम नाम जप जलद येत । होई गणित काढल्यावत ।
सेकंदास तीन वेळा तरी होत । नाम म्हणणे तेधवा ।।१९।।
असे तरी गुंगीत । नाम ऐकी परी जाग न येत ।
हळू हळू माध्यान्हापर्यंत । होई जागा पूर्णपणे ।।२०।।
तो त्यासी ये कळून । कोणीच दुसरे नसून ।
आपण स्वत:च नामस्मरण । करत होतो इतुके वेळ ।।२१।।
जे आपणांस वाटे अशक्य । ते महाराज पूर्णत: शक्य ।
करून सत्यापिती अपुले वाक्य । भक्ता माझ्या दैन्य कैचे ।।२२।।
असेच एका शिष्येस । वाटे सर्वांसारिखे आपणांस ।
मिळावे ऐकाया भागवतास । एके स्थानी आश्रमी ।।२३।।
परी दोन कारण ही ते । आड येती श्रवणांते ।
वाटे इतक्या वेळ तेथे । बसवेल कां आपणास ।।२४।।
दुसरे म्हणजे व्यवस्थापनी । सेवा करीती अनेक रमणी ।
त्या सेवेस महत्वाचे मानी । ही शिष्या हो त्यात मग्न ।।२५।।
एक दुसरी सेवक भगिनी । या शिष्येची इच्छा जाणोनी ।
भागवत श्रवणाचे पुण्य मिळण्याकारणी । उपाय एक सांगे ती ।।२६।।

महाराज ज्या वास्तूत । भागवत आहेत सांगत ।
प्रदक्षिणा त्यास जा घालित । लाभ त्यात श्रवणा इतकाच ॥२७॥
ही कल्पना पडून पसंत । सेवेतून मिळता उसंत ।
महाराज प्रवचन सांगत । प्रदक्षिणा घाली ही शिष्या ॥२८॥
एका सकाळी जाता आश्रमी । महाराज बोलाविती एका कामी ।
प्रथमच उच्चारुनी एकेरी नामी । देत कोऱ्या नोटांचे बंडल ॥२९॥
इथे येणाऱ्या साऱ्या सुवासिनी । हळद-कुंकू त्यांस लावुनी ।
एक-एक नोट त्यांस देऊनी । लिहुनी घेई नांवे त्यांची ॥३०॥
ऐसे महाराज निरोपित । शिष्या तैसेचि आचरित ।
तीन नोटा हाती उरत । परत द्यावी गुरुंस म्हणे ॥३१॥
तो इतुक्यांत दोन सुवासिनी । येती, महाराज आज्ञापुनी ।
नोटा दोन त्यांस देववुनी । एक प्रसाद म्हणुनी शिष्येस देती ॥३२॥
या सेवेचे प्रतिफळ । आश्चर्यकारक केवळ ।
स्वप्नी शिष्येस दिसे मंगळ । सोहळा एक वासुदेव निवासी ॥३३॥
महाराज व्यासपीठावर विराजमान । गळ्यांत पुष्पहार घालुन ।
गोपाळकृष्ण पूजीला घालुन हार सुमन।
कोऱ्या सतरंज्या अंथरलेल्या ॥३४॥
महाराज होते भागवत वक्ता । शिष्या ही एकमेव श्रोता ।
संपूर्ण सात दिवसांची कथा । ऐकिली शुकांनी कथिलेली ॥३५॥
जैसा धन्य परीक्षीत राजा । तैसीच शिष्या ब्राम्हणजा ।
भागवत मुखी महाराजां । अमृताहुन ही मधुर ते ॥३६॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौतिसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ३५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

भगवंताचे अवतार । संत सद्‌गुरु ऋषीश्वर ।
ईशप्राप्तीचे तेच द्वार । शरण रिघावे त्यांसी मना ॥१॥
संतांचे करता अनुसरण । तुटतील हे भवबंधन ।
सारे प्रतिबंध लय पावून । अक्षय पदी रत होती ॥२॥
सद्‌गुरुंचे जे वचन । वेदांचे ते सार जाण ।
करण्या साधकांचे भ्रमनिरसन । वाक्सुधेची गंगा वाहे ॥३॥
त्या भागीरथीतील तुषार । गुरुवाणीचे तारक नीर ।
त्यांच्या उपदेशाचे सार । वाचन चिंतन व्हावे त्याचे ॥४॥
संत अतिशय कृपाळू । आहेत फार कनवाळू ।
न रागावता वेळोवेळू । न कंटाळता उपदेशिती ॥५॥
शिष्याने पुसिता वारंवार । शब्द उच्चारिती बोधपर ।
करण्या भक्तांचा उध्दार । व्यवहार चालविला परमार्थाचा ॥६॥
संताच्या संगतीत ही राहून । उशीर होई उन्नती लागून ।
दोष न त्यांचा, समजून । न ये बुद्धिसी महती त्यांची ॥७॥
साक्षात्कारी महात्मे जरी । मार्गदर्शन करिती तरी ।
वागण्याची त्याप्रमाणे बुद्धि नातरी । दुर्दैव आपले आहे ते ॥८॥
दत्तमहाराज ईश्वरावतारी । बोध त्यांचा या अवसरी ।
आपल्या यावा वाचनांतरी । मनन निदिध्यासन होईल ॥९॥
त्यांसी करू प्रार्थना । शुद्ध करी बुद्धि-मना ।
मग तुझ्या उपदेश श्रवणा । एकाग्रता होईल ॥१०॥
आणिक ऐसी कृपा करी । उपदेश हा वाचल्या उपरी ।
ओढ उपजावी मना भीतरी । वर्तन त्याप्रमाणे करण्याची ॥११॥
ऐका हो सकल श्रोते जन । उपदेश करी नारायण ।
हे सद्‌गुरु रूप धरून । बोध करी सर्वांना ॥१२॥

म्हणे प्रपंच हा मोठा व्याप । चक्रव्यूह ते अमाप ।
सर्वांनाच त्यातून आपोआप । जावे लागे सततही ॥१३॥
द्वंद्वात्मक हा संसार । दु:ख त्यात अनिवार ।
विश्वास संतांच्या अनुभवावर । ठेवून मार्गक्रमणा करावी ॥१४॥
चक्रव्यूहात प्रपंचाच्या राहून । प्राप्त कर्तव्य सारे करून ।
परमात्मा संरक्षक जाणून । प्रार्थावे सतत तयासी ॥१५॥
ईश्वराचे संरक्षण । संकटमुक्ती केवळ नसून ।
उपासनेची बुद्धि होऊन । अभ्युदय हेहि संरक्षण असे ॥१६॥
कधी परिस्थिती असे अनुकूल । कधी ती भासे प्रतिकूल ।
सुख–दुख दोघांस समतुल । मानून आचरण करावे ॥१७॥
याचा अर्थ असा न होई । सुख येता दु:खी राही ।
दु:ख येता सुख पाही । तर दोघांस जाणणे अनित्य ॥१८॥
सुख येता हे जाईल म्हणून । त्यास टिकविण्या न करावे यत्न ।
दु:ख येता हे ही जाईल म्हणून । न खंतावे त्यासाठी ॥१९॥
दु:ख न मागता मिळे । तसेच सुख ही न मागता मिळे
येईल ते ज्याच्या त्याच्या वेळे । शांत असावे दोहो विषयी ॥२०॥
दोन्ही स्थितीत ही अंतरी । स्मरावे त्या श्रीहरी ।
सद्गुरूंचा उपदेश धरून उरी । करी साधन सश्रध्द ॥२१॥
न करावी चिकित्सा अधिक। ईश्वर त्यांसी म्हणे करा तर्क–वितर्क ।
श्रध्देचे फळ तयां न मिळे आणिक । तर्कातच ते गुंतुनी राहे ॥२२॥
संसारी कर्तव्ये करावी सारी । कर्तृत्व न धरावे परी ।
प्रपंचात राहणे जरी । भरताप्रमाणे करावे आचरण ॥२३॥
राज्य केले दुर्योधनाने । बंधूचे, तैसेच केले भरताने ।
परि अंतर केवढे, एकाने । सांगितले पांडवांना ॥२४॥
युध्दावीण तुम्हासी । सुईच्या टोकाएवढ्या भूमीसी ।
न देईन केले निश्चयासी । राज्य सत्ता माझी म्हणे ॥२५॥
दुसरा भरत राज्यकर्ता। रामाचेच राज्य ऐसे तत्वतां ।
मानून अलिप्तपणे आचरिता । वाट पाहे रामाची ॥२६॥

राम म्हणती हनुमंतास । भरत मुकेल प्राणास ।
धरोन मद्‌दर्शनाची आस । चौदा वर्षे पूर्ण झाली ॥२७॥
जाऊनी सांगा वेगे त्यासी । निघालो आम्ही या समयासी ।
ऐशा उत्कट निस्पृहतेसी । तोड नाही जगामाजी ॥२८॥
असेच राहून संसारी । भार टाकावा देवावरी ।
अलिप्त राहून कर्तव्ये करी । अंतरंगी भजावे हरीस त्या ॥२९॥
रामाचे राज्य म्हणून । यथा तथा न करी उबगून ।
उत्तम रीतिने व्यवस्थापन । करी दूषण न यावे म्हणे ॥३०॥
तैसेच या संसारासी । अर्पण करावे देवासी ।
परी तो चोख करणे व्यवहारासी । हेचि कर्तव्य आपले ॥३१॥
सद्‌गुरुंच्या वचनांवर । विश्वास ठेवून निरंतर ।
प्रदत्त साधन नित्य आचर । सहाय्य करीती श्रीगुरु ॥३२॥
नुसते मुखाने आपण म्हणतो । ईश्वर हे सर्व कार्य करितो ।
परि व्यवहारात सारे विसरतो । तरी ऐसे न करावे खचित ॥३३॥
सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हे घरदार ।
श्री वचनांप्रमाणे आचार । चालवावा आणिक ॥३४॥
सकाम साधना न करावी । धर्माचरणी गोडी ठेवावी ।
ईश्वरभक्ति आचरावी । दोष निवृत्ती सर्व होण्या ॥३५॥
अनंत जन्मांचे बंधन । कर्म साठले अतिगहन ।
पाप-पुण्य दोही फल देऊन । प्रतिबंध करिती जीवात्म्यास ॥३६॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पस्तिसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ३६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

पूर्वकर्मानुसार । फल देई तो ईश्वर ।
जरी दुःख जाहले अनिवार । तरी साधन न सांडिजे ॥१॥
जरी हे दुःख नेई । ईश्वराच्या चरणा ठाई ।
मग ते उपकारकच होई । आर्त भक्ति देई ते ॥२॥
भक्ति करिता ईश्वराची । कृपा होते भक्तावर साची ।
साखळी तोडी प्रतिबंधांची । पूर्व–दुष्कृते निर्मिलेली ॥३॥
परंतु गर्व भक्तिचा आपल्या । न करावा तो नेईल लया ।
धर्माचरण बुद्धि शुद्ध करण्या । करावा जी प्रयत्नाने ॥४॥
शुद्ध बुद्धी जाहल्या उपरी । ज्ञान प्राप्त होईल अंतरी ।
अखंड आनंद भरे उरी । प्राप्ती शांतीची होईल ॥५॥
साधावया सर्व ऐसे । गुरुप्रदत्त साधन करावे कैसे ।
शब्दप्रामाण्य मानून तैसे । अभ्यासावे सतत ही ॥६॥
शब्दप्रामाण्य न मानिता । शंका उगीच घेत बसता ।
पदरांत काहीच न पडता । पश्चाताप होईल ॥७॥
जन्म जन्मांतरीचे कुसंस्कार । हळू हळू होतील दूर ।
प्रतिबंध नाश व्हाया उशीर । लागणार तरी धीर धरावा ॥८॥
सर्वसंपन्न सुखी असता । ईश्वरी कृपा मानावी तत्वता ।
सुखात ईशानुसंधान सुटता । मार्गविरोध होतसे ॥९॥
म्हणोन अनुकूल परिस्थिती । आध्यात्मास न योग्य कदाचिती ।
मद अहंकारादिंची उत्पत्ती । होते, विकार जखडती मग ॥१०॥
बार्शीस एक संत । नांव जोगी परमानंद ।
एक त्यांचा नियम अभंग । नित्य आचरिती मनोभावे ॥११॥
गीतेच्या श्लोकाचा उच्चार । करूनी करिती नमस्कार ।
ऐसे पूर्ण गीता श्लोकवार । नमस्कार घालती साष्टांग ॥१२॥

एक दिनी कोणीतरी । नेसविले पीतांबरी ।
प्रणिपात करिता त्या वस्त्रावरी । लक्ष जाई वारंवार ।।१३।।
मग नित्य नेमांत । बाध जाहला अपरिमित ।
जाती एका शेतकऱ्याप्रत । म्हणती बैलांस बांधी मज ।।१४।।
बांधून घेऊन बैलांसी । मारविले चाबुक तयांसी ।
बैल उधळिले असमसाहसी । फरफटत जाती त्यांसवे ।।१५।।
शिक्षा स्वत:स केली । भगवंतेच त्यातून सुटका केली ।
असो, आपली गुरुमाउली । निरोपील ते ऐकावे ।।१६।।
आपणांस व्यवहारांत । ईश्वराने केले नियुक्त ।
ऐसे मानून कर्तव्यी रत । असोन करावी साधना ।।१७।।
ज्ञानी महात्म्यांची दृष्टी जरी । पडे आपल्यावर क्षणभरी ।
पापक्षय त्वरित ती करी । म्हणोन संतांस शरण जावे ।।१८।।
अन्नदोष अति भयंकर । बुद्धि भ्रष्ट करील सत्वर ।
म्हणोन शुचितेच्या नियमांवर । कटाक्षाने द्यावे लक्ष ।।१९।।
आयुष्यांत जे घडते । ईश्वराच्या संमतीने होते ।
स्वकर्मच त्याला कारण होते । दोष नाही नियंत्यास ।।२०।।
चांगली कर्मे जर केली । बुद्धि होईल शुद्ध भली ।
जरी आयुष्याची दोर तुटली । तरी ही बुद्धि येई बरोबर ।।२१।।
म्हणोन आपल्या आध्यात्म धर्मात । निराशावाद नाही यत्किंचित ।
या जन्मीचे शुद्ध संस्कार खचित । पुढील जन्मी गति देती ।।२२।।
जरी भार आपला ईश्वरावरी । ठेवायचा असेल सर्वतोपरी ।
तितकी निश्चित बुद्धि तरी । व्हावया वेळ लागणार ।।२३।।
पूर्व जन्मीचे संस्कार । हळू हळू कमी होतील विकार ।
रहायला हवी बुद्धि स्थिर। परिस्थिती अनुकूल–प्रतिकूल असो ।।२४।।
म्हणोनी सांगितला भक्तिमार्ग । ज्यास मिळे तो सुभग ।
सन्मतीने होणे वीतराग । हीच खरी ईश कृपा ।।२५।।
इथून ही आपली । निश्चित होणार बदली ।
आसक्ति न पाहिजे ठेविली।
मृत्यूसी आठवा वदती नाथ महाराज ।।२६।।

कर्तृत्वाची अहंता । न ठेवावी तत्वतां ।
अर्जुनास वाटे मी कर्ता । युध्द करणारा मीच असे ।।२७।।
म्हणे हे माझे गुरु । माझे पितामह, स्वजन नरु ।
यांसी आता कैसा मारू । मोह झाला हा त्यासी ।।२८।।
श्रीकृष्ण म्हणे हे मरणार । जरी तू न त्यांसी मारणार ।
काय पडेल फरक त्या चक्रधर । जाता अथवा राहता अर्जुन ।।२९।।
परि व्हावे अर्जुनाचे कल्याण। ऐसे इच्छितो श्रीकृष्ण ।
अनेक जन्मांची सेवा जाण । अर्जुनाची पाहिली त्यांनी ।।३०।।
बाजूला करावी अहंता । मग मोक्ष मिळे निश्चिता ।
ज्ञानियांस ही पीडितो तत्वतां । अहंकार हा महान शत्रू ।।३१।।
चांगदेवांचे उदाहरण । आठवावे या कारण ।
शेवटपर्यंत सावध ठेवावे मन । प्रार्थावे देवासीच त्यापाई ।।३२।।
करावे मनासी स्थिर । किंवा प्राणांस करावे स्थिर ।
जो मार्ग वाटे सुकर । भक्तिमार्ग किंवा योगपंथ ।।३३।।
या दोहोंनी बुध्दि । सुसंस्कारे होई सुबुध्दि ।
होता बुध्दिची शुध्दि । गवसेल तो सच्चिदानंद घन ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
छत्तिसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ३७

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

माता–पिता अपत्यावर । करिती उचित संस्कार ।
परि प्रभाव अन्यांचाही त्यावर । होतो मोठ्या प्रमाणांत ॥१॥
पूर्व जन्मीचे सूक्ष्म संस्कार । वातावरण आणि मंडळी इतर ।
कलियुगाचाही महिमा फार । त्यामुळे बुद्धि भ्रष्ट होई ॥२॥
हा सर्व आहे अज्ञान । परि सद्‌गुरुंचे दयापूर्ण ।
होई जेव्हा कृपेने ईक्षण । दोष सारे निघून जाती ॥३॥
गुरु घालुनी ज्ञानांजन । अज्ञानांधकार घालवून ।
ज्ञानदृष्टी देऊन । लोचन उन्मीलित करीतात ॥४॥
अशीच एक गुरुभगिनी । सात्विकगृही जन्म घेऊनी ।
इतर संस्कारांचे बळी पडोनी । नास्तिक होऊन राहिली ॥५॥
धार्मिक संस्कारांस । म्हणे थोतांड खास।
विविध शंका कुशंकांस । धरून अव्हेरी सद्‌वर्तन ॥६॥
तथाकथित आधुनिक । म्हणवी स्वतःस आणिक ।
सोवळे वगैरे सकळिक । मानी कालबाह्य सर्वही ॥७॥
विवाह योग्य होता । स्थळ एक योजिता ।
नियोजित वरास स्वतः । सांगे अगोदर काय ते ॥८॥
मी ही 'अशी' वागणार । त्यात बदल न होणार ।
काही लादता माझ्यावर । घटस्फोट घेईन ॥९॥
एवढे सांगुनच ती । विवाहास देई संमती ।
सासर मंडळी धार्मिक होती । साधक होते सर्वही ॥१०॥
धर्म नियमांचे पालनात । दक्ष असती ते सतत ।
नववधूचे स्वभाव विहित । वाद नित्य होतसे ॥११॥
परंतु संसार न मोडावा । म्हणून वडील मंडळी तेधवा ।
मुरड घालून स्वतःच्या स्वभावा । निभावून घेती तियेस ॥१२॥

ही मंडळी समस्त । श्रींची अनुग्रहित ।
पतीदेवांस ही वाटत । पत्निने घ्यावी अनुग्रह दीक्षा ।।१३।।
आग्रहपूर्वक समजाविती । दीक्षा घेण्यास प्रवृत्त करिती ।
कष्टानेच वळे हिची मती । प्रार्थना पत्र गुरूंस लिहिले ।।१४।।
महाराज अत्यंत दयाळू । मातेपरी कनवाळू ।
दीक्षा देती तये वेळू । या भगिनीस कृपेने ।।१५।।
न ये विशेष अनुभव । परि हळू हळू बदले स्वभाव ।
ईशचरणी होई भाव । समंजसपणा ही येतसे ।।१६।।
श्रींच्या शिवसंकल्पाने । पालटोन जाई तत्क्षणे ।
अज्ञानाची लक्षणे । मनांत बदल हळूहळू होई ।।१७।।
सासू सासऱ्यांसही । समजून घेऊन ती राही ।
प्रपंचात ही लवलाही । होई अनुकूलता तदनंतर ।।१८।।
वरचे वरी गुरुदर्शन । होऊन वाटे समाधान ।
श्रींच्या शक्तिची खूण । काही प्रसंगांतून पटे ।।१९।।
एकदा दर्शन झाल्यावर । श्रींनी दिलेली खडीसाखर ।
भक्षण न करिता सत्वर । पिशवीत दिली ठेऊन ।।२०।।
अचानक होई व्याधी नवीन । काही नसता कारण ।
तीव्र वेदना होती जाण । असह्य होई तियेस ते ।।२१।।
अशा ही स्थितीत । बसावे साधनेस असे वाटत।
ध्यानास बसता ऐकू येत । विचारणा करे कोणीतरी ।।२२।।
"खडीसाखरेचा प्रसाद । घेतला कां?" ऐसे शब्द ।
कोण बोले न कळे परि नाद । अंतरंगात उमटला ।।२३।।
प्रसादाची साखर । टाकिता मुखांत कणभर ।
हळू-हळू व्याधी होऊन दूर । वेदना जाती पूर्णपणे ।।२४।।
श्रींच्या मार्गदर्शना प्रमाणे । गेले तीर्थयात्रा कारणे ।
तेथे ऐकू येई स्पष्टपणे । निरोप कानांत सांगितला ।।२५।।
अपरिचित एका शेजाऱ्यास । न्यावे इथल्या प्रसादास ।
ते ही आपल्या गुरुपरंपरेस । गुरुबंधू, असे कळोन आले ।।२६।।

महाराजांच्या मार्गदर्शनावरून । दिधले सत्पात्री दान ।
घडले ईश-गुरु सेवन । अन्नदान ही काही झाले ।।२७।।
प्रतिकूलता वाटे जरी । आज्ञा पालन करिता तरी ।
संकट जाऊन सत्वरी । अनुकूलता येतसे ।।२८।।
या भगिनीने स्व-बांधवांस । आणिले श्रींचे दर्शनास ।
आपत्तीतून रक्षण खास । केले त्यांचे ही श्रीगुरुंनी ।।२९।।
अशा असंख्य अनुभवातून । गुरुभाव तिचा दृढ होऊन ।
वाटे अतिशय समाधान । साधना ही उत्तम होई ।।३०।।
अंतरंगात बदल । अशक्य इतरांस केवळ ।
श्रीगुरुंची कृपा विमळ । तेच करू जाणती ।।३१।।
सत्संगत्वे निःसंगत्वम् । निःसंगत्वे निर्मोहत्वम् ।
निर्मोहत्वे निश्चलितत्वम् । निश्चलितत्वात् जीवन्मुक्तिः ।।३२।।
- आद्य शंकराचार्य ।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सदतिसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ३८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

पार्थ म्हणे भगवंतास । जरी कोण्या योगियास ।
प्राप्त करण्या आत्मज्ञानास । अभ्यास करता येई मृत्यू ॥१॥
अभ्यास मग का वाया जाई । पुढचा जन्म प्राप्त होई ।
तेव्हा पुनश्च करोन राही । सर्व ही आरंभापासून कां?॥२॥
यावर म्हणती भगवान । ऐसे घडता जन्मोन ।
अनुकूल पवित्र कुळालागून । ईशभक्तिचे वैभव जेथे ॥३॥
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।
अथवा योगिनामेव कुले भवति धीमतां ॥४॥ (भगवद्गीता)
श्रीमंताच्या घरी ऐशा । जन्म घेई अभ्यासक तद्देशा ।
दृढ करोन पुढील अभ्यासा । आत्मज्ञान मिळवोन घेई ॥५॥
जरी होता आत्मज्ञान । प्रारब्ध राही काही उरोन ।
तेव्हा येता त्यास मरण । योगभ्रष्ट महात्मा घेई जन्म ॥६॥
भगवंताचे हे निरुपण । त्याचे सुंदर उदाहरण ।
जन्मोजन्मीचे ऋणानुबंधन । गुरु-शिष्यांचे जे असे ॥७॥
गुरु हे तत्व एक । जरी आपले जन्म अनेक ।
तरी विविध नामरुपादिक । घेऊन तेच गुरु होती ॥८॥
जीवास नसे स्मरण । गुरु घेई शिष्यास ओळखून ।
घडता उत्तम साधन । ज्ञानप्राप्ती जीवास होई ॥९॥
प्रारब्ध भोगण्यास । जगे तो काही मास ।
अथवा काही संवत्सरास । मग गुरु चरणी विलीन होतसे ॥१०॥
असाच एक ज्ञानी जीवात्मा । महाराजांच्या भक्ता घरी घे जन्मा ।
भक्ति-गुरु कृपेच्या संगमा । पुत्ररूपे महात्मा येई तो ॥११॥
शेवटच्या या जन्मात । गुरुंची ओढ विलक्षण वाटत ।
गुरुभाव त्याचा प्रशंसनीय असत । गुरुंचेही असे फार प्रेम ॥१२॥

पाच वर्षे जेमतेम । जगे हा योगी उत्तम ।
दुर्धर व्याधीत देह होम । होई कर्मविपाकाने ।।१३।।
श्री दत्तमहाराजांस । तसेच सौ. आईसाहेबांस ।
लळा या बालकाचा खास । भेटीस उत्सुक असे तोही ।।१४।।
राही बालक दूर अंतरावर । दर्शनास न जाता येई वरचेवर ।
म्हणोन श्रींचा एक फोटो समोर । लागे त्यास सतत ही ।।१५।।
''फोटोतील आजोबा'' म्हणे त्यांसी । सगळे निवेदन करी जे मानसी ।
न सांगता करी नमस्कारासी । स्नानानंतर नित्यशः ।।१६।।
या बालकासाठी श्रींनी । विविधोपासना नियोजनी ।
सांगितल्या मातापित्या लागुनी ।
इतर गुरूबंधूंस ही समाविले त्यांत ।।१७।।
दिगंबराचा जप अखंड करावे। श्रीगुरूचरित्र सप्ताह पारायणे वाचावे ।
सबीज अनुष्ठाने मंत्र जपावे । सामुहिक धून उपासना ही ।।१८।।
एवढे नित्य करण्यास । सांगती श्री माता पितांस ।
तसेच काही गुरूबंधूंस । बालकास दीक्षा ही दिधली असे ।।१९।।
गुरूप्रसाद तो असे । माता पितरांस हेच वाटतसे ।
वेळोवेळी अनुभव येतसे । त्यावरील गुरूकृपेचा ।।२०।।
स्व-समवेत या बालकासी । नेले गुरूंनी यात्रेसी ।
तुळजापूर, गाणगापूर, हरिहरेश्वरासी । वाडीसी ही प्रतिवर्षासि ।।२१।।
महाराजांनी यांस । बरोबर नेले काशीस ।
धून आवडे या बालकास । उत्तम साधनाही करितसे तो ।।२२।।
चैतन्याने ओतप्रोत । योगियाचा देह असत ।
आहार अत्यंत अल्प घेत । नैवेद्याच्या ताटातील ।।२३।।
श्रींस करून निवेदन । मगच घेई आपण ।
अत्यंत सात्विक प्रेमळ असून । बुद्धि तरल असे त्याची ।।२४।।
अगदी व्यावहारिक बाबतीत । अचूक सूचना कधी-कधी देत ।
जणू वडीलधारे कुणी पोक्त । तितिक्षा ही विलक्षण त्याची ।।२५।।
मारुतीस्तोत्र, गणपतीस्तोत्र । शुभंकरोती नित्य म्हणत ।
अघोर कष्टोध्दरण पाठ नियमित । करी बालक इवलासा ।।२६।।

तीव्र परिणामाची औषधे रासायनिक ।
न द्यावी म्हणती महाराज आणिक ।
चैतन्यमय देह पांचभौतिक । त्याची काळजी घेण्यासाठी ।।२७।।
एका सत्पुरुषाच्या देखरेखित । विशिष्ट अशा अनुपानात ।
आयुर्वेदिक औषधे त्यास देत । श्री नामाच्या उद्‌घोषासह ।।२८।।
याकडे भेटीस जे गुरुबंधू येत । प्रथम हातपाय धुवून बसत ।
देवासमोर एक माळ जपत । मग होई पुढील बोलणे ।।२९।।
विचारिले एकदा एकानी । बाळा पुढच्या वेळी येतानी ।
काय आणू तुजलागुनी । बाळ म्हणे "रामाचा फोटो" आणा ।।३०।।
प्रति मासिक जालना वारी । महाराजांच्या आज्ञेपरी ।
बालकासह मातापितरी । दर्शन ताईंचे घेत ।।३१।।
योजनाबद्ध दक्षतेने । या छोट्या बालका कारणे ।
श्रींनी उपासनादिक सांगणे । आश्चर्य यांत वाटे सर्वांस ।।३२।।
या सर्वही वर्तनातून । स्पष्ट येई कळोन ।
या बाळाचे पूर्वऋणानुबंधन । विलक्षण होते सद्‌गुरुंशी ।।३३।।
बालवयातील आचरणातून । बालमहात्मा स्वतःस घेई झाकून ।
ओळख स्वतःची न देऊन । राही योगभ्रष्ट सत्पुरुषापरी ।।३४।।
श्रीगुरुंचे करीत स्मरण । त्यांचे चरणी लीन प्राण ।
देहत्याग हा करून । अमरत्व प्राप्त करिता झाला ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
अडतीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ३९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एका लहान शहरातील । ब्राम्हण एक कुटुंबवत्सल ।
कथा त्याची ही मंगल । सामान्य परिस्थितीतील गृहस्थाची ॥१॥
गुळवणी महाराजांची माहिती । एका पत्रिकेतून मिळे ती ।
दयासागर ही विभूति। देई सर्वांस अनुग्रह ॥२॥
सर्व कुटुंब भक्तिने साधन । करून राहता अनुदिन ।
तयांस कळे वर्तमान । गावी आपल्या आले सत्पुरुष ॥३॥
प.पू.श्री दत्तमहाराज म्हणून । आहे त्यांचे अभिधान ।
जाती दर्शना लागून । नमस्कारुनी सांगती परिचय ॥४॥
स्वगृहास लागावे चरण । म्हणोन विनवी ब्राम्हण ।
गुरुमहाराजांची मंडळी म्हणोन । यायलाच हवे म्हणती गुरु ॥५॥
स्वागतादिक करून । यथाशक्ति अर्चन ।
करिती सद्गुरुंस वंदन । कृतार्थ होती सर्वही ॥६॥
या ब्राम्हणाच्या पुत्रास । बसता एके दिनी साधनेस ।
येई विशेष अनुभवास । दर्शन दत्तमहाराजांचे होई ॥७॥
महाराज म्हणती हासून । उदईक माध्यान्ही भोजन ।
करण्या तुमच्या गृहालागून । येऊ ऐसे बोलती ॥८॥
आनंद ब्राम्हण पुत्रास होई । आनंद वार्ता सर्वही ।
घरांत सांगे सर्वाही । शुभ ऐकोन हर्षती ॥९॥
पूर्वी ही अनेक वेळ । श्रीगुरुंचे चरण कमळ ।
घरास लागून विमळ । वास्तू पवित्र झाली असे ॥१०॥
पूर्व सरावानुसार । चर्चा करिती अगोदर ।
मग तयारी साचार । करण्या आरंभिती यथामति ॥११॥
दुसरे दिनी पक्वान्न पाक । सिद्ध करिती सम्यक ।
पूजेची तयारी आणिक । औक्षणादिची तयारी ठेविली ॥१२॥

रांगोळ्या घालुनी अंगणी । चरणांवर घालण्यास दूधपाणी ।
जे सुचे जया लागुनी । यथामती केलेसे ।।१३।।
वाट पाहती सर्वजण । येईल सद्गुरु नारायण ।
होता काळ माध्यान्हजाण । अपूर्व एक वर्तले ।।१४।।
जागोजाग सर्वजण । असती स्वकार्यी लीन ।
ते झाले निद्राधीन । स्व-स्थानावर आपोआप ।।१५।।
नात दोन वर्षांची । असे या ब्राम्हणाची ।
तीच जागी राहे साची । इतर सर्व झोपले ।।१६।।
ही नात अति चंचल । कारभार करी सारा वेळ ।
परि यावेळी शांत निश्चल । राही न काहीच केले तिने ।।१७।।
या देवी सर्वभूतेषु । निद्रा रूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै । नमस्तस्यै नमोनमः ।।१८।।(स.श.)
सर्वांसि घालून मोहिनी । येती सद्गुरु घरालागुनी ।
सर्वोपचार स्पर्श करूनी । मंगळ करूनी निघून जाती ।।१९।।
परत जाती गुरु तेव्हा । काका-काका वदे जिव्हा ।
नात बोट दाखवून, तेव्हा । आवाजाने जागती सर्व ।।२०।।
हळू हळू जाग येई सर्वांसि । बघती सर्व बाल कन्येस ।
जी "काका" म्हणोन मारी हाकेस । बोट दाखवी दाराकडे ।।२१।।
आश्चर्य वाटे सर्वांना । झोप कशी लागली आपणा ।
एकमेका बघती नयना । सर्वच झोपलो कसे म्हणती ।।२२।।
माध्यान्ह काळ गेला उलटून । गुरु येऊन गेल्याची खूण ।
दिसे, राही घरांत सुगंध दरवळून । अन्नास अपूर्व माधुरी येई ।।२३।।
वास्तविक पाहता श्रीगुरु । नव्हते यांच्या नगरु ।
असती कुठेही तरी अंगिकारू । केला यांचे साहित्याचा ।।२४।।
या कुटुंबातील सर्वांना । देऊन सेवेच्या दाना ।
पावन केले त्यांना । जवळ करून वात्सल्याने ।।२५।।
श्रींचे एक विशेष असे । आपले म्हटले कोणास तसे ।
सर्व कुटुंबावर बरसे । कृपा त्यांची सतत ही ।।२६।।

एवढेच नाही तर पुढे ही । पिढ्यान पिढ्या सर्वाही ।
कृपा दृष्टीने पाही । तारी तयांस दयाघन ॥२७॥
या ब्राम्हणाची कन्या सुंदर । झाली असता उपवर ।
म्हणे इयेस योग्य वर । मिळून विवाह व्हावा आता ॥२८॥
व्हावे कार्य उत्तम संपन्न । मनी असे तरी पण ।
न सांगी तरी गुरु स्वत:हून । सांगती या कन्येसी ॥२९॥
काय सांगती या कन्येस । पुढील कथा ती सरस ।
अनुक्रमे पुढील अध्यायास । सावधानपणे ऐकावी ॥३०॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

ब्राम्हणजा करी भावे वंदन । श्री गुरु वदती दयाघन ।
"मंगळवार" हे व्रत करून । "सौभाग्य संपन्नता" प्राप्त होते ॥१॥
या व्रताचे करता आचरण । उपवर कन्येचे त्रासदायक ग्रहमान ।
होई त्यांचे प्रतिबंध निवारण । योग्य वराची प्राप्ती होय ॥२॥
कल्याणकारक व्रत म्हणून । श्री मुखाने प्रकट होऊन ।
सर्व भाग्य संपन्नता लाधून । मंगळ होई हे आशीर्वचन श्रींचे ॥३॥
विधि याचा पूर्ण । सांगितला कन्येलागून ।
दिनशुध्दि व कन्येस चंद्रबल पाहून ।
कोणत्याही मंगळवारी करावा व्रतारंभ ॥४॥
एक वर्ष पर्यंत । आचरावे हे व्रत ।
मंगळवारी उठोन प्रात: । करावे स्नान मंगळ ॥५॥
करावे दिवसभर उपोषण । उपवासाचा जो अभिप्राय म्हणून ।
भगवतीचे स्तोत्रादिक पठण । करून तियेसी प्रार्थना करावी ॥६॥
"व्रताधिष्ठात्री" भवानी माता । होवो मजवरी संतुष्ट आता ।
जगदंब जगदंब मुखी म्हणता । दिवस घालवावा स्मरणात ॥७॥
सायंकाळी करून स्नाना । पूजा मांडावी शुद्ध स्थाना ।
यथाशक्ति मूर्ति-प्रतिमेचे अधिष्ठाना।पूजना षोडशोपचार अपवि ॥८॥
विप्राकरवी श्रीसूक्त म्हणवून । मनोभावे करावे पूजन ।
सौभाग्यदानास प्रार्थून । नैवेद्य तियेसी अर्पावा ॥९॥
सव्वापट कणीक घेऊन । दुधात घट्ट भिजवून ।
तळहातावर पानगे करून । मंद आरावरी भाजावे ॥१०॥
असे गाकर चुरुन । गूळ-तूप घालून ।
लाडू त्याचे करून । हे चुरमा लाडू नैवद्यासी घ्यावे ॥११॥
प्रार्थना-स्तुती आदि करून । तीन कुमारिकांस पाचारून ।
अर्घ्य पाद्यादि देऊन । पुष्पमालादि अर्पण करावी ॥१२॥

कुमारिकांच्या रुचि प्रमाणे । चुरमा लाडू त्यांस देणे ।
उरलेला भाग स्वत: घेणे । कन्येने व्रतकर्त्या ।।१३।।
इतर काहीही न करावे सेवन । निजेपर्यंत करावे स्मरण ।
कालमान परिस्थिती अडचण । येता नुसते उपोषण करावे ।।१४।।
याप्रमाणे एक वर्ष पर्यंत । मनोभावे आचरिता व्रत ।
शेवटचे मंगळवारी चुरमा लाडू सहित ।
पंचपक्वांनाचा नैवेद्य करावा ।।१५।।
यथाशक्ति कुमारिका बोलावून । यथामति करावे पूजन ।
वस्त्र दक्षिणादिक देऊन ।
ब्राम्हण सुवासिनींसह भोजन अपवि ।।१६।।
सर्व व्रतकर्म भगवती चरणी । मनोभावे अर्पण करूनी ।
सर्वांसह प्रसाद घेऊनी । सांगता त्याची करावी ।।१७।।
ब्राम्हण कन्येने वर्ष एक । श्री गुरुंनी निरोपिले जे सकळिक ।
व्रताचरण केले सम्यक । समाप्तीचे मंगळवारी ।।१८।।
येती महाराज यांचे घरी । आचार्य स्वत: होती तरी ।
कृपाहस्त ठेऊन शिरी । आशीर्वाद उत्तम दिधला तियेस ।।१९।।
श्रीं चे मिळता आशिर्वचन । लवकरच योग्य वर मिळून ।
झाला विवाह संपन्न । जाई श्वशूर गृही कन्या ।।२०।।
प्रारब्ध कर्मभोग सर्वांसि । स्वत:च लागे भोगावयास ।
तरी सद्गुरु समर्थ खास । परिस्थितीस बदलण्या ।।२१।।
सासरी असे विरुद्ध परिस्थिती । सासऱ्यांची भक्ति असती ।
जरी शिर्डी साईबाबांवर प्रीती । गृहस्वामीनी नसे अनुकूल।।२२।।
घरात विरुद्ध प्रवाह । मनाचा होई दाह ।
नित्योपासन न घडता दु:सह । दु:ख होई ब्राम्हण कन्येसी ।।२३।।
तरी पूर्वेतिहासातील योगिमान्या । मदालसादिका स्त्रिया ।
त्यांचे चरित्र आठवून ही भार्या ।
पतीस समजाविण्याचा करी प्रयत्न ।।२४।।
भक्ताभिमानी अंतर्यामी । भक्तवत्सल सद्गुरुस्वामी ।
जाती स्वत: सासरग्रामी । गृही ब्राम्हण कन्येच्या ।।२५।।

करून वास्तव्य काही दिन । कन्येस उपदेश करून ।
स्थिर केले तिचे मन । कृपा प्रभावे वातावरण बदलविले ।।२६।।
श्रींचे होता दर्शन । पतींचे प्रसन्न झाले अंत:करण ।
कृपा प्राप्त करण्याची तीव्र इच्छा होऊन ।
प्रार्थना करिती गुरूंस ते ।।२७।।
हळूहळू जीवनांत । सर्व अनुकूलता येत ।
दीक्षा मिळून कृतार्थ होत । पतिदेव ही कन्येचे ।।२८।।
स्वत:ची वास्तू होऊन । श्री वासुदेव निवास अभिधान ।
त्या घरास देऊन । भक्ति करिती उभयताही ।।२९।।
हे सर्व घडत असता । घटना एक विचित्र होता ।
आश्चर्य वाटे तत्वतां । लीला बघून श्री गुरूंची ।।३०।।
माहेरच्या आंदणातून । श्रीगुरू एका फोटोतून ।
आले सासरलागुन । या कन्येच्या समवेत ।।३१।।
ज्याप्रमाणे गढूळ पाण्यात । निवळीच्या बियेचा कल्क टाकत ।
स्वत: नष्ट होऊन निश्चित । गाळ सर्व तळाशी साठवी तो ।।३२।।
स्वत: नष्ट होऊन । शुद्ध पेय जल देऊन ।
करी कल्क आपण । त्याप्रमाणे गुरूंनी केले ।।३३।।
हळू हळू फोटोतील प्रतिमा । फिक्कट होवून क्रमा-क्रमा ।
अदृष्य होऊन फोटो रिकामा । होऊन जाई कालौघाने ।।३४।।
ब्राम्हण कन्येस जे दुर्निवार । प्रतिबंध पीडिती ते आपणावर ।
घेऊन स्वच्छ शुद्ध विचार । केले परिवाराचे श्रीगुरूंनी ।।३५।।
आयुष्य सारे बदलून । श्रींची कृपा मिळून ।
प.पू.ताईंचे वात्सल्य पावून । कृतार्थ होती उभयता ।।३६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चाळीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ४१

॥ श्री गणेशदत्तगुरूभ्योनमः ॥

मागील अध्यायीचा ब्राम्हण । त्याचे पुढील प्रसंग पूर्ण ।
या अध्यायी उल्लेखून । सांगता करावी या कथेची ॥१॥
या ब्राम्हणाचे ठिकाणी । उत्तम भक्ति असोनी ।
उत्तम संस्कार करोनी । कल्याण साधी कुटुंबाचे ॥२॥
उभयता पती-पत्नीस । गुरू भक्तिचे सरस ।
फळ मिळे उत्तर काळास । उत्तम गती मिळे त्यांना ॥३॥
ब्राम्हणाच्या पत्नीस । घसरून पडता अर्धांगास ।
झटका येऊन अर्ध शरीरांस । निष्क्रियता जाहली ॥४॥
ब्राम्हणाचा ज्येष्ठ पुत्र । जाई श्रीं च्या दर्शनाप्रत ।
योगायोगाने गांवात । आले होते म्हणोनी ॥५॥
घरी येण्याचे विनवोन । करी मातेचे सर्व कथन ।
महाराज म्हणती सांत्वन करून । तीर्थ अंगारा मातेसी न्यावा ॥६॥
मुक्काम दत्त मंदिरात । होता महाराजांचा त्या काळात ।
तेथील तीर्थ अंगारा घेत । ब्राम्हणपुत्र तये वेळी ॥७॥
विनवी महाराजांस सत्पुत्र । स्पर्श करावा तीर्थ अंगाऱ्याप्रत ।
त्याप्रमाणे हात लावून देत । तीर्थ अंगारा श्रीगुरू ॥८॥
घरी जाऊन मातेस । लावी बधिर झालेल्या अंगास ।
काही काळाने बरे वाटून तियेस । दुसरे दिनी झाली पूर्ववत् ॥९॥
या साध्वी स्त्रियेस । दिसे उघड्या नेत्रांस ।
श्रीकृष्ण लीला रास । देव्हाऱ्याच्या समोर ॥१०॥
हे दिसे निळ्या प्रकाशात । अंगणात वृक्ष पारिजात ।
एकदा त्यावर ही दिसत । रासक्रिडा नेत्रांना ॥११॥
प्रेमलक्षणा भक्तिची अधिकारी । रासलीला पाहणारी ।
विष्णू सहस्त्रनाम श्रवण करी । अंतकाळी सुधामास जाता ॥१२॥

ब्राम्हण ही अंतिम समयास । सहे व्याधीचा त्रास ।
परि उच्च स्वरे नामोच्चारास । करी सतत प्रेमाने ॥१३॥
देवांचे स्तोत्र पठण । कुटुंबीयांस उच्चस्वरे करवून ।
स्वत: त्यांसमवेत म्हणून । जप करी सातत्ये ॥१४॥
ब्राम्हण कन्या वडिलांस । येई माहेरी भेटण्यास ।
पिता म्हणे तियेस । दिसती सत्पुरुष एक मजसी ॥१५॥
माझ्याकडे पाहून । ते म्हणती अभय देऊन ।
काळजी करू नको म्हणून । तुला नेण्यास येईन स्वत: मी ॥१६॥
कुतुहलाने कन्या म्हणे । त्यांचे रूप वर्णन करणे ।
तैसे करिता पितयाने । समजे ते श्रीधरस्वामी होते ॥१७॥
गुरु नामाचा उच्चार करित । उच्च स्वरे जयघोष करित ।
हा ब्राम्हण देह ठेवित । श्रीचरणी लीन होय ॥१८॥
एक पुत्र ब्राम्हणाचा । अस्थि विसर्जन करावयाचा ।
म्हणोन प्रवास रेल्वेचा । करून ओंकारेश्वरी जाई तो ॥१९॥
काही स्टेशन पुढे जाऊन । गाडी बराच वेळ थांबून ।
मूळ स्थानी ये परतून । कारण रेल्वेसच ठाऊक ॥२०॥
नाइलाजे घरी परतोन । पुन: प्रथमोपलब्ध रेल्वेने निघोन ।
जाई वाडी क्षेत्रालागून । कृष्णा माईत अस्थि विसर्जित करी ॥२१॥
श्रींची इच्छा म्हणोन । असे येई घडोन ।
कारणमीमांसा याहून । न देता येई दुसरी येथे ॥२२॥
पुढे एक सांत्वन पर । पत्र पाठविती गुरुवर ।
ब्राम्हण पुत्रांस देण्या धीर । काय लिहिती महाराज ॥२३॥
आपल्या पिताजींचा उद्धार । करण्या समर्थ श्री गुरुवर ।
"ते स्वनाम धन्य होते" असे उद्गार। लिहिले गुरुंनी तयासाठी ॥२४॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४२

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

## पद

कोणी बांधिती मंदिरे, सुशिखरे, कोणी गोपुर महाद्वार ।
कोणी अर्पिती वस्त्रमाळ भूषणे, मूर्तिस सगुण साकार ॥१॥
कोणी आलयी जाउनी सुपुजिले, वाहुन सकल उपचार ।
कोणी बांधिती पूजा पत्री पुष्पांची, कोणी घालिती सुमहार ॥२॥
कोणी धूप सुगंधित दाविले, कोणी म्हणे स्तोत्र फार ।
कोणी ज्योतिस ज्योतिने ओवाळिती, करूनी मंत्र उच्चार ॥३॥
कोणी दावुनी नैवेद्यास प्रार्थिती, कोणी आणी फलाहार ।
कोणी मस्तक ठेवुनी नमियले, अष्टांग केला नमस्कार ॥४॥
कोणी देऊनी दक्षिणा-प्रदक्षिणा, कोणी घातल्या हजार ।
कोणी गाऊन भक्ति गीत आळवी, दावून ताल रागदार ॥५॥
हे सारे नच बांधिती देवासी, असती जरी ते साचार ।
भावाच्या भुके तिष्ठतो श्रीहरी, अनादि-अनंत-निराकार ॥६॥
जो संसार धनादिकांची माया, सोडी मोह, पुत्र-दार ।
प्रेमे जाई शरण भाव ठेवुनी, त्यासीच देव तारणार ॥७॥
प्रेमाने वश होउनी रंगवी, चामडे होऊन चांभार ।
माती तुडवी चरणांनी स्वतःच्या, भजनी रंगे कुंभार ॥८॥
दळण जनीचे दळीले, उष्ट्या बोरांचा केला स्वीकार ।
शेले विणले बसुनी मागावरी, कबीर होई कीर्तनकार ॥९॥
विदुराच्या कण्या भक्षुनी, रक्षिले द्रौपदीस वारंवार ।
भावे जाई शरण तोचि आवडे, हेचि असे भक्ति सार ॥१०॥

# ओवी

एक असे पीडित नर । दारिद्रे व्यापिला संसार ।
स्त्रिपुत्रादिक त्याचे घर । देती दोष तयासीच ।।१।।
परंतु हा पूर्णपणी । अत्यंत भक्ति भावांनी ।
शरण श्री सद्गुरु चरणी । होता सर्वदा सर्वकाळ ।।२।।
प्रपंची करणे धनार्जन । करणे परिवाराचे पोषण ।
नांव लौकिकादि संपादन । हे करणे प्राप्त होय ।।३।।
परंतु हे न मिळे स्वकर्तृत्वे । त्यास दैवाचे बळ असावे ।
तरीच हे सुख बरवे । प्राप्त होई जनांसी सर्व ।।४।।
परंतु परिवारातिल लोक । न मानिती हे कौतुक ।
इतरांचे उदाहरण आणिक । देतात ते गृहपतीस ।।५।।
बोलती त्यास उणे-अधिक । म्हणे तू न मिळविसी अमुक ।
हे सर्व असह्य होई आणिक । प्रार्थी भक्त श्री गुरुंसी ।।६।।
मनांत करूनी सर्व निवेदन । म्हणे नच कोणी मजलागुन ।
हे गुरुमाय तुझ्याविण । तारी मजसी यातुनी ।।७।।
करी परिवारासी समजाविण्याचा । प्रयत्न तो बोलुनी वाचा ।
भाव असता मनांत साचा । श्रींचे पूर्ण लक्ष असे ।।८।।
त्यांच्या कृपेने सर्व ही । परिस्थिती ठीक होई ।
आपली पूजा उपासनाही । नित्य नियमे रहावी करीत ।।९।।
दृढ जशी निष्ठा होते । उत्तम अनुभव तेव्हा येते ।
परंतु म्हणणे चमत्कार त्याते । हे नाही सर्वथा उचित ।।१०।।
ही तर श्रीगुरुंची करुणा । प्रकट होई भक्तजना ।
त्याच्या संकट निवारणा । करिती श्रीगुरु कृपा ही ।।११।।
बिकट असता अर्थ-स्थिति । अकस्मात या भक्ताप्रति ।
ग्रासिले ज्वराने निगुति । उतार न पडे औषधांनी ।।१२।।
सायंकाळी चढे ज्वर । बहुत वाढे होई जसा उशीर ।
प्रात:काळा नंतर । कमी होई अनुक्रमे ।।१३।।
ऐसे असता आले एक दिनी । यांचे घरी अचानकपणी ।
श्री दत्तमहाराज वात्सल्यखाणी।भक्तास अपुल्या सांभाळण्या ।।१४।।

प्रकृति होती क्षीण । काही न ये समजून ।
काय बोलावे पुढे होऊन । स्वागत आता कैसे करू ।।१५।।
श्रीगुरु येती पटकन । बैसले येऊन झटकन ।
न करिता अनुमान । जीर्ण एका सतरंजीवर ।।१६।।
काही करण्याची संधी । भक्तास न मिळे तधी ।
चौपदरी आसन आणिले आधी।
विनविले श्रीगुरूंस स्वीकारण्या ।।१७।।
म्हणती महाराज तयासी । बरे नाही आपणासी ।
आपणच बसावे ऐसी । वाणी बोलले श्रीगुरु ।।१८।।
लांबचा करून प्रवास । श्री महाराज आले घरास ।
करून साऱ्या चौकशीस । सांत्वन केले भक्ताचे ।।१९।।
काळजी न करावी आपण । बोलती श्रीगुरु लक्ष्मीरमण ।
घोरात् कष्टात् चें पठण । करा म्हणून निरोपिती ।।२०।।
पुढे स्वमुखे श्रीगुरु । करिती स्तोत्राचा उच्चारु ।
संपूर्ण स्तोत्र सविस्तरु । म्हणून दाखविती तयासी ।।२१।।
नित्य उपासनेत भक्त । रोजच हे स्तोत्र म्हणत ।
श्रीगुरूंसही हें माहित । तरीही त्याची संथा दिधली ।।२२।।
पंचावन हजार पर्यंत । संख्या पाठाची होई निश्चित ।
तेव्हा बरे वाटेल त्वरित । रोग समस्त जाईल ।।२३।।
स्वये दत्तप्रभू आपण । स्वत:चे स्तोत्र म्हणून ।
मार्ग दाखविला भक्तास जाण । व्याधिमुक्त होण्यासाठी ।।२४।।
स्वत:हून येती घरास । आसनाची ही अपेक्षा नसे त्यांस ।
स्वत:हून सांगून उपासनेस । आश्वासन देती भक्तालागी ।।२५।।
ऐसी सद्गुरु कारुण्य मूर्ति । अहेतुकी कृपा भक्तावरती ।
सतत निरपेक्षपणे करिती । भाव जाणून शिष्याचा ।।२६।।
करिता उपासना त्वरित । व्याधि गेली समस्त ।
आश्चर्य नाही काही त्यात । सत्य संकल्प श्रीगुरूंचा ।।२७।।
याच काळात घरात । विपन्नता फार येत ।
नवीन वस्त्रे ही कित्येक दिवसांत । मुलांस घेतली नाहीत ।।२८।।

गहू शेर दोन शेर । असती मुश्किलीने, इतर ।
गोष्टींची असे वार्ता दूर । कसे बसे चालले दिवस त्यांचे ॥२९॥
अशात एके दिनी । कळले भक्ता लागुनी ।
मुक्कामास येणार श्रीगुरु आणि । भक्त इतरही येतील ॥३०॥
समवेत येतील शिष्य अनेक । तसेच दर्शनाचे इच्छुक ।
आसपासचे भक्त सकळिक । येतील प्रसादास ही सर्व ते ॥३१॥
दीड–दोनशे पर्यंत पाने । होतील ऐसे अंदाजाने ।
कळविता ऐसे घरी त्याने । संकट वाटले सर्वांसही ॥३२॥
परि पत्निची मिळाली साथ । जी ओढी संसाराचा रथ ।
जाऊनी तिच्या समवेत । केली काही तयारी ॥३३॥
गहू आणले करून सोय । इतर ही वस्तूंची तयारी होय ।
महत्प्रयासे, तरी मनी भय । कैसे होईल म्हणून सर्व ॥३४॥
ऐसे असता वर्तमान । सर्व भक्तांस ये कळून ।
श्रीगुरुंचे होईल आगमन । म्हणून सर्व येती याचे कडे ॥३५॥
ग्रामस्थ आणि इतरत्र भक्त । आले या भक्ताच्या घराप्रत ।
व्यवस्था स्वहस्ते घेऊनी करीत। तयारी सर्व ही कार्यक्रमाची ॥३६॥
काहीच नसता नियोजन । कार्यक्रम सर्व होई संपन्न ।
भरपूर झाले अन्नदान । पाद्यपूजा ही उत्तम झाली ॥३७॥
श्री गुरुचरित्रात ब्राम्हण । समाराधना करण्याचे विनवून ।
करिता भिक्षा श्रीगुरु आपण । अन्नदान प्रचंड करविले ॥३८॥
तीन माणसांचे भोजन । त्यात जेविले सकलजन ।
चार सहस्त्र पाने होऊन । मत्स्यादि प्राण्यांसीही जेवविले ॥३९॥
ही कथा ही तैसीच । संशय नाही मुळीच ।
लाज भक्ताची राखी तोच । असो, श्रीगुरु प्रसन्न झाले ॥४०॥
देऊन भक्तास आशिर्वचन । श्रीगुरु संतुष्ट होऊन ।
जाती पुढच्या ग्रामा लागुन । वाटे आश्चर्य भक्तासी ॥४१॥
एकुलता एक पुत्र यांचा । झाला मौंजीच्या वयाचा ।
महाराज बोलती मधुर वाचा । कारुण्य सिंधू श्रीगुरु ॥४२॥

श्री वासुदेव निवासात । मुंजीचे कार्य समस्त ।
करू, या तुम्ही पुण्याप्रत । निरोपिती ऐसे भक्तालागी ।।४३।।
हा भक्त श्रींस भीतभीत । परिस्थिती आपली सांगत ।
केवी करू मौंज म्हणत । गरीब असे मी म्हणे तो ।।४४।।
श्रीगुरू म्हणती हासोन । संस्कार महत्वाचे जाण ।
महाराजांसमोर होता मौंजीबंधन । कारण अक्षता पडण्याशी ।।४५।।
असे सांगून दिनांक । सांगती श्रीगुरू आणिक ।
दौरा संपून आम्हीही सकळिक । पुण्यास येऊ त्यावेळी ।।४६।।
महाराजांनी या मुहुर्तासि । व्यवस्थापकादि मंडळींस ।
पाठविले इतरत्र कार्यासि । मुद्यामच केले तैसे हो ।।४७।।
भिक्षावळीचे पदार्थ सारे । उपाध्याय विधि सांगणारे ।
ही सर्व तयारी परभारे । केली स्वत: श्रीगुरूंनी ।।४८।।
नैवेद्य करून पुरण-वरण। शास्त्रोक्त झाले मौंजीबंधन ।
ही मंडळी आणि महाराज आपण ।
अन्य कोणीही आश्रमात नसे ।।४९।।
काही अधिक खर्च न करिता । सर्व कार्य उत्तमरित्या ।
पार पडले ही निश्चिता । कृपा सर्वही महाराजांची ।।५०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
बेचाळीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ४३

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

एका निर्सगरम्य स्थानी । एका सेवक भक्तानी ।
केला आश्रम निर्माणी । सेवेस श्री दत्तमहाराजांच्या ।।१।।
श्रीगुरु तेथे जाती । अनेक वेळा मुक्काम करिती ।
यज्ञादि अनुष्ठाने तेथ होती । प्रवचनोपासनादि उपक्रम ।।२।।
एकदा श्रीगुरु तेथे असता । मागील अध्यायीच्या भक्ता ।
संधि मिळे राहण्या करिता । सेवा करी हर्षभरे ।।३।।
ऐसे असता अचानक । कळिले त्यासी वृत्त एक ।
परतताना श्रीगुरु आणिक । जातील याचे घरी आधी ।।४।।
यासी वाटला अभिमान । विशेष कृपापात्र आपण ।
ऐसा विचार करी ब्राम्हण । परी पुनः दुसरा विचार येई ।।५।।
आपल्या जवळ काय असे । का बरे श्रीगुरु येतील असे ।
म्हणोन धीर करून पुसे । श्रीगुरुंस तयेवेळी ।।६।।
सध्या नाही काही प्रसंग । माझा सेवेचा नाही अंग ।
योग्यता नाही माझी चांग । तरी काय हे सत्य असे? ।।७।।
श्रीगुरु आपण येणार । घरी माझे राहणार ।
हे सत्य कां हो निर्धार । निरोपावे मजसी हो ।।८।।
श्रीगुरु म्हणाले हसून । हो येऊ आम्ही! म्हणून ।
मग एकदम भान । वर्तमानाचे यासी आले ।।९।।
घरी नव्हती मंडळी । रजा ही नव्हती तयेवेळी ।
श्रीगुरु येणार सायंकाळी। कार्यालयातून परतण्याच्या समयास ।।१०।।
घरी येऊन कुलूप उघडणार । तोच श्रीगुरु पोचणार ।
मग तयारी कोण करणार । स्वागताची सारी ही ।।११।।
रजा पुढील घेण्यास । श्रीगुरु नाही म्हणती त्यास ।
हो नाही करता आधी दोन तास ।
येण्याची परवानगी मिळे त्यासी ।।१२।।

परी सद्गुरुंची योजना । आगळीच असते म्हणाना ।
कार्यालयातून येऊन विचारणा । करी पुढील तयारीची ।।१३।।
तोच एक भक्त दंपती । येती याच्या घराप्रती ।
येणार तेथ श्री गुरुमूर्ति । म्हणून आले दर्शना ।।१४।।
दोघे मिळून तयारी । स्वागताची केली सारी ।
वहिनी श्रीगुरुंस औक्षण करी । पातले ते घरामाजी ।।१५।।
झाले पूजा उपाहार । दोघेही झटती फार ।
व्यवस्थित पाडती पार । कार्यक्रम तो सारा ही ।।१६।।
भक्त हा मंत्रमुग्ध होऊन । कळसूत्री बाहुली प्रमाण ।
पाही सर्व नियोजन । अनाकलनीय करणी ही श्रींची ।।१७।।
असो, पुढे एके दिनी । श्रींची कृपा होऊनी ।
नोकरी मिळे तयालागुनी । कारखान्यात मोठ्या शहरातील ।।१८।।
त्यामुळे कष्ट प्रापंचिक । बरेच सांवरले आणिक ।
बरीच वर्षे राहून प्रामाणिक । चिकाटिने करी काम तेथे ।।१९।।
सज्जन जो राहे समाधानी । संतोष केवळ इच्छी मनी ।
विनाकारण तो दुर्जनी । पीडिला जाई ।।२०।।
रीत ऐसी जगामाजी । करिती धन्याची हांजी हांजी ।
रत जे राजकारणाच्या काजी । उगाच पीडती भक्ताला ।।२१।।
नवीन उत्पादनांसाठी संशोधन । करी हा भक्त सतत झटून ।
अल्प फलदायी कार्य म्हणून । करी प्रयत्न चिकाटीने ।।२२।।
तरी कार्यालयातील दुर्जन । मालकाचे भरून कान ।
याच्या कार्यांचे समाधान । घेती हिरावून नेहमीच ।।२३।।
प्रत्यक्षात याच्या कामामुळे । उत्पादन जे नवीन मिळे ।
त्याचेनि प्रभावे लक्ष्मी खेळे । मालकाच्या उद्योगात ।।२४।।
ऐशा प्रकारा कंटाळून । म्हणे नोकरी द्यावी सोडून ।
स्वबुध्दिचा वापर करून । कारखाना काढावा स्वत:चाच ।।२५।।
सहकाऱ्याने याचे मनोगत । सांगून टाकले मालकाप्रत ।
मालक तिरकसपणे विचारत। उत्पादन स्वत:चे करणार काय?।।२६।।
श्रींच्या कृपा प्रभावाने । उत्तर सडेतोड दिले याने ।
मालक प्रभावित झाला त्याने । निवळले प्रतिकूल वातावरण ।।२७।।

स्वत: पुढाकार घेऊन । सारे प्रयत्न करून ।
मदत करी या भक्तालागून । मालक, उद्योग सुरू करण्या ।।२८।।
इतकेच नव्हे या भक्तासी । सांगे मालक परियेसी ।
भरपूर नफा देणाऱ्या उत्पादनासी। करा तुमच्या कारखान्यांत ।।२९।।
जरी ते उत्पादन । होई मालकाच्या उद्योगातून ।
तरी तो म्हणे भक्तालागून । हें उत्पादन तुम्ही घ्या ।।३०।।
शासकीय प्रशासकीय प्रणालीतून । कागद पत्रे सारी मिळून ।
जाती काही वर्षे ही निघून । नवीन कारखाना उघडण्यास ।।३१।।
परंतु संकल्प होता गुरुंचा । कार्य करणे भक्ताचा ।
म्हणून अल्पावधीतच साचा । उघडला याचा कारखाना ।।३२।।
शासकीय कार्य बँकेचे काम । तसेच इतर संस्थांतील काम ।
कसलाच न घेता विराम । त्वरितच पूर्ण जाहली ।।३३।।
एक अधिकारी तेथे होता । त्याची सहानुभूति भक्तावर असता ।
कार्यालयीन प्रमुख म्हणून नेमिता । जाहला त्याच काळात ।।३४।।
या भक्ताचे कार्य झाले । आणि सहा दिवसातच भले ।
त्या अधिकाऱ्याचे स्थान बदले । इतरत्र रुजू जाहला तो ।।३५।।
अनुकूल झाली प्रतिकूल स्थिति । शत्रू-मित्र झाले निश्चिती ।
विरोधक ते सहाय्यक होती । सत्ता गुरुंची कार्य करता ।।३६।।
यात नसे आश्चर्य । भाविक भक्ताचे करण्या कार्य ।
धांव घेती गुरुवर्य । विघ्न कोणतेच न बाधे ।।३७।।
प्रसंग असाच एक । श्रीगुरु करिती कौतुक ।
शांत स्थितित बसता अनेक । ब्रम्हांडाचे चालनकर्ता ।।३८।।
भक्ताची जी चिंता । ती स्वत:ची मानून तत्वता ।
उपाय त्या समस्येवरता । सहज करिती विनासायास ।।३९।।
या भक्ताच्या कारखान्यांत । रासायन वेगळाले तयार होत ।
त्या करिता कर्मचाऱ्यांप्रत । हातमोजे विशिष्ट लागती ।।४०।।
अनेक प्रयत्न करून । तैसे हातमोजे न मिळती जाण ।
राहिली चिंता लागून । भक्ता प्रति तेधवा ।।४१।।
अशातच एके दिनी । जालन्यास येऊनी ।
सौ.ताईंचे दर्शन घेऊनी । परत जाई वाहनातून ।।४२।।

जरी कोणास ही न सांगे । तरी मनांत चिंता जागे ।
काय उपाय करावा वेगे । समस्येवर आपल्या ।।४३।।
तोच याचा सहप्रवासी । प्रश्न सहज करे यासी ।
नांव काय, कोणत्या व्यवसायासी । करिता तुम्ही सांगा हो ।।४४।।
सहज बोलण्याच्या ओघे । कारखान्याचा विषय निघे ।
प्रवासात बोलती दोघे । पुसे भक्तास प्रश्न एक ।।४५।।
तुमच्या या कारखान्यांत । विशिष्ट हातमोजे असतील लागत ।
मी नोकरी करून व्यवसाय करत । हातमोजे तयार करतो मी ।।४६।।
मुंबापुरीत तुम्हासी । पुरवितो हातमोज्यांसी ।
काळजी दर्ज्याची नसावी मानसी । योग्य दरात देईन ।।४७।।
पुढील आठवड्यात त्यानी । पुरी केली समस्त मागणी ।
आणि पुढेही सातत्यानी । हातमोजे पुरवित राहिला ।।४८।।
असेच एक खरेदीदार । मोठ्या रकमेचा देनदार ।
परंतु टाळिले अनेक वार । भक्ताचे पैसे देण्यास ।।४९।।
ड्राफ्ट दिला करून । परि पैसे येता खात्यातून ।
हातोहात घेई काढून । साठू न देई खात्यात पैसे ।।५०।।
बँकेचा जो मॅनेजर । त्यास लक्षात येई प्रकार ।
खरेदीदाराच्या खात्यावर । एकदा चेक मोठा येई ।।५१।।
तेव्हा मॅनेजर हे पाही । त्यास गरज नसता काही ।
भक्ताच्या नांवे चलन करून त्याही ।
पैसे वळविले भक्त खात्यात ।।५२।।
स्वत:च्याच कृत्याचे । त्यास आश्चर्य होई साचे ।
काय तणावि इतरांचे । ही कृपा केवळ महाराजांची ।।५३।।
भक्तपाळक गोविंद । भक्तवत्सल त्याचे बिरुद ।
अनन्य शरणागतास शरणद । भाववशे भक्ताधीन ।।५४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्रेचाळीसावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ४४

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

मागील अध्यायीचा भक्त । त्याचीच कथा रसभरित ।
हा अध्याय आहे सांगत । श्रोते व्हावे सावधान ।।१।।
या भक्ताच्या कारखान्यात । एक महत्वाचे यंत्र असत ।
सर्वही कामाची सुरूवात । होत या यंत्रापासूनच ।।२।।
हे यंत्र नवीन बसविले । परि एक विघ्न उद्‌भवले ।
नित्य हे यंत्र बिघडू लागले । या ना त्या कारणा वरून ।।३।।
कधी एक भाग जाई जळून । कधी दुसरा तुटे झिजून ।
कार्य बंद होई मग अनेक दिन । यंत्र दुरूस्ती पर्यंत ।।४।।
येणे हा भक्त । होई त्रस्त अत्यंत ।
पत्नि ही काही त्यात । टाकून बोले तयासी ।।५।।
एवढी करिता उपासना । जप-पूजा आराधना ।
मग त्या देवाच्या मना । संकट निवारण तुमचे न येई ।।६।।
क्षणभर यालाही वाटे । संकट सतत मजसी गाठे ।
कधी हे दुर्दैव कटे । कधी कृपा श्रींची होई ।।७।।
काही काळ असाच जाता । पू.सौ.ताईंच्या दर्शनास जाता ।
गुरु रुपांत ठेऊन अभिन्नता । अडचण त्यांसी कथे तो ।।८।।
पू.ताईंचे त्यावर । असे येई उत्तर ।
अहो! त्या यंत्रासमोर । नारळ एक फोडा तुम्ही ।।९।।
आणिक सांगावे पुढे काय । ऐसा करिता सहज उपाय ।
काळ कितीतरी लोटून जाय । काहीच त्रास यंत्र न देई ।।१०।।
साध्या संकेतावरून । केले मोठे मार्गदर्शन ।
भक्ताची समस्या निवारण । करून केले उपकृत ।।११।।
मागील एका अध्यायी । या भक्ताचे अहित पाही ।
निष्कारणच छळी त्याही । कार्यालयात सतत जो ।।१२।।
या भक्ताच्या मनांत । द्वेष तयासाठी यत्किंचित ।
नव्हता, म्हणे प्रारब्धगत । घटना सर्व घडताती ।।१३।।

त्या त्रास देणाऱ्यास । हा भक्त विसरे खास ।
परी एक वृत्त त्यास । मागाहून समजले ।।१४।।
त्या छळणाऱ्या व्यक्तिस । रोग जाहला दुर्धर खास ।
नोकरी सोडून बहुत काळास । बसावे घरी लागले ।।१५।।
भक्तास पीडणाऱ्या व्यक्तिला । दैव रोष सहावा लागला ।
श्रींच्या रोषास पात्र झाला । कर्मविपाक हे गहन ।।१६।।
काय जाणावे यावरून । कोणाशीही वागताना सावधान ।
भक्तापाशी वागावे सावरून । वाईट कोणाचे चिंतू नये ।।१७।।
भक्ताने जे गूण । गुरुंचे पाहिले आपण ।
ते सांगी त्याचे वर्णन । सावध चित्ते ऐकावे ।।१८।।
एकदा एका ठिकाणी । मुक्काम केला श्रीगुरुंनी ।
भक्त होता सन्निधानी । बैसले उभयता खोलीत ।।१९।।
खिडकीला होती जाळी । आत त्या खिडकी जवळी ।
पात्र एक भरलेले फळी । महाराजांजवळी ठेविले ।।२०।।
इतुक्यात काय झाले । एक माकड तेथे आले ।
बाहेरून जाळी उचले । हात घाली फळांवर ।।२१।।
फळ घेऊन खाई वानर । दिसती त्यास दोघे नर ।
पाही त्यांकडे तो, गुरुवर । प्रेमे बोलती तयासी हो ।।२२।।
घ्या,घ्या म्हणती महाराज । घ्या, खा हो वानरराज ।
हळूच मृदु आवाज । बोलती त्या माकडासी ।।२३।।
त्यांच्या कृपा दृष्टीत । नर-पशू हा भेद नसत ।
प्राणीमात्रा विषयी ठेवित । जिव्हाळा दयाघन हृदयांत ।।२४।।
एकदा श्री वासुदेव निवासात । माडीवरच्या खोलीत ।
बैसले महाराज शांत चित्त । दृष्टी स्वतःच्या हातांवरी ।।२५।।
पाठीमागे गुळवणी महाराजांचा । फेटा घातलेला फोटो साचा ।
तेवढ्यात प्रवेश एका भक्ताचा । जाहला त्या खोलीत ।।२६।।
एक भक्त बैसला श्रीं जवळी । तो ही घटना तये वेळी ।
पाही, आलेला भक्त तये वेळी । हातात धरिला हार एक ।।२७।।
तो भरगच्च असे हार । सुगंध सुटे त्याचा फार ।
गुळवणी महाराजांच्या फोटोवर । घाली हार भक्त जाई ।।२८।।

श्रीगुरु उठले अकस्मात । गेले त्या फोटो प्रत ।
हार काढून घेतला त्वरित । कारण त्याचे काय होते ॥२९॥
हार होता आखुड अती । येई तो नेत्रांवरती ।
काढुन त्यासी नीट करिती । फोटोस बसेल व्यवस्थित ऐसा ॥३०॥
दोरा लांबवून फुले नीट करून । फोटोस परत हार घालुन ।
परत बैसले येऊन । स्वासनावरी शांतपणे ॥३१॥
साध्या कृतीतून कितीतरी । गोष्टी शिकविती आपणांतरी ।
एक आश्चर्य या घटने भीतरी । आहे ते आकळले ॥३२॥
पाठमोरे असता आपण । कैसे कळले महाराजांस जाण ।
हार नीट नाही म्हणून । सर्वज्ञता हेच उत्तर यासी ॥३३॥
ऐसे असता कधीही । देहास जपले नाही ।
स्थितप्रज्ञपणे पाही । मानापमान क्लेश कपट ॥३४॥
संपूर्णपणे श्रीगुरुंनी केले । त्या कार्यांचे कर्तृत्व भले ।
आहे म्हणूनी आपुले । अभिमानात वावरती कित्येक ॥३५॥
गुरुंसी बोलती उणे-अधिक । न ठेविती त्यांचा धाक ।
असे करा असे करू नका आणिक।सांगण्याचे करिती धाडस ॥३६॥
'महाराज-येथ बसा', म्हणती । श्रीगुरु बैसती शांत चित्ती ।
'येथे जावयाचे', 'चला' म्हणती । देह चालविती ईशेच्छेने ॥३७॥
साक्षी भावे सर्वही । समर्थ योगी तो पाही ।
क्रोध किंवा तक्रार नाही । निंदा तर कधी नाहीच ॥३८॥
कैसे असावे आचरण । कसे वागावे अनुदिन ।
हे स्वतः आचरुन । दाखविले आम्हासी ॥३९॥
यातून जो बोध घेई । तो भवसागर तरून जाई ।
संशय यात काहीच नाही । त्रिवार सत्य बोल हे ॥४०॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
चव्वेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

श्री दत्तमहात्म्य ग्रंथात । चोवीस गुरुंची गाथा विशद ।
मोठे महाराज विवेचन करीत । गुरु केले दत्तात्रेयांनी ॥१॥
या चोवीस गुरुं मधून । काही ग्राह्य गुण म्हणून ।
हेयोपादेय विवेके करून । ग्राह्य ते घेतले भगवंतांनी ॥२॥
काही त्यातील गुरु आणिक । "त्यागार्थ" ही केले सम्यक ।
अयोग्य जे गुण सकळिक । त्यजिण्यास त्यांना हे गुरु ॥३॥
त्याचे काही उदाहरण । मासा आणि हरिण ।
हत्ती तसेच कुमारी कंकण । अभ्यासून चरित्र यांचे ॥४॥
रस जिंकण्यास मासा गुरु । ग्राम्य-गीत-नाद मनोहरु ।
तो सोडण्यास हरिण गुरु । हत्ती गुरु काम त्यागार्थ ॥५॥
म्हणे अनेकांचा संग केला । त्याने साधनेत विघ्न पडला ।
त्या करिता राहिलो एकला । कुमारी कंकणापासून हे शिकलो ॥६॥
एक आहे महाराजांचा भक्त । त्याचे पुढील आत्मकथित ।
त्यागार्थ गुरु निश्चित । करावे मजसी म्हणे तो ॥७॥
दीक्षा मिळे आई-वडिलांस । होते बाल्यावस्थेत ।
महाराजांना प्रार्थिले दीक्षेस । देती अनुग्रह श्रीगुरु ॥८॥
वय यांचे लहान । यांचे बुध्दिस अनुलक्षून ।
करिती महाराज संभाषण । मृदू हलके फुलकेच ॥९॥
दीक्षा होणे हे काय । श्री गुरुकृपा केवी होय ।
योग, साधनेचे माहात्म्य । न कळले बहुकाल पर्यंत ॥१०॥
असे जाता आयुष्य बहुत । महाराज यांसी निरोपित ।
कार्यक्रम जे आश्रमांत । होतात यावे त्यासाठी ॥११॥
भेट जेव्हा जेव्हा होई । श्रीगुरु सांगती लवलाही ।
आवर्जून येण्यास त्याही । सांगती पुढील कार्यक्रम ॥१२॥

परंतु बुद्धि कैसी असे । गुरू सांगताही वाटत नसे ।
कार्यक्रमास-दर्शनास जावे असे । अर्धाधिक वय गेले तैसेची ॥१३॥
अशातच मुंबई प्रांतात । काम एक यांस मिळत ।
लोकलने करावा लागत । प्रवास नित्याचा ॥१४॥
वेळ कारणी लागावा । इतरांच्या बोलण्याचा त्रास न व्हावा ।
णोन घेतले प्रवासात तेधवा । श्री दत्तमहाराजांचे पुस्तक ॥१५॥
भक्तांचे अनुभव होते त्यात । म्हणे वाचू प्रवासात ।
दोनच पाने वाचत । त्याबरोबरच एक नवल घडे ॥१६॥
साधनेतील क्रियांचा आवेग । होई आनंद अव्यंग ।
पुलकित झाले सर्वांग । प्रचीती वेगळीच येता ॥१७॥
नुसते घेतले हातात । त्याचे हे फळ होत ।
म्हणोन सर्वच अव्याहत । वाचून ते काढले ॥१८॥
वाचन जे झाले त्यातून । आणि श्री शक्तिने आतून ।
आले सर्व समजून । महाराज आपले आहेत काय ॥१९॥
माहात्म्य त्यांचे असे काय । दीक्षा म्हणजे कृपा होय ।
दर्शन-साधनेचे माहात्म्य । उमगले ते आतूनच ॥२०॥
परंतु उपयोग त्याचा आता । श्रीगुरूंनी सगुण रूप लपविता ।
काय फायदा समजून येता । दु:ख वाटे भक्तास ॥२१॥
तीन चतुर्थांश वयमान । वाया गेले साधने वाचून ।
नायकले गुरूंचे वचन । पश्चाताप होतसे ॥२२॥
म्हणे सर्वांस हा भक्त । आपले गुरू महान निश्चित ।
बुद्धिने जरी न समजत । तरी निरोपिलेले आचरावे ॥२३॥
आज्ञा प्रमाण मानून । करावे तसे आचरण ।
स्वत: कृपा करून । तारितील ऐसे महाराज ॥२४॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंचेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरूचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

चिखलातून उमले कमळ । सुंदर तो असे विमल ।
कावळ्याचे पडले मल । अश्वत्थ तयातून उगवले ॥१॥
उदाहरण दोन सुरेख । एक तत्व सामायिक ।
कंद तो कमळाचा आणिक । बीज अश्वत्थाचे ते असे ॥२॥
एका भक्ताची कथा ही । जमेची बाब जी काही ।
महाराजांनी म्हटले आपले त्याही । त्यानेच 'पंकज' तो झाला ॥३॥
अतिशय प्रतिकूल वातावरण । परी महाराजांनी कृपा करून ।
घडविले आमूल परिवर्तन । ही कथा त्याची सुरस ॥४॥
आज पाहता त्या भक्तास । "हाच का तो?" वाटे साऱ्यांस ।
लीला कशी जसा 'परिस' । सोने केले आयुष्याचे ॥५॥
मोठा याचा परिवार । प्रेमळ सारे सान थोर ।
एकत्र राहून पाडती पार । कुलधर्म कार्य सर्वही ॥६॥
या परिवारातील काही जण । दत्तमहाराजांचे भक्तगण ।
घेती त्यांचे मार्गदर्शन । प्रसंग असो कोणताही ॥७॥
श्रीकृपेने आपले कल्याण । अशी दृढ निष्ठा त्यांची म्हणून ।
गुरु आज्ञेप्रमाणे आचरण । करिती सदस्य या परिवाराचे ॥८॥
काही जण संसार प्रवाहात । जाती जरी विरुद्ध दिशेत ।
तरी हे सर्व स्नेह बंधनात । बांधून परिवार होई तो ॥९॥
परंतु माझेच खरे म्हणून । नसे वृथा अभिमान ।
ज्यासी जे पटेल तैसे आचरण । करितात ऐसी माणसे ॥१०॥
कुळपरंपरेनुसार । घरांत चाले मांसाहार ।
परंतु श्री भक्तांनी सविचार । त्याज्य तो केला असे ॥११॥
सामिष भोजना बरोबर । मद्यादि दुर्व्यसने दुर्निवार ।
तंबाखू आदि व्यसन विकार । जडती हळूहळू नकळत ॥१२॥

सदर भक्त ही त्यातून । नसे अपवाद म्हणून ।
परिवारातील भक्तांच्या आग्रहावरून।दर्शनास येई महाराजांच्या॥१३॥
तेव्हा शाळकरी विद्यार्थी असे । गुरुकृपा वगैरे कळत नसे ।
खाऊ साठी महाराज देती पैसे । त्याने आणावे चॉकलेट ॥१४॥
प्रसाद हा ठेवावा जपून । न ये हे त्यास कळून ।
सुरू असता याचे शिक्षण । अडसर त्यात काही येई ॥१५॥
बारावीची परीक्षा हुकली । शिक्षणाची इतिश्री झाली ।
व्यसनाधीनता बळावली । वृत्ति होई चंचल ॥१६॥
नोकरी व्यवसायाचे प्रयत्न । जाती विफल होऊन ।
एकदा पुण्याजवळ नोकरी लागून । राही तो त्या गावास ॥१७॥
आप्तांच्या आग्रहावरून । येई दर्शनालागुन ।
परिस्थिती दिली सांगून । महाराजांसी सर्वही ॥१८॥
महाराज निरोपिती त्यासी । वाचावे दत्तमाहात्म्यासी ।
अपवित्र वातावरण परियेसी । म्हणे प्रतिकूलता वाचनास ॥१९॥
म्हणती महाराज असे जरी । आपल्यापुरती शुद्धता करी ।
निदान एक अध्याय तरी । वाचावा एकांती नियमाने ॥२०॥
असे ही सांगत असत । महाराज आपल्या भक्तांप्रत ।
संकटी सापडता अवचित । मनांत शंका उत्पन्न होई ॥२१॥
अशा वेळी करावे काय । न समजे तेव्हा उपाय ।
फार सोपा गुरुराय । सांगती तो ऐकावा ॥२२॥
पोथी नित्य वाचनातील । न पाहता उघडा एक वेळ ।
जे पान समोर येईल।त्यावरील मजकूर शंका निरसन करी ॥२३॥
असो, एकदा गाडी चालक म्हणून यास । काकांनी नेले पुण्यास ।
प.पू.सौ.ताईंचे ही दर्शनास । जाई त्यावेळी हा भक्त ॥२४॥
त्यांनी ही काही उपदेशून । जालन्यास यावे म्हणून ।
निरोपिले या भक्तालागून । जप करण्यास सांगितले ॥२५॥
वरचेवर जाई जालन्यास । ठेवविले मुक्कामास ।
ताईंने या भक्तास । जाई रेणुका निवासी पण ॥२६॥

या सर्व यात्रेत । ड्रायव्हरची ड्यूटी करत ।
सतत मनासी जाणवत । लक्ष आपणाकडे श्रीगुरूंचे ॥२७॥
पुढे एका क्षेत्रात । तसेच जालन्याच्या आश्रमात ।
काही सेवा कार्यात । गुंतवी यास माउली ॥२८॥
याचा होऊन सुपरिणाम । काही प्रयत्न न करता सुगम ।
दुर्व्यसनांचे बहिर्गम । होऊन शुद्ध जाहला ॥२९॥
सुरा असे समोर । पात्र न जाई ओठांवर ।
सामिष पूर्वी वाटे रुचिर । ग्रास न त्याचा घेववे ॥३०॥
श्री कृपेने आपोआप । बदल घडला अमाप ।
जो होता जीवनास शाप । बदलून वरदान जाहले ॥३१॥
दुरितांचा क्षय जाहला । ताईंनी योजिले विवाहाला ।
शोधून योग्य मुलीला । चतुर्भुज केले तयासी ॥३२॥
उभयतांस देऊन सेवा । संसार शिव केला तेधवा ।
अश्वत्थ बीजाचा वृक्ष व्हावा । कमळ उमलावा त्यापरी ॥३३॥
प्रपंच आणि परमार्थ । जोडिला खरा स्वार्थ ।
ही कृपा भक्तोद्धारार्थ । दत्तमहाराजांची केवळ ॥३४॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
सेहेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४७

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

सामान्य स्वतःस दावून । दिव्यत्व घेती झाकून ।
ऐसे दत्त महाराज आपण। शिंपल्यांत मोती झाकिले जेवी ॥१॥
पारख जाणे मोतिया । पटल शिंपल्याचे उघडोनिया ।
मोत्याची तेजस्वी काया । प्रकट करी लोकांप्रती ॥२॥
तैसेच महत् पुरुषांनी । महाराजांचा बहुमान करोनी ।
त्यांचे दिव्य रूप दाखवूनी । दिले आपणांस सत्यत्वे ॥३॥
श्री क्षेत्र वाराणसीला । आमंत्रित केले चर्चेला ।
अनेक विद्वान महापंडितांला । वाराणसी विद्यापीठात ॥४॥
श्री शंकराचार्य आयोजक । वेदान्त हा विषय आणिक ।
चर्चासत्रात सम्मिलित अनेक । भारत भरातील शास्त्रीगण ॥५॥
प्रथम पारितोषिकाचे अधिकारी । श्री दत्तमहाराज झाले त्यावरी ।
शंकराचार्य हे शब्द उच्चारी । दक्षिणेत प्रथमच जाई पुरस्कार ॥६॥
महाराजांचा केला बहुमान । शाल-पगडी-वस्त्रे देऊन ।
दिले बहुमूल्य सुवर्ण कंकण । दहा तोळ्यांचे तये वेळी ॥७॥
आचार्यांस करून वंदन । महाराज करिती भाषण ।
मातापिता गुरुंनी केले मार्गदर्शन । अंशतः त्याचे सार्थक झाले ॥८॥
विद्याध्ययनांत जे विद्यार्थी । रत या विद्यापीठात तयांप्रती ।
या कंकणाचा विनियोग व्हावा निश्चिती ।
ऐसे बोलून कंकण ठेविले॥९॥
श्री महाराज पुढे गहिवरोन । बोलले ऐसे वचन ।
मी असे अकिंचन । यांत भर न घालू शके ॥१०॥
श्री शंकराचार्य करिती समारोप । म्हणती मी विद्वान पाहिले अमाप ।
परि ऐसी विनम्रता निकोप । ऐसी निरहंकारिता न देखिली ॥११॥
आग्रहे पुनः कंकण । केले महाराजांस प्रदान ।
तुष्ट होऊन पुढील वचन । शंकराचार्य बोलिले ॥१२॥

तपःपूतम् परंपूज्यं वन्दे दत्तं कवीश्वरम् ।
विनम्रता पराकाष्ठा । वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥
निरहंकारं अलंकारं वन्दे दत्तं कवीश्वरम् ।
वेदवेदांग पारङ्गं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥१३॥
हा प्रसंग कोणाप्रत । महाराज स्वतः न सांगत ।
मागाहून हे वृत्त कळत । श्री गुळवणी महाराजांसी ॥१४॥
श्री वासुदेव निवासात । सत्कारिले तयांप्रत ।
अमानित्व त्यांच्या स्वभावात । पूर्णपणे भिनलेले ॥१५॥
असेच श्रींचे दिव्यरूप । प्रगट केले आपोआप ।
त्यांस देऊन आदर अमाप । डोंगरे महाराजांनी बार्शीत ॥१६॥
एकदा सप्ताह भागवताचा । बार्शीत डोंगरे महाराजांचा ।
उत्साह वाटे जनांत त्याचा । तयारी अपूर्व केली असे ॥१७॥
या सप्ताहाचे निमंत्रण । डोंगरे महाराज देती स्वतःहून ।
म्हणती एक दिवस तरी आपण । यावे श्री दत्तमहाराज ॥१८॥
दत्तमहाराज ते स्वीकारिती । येण्याचा दिवसही कळविती ।
गणपती मंदिरात उतरिती । तयेवेळी महाराज ॥१९॥
त्या भागवत सप्ताहाला । प्रचंड जनसमूह लोटला ।
दत्तमहाराजांनी निरोप पाठविला । येतो आम्ही म्हणोन ॥२०॥
प्रातः आन्हिक आटोपून । निघाले महाराज आपण ।
तेवढ्यात त्या स्थानालागुन । स्वतः आले डोंगरे महाराज ॥२१॥
हे कळता सामोरी । गेले श्री दत्तमहाराज त्यावरी ।
येताच साष्टांग दंडवत नमस्कारी । स्वतः डोंगरे महाराज ॥२२॥
महदाश्चर्य वाटे सर्वांना । दत्तमहाराज स्वये नमस्कारिताना ।
त्यांचे हात धरून वंदना । परत केली डोंगरेजींनी ॥२३॥
नम्रपणे विनविती दत्तात्रेयांस । आम्ही जातो मंडपास ।
आपण ही यावे या समयास । सप्ताह स्थानी श्रीगुरु ॥२४॥
काही कालांतरे महाराज । जाता, श्री डोंगरे महाराज ।
लेऊन नम्रतेचा साज । पीठावरून उतरून सामोरे येती ॥२५॥

दत्तमहाराजांस घेऊन । आले मंचावर आपण ।
जयजयकार करिती सकलजन । दोघांचा ही तेधवा ॥२६॥
व्यासपीठावर बसण्यास । विनविती दत्तमहाराजांस ।
महाराज म्हणती त्यांस । आपण येथे सांगता भागवत ॥२७॥
आपण 'शुक' असून । बैसावे पीठालागून ।
डोंगरेजी म्हणती वंदून । प्रत्यक्ष व्यास आपण आहात ॥२८॥
तरी आपल्या समोर । मी न बसेन पीठावर ।
दुसरे व्यासपीठ मंचावर । ठेविती व्यवस्थापक ॥२९॥
यावर डोंगरे महाराज । म्हणती येथे दत्तमहाराज ।
उपस्थित असता आज । तेच पीठावर बसतील ॥३०॥
एका मंचावर पीठ दोन । ते नसती कधी म्हणोन ।
दत्तमहाराजांनी व्हावे विराजमान ।
पीठावर, चरणांपाशी बसेन मी ॥३१॥
असे अद्‌भुत आचरण । करून दाविती दिव्यत्व जाण ।
श्री दत्तमहाराजांचे देवपण । प्रगट करिती संत पुरुष ॥३२॥
बालवयापासून । पाहिले महाराजांस म्हणून ।
बार्शीकरांस आपणहून । न दिसे ते दाविले कौतुक ॥३३॥

श्री सुंदरदत्त चरिते
सत्तेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

रेणुका निवासात । महाराज आईसाहेब रूपात ।
माता पिता जगाचे विलसत । माहेर भक्तांचे ते असे ॥१॥
संसार ज्वाळेत होरपळून । अनेक विसंगतींना कंटाळून ।
भांबावलेल्या मनस्थितीतून । निघती जाण्या दर्शनास ॥२॥
वाटेत करिती विचार । श्रीगुरूंस सविस्तर ।
हे-हे सर्व पुसणार । आपण गेल्यावरी गुरुगृही ॥३॥
ऐसा मानस करून । येती भक्त दुरून ।
फाटक उघडिता तत्क्षण । दिव्य शांतता जाणवे ॥४॥
आपोआप विचलित मन । पूर्ण शांत होऊन ।
तेथील दिव्यत्व सेवून । राहे होऊन आनंदित ॥५॥
सर्व विमनस्कता जाऊन । राहे प्रसन्नता भरून ।
श्रीगुरूंचे घेता दर्शन । सुख आगळे होतसे ॥६॥
शांत गंभीर मुद्रा । शोभे महाराजांची अभयदा ।
लावी मनास वेगळीच तंद्रा । नेत्र खिळती तेजावर ॥७॥
सौ.आईसाहेबांचे दर्शन होता । शब्द उभयतांचे कानी पडता ।
सर्व शीण पळोन जाई तत्वतां । संजीवनी मिळे चैतन्याची ॥८॥
दर्शन प्रसाद घेऊन । परतीस निघता आपण ।
आश्चर्य करी मनोमन । भक्त स्वतःत्रीच ॥९॥
जे होते ठरविले । ते विचारायचे राहिले ।
ऐसे कैसे जाहले । ही धन्यता श्रीगुरूंची ॥१०॥
अशा सर्व भक्तांस । मनी वाटे विश्वास ।
सांभाळितात आपणांस । महाराज स्वयेची ॥११॥
कर्मकांड नाही प्रदर्शन । उगाचचे बडेजावपण ।
सर्वांसि वाटती आपलेच म्हणून । धीर मिळे दर्शनाने ॥१२॥

दिसती शांत बैसले । परि अंतरंग करून शांत आपले ।
मानसिक समाधान दिधले । हे सर्वांनाच जाणवे ॥१३॥
सांसारिक अडचणीतून । बाहेर भक्तास काढून ।
जोडी भजना लागून । शक्तिपाते उद्धरी ॥१४॥
या साठी शास्त्रीय उपाय । सांगे भक्ता गुरुमाय ।
तुमचे कुलदैवत काय । उपासना त्याची करा म्हणे ॥१५॥
काही स्तोत्रादिक म्हणून । किंवा प्रश्नावली बघून ।
सांगती करण्या त्यातून । उपासनादिक भक्तांस ॥१६॥
निवारण होता संकट । आनंद वाटे उत्कट ।
माउलीसी म्हणती स्पष्ट । आपण सोडविले आम्हासी ॥१७॥
यावर बोलती हासून । उपासनादिक केले म्हणून ।
देवानी तारिले संकटातून । नामानिराळे पुन: स्वत: ॥१८॥
कोणाचा टाळिला अपघात । कोणास वाचविले त्यात ।
कोणाचे कार्यालयीन संकट । दवडून अभय देवविले ॥१९॥
नुसते आध्यात्मिक प्रवचन । नसे तर कर्तव्यास अनुलक्षून ।
करावे दक्ष व्यवहार म्हणून । सांगती सर्वांस श्रीगुरु ॥२०॥
विद्यार्थी वर्गाने अध्ययन । नोकरदाराने कर्तव्य करून ।
व्यावसायिकाने इष्ट कर्म करून । असावे देवचरणी रत ॥२१॥
हेच त्यांचे सांगणे । कर्तव्यास धरून चालणे ।
सर्व सोडून येथे येणे । योग्य नसे भक्तांसी ॥२२॥
सर्व करून अनुसंधान । न चुकवावे कधीच आपण ।
श्रध्देने गुरुदत्त मंत्र जपून । बैठक करावी एकाग्र चित्ते ॥२३॥
सर्व व्यवहारात जसे । तटस्थपणे रहावे तसे ।
तटस्थपणे विशेषे । पहावे साधनेतील क्रियांस ॥२४॥
सर्व अंतर अनुभव । देतो आपणांस देव ।
टाकावा भार सर्वथैव । त्यावर उद्धाराचा आपल्या ॥२५॥
करिती महाराज प्रवचन । मंचावरून समाज प्रबोधन ।
परी प्रत्येकाचे मन । म्हणे बोलती ते आपणाशी ॥२६॥

आपल्यास बघून । बोलती मधुर वचन ।
आपले मार्गदर्शन । करती वाटे प्रत्येकास ॥२७॥
म्हणती भक्तांस महाराज । दिवसभरांत काय केले काज ।
प्रातःकाळापासून मी आज । ते स्मरावे शय्येवर बसून ॥२८॥
ते कर्म सर्वही । असो चांगले वाईट काही ।
समर्पावे ईश्वराही । संबंध राही न तयांशी मग ॥२९॥
असे हा सोपा उपाय । टळती याने पुढील अपाय ।
अशी सांभाळी गुरुमाय । परोपरीने लेकरांस ॥३०॥
एक घटनेच्या निमित्ताने । सांगितले श्रीगुरुंने ।
आलेल्या अतिथीस न दवडणे । माध्यान्ह समयी कधीच ॥३१॥
एका आश्रमाची मुख्य द्वारे । बंद राहती दुपारभरे ।
जेवून विश्रांतीस जाती बरे । सेवकगण सारेही ॥३२॥
सायंकाळचे समयास । उघडण्या जाती मुख्य द्वारांस ।
तो ते न उघडती, बहु सायास । चालविला तयासाठी ॥३३॥
परी ती न उघडिली । दारे जी बंद पडली ।
श्रीगुरुंच्या कानावर घातली । बातमी सेवके तेधवां ॥३४॥
महाराज विचारिती तयांस । आज दुपारचे समयास ।
दिले नाही भोजनांस । अतिथी गेला तसाच काय? ॥३५॥
चौकशी अंती कळले असे । वर्तमान जाहलेसे ।
श्री दत्तमहाराज बोलिले तसे । न जेविता अतिथी गेला ॥३६॥
मग सर्वही संबंधितांस । सांगितले क्षमा मागण्यास ।
देवाजवळ जावून प्रार्थनेस । करिता तैसे, उघडली दारे ॥३७॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्ठेचाळीसावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ४९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

महापुरुषाचे भूषण । निरहंकार असणे जाण ।
संपूर्ण अमानित्वाची खूण । चरित्र दत्त महाराजांचे ॥१॥
एकदा महाराज दौऱ्यावर । असता, एक भक्त वर ।
रेणुका निवासात सुंदर । शोकेस बसविते जाहले ॥२॥
हॉलमधे देवघराच्या । भिंतीवर देवासमोरच्या ।
भव्य शोकेस लावुनी त्याच्या । आत ठेविली सन्मानपत्रे ॥३॥
महाराजांस जी मिळाली । मानपत्रे वेळोवेळी ।
त्यांची रचना करून आगळी । मांडली सर्व तयांत ॥४॥
परत येता महाराज । कौतुके दाखवी साज ।
एक कटाक्ष टाकुनी नाराज । होऊन पाठ फिरविली ॥५॥
जाता आपल्या खोलीत । महाराज पूर्ण अलिप्त ।
कशाला हे केले म्हणत । बोलून दाखविती पुढील ओवी ॥६॥
"पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।
हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ॥७॥" (ज्ञानेश्वरी)
हे अमानित्वाचे उदाहरण । अशीच घटना श्रोतेजन ।
पुढे ती ऐका प्रेमे करून । दाखवी गुण श्रीं चे ती ॥८॥
महाराजांची विद्यार्थिनी । एकमेव शिकली त्यांकडुनी ।
टिळक महाराष्ट्र विद्यापीठातुनी । वेदान्त कोविद जाहली ॥९॥
वेदशास्त्रोत्तेजक संस्थेची । परीक्षा तीस द्यावयाची ।
त्यासाठी "भामती" शिकायची । संधी मिळाली महाराजांकडून ॥१०॥
त्यावेळी नारायण पेठेत । श्री महाराज होते राहत ।
भागवत सप्ताहास जात । अनेक वेळी परगावी ॥११॥
तेव्हा पाठ न होई । ते सांगण्यास स्वतःही ।
अनवाणी येत पायी । घरी आपल्या शिष्येच्या ॥१२॥

या विद्यार्थिनीच्या घरी । शनिवार पेठेत सदनिकेवरी ।
पाद्यपूजा समारंभ करी । श्री गुळवणी महाराजांचा ॥१३॥
दत्तमहाराजांना केले उत्तराधिकारी । त्यानंतरची ही घटना खरी ।
या पाद्यपूजा समारंभांतरी । गुरु सन्निध असावे तर ॥१४॥
तेथे नव्हते कवीश्वर । गर्दी होती तेथे फार ।
आत्मानंदात निमग्न स्थिर । कोठे बैसले महाराज ॥१५॥
दारांत चपलांच्या ढिगाजवळी । बैसले महाराज तयेवेळी ।
अनहंकार मूर्ति चंद्रमौळी । ऐसे दत्तमहाराज ॥१६॥
शंकरदयाळ शर्मा, राष्ट्रपती । स्वहस्ते पुण्यात सत्कार करिती ।
या समारंभाचे कौतुक किती । होते सर्वांना तेधवा ॥१७॥
मोठ्या सूनबाईंनी त्यावेळी । नवीन धोतरजोड भिजविली ।
चार दिवस अगोदरच भली । दिली नेसावयास त्या दिनी ॥१८॥
कोरं नेसणार नाहीत । म्हणोन ही खटपट करीत ।
परी नवे धोतर देखत । बोलले महाराज तयेवेळी ॥१९॥
जुने धोतर नेसल्यास । आंत न घेतील का आम्हास ।
रोजचे तेच खरे खास । ही भूमिका श्रींची असे ॥२०॥
असो एकदा मलकापूरला । भागवत सप्ताह योजिला ।
संहिता वाचन करण्याला । गुरुजी एक बैसती ॥२१॥
दर्शनार्थी भक्त मंडळी । संहिता वाचनाचे वेळी ।
दक्षिणा ठेवी ग्रंथाजवळी । ती तशीच राहे तेथे ॥२२॥
महाराज बैसती त्या स्थानी । करण्या निरुपण म्हणोनी ।
सह भक्तास सांगती आवर्जोनी।दक्षिणा गोळा करून ठेविण्या ॥२३॥
सप्ताह पूर्ण झाला । संहिता वाचणाऱ्या गुरुजींला ।
दक्षिणेचे द्रव्य द्यायला । सांगितले महाराजांनी ॥२४॥
परंतु गुरुजी ते । न स्वीकारिती तीते ।
काय महाराज या वरूते । करिते जाहले श्रोते हो ॥२५॥
पुढील प्रवासास निघाले । एका स्थानाप्रती आले।
त्या गुरुजींचे चुलत बंधु भले । पातले त्यांच्या घरी ॥२६॥

देवा समोर येता । नमस्कार करिता ।
देव्हाऱ्यासमोर तत्वतां । रक्कम ठेविली हळूच ॥२७॥
ऐसी व्यवहार दक्षता । ऐसी पूर्ण निस्पृहता ।
अन्यत्र न दिसे तत्वता । एकमेवाद्वितीय महाराज ॥२८॥
असो, एका भक्ताकडे अनेक । धार्मिक ग्रंथ सकळिक ।
होते संग्रहात आणिक । महाभारत ही होते त्यांकडे ॥२९॥
आपलेही व्हावे वाचन । पीढीस आपल्या नूतन ।
लागावी वाचनाची गोडी म्हणोन । संग्रही ठेविले ग्रंथ सर्व ॥३०॥
परंतु काही मंडळी । सांगे यांस तयेवेळी ।
महाभारत नसावे घरात मुळी । घरातच होते महाभारत ॥३१॥
भक्त म्हणे महाराजांस । विचारू या समयास ।
घेऊ त्यांच्या मार्गदर्शनास । म्हणून स्वस्थ राहती ॥३२॥
पुढे जाता दर्शनाला । विचारले शंकेला ।
हसले महाराज प्रश्नाला । उत्तर दिले स्पष्ट असे ॥३३॥
तसे नसे हो काही । महाभारत हे लवलाही ।
सरस्वतीचे रूप, त्याही । घरात ठेवण्या हरकत नाही ॥३४॥
सलगपणे त्याचे । वाचन न करावे साचे ।
समाधान आपल्या भक्ताचे । करीती शंका निरसन ॥३५॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणपन्नासावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ५०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

जे परद्रव्यास न स्पर्शिती । निस्पृह सतत राहती ।
कवीश्वर ते 'श्रीपाद' निश्चिती । सत्य जाण बोल हा ॥१॥
सम–विषमता परिस्थितीची । परी दृढ धारणा मनाची ।
घटना ही निस्पृहतेची । साक्ष देई आपणांस ॥२॥
काही भक्तांस वाटे सतत। द्यावी दक्षिणा गुरुंप्रत ।
भाव असे मनी बहुत । म्हणे अर्पूया श्री चरणी ॥३॥
याच सुमारास पंथराजी । लेख आला तया माजी ।
लिहिला श्री गुळवणी महाराजी । वाचते झाले हे भक्त ॥४॥
आय आपुली असे । त्याच्या पंचमांशे ।
द्यावे श्रीगुरुंस परिसे । धर्मदायास हे उचित ॥५॥
हे वाचून उत्साहे । भक्त जाती गुरुगृहे ।
दर्शन करिता वाहे । वात्सल्य श्री नेत्रातून ॥६॥
सगळ्यांनी मिळुन एकदम । एक मोठी रक्कम ।
ठेऊन विनविले परम । स्वीकारण्या ते महाराजांसी ॥७॥
श्रीगुरु तयांस म्हणत । आम्हास हे नको निश्चित ।
यावर गुळवणी महाराजांचे लिखित । दाविती ते भक्तगण ॥८॥
श्री महाराज म्हणती हासून । माहित नाही तुम्हांस पूर्ण ।
कलियुगांत हा भाग न्यून । षोडषांश किंवा न्यूनतर ॥९॥
रकम एवढी तुम्ही देत । परि ती घेणे नाही उचित ।
परी सर्वांनी भावना विहित । आग्रह केला परोपरी ॥१०॥
तेव्हा तर ऐकून आग्रहास । स्वीकारिले त्या धनांस ।
पुढे एका धर्मकार्यास । फंड केला राशीचा ॥११॥
स्वतः साठी एक पैका । न ठेविला त्यांनी ऐका ।
हे शिक्षण मूढ लोका । द्रव्यार्थ जे सोडिती धर्म ॥१२॥

असेच राष्ट्रपती वेंकटगिरी । जेव्हा श्रींचा सन्मान करी ।
वार्षिक मानधन त्या भीतरी । केले होते मंजूर ॥१३॥
पुढे कारकुनी खाक्यांत । धन मिळे न ते समस्त ।
बरीच रक्कम महाराजांप्रत । न आली तये वेळी ॥१४॥
काही भक्तांनी करून प्रयत्न । मागील रक्कम शासनाकडून ।
मिळण्यास मार्ग काढून । मानधन मिळवून दिले असे ॥१५॥
त्याप्रमाणे पस्तीस हजार । एक रकमी ड्राफ्टावर ।
पाठविलेले मिळती त्यावर । आनंद होई भक्तांस ॥१६॥
परंतु त्याच बरोबर । त्यांस थोडा अहंकार ।
होई, परी व्यवहार । वेगळाच करिती श्रीगुरु ॥१७॥
प्रत्यक्षात रक्कम मिळता । पांच हजाराचे धनादेश साता ।
करून विविध श्रद्धा स्थानांप्रता । देवविले लगेच हो ॥१८॥
म्हणती महाराज समस्त जना । काम करत नसताना ।
न घ्यावे राजाच्या धना । वाडी आदिकांसी दान दिले ॥१९॥
असो श्रींची नित्य उपकरणे । जुनी झाल्या कारणे ।
चांदीची ती करूनी देणे । ठरविले काही भक्तांनी ॥२०॥
या भक्तांनी त्याप्रमाणे । सर्वही रजतोपकरणे ।
अर्पण केली श्री चरणे । मांडून ठेविती सेवक ॥२१॥
परी महाराजांचे मना । न वाटे समाधाना ।
एके दिनी त्यांचे दर्शना । राजेश्वर शास्त्री पातले ॥२२॥
धारवाडचे हे शास्त्री । येता रेणुका निवासाप्रती ।
ती सर्वही रजत पात्री । देवविली त्यांस ॥२३॥
संकोची तेही बहुत । श्रीं सारखेच आत्मतृप्त ।
श्रींचेच ते शिष्य असत । संकोच वाटे घेण्यास त्यांना ॥२४॥
महाराज त्यांस निरोपिती । कार्य तुमचे मोठे असती ।
याचा उपयोग तुम्हांस निश्चिती । होईल म्हणून स्वीकारावे ॥२५॥
गुरु आज्ञा न मोडित । सारी चांदीची उपकरणे नेत ।
दुसरे दिनापासुन मांडित । सेवक जुनीच उपकरणे ॥२६॥

पात्रे तांबे पितळी । दिसती आन्हिकाचे वेळी ।
समाधान झाले त्या चंद्रमौळी ।
रजतपात्रे पुन्हा न करण्या बजाविले ।।२७।।
या निस्पृहते बरोबर । अमानित्व त्यांचे खरोखर ।
'मी' हा शब्द गोचर । न होई लेखन संभाषणी ।।२८।।
संत कबीरांचे वचन । ऐका हो श्रोते जन ।
जो घेई तादात्म्य नैर्गुण्य । "मी" न जाणे सर्वथा ।।२९।।
जब "मैं" था तब हरी नहीं । अब "हरी" हैं मैं नाहिं ।
प्रेमगली अति सांकरी । जा में दो न समाहि ।।३०।।
त्यांची वाक्यरचना ऐसी । मी या शब्दाचा उल्लेख परियेसी ।
न होय त्यांच्या वचनांसी । आश्चर्यकारक सत्य हे ।।३१।।
पत्र लिहित भक्तांसी । देत त्यांना दीक्षेसी ।
परी त्यात भाषा कैसी । लिहित पहा श्रीगुरु ।।३२।।
अमुक वेळी अमुक दिनी । सर्व ज्येष्ठांस वंदुनी ।
देवापुढे नारळ ठेवुनी । बैसावे आसनी स्वस्थ चित्ते ।।३३।।
बैसावे डोळे मिटून । काळजीचे नाही कारण ।
श्री गुरुमहाराज कृपा पूर्ण । करितील हो आपल्यावर ।।३४।।
म्हणजे यांचा संबंध काही । जणू दीक्षेत मुळीच नाही ।
एकदा प्रवचनांत त्याही । केले दीक्षेचे विवेचन ।।३५।।
सत्पुरुषांची वृत्ती । पोस्टमनासारखी असती ।
पत्र पोचविले किती । नोंद न ठेविती याची ते ।।३६।।
स्वामी लोकनाथतीर्थ म्हणती । घेण्यादेण्याची गोष्ट न ती ।
दीक्षा होण्या मिळण्याची गोष्ट निश्चिती ।
अशीच वृत्ती महाराजांची असे ।।३७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पन्नासावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ५१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

भक्तवत्सल भक्ताभिमानी । बिरुद शोभे जया लागुनी ।
भाव देखे तो भक्त मनी । भुले त्याचेनेच श्रीपती तो ॥१॥
एक वर्षी मलकापुरास । योजिले भागवत सप्ताहास ।
वद्यपक्षी माघ मास । साल एकोणीसशे नव्वद ॥२॥
पत्रिका वाटल्या छापून । उत्साहे राहती तयारी ठेऊन ।
राहता उत्सवास चार दिन । येती श्रींचे ज्येष्ठ चिरंजीव ॥३॥
सांगती ते भक्तांस । अडचण काही या समयास ।
म्हणोन महाराज या सप्ताहास । येऊ शकणार नाहीत ॥४॥
पुढे केव्हातरी ठरवावा । सप्ताह भागवताचा तुमच्या गावा ।
सर्व भक्तांस तेधवा । निराशा अतिशय वाटली ॥५॥
श्रीकृपेचा लाभ सुंदर । मिळेल आपणांस मनोहर ।
म्हणोनी उत्सुक सर्व भक्तवर । दुःख झाले त्या सर्वांसी ॥६॥
शेवटी महाराजांना भेटून । पहावी प्रत्यक्ष प्रार्थना करून ।
आले भक्त पुण्यालागुन । तेथे नसती श्रीगुरु ॥७॥
प्रकाशन करण्या एक ग्रंथ । नामे "संत निवृत्तीनाथ" ।
गेले बाहेरगावी, भक्त तेथ । पोचती प्रार्थना करण्यास ॥८॥
समारंभानंतर । प्रार्थना करिती भक्तवर ।
तिचा करून स्वीकार । सप्ताहास स्वीकृती देती गुरु ॥९॥
नंतर जी कळून आली । माहिती ती वेगळी ।
पोचण्यापूर्वीच भक्त मंडळी।मलकापुरास जाण्याचा निर्णय घेती ॥१०॥
श्री गुरुंनी आरक्षण । रेल्वेचे घेतले करवून ।
प्रथम श्रेणीचे रद्द झालेले म्हणून । तृतीय श्रेणीत घेतले ॥११॥
आधीच अंतर्ज्ञाने । जाणिली भक्तांची मने ।
भक्तांस निराश न करणे । गैरसोयीचा त्रास पत्करिती ॥१२॥

एरवी ही प्रथम श्रेणीत । जागा न राखू देत ।
यासाठी कारण सांगत । आपल्या भाविक भक्तांसी ॥१३॥
तुम्ही सर्वही एकत्रपणे । आनंद लुटाल प्रवासाचा म्हणे ।
आम्हांस लागेल एकटे राहणे । संगती तुमची न लाभेल ॥१४॥
म्हणोन तुम्हा सर्वांसहित । प्रवास करणार आम्ही निश्चित ।
प्रथम श्रेणीचे तिकिट । नको निश्चित आम्हासी ॥१५॥
असाच प्रसंग एक । भक्तवात्सल्याचे कौतुक ।
महाराजांस प्रिय प्रत्येक । याची साक्ष देतसे ॥१६॥
देऊळगावराजा परिसर । श्रींच्या भक्तांचे स्थान मनोहर ।
कृपाछत्र तेथ अमर । प.पू.धुंडीराज महाराजांचे ॥१७॥
दत्तमहाराजांचा महोत्सव । सहस्रचंद्रदर्शन शांतीचा अभिनव ।
करिती देऊळगावी ठेऊन भाव । पुण्यात झाल्या नंतरी ॥१८॥
संतमंडळी जमून । उत्सव आनंदे भरून ।
रौप्य तुला करून । संपन्नता जाहली ॥१९॥
महाराज आईसाहेब उभयता । एका वाड्यात बैसता ।
दुसरे द्विजी, सर्व भक्ता । दर्शन निरोप घेते झाले ॥२०॥
ढीग अनेक भेट वस्तूंचा । समीप श्री महाराजांचा ।
प्रसाद त्यातून देऊन भक्तांचा । निरोप घेती प्रेमभरे ॥२१॥
एक भक्त रांगेत । उभा राहूनी दर्शनास जात ।
वंदन करूनी निघत । परी प्रसाद काहीच मिळाला नसे ॥२२॥
निराश होई किंचित । तैसेच जाण्या उद्युक्त ।
निरोप येई इतुक्यात । बोलाविले यांस महाराजांनी ॥२३॥
उभयता जाती दर्शना । उत्तम जरी काठी धोतर यांना ।
नऊवार साडी सौभाग्यवतींना । प्रसाद ऐसा देते झाले ॥२४॥
प्रसाद मिळता गहिवरून । आले या भक्ताचे मन ।
नेत्री प्रेमाश्रू दाटून । समाधान वाटले ॥२५॥
श्रींचे लक्ष आपणावर । आहे पूर्ण निरंतर ।
झालो निराश आपण पामर । मग्धा उगीच म्हणतसे ॥२६॥

श्री गुरू निरोपिती त्यांस । येऊ तुमच्या गांवास ।
निकटच्या समयास । त्याप्रमाणे येती श्रीगुरू ॥२७॥
श्रींचा मुक्काम जेथ । हे भक्त जाती तेथ ।
महाराजांच्या दर्शनार्थ । आन्हिकांत गुंतले श्रीगुरू ॥२८॥
बाहेर बैसती म्हणून । एवढ्यात एक भक्त येऊन ।
सांगे या भक्ता लागुन । बोलाविले हो तुम्हास ॥२९॥
जावून केले वंदन । श्रीगुरू बोलती हास्य वदन ।
आले तुम्ही पुण्यालागून । परी घाई फार जाहली ॥३०॥
ऐसे बोलून प्रसादा । दत्तमूर्ति मुद्रांकित मुद्रा ।
दिली चांदीची, भक्ताच्या मोदा । पारावार न राहिला ॥३१॥
मज सामान्य भक्ताची आठवण । ठेऊन घेतले बोलावून ।
कृपा केली प्रसाद देऊन । कृतकृत्य झाला हा भक्त ॥३२॥
महाराज न पाहती उच्च-नीच । प्रेम भक्तांवर सारखेच ।
कृपा भाव राहे श्रींचा तोच । भक्त धनिक वा निर्धन ॥३३॥
एकदा एका मोठ्या शहरी । भक्त होते महाराजां बरोबरी ।
कार्यक्रम या स्थाना भीतरी । होई राजवैभवाच्या थाटात ॥३४॥
धनिक व्यापाऱ्यांच्या घरी । व्यवस्था होती चोख सारी ।
अन्नदानास पक्वान्ने भारी । मंडळीही येती बहुत तेथ ॥३५॥
या नंतरच लहान गावी । खेडेच जे खर्डा नावी ।
लक्ष्मी फारशी फिरली नसावी । गरीब भक्त राहती तेथ ॥३६॥
श्री वक्रतुण्ड महाराजांपासून । भाविक तेथील भक्तजन ।
जाती दत्तमहाराज आपण ।
शहरातल्या कार्यक्रमातील ही होते भक्त॥३७॥
जाता या गावाप्रती । अतिशय लहान घरे असती ।
सोय ही फारशी नव्हती । वाकुन शिरावे ऐसे ठेंगणे द्वार ॥३८॥
महाराज जाती दारातून । कोणीच नव्हते अंगणात म्हणून ।
कोपऱ्यातील बादलीतले पाणी घेऊन । पाय धुतले स्वतःचे नि ॥३९॥
उपरण्याने हात पाय टिपले । महाराज पडवीत गेले ।
स्वहस्ते एक पाट घेतले । बसती विशिष्ट जागी मांडून ॥४०॥

इतुके जाहल्या नंतरी । गृहमंडळी आली सामोरी ।
कळले भक्तांस त्या घरी । धुंडीराज येती बैसती ऐसेच ॥४१॥
पुढे सात दिवसापर्यंत । अशाच लहान लहान घरी जात ।
स्वपादांवर पाद्यपूजा घेत । प्रेमे देती आशिर्वचन ॥४२॥
आश्चर्य वाटे भक्तांस । गरीबास आणी श्रीमंतास ।
सारखेच पाहती, कृपा खास ।
करिती मनी भाव ज्याच्या असे ॥४३॥
असेच सुदूर खेड्यातील भक्त । येती दर्शनास पुण्याप्रत ।
त्यासाठी यत्ने धन जमवीत । सामान्य परिस्थितून आपल्या ॥४४॥
रेणुका निवासात येती । हे भक्त संकोचून लाजती ।
सारे नियम झुगारिती । लाडक्या भक्तांसाठी श्रीगुरु ॥४५॥
जरी स्वत: सोवळ्यात असती । पायांवरी मस्तक ठेऊ देती ।
छोटे हार जे डोक्यातून न जाती । प्रेमे घालून घेती तेही ॥४६॥
विचारपूस आपुलकीने करून । नावानिशी संबोधून ।
प्रसाद देऊन समाधान । करिती या सर्वांचे सर्वोपरी ॥४७॥
जाकी रही भावना जैसी । प्रभु मूरती देखी तिन तैसी ।
वचन सत्य तुलसीदासी । प्रमाण श्रींची भक्त माया ॥४८॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकावन्नावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ५२

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

एक भक्त चिकित्सक । परम श्रध्दावान भाविक ।
बाल्यावस्थेपासून उपासक । आंबेजोगाई देवीचे ।।१।।
यांची माता धर्ममान्या । श्री गुळवणी महाराजांच्या मानस कन्या ।
उभय पती–पत्नी वैद्यक निपुण्या । ही कथा सुरस त्यांची हो ।।२।।
या चिकित्सकांची भार्या । पत्यानुगामिनी आर्या ।
आजारपणामुळे शिक्षण कार्या । अडथळा इयेच्या येई मग ।।३।।
दत्तमहाराजांचे दर्शन । त्यांचा उपदेश घेऊन ।
शांत होई तन–मन । "नमोस्तुते महादेवी" चे पाठ निरोपिती ।।४।।
श्रीं नी सांगितलेली उपासना । केली पूर्ण लाऊन मना ।
रोग जाऊन समाधाना । पावली से सत्वरे ।।५।।
दत्तमहाराजांचे उत्तेजन । वेळोवेळी मिळून ।
वैद्यक शिक्षण केले पूर्ण । मुलींस ठेऊन सासू जवळी ।।६।।
उभयता होती चिकित्सक । आरोग्यालय उघडण्या इच्छुक ।
यात श्रीं च्या योजनेचे कौतुक । ऐका श्रोते एक चित्ते ।।७।।
बीड ग्रामी दवाखाना । उघडावा हे यांचे मना ।
असता एक मध्यवर्ती स्थाना । जागा मिळाली स्वस्तात ।।८।।
या वास्तूत देवीचे । जोगीश्वरी रूपे वास्तव्य साचे ।
मालकाची कुलदेवता हिचे । जागरण गोंधळ होई नवरात्री ।।९।।
हॉटेल खानावळी साठी । या जागेची मागणी मोठी ।
परि समाज–धर्म कार्यासि होती । योजना जागा द्यावयाची ।।१०।।
असो, येथे बांधून वास्तू । रुग्ण सेवेचा पूर्ण हेतू ।
होऊन देवी सेवेचा सेतू । बांधिला समाज हितासाठी ।।११।।
येथे उल्लेख एक । व्हावा आरोग्यधामाचा आणिक ।
श्री तुळजाभवानी नामक । सुरू केला दत्तमहाराजे ।।१२।।

याचे पूर्वी लिखाण । झाले ग्रंथी अनुषंगानं ।
या कार्यासि स्त्रीवैद्य म्हणून । जी नेमिली महाराजांनी ।।१३।।
ती ही गुळवणी महाराजांची भक्त । मेधावीछात्रा असत ।
दोन गुणांनी चिकित्सा महाविद्यालयात ।
प्रवेश मिळण्याची संधि हुके ।।१४।।
परी सूक्ष्मजीव शास्त्रात । ही गुरुभगिनी पदवी घेत ।
एकदा गुळवणी महाराजांच्या दर्शना जात ।
पाठीवर थाप देऊन गुरु वदती ।।१५।।
काय होणार ना डॉक्टर । हिची ही असे इच्छा फार ।
गुरुमहाराजांचा संकल्प थोर । म्हणून एक स्नेही सुचविती ।।१६।।
अर्ज भरा या वर्षीस । कमी केलेसे प्रवेश गुणांस ।
असे करता अनपेक्षित प्रवेश । मिळे वैद्यक शास्त्रात ।।१७।।
जनरल मेडिसीन विषय घेऊन । झाली ही डॉक्टर निपुण ।
दत्तमहाराज तेव्हा बोलावून । विचारते झाले तये वेळी ।।१८।।
श्री वामन निवासात । श्री लोकनाथतीर्थ स्वामी स्मारक असत ।
यात तुळजाभवानी आरोग्यधामात ।
रुग्ण सेवा करण्यासी विचारिती ।।१९।।
या संपूर्ण घटनेत । गुरुंची योजना निश्चित ।
रुग्ण सेवा हे धर्मकार्य असत ।
स्वास्थ्य लाभ व्हावा समाजासी ।।२०।।
गुंतागुंतीची केस येता । गुरुमहाराजांचे स्मरण करिता ।
आपोआप योग्य निदान होता ।
आश्चर्य करिती ज्येष्ठ चिकित्सक ।।२१।।
याचप्रमाणे या अध्यायी । जी गुरुभगिनी चिकित्सक होई ।
पत्रात तीस अभिनंदन देई । स्वतः दत्तमहाराज ।।२२।।
ईश कृपेने आपण । केले पूर्ण शिक्षण ।
मंगल आशीर्वाद म्हणून । ऐसे लिहिती पत्रात ।।२३।।

बांधून होता वास्तू पूर्ण । येती सद्गुरू आपण ।
परिसरातील विहिरीच्या जलदेवतेचे पूजन ।
करवून पाद्यपूजा स्वीकारिती ॥२४॥
पुढे यांच्याकडून । महद्धर्मकार्य घेतले करवून ।
सप्ताह भागवताचा व्हावा म्हणून । उभयता विनविती गुरूंसी ॥२५॥
सप्ताह घरात न करत । समीपच्या देवालयाच्या पटांगणात ।
करिती तेथे त्याच काळात ।
मुक्काम शृंगेरी पीठाच्या आचार्यांचा होता ॥२६॥
श्री दत्तमहाराज आपण । शंकराचार्यांचे घेण्या दर्शन ।
जाती, त्यांना प्रेमे जवळ बसवून । वार्तालाप करिती आचार्य ॥२७॥
दुपारी घेऊन भोजन । यांचे होते प्रस्थान ।
त्यापूर्वी स्वतःच बोलावून । घेती दत्तमहाराजांस ॥२८॥
दत्तमहाराज विश्रांती घेती । परि निरोप येता त्वरित जाती ।
आचार्य शारदांबेचा फोटो देती । सत्कारुन दत्तमहाराजांस ॥२९॥
भागवत सप्ताह संपन्न । होई विपुल अन्नदान ।
लक्ष्मीबाई आईसाहेबांनी करवून । घेतले लाडू महाप्रसादाचे ॥३०॥
सर्व करवून घेती आपण । परी भक्तांस श्रेय देऊन ।
दुसरे दिनी नवचंडी याग करवून । घेतला प्रथम वास्तूत ॥३१॥
मंत्र आणि शक्तिपात । देऊन केले अनुग्रहित ।
उभयतांस व वडिलांप्रत । याच सुमारात श्रीगुरूंनी ॥३२॥
पुढे अनेक नवचंडी । तसेच यागशतचंडी ।
महान उपासना सहस्त्रचंडी । ती ही करविली यांकडून ॥३३॥
आजन्मपर्यंत पाठ देवीचे । गुरूंनी संकल्प स्वहस्ते लिहिले त्याचे ।
यांकडून गुरूंनी वदविले साचे ।
"प्रतिदिनं ब्राम्हण द्वारा यथाशक्ति पाठान् करिष्ये" इति ॥३४॥
वारंवार यांकडे जाऊन । देती अमूल्य आशिर्वचन ।
होता यांस पुत्ररत्न । नांव ठेविले नारायण ॥३५॥

दोन कन्यानंतर । कुलदीपक जन्मला कुमर ।
तो वाटे बुद्धिने कमजोर । काळजी करिती सर्वही ।।३६।।
परी एका मुक्कामात । व्यथा कळे महाराजांप्रत ।
लांब असता हांक मारत । नारायण म्हणून बाळासी ।।३७।।
दुडुदुडू रांगत येई सत्वर । महाराजांस पाहून हंसे सुंदर ।
श्रींच्या हातावरील खडीसाखर । खाई मुखानेच तो बाळ ।।३८।।
असो अशा या भक्तांप्रति । गुरुमाउलीची अति प्रीती ।
तशीच राहो आपल्या सर्वांवरती । म्हणून विनवू प्रेमभरे ।।३९।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
बावन्नावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ५३

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

श्रुति स्मृति पुराणानामालयं करुणालयम् ।
वन्दे कवीश्वरं नित्यं श्रीदत्तं 'सद्गुरु' वरम् ।।१।।
श्री दत्तमहाराजांवरील महिम्न । सौ.उमा यांचे ते कवन ।
त्यातील हे श्लोक सुमन । यातील शब्द 'सद्गुरु' ।।२।।
या शब्दाचा गाभा । अमर्याद याची प्रभा ।
श्रींच्या जीवनातील दोन आभा । या शब्दात गुंफिल्या ।।३।।
एक गुरु आध्यात्मिक । दुजा शास्त्रवाङ्मय शिक्षक ।
दोन्ही प्रवाह लोकहित प्रवर्तक । कल्याण दोहोंत समाजाचा ।।४।।
मोठे महाराज दत्तमाहात्म्यात । सांगती एका ओवीत ।
स्वार्थी माता कळकळत । शिष्य कल्याणा गुरु कळकळे ।।५।।
शांकरपीठ तसेच टिळक विद्यापीठात । शास्त्री म्हणोन शिकवित ।
जे विद्यार्थी शिकण्यास येत । करीत त्यांना आपलेसे ।।६।।
दिधले तयांसी ज्ञान । परी व्यवहारात ही सांभाळून ।
आधि–व्याधि भय नाशन । करून पुत्रवत सांभाळिती ।।७।।
एक शिष्य विदर्भातून । आला पुण्यालागून ।
टिळक विद्यापीठात राहून । शिक्षण घेई अनुक्रमे ।।८।।
गणपतीचे ते दिवस । गेले सर्व गणेशयागास ।
श्री दत्तमहाराजांसह शिक्षक खास । सर्व विद्यार्थी ही जाती तेथे ।।९।।
त्या शिष्याला तयेवेळी । "तार" एक अचानक मिळाली
आईची प्रकृति बिघडली । वर्तमान ऐसे समजले ।।१०।।
नवखा शिष्य लहान वय । गोंधळून भयभीत होय ।
गर्दीत या कुणास सांगू काय । पैसेही जवळ नाहीत ।।११।।
गर्दीतून पुढे शिरे । भांबावलेली नजर भिरभिरे ।
श्री दत्तमहाराजांनी जाणले सारे । जागेवरून उठोन येती ।।१२।।
आले छात्राचे जवळी । बोलती आत्मीयतेने तयेवेळी ।
नका घाबरु अशा वेळी । ताबडतोब जा आईस भेटण्या ।।१३।।

असे म्हणोन नोट शंभराची । दिली छात्राच्या हातात साची ।
पाठीवरून हात फिरवून शिष्याची । सहाय्यता केली परियेसी ।।१४।।
या हृद्य प्रसंगे । छात्र गुरुंस काहीच न सांगे ।
तरी मदतीस धावी वेगे । ही मात न वर्णवे ।।१५।।
असेच दूरवरच्या प्रांतातून । येती गरीब छात्रगण ।
शिकण्यास राहाती छात्रावासातून । शिकती दत्तमहाराजांजवळ ।।१६।।
यांचेवर लक्ष्य पूर्णपणी । होते महाराजांचे, जर कोणी ।
पडे आजारी तर स्वत: जावोनी। चौकशी अंती करिती सांत्वन ।।१७।।
तसेच अनेक युरोपीयन परदेशी । शिकण्यास येती भारत देशी ।
प्राच्य विद्येच्या आकर्षणे विशेषी । त्यांस ही शिकविती महाराज ।।१८।।
हार्वर्ड विद्यापीठाचे संस्कृत प्राध्यापक । प्राच्य विद्येचे अभ्यासक ।
वेदान्त विषयाचे सम्यक । अध्ययन दत्तमहाराजांकडून केले ।।१९।
नांव डॉक्टर इंगॉल्स । प्राच्य विद्या संशोधन भांडारास ।
राहता निजामाच्या गेस्ट हाऊस।जाती दत्तमहाराज शिकविण्या।।२०।।
ग्रंथ त्यावेळेस मुद्रित । नव्हते इतके संशोधित ।
परि श्रींच्या अगाध ज्ञानाची मात । शिकताना त्यांस जाणवे ।।२१।।
भाषा आणि वेदांतावर । पकड महाराजांची थोर ।
विदेशी शिष्य ब्रम्हसूत्रावर । करी तुलनात्मक अध्ययन ।।२२।।
भास्कराचार्यांचे सूत्र । आणि शांकरभाष्य सूत्र ।
तुलनात्मक अभ्यासित । दत्तमहाराजांच्या मार्गदर्शनात ।।२३।।
आद्यशंकराचार्यांचा विरोधक । भास्कर द्वैतवादी सम्यक ।
हा विद्यार्थी व्यर्थ कौतुक । करी भास्करांच्या अभ्यासे ।।२४।।
जरी हे महाराज जाणिती । तरी त्यास परावृत्त न करिती ।
प्रामाणिक समर्पण हे निश्चिती । भारतीय विद्वान शास्त्र्यांवर ।।२५।।
तरी एकदा प्रसंगानुसार । विद्यार्थी काढी उद्गार ।
शंकराचार्यांचे भाष्य अधिक सुंदर।अधिक सशक्त भास्कराहून ।।२६।।
तेव्हा मंद स्मित । करून श्री महाराज वदत ।
शांकर भाष्य सत्य असत । भास्करांचे नाहीच सर्वथा ।।२७।।
सौजन्यपूर्ण तर्क विरोध । महाराज करिती सुबोध ।
शास्त्र मतांविषयी आदर अगाध । शेषं कोपेन पूरयेत् न असे ।।२८।।

असाच एक युरोपीयन पुण्यात । उतरला तो शनिवार पेठेत ।
महाराजांच्या दर्शनास येत ।
विनवी त्यांस विठ्ठल मंदिरात येण्या।।२९।।
तेथे होता त्याचा मुक्कांम । महाराजांकडे अध्ययनाचे काम।
दुसरे दिनी येऊ असे पूर्ण काम । महाराज त्यास आश्वासिती ।।३०।।
सकाळी गाडी घेऊन । येई श्रींस नेण्या युरोपीयन ।
आन्हिक व्हावयाचे अजून । पुढे चला श्री म्हणती येतो आम्ही ।।३१।।
दुपारच्या उन्हात । अनवाणीच महाराज जात ।
शिष्य जे श्रींच्या घरी रहात । ते हळहळती या त्रासासाठी ।।३२।।
तो गृहस्थ गाडीतून । सोडी महाराजांस आणून ।
दुसरे दिनी क्षौर करून शेंडी ठेऊन । सोवळे नेसून येई तो ।।३३।।
हातात पळीभांडे असून । करी महाराजांचे दर्शन ।
तेव्हा तो परम श्रद्धावान । हे जाणवे इतरांस ।।३४।।
त्यासाठी स्वत: त्रास । सोसला महाराजांनी खास।
अंतर्ज्ञाने त्याच्या तळमळीस । जाणले ऐसे 'सद्गुरु' ।।३५।।
एकदा दूरध्वनी वरून । श्रींची परवानगी घेऊन ।
करण्या शंका निरसन । एक फ्रांसीसी गृहस्थ पातला ।।३६।।
होता दुभाषा बरोबर । सांगे करून भाषांतर ।
आला चित्तास गहिवर । निरुपण ऐकून महाराजांचे ।।३७।।
शेवटी भावावेशात । एक प्रश्न तो गृहस्थ विचारीत ।
भाषांतर करण्यापूर्वीच देत । उत्तर सुंदर महाराज ।।३८।।
परमाश्चर्य त्या गृहस्थास । तैसेच त्या दुभाष्यास ।
तसेच इतर लोकांस । वाटे या घटनेवर ।।३९।।
ते गेल्यावर एक भक्त । या बद्दल श्रींस विचारित ।
भाषांतर करण्यापूर्वीच त्वरित । उत्तर कैसे दिधले ते?।।४०।।
सर्व भाषांचा निर्माता । परमेश्वर, त्यास जाणता ।
क्वचित येई ऐसे करता । ऐसे बोलती सद्गुरु ।।४१।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्रेपन्नावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ५४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

सर्व शास्त्रांवर । श्रद्धा महाराजांची अपार ।
निष्ठा ती मानपुरस्सर । भारतीय विद्येवर अगाध असे ॥१॥
एका भक्ताचा श्रेष्ठ सुत । रेल्वेच्या मोठ्या अपघातात ।
देवाघरी अकस्मात । जाई दैवकाल वश ॥२॥
झाल्यावर अशी घटना । करण्या मातापितांची सांत्वना ।
जाती महाराज त्यांच्या सदना । गहिवरोन डोळ्यांत अश्रू येती ॥३॥
श्रींची करुणा पाहून । गहिवरे भक्तांचे ही मन ।
सर्वव्यापक कोमल अंतःकरण। परदुःखाने दुःखी झालेसे ॥४॥
थोड्या वेळाने श्री विचारिती । पत्रिका मुलाची कां दाखविली नव्हती ।
कोण्या ज्योतिषी निपुणाप्रती । त्यावर उत्तरती हे भक्त ॥५॥
वडीलच माझे प्रख्यात ज्योतिर्विद । परी घरच्यांची पत्रिका न पहात ।
इतर कोणी हे न सांगत । अल्पायुषी पत्रिका म्हणून ही ॥६॥
मग हे भक्त विचारिती । जर कां हे आधी कळती ।
तर ही विधि घटना टाळता येती । घडले असते ऐसे कां?॥७॥
शास्त्रांवर निष्ठा पराकोटीची । म्हणती शास्त्रात अपमृत्यू टाळण्याची ।
उपाये सांगितली उपयोगिता त्यांची ।
नसता शास्त्र वाक्यांस वैयर्थ्य येईल ॥८॥
शास्त्रवचनांवर निष्ठा पूर्ण । हे विचारात भिनले असून ।
त्यांचे ठाई साकार होऊन । दिसे आपणांस पदोपदी ॥९॥
एकदा काशीचे पंडित । आले व्याकरण पारंगत ।
व्याकरणाचा अभ्यास सतरा वर्षपर्यंत । केला त्यांनी समग्र ॥१०॥
भारत भरात त्यांना । स्वतःच्या तोडीचा मिळेना ।
व्याकरणाचार्य, तेव्हा त्यांच्या मना । अभिमानाने घर केले ॥११॥
त्यांचा यथोचित सन्मान । होऊन महाराजांचे प्रवचन ।
त्या ठिकाणी प्रारंभ होऊन । सुश्राव्य भाषण ऐकती श्रोते ॥१२॥

प्रवचनांत महाराज म्हणती । देवांचे गुरू बृहस्पती ।
व्याकरण शिकविती इंद्राप्रती । देवांची वर्षे हजार झाली ।।१३।।
इंद्र शेवटी कंटाळला । तरी अंत ना व्याकरणाला ।
ऐसे सहज प्रवचन ओघाला । धरून सांगती महाराज ।।१४।।
शास्त्र ज्ञान अनंत । किती ही अभ्यासा कमी पडत ।
आपली बुद्धी करण्या पूर्ण आत्मसात । हे सहजच सांगितले ।।१५।।
विविध विद्वत्सभांमाजी । विवेचन जे दत्तमहाराजी ।
केले त्याचा या अध्यायामाजी । उल्लेख करू थोडासा ।।१६।।
ब्रम्हसूत्रातील चार सूत्र । 'अथातो ब्रम्ह जिज्ञासा' प्रथमत: ।
'जन्माद्यस्य यत:'आणि 'शास्त्र योनित्वात्'। हे प्रथम तीन सूत्र ।।१७।।
अथातो ब्रम्ह जिज्ञासा मधील । 'अथ' या शब्दाचा अर्थ तपशील ।
सभेत केला अद्वितीय केवळ । सर्व साश्चर्य आनंदिती ।।१८।।
असेच एका पंडित सभेत । चौथे सूत्र 'तत्तुसमन्वयात्' ।
विवेचन करिती विविध पंडित । शंकराचार्य उपस्थित होते ।।१९।।
परंतु अपरेतु शब्दानी । परिग्रह कोणाचा करावयाचा आणि ।
कोणीच हे आपल्या विवेचनी ।
संतोषकारक समाधान करू न शके ।।२०।।
दत्तमहाराज सांगती तेधवा । अपर शब्दाने परिग्रह करावा ।
बोधायन विशिष्ट द्वैत वृत्तिकारांचा बरवा ।
पूर्वोत्तर मीमांसा सांगितली सम ।।२१।।
संप्रदायपूर्वक सूक्ष्म अध्ययन । आणिक सखोल चिंतन ।
म्हणोन ऐसे स्पष्ट विवेचन । करू शकती महाराज ।।२२।।
अशाच एका परिषदेत । वेदांच्या अपौरुषेयाबद्दल मांडत ।
विचार आपले अनेक पंडित । युक्ति प्रयुक्ति विविध मांडिल्या ।।२३।।
यावर ते मतभेद । जाहले विद्वानांत ।
तेव्हा श्री दत्तमहाराज मांडत । पुरुषदोषरहितत्व सिद्धांत ।।२४।।
प्रत्यक्ष इंद्रिये न दिसणारी वस्तु । अनुमाना प्रमाणे सिद्ध होतु ।
घेऊन एखादा हेतु । सिद्ध करिती अस्तित्व ।।२५।।
जसे पर्वतावर आहे अग्नि । परि धूम दिसे नयनी ।

सिद्ध केला या वरूनी । दोषरहित असावा हा हेतु ।।२६।।
अनुमानातील हेतू जरी । हेत्वाभास म्हणजे सदोष असे तरी ।
साध्य सिध्द न होय यापरी । वेदांचे अपौरुषेयत्व सिद्ध होय ।।२७।।
'पुरुषेदोषरहितत्व' हे । प्रयोजक कारण आहे ।
मानवीकृत कृतीत राहे । भ्रम,प्रमादादि दोष आणिक ।।२८।।
फसवणूक आणि कपट । इंद्रियांची अपुरी कुवत ।
हे दोष पुरुषांत निश्चित । वेद संपूर्ण निर्दोष असती ।।२९।।
म्हणोन वेद अपौरुषेय । हे येथे सिद्ध होय ।
हे विवेचन अखंडनीय । ग्राह्य म्हणती विद्वान ।।३०।।
सभा अशा अनेक । श्रीं च्या प्रकांडपांडित्याचे कौतुक ।
दिसे बुद्धिचातुर्य सम्यक । शास्त्र चर्चेतील निपुणता ।।३१।।
सतर्क करणे विवेचन । हे शिष्यांलागुन ।
शिकविती महाराज आपण । गाभा तो संस्कृति प्रवाहाचा ।।३२।।
आपण सामान्य जनांसी । न जाणत त्यांच्या अवाक्यासी ।
सकल विद्वद्‌जन त्यांस सम्मानिती । दिसे एवढेच आपणासी ।।३३।।
कोणी विद्वानांकडून । कळले वरील प्रसंग म्हणून ।
थोडी चुणुक त्यातून । दिसे त्यांच्या बुद्धि तेजाची ।।३४।।
असे वेदांत निपुण । परी सामान्यांचे कल्याण ।
जाणून तैसे मार्गदर्शन । करिती सहज शब्दांनी ।।३५।।
एका तरुण भक्तानी । पुसले महाराजांलागुनी ।
सर्व गोष्टी देव करतो म्हणोनी । प्रयत्नांस अर्थ काय ।।३६।।
दत्त अवधूत गीतेत । अजगरास गुरु करत ।
सर्व प्रयत्न सोडणे का उचित । सांगा मजसी महाराज ।।३७।।
महाराज या प्रश्नावरती । अतिशय बोधक उत्तरती ।
सगळ्यांची का मनोवृत्ती । अवधूतां सारखी आहे हो।।३८।।
वेगळी ती अवस्था असे । सर्वांना ती जमत नसे ।
साध्या उदाहरणे समजावितसे । गुरु आपल्या भक्तास ।।३९।।
सकाळी घ्यायचा चहा । देव देईल म्हणून स्वस्थ रहा ।
चहा मिळेल का ते पहा । तोंड धुवून स्वयंपाक घरी न जाता ।।४०।।

असो, नारेश्वरी भागवताचा । सप्ताह असे महाराजांचा ।
पात्र जवळ नर्मदेचा । नातवंडे महाराजांची पोहण्या जाती ।।४१।।
सायंकाळी पोहण्यास । जाती हे विशेष साहस ।
कळता महाराजांना, म्हणती त्यांस । जाऊ नका सायंकाळी ।।४२।।
या नदीत फार मगरी । बसती येऊन तीरावरी ।
एक नातू त्या अवसरी । वदे पटकन काय ते ।।४३।।
आजोबा या ठिकाणी । भागवत चाले म्हणोनी ।
मृत्यूच्या आहारी न पडे कोणी । मग भय ते नाहीच ।।४४।।
यावर महाराज प्रत्युतर । देती फारच सुंदर ।
जरी ओढून नेई मगर । तरी सप्ताह चुकेल त्याचे काय ।।४५।।
भागवत असे या तीरावर । ती जर नेई पैल तीरावर ।
मग आपण काय करणार । बोलती ऐसे युक्तिने ।।४६।।
तत्वज्ञान जरी मनी असे । व्यवहार सोडा असे ।
कधीच ते सांगत नसे । ऐसे आपले महाराज ।।४७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौपन्नावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ५५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

दिल्ली सारख्या महानगरा पासून । लहान सहान खेड्या लागुन
जाती विविध कार्यक्रमा आपण। श्री दत्त महाराज ॥१॥
भागवत सप्ताह आयोजन । किंवा अध्वर यजन ।
कर्माचिरण आणि प्रवचन । धर्मकृत्ये सर्वही ॥२॥
करण्या सनातन धर्माचे पुनरुज्जीवन । करणे शास्त्रोक्त आचरण ।
"स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्" म्हणोन ।
आदेश जो उपनिषदाचा ॥३॥
विद्या साधे प्रवचनाने । विद्या रक्षण्या कारणे ।
"यःक्रियावान् स पंडितः" या न्यायाने ।
उपनिषदाज्ञा शिरोधार्य केली ॥४॥
याच कारणे सतत । स्वकर्तव्ये असती रत ।
त्यासाठी सदोदित । देशाटन केलेसे ॥५॥
कर्नाटकाच्या सीमेवर । एक गाव अश्वत्थपूर ।
अनुष्ठान सहस्त्रचंडीअध्वर । योजिला असे ते स्थळी ॥६॥
मद्रासकडील एक विद्वान । वयाने तो तरुण।
तो असे वंशातून । श्री अप्पय दीक्षितांच्या ॥७॥
हे अप्पय दीक्षित । अद्वैताचार्य प्रसिद्ध ।
हा त्यांचा वंशज हे कळत । त्यास सांष्टांगे नमस्कारिती ॥८॥
असे नमस्कारिता नयन । जाहले महाराजांचे अश्रुपूर्ण ।
अद्वैत ज्ञानावरची निष्ठा प्रकटे त्यातून ।
तशीच प्राचीन ग्रंथकारांवरील भक्ति ॥९॥
लीनता ही केवढी । संतांविषयी श्रद्धा गाढी ।
अगाध चरित्राची ओळख थोडी । होई या उदाहरणांवरून ॥१०॥
नाना महाराज तराणेकर । मोठ्या महाराजांचे शिष्य थोर ।
परम योगी इंदूरकर । जेव्हा यांसी भेट होई ॥११॥

प्रत्यक्ष ईश्वर भेटता । भाव प्रवाह होईल तत्वता ।
तैसा यांचा संग घडता । होई दत्तमहाराजांचा ॥१२॥
येता दोहों समोरासमोर । घालिती एकमेकांस साष्टांग नमस्कार ।
गहिवरोन नेत्री अश्रुधार । मुखी "घोरात् कष्टात्" स्तोत्र येई ॥१३॥
दत्तमहाराजांस विनम्रपणे । नानांचे होई सांगणे ।
सामर्थ्य तुमचे जे नामाप्रमाणे । त्यावरच चाले आमचे कार्य ॥१४॥
वामनरावांची उणीव । न भासू दिली सर्वथैव ।
कृपा आम्हावरी सदैव । असावी तुमची म्हणती ते ॥१५॥
दत्तमहाराज यावर । करूनी नम्रपणे नमस्कार ।
काढिती काय उद्‌गार । लोकांस देव सहवास हवा असे ॥१६॥
त्यासाठी पादुका रूपाने । परमेश्वराला स्वतः जवळ ठेवणे ।
सामान्य माणसांचे ऐसे करणे । आपले आहे विरुद्धच ॥१७॥
आपले हृदय परमेश्वरास । अतिशय प्रिय, तेथे वास ।
सदैव करी, त्याच्या त्यागास । न इच्छी तो देव ही ॥१८॥
असो, इंदूरकर भक्ताकडे महाराजांचे । आगमन होते व्हावयाचे ।
प्रत्यक्ष दर्शने श्रींस येण्याचे । विनविले तसेच पत्रानेही ॥१९॥
श्री दत्तमहाराज पत्रोत्तरात । भक्तासी या लिहित ।
आधी नाना महाराजांचे स्थानाप्रत । जाऊ आम्ही दर्शनासी ॥२०॥
पुढे त्यांच्या अनुज्ञेने । घडेल तुमच्याकडे येणे ।
नाना महाराजांची अनुमती घेणे । अगोदर हे आहे उचित ॥२१॥
एवढेच नव्हे तर । जेथे जाती गुरुवर ।
यजमान म्हणती त्या भक्तवर ।
अनुमति घेती इतरांकडे जाण्यास ॥२२॥
असा विनम्र भाव पूर्ण । हा अद्वितीय त्यांचा गुण ।
नाना महाराजांची इच्छा जाणून ।
मुद्दाम त्यांसाठी भागवत निरूपिले ॥२३॥
मुंबापुरीत भक्तिपूर । लोटे, होई मनोहर ।
भागवत सप्ताह सुंदर । श्रोता वक्ता दोघे संत ॥२४॥
काव्याची नानांस आवडी । भजनाची त्यांना अतिशय गोडी ।
दोघांच्या जुगलबंदीने वाढी । सुरसता त्या निरूपणाची ॥२५॥

नानांस अधिक काळपर्यंत । एका स्थानी न बसवत ।
त्यासाठी मोठे निरुपण सांगत । थोड्या काळातच महाराज ॥२६॥
गोकुळच तेथे अवतरे । दोघांच्या दृष्टीवरे ।
भागवत जिवंत होई सारे । अपूर्व सोहळा ऐसा झाला ॥२७॥
असो, स्वतःस संत न म्हणवीत । महानता ही न दाखवीत ।
साध्या संभाषण कृतीत । भरले असे साधेपण ॥२८॥
एक भक्त श्रीं जवळ । प्रकृती विषयी तळमळ ।
बोलून दाखवी, तात्काळ । महाराज त्यासी सांगती काय ॥२९॥
आमच्या प्रकृती विषयी । न सांगावे कोणास काही ।
येतील मग दुसरे चिकित्सक ही । तपासून सांगतील वेगळेच ॥३०॥
एका डॉक्टरांचे उपचार । चालू आहेत मग इतर ।
उगाचच नको औषधे फार । काळजी नसावी त्या विषयी ॥३१॥
येथील कार्यक्रम यथासांग । व्हावा पूर्ण अव्यंग ।
त्यासाठीच प्रथम दिनी सत्संग । केला ताई महाराजांचा ॥३२॥
औषध त्यांचे दर्शन । संतांचे मिळता आशिर्वचन ।
न बाधी कुठलेच विघ्न । म्हणोन तैसे आचरिले ॥३३॥
या विचारांना ऐकून । वृत्ती होते आपली मौन ।
यातील भाव अनुभवून । कळतील केवळ मनासी ॥३४॥
एकदा अधिक मास निमित्ते । श्री दत्तमहाराजाते ।
नारायण पेठेतील गृहाते । बोलाविती गुळवणी महाराज ॥३५॥
महाराजांस देती वायन दान । झाले ब्राम्हण भोजन ।
नंतर खोलीत बैसून । बोलती गुरुशिष्य दोघेच ॥३६॥
श्री दत्तमहाराजांची नजर चुकवून । पुढे वाकून चटकन ।
गुळवणी महाराज स्वतः आपण ।
नमस्कार दत्तमहाराजांस करिती ॥३७॥
राम पूजे रामेश्वरासी । शंकर वंदे रामासी ।
कृती कळावी पामरांस कैसी । उभयतांसी नमन मूकपणे ॥३८॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंचावन्नावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ५६

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम : ।।

श्रीं ची देहात्मवृत्ती । पूर्ण नाहीशी झाली होती ।
दृढ तितीक्षा ती होती । किंवा काय न कळे ।।१।।
जाण्यापूर्वी विद्यापीठात । कॉफी महाराज घेत ।
मग इतर सगळे घेत । मुले वगैरे कॉफी ती ।।२।।
एकदा सगळ्या मुलांनी । आईसाहेबांजवळ गिल्ला करोनी ।
बोलले काय केली कॉफी नी । साखरच नाही घातली ।।३।।
आईसाहेब त्यावर । हात धरिती मुखावर ।
म्हणजे हे बिन साखर । कॉफी घेऊन गेले की ।।४।।
अवाक्षरे काही । मजसी बोलले नाही ।
काय हा स्वभाव बाई । पुसती परतल्यावर श्रींस ते ।।५।।
त्यात काय विशेष घडले । कामांत असता राहिले ।
आम्हांस काहीच न वाटले । बोलले ऐसे महाराज ।।६।।
मुलांस आठवे यावर । आपण गोंधळ केला फार ।
वडिलांची वृत्ती कैसी थोर । हे त्यांस जाणवले ।।७।।
अशीच प्रचीती एका भगिनीस । येई एका सप्ताहास ।
गावी येता महाराज त्यांस । कॉफी साठी बोलाविले ।।८।।
छान दुधातली कॉफी केली । परी साखरच नाही घातली ।
महाराजांनी तशीच घेतली । मागाहून प्रमाद कळोन येई ।।९।।
दु:ख गुरुभगिनीला । अतिशय झाले सायंकाळा ।
प्रवचनास जाई त्यावेळा । अश्रूपूर्ण क्षमा मागे ।।१०।।
महाराज म्हणती तियेसी । कॉफी छान लागली आम्हासी ।
साखर नव्हती का कॉफीसी । काहीच आम्हास न कळले ।।११।।
दगड ही जरी दिला देवास । भक्तिने तर तो त्यास ।
चघळेल अनंत काळ, सहास ।
म्हणेल भाव टणक खरेच भक्ताचा ।।१२।।

असो, एकदा प्रयाग क्षेत्रात । श्राद्धविधि करण्यास जात ।
मे महिन्याच्या रणरणत्या उन्हांत।तप्त दगडांवरून होते जाणे ।।१३।।
सहभक्तांस काळजी वाटे । तापलेल्या रस्त्यावर कोठे ।
अनवाणीच जातील म्हणून पंचे मोठे । वाटेवर ओले अंथरती ।।१४।।
भक्तांस वाटे पंच्यावरून । जावे महाराजांनी म्हणून ।
परी त्यांवर न ठेवता चरण। सरळ दगडांवरून जाती महाराज।।१५।।
पाय भाजताहेत म्हणून सत्वर । न चालती भरभर ।
शांतपणे सहज सरसर । चालती नेहमीच्या चालीत ।।१६।।
सगळ्यांस आश्चर्य होई । सहज स्थिती ही अक्षयी ।
देहात्म बुद्धीच त्यां नाही । कोणती सहनशीलता न कळे ।।१७।।
त्याच श्रेत्री भक्त घरात । श्राद्ध विधि एकदा होत ।
सर्व शास्त्रोक्त विधि करावे लागत । प्रयाग क्षेत्री गेल्यावर ।।१८।।
सर्व ब्राम्हण वर्गाचे । पठण सुरु होते मंत्रांचे ।
महाराज बसले होते त्या खिडकीचे । झडप होते उघडलेले ।।१९।।
काही वस्तू देण्यास । उठती महाराज त्यांस ।
जोरात झडप लागे, कासावीस । सर्व भक्तांचा जीव होई ।।२०।।
अनवधान आपला कसचा । राग सर्वांसि येई स्वत:चा ।
परंतु शांत भाव महाराजांचा । किंचितही नसे ढळलेला ।।२१।।
हात ही डोक्याकडे । न जाई शांत खडे ।
देहबुद्धिच पूर्ण मोडे । मग कैसे शरीर दु:ख ।।२२।।
चालू द्या मंत्रविधि । थांबवू नका त्यांस मधी ।
ऐसे बोलता सर्वांसि सुधी । येई पुढील कार्यक्रमाची ।।२३।।
असेच एक भक्त । पाद्यपूजेस विनवीत ।
या महाराज माझे घरात । महाराज ही जाती प्रेमाने ।।२४।।
घर जुनेच होते । गर्दी वाढे बहुते ।
मग माडीवरूते । केला पूजन समारंभ ।।२५।।
सर्व झाले यथासांग । प्रसाद घेऊन परतती मग ।
सर्वही भक्त सवेग । जुनाट उभ्या जिन्यावरून ।।२६।।

शेवटी दोन भक्तांच्या मधून । उतरता महाराज पाय घसरून ।
पडले त्या जिन्यावरून । डाव्या पायास लागले बहुत ।।२७।।
घाबरले सर्व भक्त । रक्तस्त्राव झाला बहुत ।
जखम ती मोठीच असत । त्वरित डॉक्टर पाचारिले ।।२८।।
सर्व भक्त हळहळत । परी महाराज असती शांत ।
कोणतीच प्रतिक्रिया न दाखवित । उलट सांगती सांत्वन पर ।।२९।।
अमावस्या आहे तिथी । गंडांतर होते म्हणती ।
आता ते टळले निश्चिती । काळजी काही करू नका ।।३०।।
इतर कोणास ही । एवढे सहन न होई ।
शक्य ते केवळ त्याही । सहनशीलतेची पराकाष्ठा ।।३१।।
सहन करतो तैसे काही । भावही मुखावर नाही ।
अविचल शांतता पसरून राही । वृत्तीवर त्यांच्या सतत ही ।।३२।।
ऐश्वर्ययुक्त ज्याचे शांत चित्त ।
प्रसन्न सुहास्य जेवी बहरला प्राजक्त ।।
देहात्मबुद्ध्याभावे पावी शिवत्व ।
वंदन त्या दत्त चरणांसी ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
छप्पन्नावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ५७

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

श्रीक्षेत्र जालन्यास । साल एकोणीसशे पंच्याऐंशीस ।
योजिले विष्णुयागास । जुन्या मंदिरात ताईंच्या ॥१॥
एकदा ताई म्हणती । एका भाविक भक्ता प्रति ।
या ज्या गवतावरून जाती । महाराज चालत सहजच ॥२॥
हे जीव वृक्षयोनीत । सर्व ही उद्धरून जात ।
श्रींच्या पदस्पर्शे मुक्त होत । ऐसे महिमान महाराजांचे ॥३॥
श्रीं च्या ठिकाणी ताईंस । श्रीकृष्णांचे होई दर्शन सुरस ।
अनन्य भावे ईश्वर त्यांस । मानिती त्या सर्वदा ॥४॥
असो, महाराजांच्या सान्निध्यात । विष्णुयाग संपन्न होत ।
अन्नसंतर्पण झाले बहुत । प्रसन्न असती महाराज ॥५॥
असा यागाचा कार्यक्रम । सर्व होई उत्तम ।
आनंद होई परम । दत्तमहाराजांच्या मनास ही ॥६॥
दुसरे दिनी श्री ताईंना । म्हणती सांग झाले यजना ।
आता उद्या तुमची स्थापना । करून तुला पूजन करावी ॥७॥
ताईंस संकोच बहुत । कोण्या इतरांस बैसवा म्हणत ।
यावर श्री आठवण करत । गुळवणी महाराजांच्या तुलेची ॥८॥
आपली जर शर्करातुला । होईल तर मग मुद्रिका तुला ।
आमची होईल हा बोल भला । मान्य करावा आपण ॥९॥
श्रीं ची आज्ञा मानीत । दुसरे दिनी तुला शर्करेची होत ।
मग मुद्रा तुलेचा बेत । श्रीं चा होता योजिला ॥१०॥
एक रुपयाच्या नाण्यांनी । तुला होईल म्हणोनी ।
पूर्वीच्या तुलेवरूनी । अंदाज वजनाचा भक्त करिती ॥११॥
करून फार खटपट । जमविली नाणी बहुत ।
सात हजार मुद्रा भरत । वजन सत्तर किलोचे ॥१२॥

तुलेची पूजा करून । सुरू झाले तुलादान ।
पासष्ट किलोची साधारण । नाणी ठेविली पारड्यांत ।।१३।।
पारडे श्रीं चे तरी । जड होते, त्या उपरी ।
सहासष्ट, सदुसष्ट असे भरी । पुढे वजन केले सत्तर ।।१४।।
तरी पारडे हलेना । भक्तांनी करून प्रयत्ना ।
जमविले नाणे पुन्हा । वाढविती पारड्यात नाणी मग ।।१५।।
पंचाहत्तर वरून ऐंशी किलो । पुढे वाढविले शंभर किलो ।
शेवटी शत द्वादश किलो । परी ते कमीच पडले हो ।।१६।।
मग सारे ही थकले । ताईंस शरण गेले ।
मग भगवतीने सांगितले । उपाय काय तेधवा ।।१७।।
देवासमोरच्या पेटीतून । घ्या पैसे काढून ।
तुळशीपत्र सवें घेऊन । ठेवा नाण्यांच्या पारड्यांत ।।१८।।
मग घेतले पैसे पेटीतून । ताई महाराजांच्याच हातून ।
तुळशीपत्रासह नाणे ठेवून । तुला समेवर आली मग ।।१९।।
सर्वांसि होई आठवण । श्रीकृष्णाचे तुलादान ।
द्वापरांत होई सोन्यानं । तैसाच समारंभ हा दिव्य ।।२०।।
त्या दिवशी काजळकर महाराजांनी ।
ताईमहाराजांस आज्ञा केली म्हणोनी ।
सर्वही आभूषणे लेऊनी । सजल्या होत्या त्या दिवशी ।।२१।।
असा हा सोहळा । कलीयुगांत होय विरळा ।
आनंदाचा सुंदर मेळा । काय वर्णावा म्या पामरे ।।२२।।
असो, तेच दिनी सायंकाळी । मिरवणूक मोठी निघाली ।
जुन्या जालन्यातून भली । तीत शेवटी पाऊस पडे ।।२३।।
घडे सर्वांसि अवभृत स्नान । मेघ जल वर्षवून ।
स्वत:च सर्वांना पवित्र करून । राही तेव्हा निश्चये ।।२४।।
कोणत्या पवित्र कार्याची । सांगता होते जलाने साची ।
यज्ञानंतर अवभृत स्नानाची । विधि असे उत्तम ।।२५।।
इथे ईश्वरच सर्वांना । घाली अवभृत स्नाना ।
या यज्ञाचे समाधाना । देव ही होई प्रसन्न ।।२६।।

असो, जालन्यातील याग यजन । आणि विपुल अन्नदान ।
पाहून एका जुन्या भक्ताचे नयन । दिपून जाती आश्चर्ये ।।२७।।
विचारी महाराजांस तो भक्त । हें सर्व काय चालत ।
श्री त्यावर उत्तर देत । विचारणीय असे बहुत ते ।।२८।।
उद्याची भ्रांत ना ज्या स्थानाला । तेथे कमी पडेलच कशाला ।
जालना क्षेत्राविषयी श्रीं च्या बोला । मनांत ठेवावे सर्वांनी ।।२९।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्तावन्नावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ५८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक भक्त गुरुभगिनी । संसारात अनंत अडचणी ।
शाळेत नोकरी करूनी । प्रपंच सांभाळी बहुयत्ने ॥१॥
वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी । परीक्षा बी.एड.विशेषी ।
तयारी करून अहर्निशी । देई परीक्षा ही भगिनी ॥२॥
अतिशय कठिण परिस्थितीत । श्रीं च्या कृपेनेच होत ।
ह्या परीक्षेत पारित । तोच कुठाराघात एक होई ॥३॥
निकाल परीक्षेचा लागत । त्याच्या एकाच महिन्यात ।
शासन निर्णय जाहिर करत । हिच्या विद्यापीठा बद्दल ॥४॥
अन्नामलाई विद्यापीठाची । ही पदवी बी.एड्.ची ।
महाराष्ट्रात अग्राह्य केली साची । शिक्षण सेवेसाठी त्वरित ॥५॥
दुसऱ्या शासनमान्य पीठाद्वारा । पुनश्च अभ्यास करून सारा ।
अशक्य परीक्षा देणे या अवसरा । निराश झाली अवचित ॥६॥
त्याच वेळी हरिहरेश्वर क्षेत्री । काळभैरव मंदिरा प्रति ।
महाराजांची प्रवचने सुरू होती । कुठल्या वार्षिक उत्सवात ॥७॥
तेथे जाता ही भगिनी । बैसली श्रीं च्या प्रवचनी ।
समस्या स्वत:ची आठवोनी । मनांत प्रार्थी सद्गुरूंस ॥८॥
बैसल्या स्थानावरोनी । मनांतच सांगी गुरु लागुनी ।
या शासनाच्या निर्णया वरूनी । काय करावे आता मी ॥९॥
पुनश्च परीक्षा देणे । शक्य नाही त्या कारणे ।
एकतर अल्प पगारे नोकरी करणे।
किंवा जाईल ही नोकरी हातची॥१०॥
आता सर्वस्वी माझा भार । आहे प्रभू तुमच्यावर ।
ऐसे विनवोन नमस्कार । करी मनातून ही भगिनी ॥११॥
दत्तमहाराजांचे चक्र वळे । गुरुवारची प्रार्थना फळे ।
पुढच्या गुरुवारीच कळे । शासन निर्णय बदललेला ॥१२॥

निर्णय येई सुधारित । या भगिनीसह पुढील दोन वर्षांत ।
जे या विद्यापीठाची परीक्षा देत । त्यांची पदवी ठरेल ग्राह्य ॥१३॥
एकदा शासन दरबारी । होय कोणता निर्णय जरी ।
त्यासाठी किती आवाज केला तरी । तो न बदले लवकर ॥१४॥
ज्यांवर होई अन्याय । त्यांनी कितीही जरी केले उपाय ।
तरी दगडावर डोके फोडिता काय । हाता येई सांगा हो ॥१५॥
परंतु जेथे महाराजांचा । संकल्प होई सत्य साचा ।
तेथे 'अशक्य' शब्द कैचा । अनंत ब्रम्हाण्ड नायक जे ॥१६॥
त्यांसमोर पृथ्वीवरील । सामान्य राज्य काय करेल ।
भक्तांसाठी हे केवळ । लीला करणे होई तैसे ॥१७॥
असो, महाराजांचा पत्र व्यवहार । असे मोठ्या प्रमाणावर ।
स्वहस्ते लिहून उत्तर । पाठविती भक्तांस व इतरांस ही ॥१८॥
लहान बालिकेने ही । पत्र पाठविले त्याही ।
उत्तर पाठविले तिलाही । सुंदर आणि बोधपर ॥१९॥
एकदा एक सेवक । पाही नवेच कौतुक ।
चष्म्याच्या घरात एक । चिठ्ठी ठेविली महाराजांनी ॥२०॥
नांव-पत्ता कोणाचा तरी । लिहिला होता चिठ्ठीवरी ।
सेवक महाराजांस प्रश्न करी । उत्तर यांस का लिहिणे आहे ॥२१॥
'होय लिहायचे आहे' म्हणती । 'पण नंतर लिहू' तयाप्रति ।
रोज 'ती' चिठ्ठी वाचती । बोलती कांहीतरी स्वगतच ॥२२॥
पुनश्च चष्म्याच्या घरात । चिठ्ठी ती नीट ठेवित ।
कांही दिवसांनी 'चिठ्ठी' वाला भक्त। येई महाराजांचे दर्शनास ॥२३॥
योगायोगे सदर सेवक । उपस्थित असे आणिक ।
'तो' भक्त महाराजांचे सम्मुख । पेढे ठेवुनी नमस्कारी ॥२४॥
आनंदे सांगे सविस्तर । तो आपला समाचार ।
भाडेकरू सोडून गेला घर । कृपा आपली सर्वही ॥२५॥
सेवक करी आश्चर्य । पुसे भक्तास काय झाले कार्य ।
तो सांगे मग तात्पर्य । घरांत भाडेकरू कोणी होता ॥२६॥

तो फार त्रास देई । घर ही सोडून न जाई ।
प्रयत्न फसले सर्वही । मग कथिले महाराजांस ॥२७॥
श्रींस केली प्रार्थना । आता त्याने सोडिले सदना ।
ताबा घराचा मिळून झाले समाधाना । सांगाया आलो त्यांप्रति ॥२८॥
भक्ताने करावे स्मरण । परी इथे उलट पूर्ण ।
रोज चिठ्ठीवर नांव वाचून । आठवण काढी भक्ताची ॥२९॥
अतर्क्य रीति ऐसी । भक्त संकट निवारणासी।
त्यांचे काय ते ठाउक त्यांसी । आपणासी ते कळेल काय ॥३०॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्ठावन्नावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ५९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

संकटे पीडिता सेवक । घालिती आर्त हाक ।
न लाविता क्षण ही एक । धावी सद्गुरु तारणार्थ ॥१॥
कोणास संकटाची पूर्व सूचना । देऊन परावृत्त करी भक्ताच्या मना ।
धोक्याचे काम काही करण्या । अगोदरच करिती सावध ॥२॥
त्यासाठी कधी मोघम बोलती । कधी स्पष्ट सूचना देती ।
त्यांचे शब्द समजोन आचरती । ते तरती हे जाणावे ॥३॥
वासुदेव निवासी एक तरुण भक्त । उत्साहे सारी सेवा करत ।
भाव ही त्याचा असे निश्चित । हे बघे एक संन्यासी ॥४॥
तो म्हणे या भक्तास । जातो आम्ही यात्रेस ।
आमचे सोबत चारधामास । चलाल काय पुसे तो ॥५॥
येण्यास आवडेल खचित । भक्त ऐसे वदत ।
जेव्हा हा संवाद होत । रेणुका निवासात महाराज होते ॥६॥
त्वरेने एका सेवका कडून । निरोप पाठविला या तरुणा लागुन ।
न जावे 'त्यां' समवेत म्हणून । आजारी पडाल निश्चित ॥७॥
अंतर्ज्ञाने जाणून । भक्त संकटी पडेल म्हणून ।
त्वरित पाठविला कळवळून । निरोप ऐसा महाराजे ॥८॥
असेच एकदा एक भक्त । कार्यालयीन कामा निमित्त ।
सांगलीस स्व-वाहनाने जात । तसेच वाडीस जाई पुढे ॥९॥
दर्शनि क्षेत्री नृसिंहवाडी । तसेच घेतले औरवाडी ।
परतीच्या प्रवासे वळवली गाडी । येई खंबाटकीचा घाट ॥१०॥
गेले घाट चढोनी । इंजिन गेले बंद पडोनी ।
पेट्रोल संपले म्हणोनी । परी उतार उतरला हळूहळू ॥११॥
घाट झाला उतरून । आता कुठे पेट्रोल भरून ।
पुढे जावे तर पंप कुठेच नसून । असे थेट शिरुळलाच ॥१२॥

हे शिरूळ गांव असे । तीस किलो मीटर वर तसे ।
एक थेंब ही पेट्रोल नसे । गाडीत आता करावे काय ।।१३।।
मनोभावे श्रीं स करून प्रार्थना । दाबले स्टार्टरच्या बटना ।
आणि काय आश्चर्य पहा ना । गाडी जाय नीट पुढे ।।१४।।
शिरूळच्या पेट्रोल पंपावर । जाऊन बंद पडे ही कार ।
खात्री भक्तास एवढे अंतर । श्री कृपेनेच कार चाले ।।१५।।
पुढे पुण्यांत जाऊन । कथिले सर्व वर्तमान ।
'बरं' एवढेच उद्गारून । शांत राहती महाराज ।।१६।।
जणू त्यांचा संबंध काही । या सर्व घटनेशी नाही ।
कायं म्हणावे या कृपेस लवलाही । भक्त वात्सल्य होई ते ।।१७।।
असेच मुंबईच्या महापुरात । अडकोन पडे एक भक्त ।
गाड्या बंद म्हणोन चालत । निघे घराप्रत आपल्या ।।१८।।
कसे बसे चालून । गाठले अंधेरी स्टेशन ।
सर्व बंद तिथेही, वरून । पाऊस पडे अव्याहत ।।१९।।
तसेच निघे चालत । अनेक तसे होते कंठत ।
रस्ता आपापल्या घराचा, अनिश्चित । वाटे सर्वही पुढचे तेव्हा ।।२०।।
कसे तरी करून । आले जुहू गल्ली लागुन ।
कमरेपर्यंत राहे जल साचून । तरी चाचपडत पुढे जाय ।।२१।।
तर पुढील गल्लीत । जल आले गळ्यापर्यंत ।
हातातील वस्तू सोडून देत । शोधे आधार भिंतीचा ।।२२।।
काळोख येई दाटून रस्ता काहीच न उमजून ।
काटेरी झाड येई हातात म्हणून । आशा मावळे आधाराची ।।२३।।
इतुक्यांत एका इमारतीतून । आवाज येई वरून ।
"उपर आ जाओ" म्हणून । बोलावी एक सद्गृहस्थ ।।२४।।
कसे तरी चढून । कंपाऊंड वॉल पार करून ।
तळमजल्यात साचलेल्या पाण्यातून । जीव एकवटून वरती जाई ।।२५।।
लगेच घरात घेऊन । कोरडे देई वसन ।
चहा आणि जेवण । देई भक्तास गृहपती ।।२६।।

रात्री सुमारे पावणे अकरास । दूरध्वनी केला पुण्यास ।
स्वतःची सुरक्षितता कळविण्यास । लगेच बंद पडे फोन ही ॥२७॥
महाराजांचे स्मरण, जप करून । रात्र काढली जागून ।
पहाटे ही चहा वगैरे देऊन । गृहपती अतिथी सेवा करी ॥२८॥
कुतुहलवश पुसे भक्त । त्या दयाळू गृहस्थाप्रत ।
आम्हास कैसे आवाज दिलेत । तुम्ही वरून पाहून ॥२९॥
त्यावर तो वदे त्याही । आम्हास आवाज ऐकू येई ।
'वाचवा बचाव' ऐसा लवलाही । म्हणून वरती बोलाविले ॥३०॥
प्रत्यक्षात या भक्तानी । बचाव वगैरे म्हणोनी ।
ओरड केली नव्हती नी । किमया ही केवळ सद्गुरूंची ॥३१॥
संकट येता जो निज अंतरी । चिंती तया शिरी करधरी त्राता ॥३२॥
असे गुणगान करून । दत्तात्रेयांचे स्तवन ।
स्वतः मोठे महाराजांनी केले कवन ।
आठवू चित्ती आपण ही ते ॥३३॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणसाठावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरूचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ६०

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

चित्त माझे तव भजनी ।
लाव तूची रामा ।।
मन आवर विषयातूनी ।
'काम' हेचि रामा ।।१।।
शश झाले भव विपिनी ।
शरण देई रामा ।।
तू जनक सीता जननी ।
सांभाळी रामा ।।२।।
हनुमंत जो नत चरणी ।
तसे करी रामा ।।
सेवा भाव जो लक्ष्मणी ।
तोच देई रामा ।।३।।
भक्ति केली जी ताईंनी ।
अद्वितीय रामा ।।
राहिला आलयी येऊनी ।
त्या योगे रामा ।।४।।
नाम तुझे राहो वदनी ।
मागू हेचि रामा ।।
चित्त रमो तव भजनी ।
हेचि करी रामा ।।५।।

अवीट गोडी असे भजनी । आवडे श्रींस मनापासुनी ।
परमानंद होई भजन गायनी । ऐकण्यातही होतसे ।।६।।
सामान्य जनांची मने । न लागती भजने ।
म्हणोन त्यांसी प्रोत्साहने । भजनी मंडळ स्थापिले ।।७।।

'वासुदेव भजनी मंडळ' । नाव दिले मंगल ।
कौतुक करिती वेळोवेळ । स्वतः ही श्रवण करिती ते ।।८।।
परगुणाचा असेल कण । त्यासी देती पर्वतपण ।
सगळ्यांना देऊन मोठेपण । करिती कौतुक सर्वांचे ।।९।।
भजनातील सर्व भगिनी । सात्विक आणि श्रध्दा धारिणी ।
सात्विक या शिकविणाऱ्या आणि।
उत्तम साथी पेटी,टाळ तबला ।।१०।।
सौ लक्ष्मी आईंच्या हातानी । हळद कुंकू देववुनी ।
शाली आणि प्रसाद देवुनी । करिती सत्कार सर्वांचा ।।११।।
भजनी मंडळाचा वाढदिवस । असे गुढीपाडव्यास ।
ते दिनी कौतुक खास । करिती प्रवचन ही त्या निमित्ते ।।१२।।
श्री सद्गुरु वासुदेवायन । प.प.श्री लोकनाथ तीर्थायिन ।
श्री सद्गुरु वामन गीतायन । हे स्वरचित पद्य म्हणे एक भक्त।।१३।।
अनेक रचनांसी । चाली लावून भगिनींसी ।
शिकविले, त्या भक्तासी । बैसविती निकट श्रीगुरु ।।१४।।
चार उपदेशाचे शब्द । सांगती सर्वांस सुबोध ।
आदर प्रेम ठेऊन निर्बाध । सेवा निरंतर करीत रहा ।।१५।।
श्री हरीचे सतत स्मरण । हे वेदशास्त्रांचे सार जाण ।
काया-वाचा-मने करून । प्रार्थना सतत करीत रहा ।।१६।।
त्या गोपी असती कामात । परी हरी स्मरणे रतचित्त ।
भक्ति-ज्ञान-कर्म मार्ग अव्याहत । भारतातच हा दिसतसे ।।१७।।
संसार सागर जायचा तरून । देह त्यासी नौका म्हणून ।
सर्व इंद्रिय-बुद्धि-मन । अनुकूल दिली ईश्वराने ।।१८।।
सद्गुरु नेतील पैलपार । श्रद्धा ठेवावी ईश्वरावर ।
प्रवृत्यालिप्ताचा उद्धार । करी जो धरी प्रेम भक्तिस ।।१९।।
गोपींचा भाव धरून । जा स्वतःस विसरून ।
भक्ति भाव मिळणे ही कृपापूर्ण । दंग व्हावे हरी भजनी ।।२०।।
परमेश्वरावर सर्व सोडावे । सतत नामस्मरण करावे ।
काम-धाम विसरून कृष्णमय व्हावे । ऐसे निरोपिती महाराज ।।२१।।

काही पदे–अभंग–गीत । महाराजांस फार प्रिय असत ।
नेहेमी जी भजने म्हणत । स्वत: दत्तमहाराज ॥२२॥
पहा ते पांडव अखंड वनवासी । परी त्या देवासी, आठविती ।
आवडीने भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥२३॥
'हेचि थोर भक्ति आवडते देवा' । या पदातील उच्च भावा ।
फार आवडे श्रीगुरु रावा । 'बाजे किसन की पैंजनीया' ही ॥२४॥
असो गायनी अभंग । समाधिमग्न अंतरंग ।
आनंदे रंगे भक्तिरंग । ही त्यांची भक्ति ज्ञानोत्तर ॥२५॥
शुकदेवजींचे उदाहरण । देती महाराज आपण ।
ज्ञानी असता स्वये पूर्ण । भगवद्‌गुण गायनी सतत रत ॥२६॥
महाराजांस जे आवडले । नेहमीच ते बोलिले ।
असे तुकारामांचे पद भले । दिले इथे श्रोते हो ॥२७॥

नमो आदिरुपा ओंकार स्वरुपा विश्वाचिया रुपा पांडुरंगा ॥१॥
तुझिये सत्तेने तुझे गुण गाउ तेणे सुखी राहू सर्वकाळ ॥२॥
तुची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन सर्व होणे जाणे तुझे हाती ॥३॥
तुका म्हणे जेथे नाही मी तूपण स्तवावे ते कवणे कवणालागी ॥४॥

गोष्ट या अभंगाची । हे वाडीस गाताचि ।
प.प.स्वामीमहाराजांची । समाधी लागली ॥२८॥
असे हे देव भजन । परमानंदाचे साधन ।
"तत्र तिष्ठामि नारद" म्हणून । स्वत: देव अनुमोदित त्यास ॥२९॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
साठावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ६१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

मन कोणाचेही न दुखवणे । भाविकांच्या इच्छा सांभाळणे ।
शांतपणे सर्वांचे समाधान करणे । भक्तवात्सल्य महाराजांचे ॥१॥
आजारी असता आपण । एक भाविक भक्त येऊन ।
चौकशी करी तो प्रेमानं । शिष्य गुळवणी महाराजांचा ॥२॥
बोलण्याच्या ओघात । म्हणे तुमच्या खोलीत ।
दारे खिडक्या बंद समस्त । शुद्ध वारा येतच नाही ॥३॥
याने प्रकृतिस अपाय । शुद्ध हवेने फायदा होय ।
हे ऐकताच गुरुमाय । म्हणे सेवकांस तत्काळ ॥४॥
खरेच कि उघडा हो सारी । या खोलीची खिडक्या दारी ।
बाहेरून असेल अडसरी । ती काढून टाका म्हणे ॥५॥
भाविकांचे झाले समाधान । काही काळ बैसून ।
ते गेले निघून । मग बोलती महाराज ॥६॥
अहो ते गेलेत आता । खिडक्या बंद करा तत्वता ।
प्रत्यक्षात त्यांची इच्छा असता । म्हणूनच खिडक्या बंद असती ॥७॥
असेच एकदा झाली बहुत सर्दी । प्रकोप तिचा बहुत तधी ।
नित्य जे चिकित्सक येती । ते म्हणती महाराज वाफ घ्यावी ॥८॥
हे लक्षात ठेऊन । कढत पाणी पातेल्यातून ।
आणी एक सेवकगण । तर त्यास म्हणती महाराज ॥९॥
किती ते कढत पाणी! । सांडेल, चटका बसेल आणि ।
घेतली आता वाफ म्हणोनी । न्या परत ते पातेले ॥१०॥
या सेवकास माहित असे । वाफ घेता गुण येत नसे ।
त्रास उलट होतसे । महाराजांस नेहेमीच ॥११॥
हे जाणोन तो भक्त । पातेले नेई परत ।
दुसरे दिनी डॉक्टर येत । सर्वांत आधी श्री म्हणती ॥१२॥

कुणी काही म्हणण्या अगोदर । म्हणती आम्ही वाफ घेतली बरं ।
कढत पाणी हे सेवकवर । आणून देती आम्हासी ।।१३।।
अशाप्रकारे दोघांचेही । समाधान केले याही ।
तसेच एकादशी असता एकही । औषध न घेती महाराज ।।१४।।
दिवसाच्या गोळ्या दहा-बारा । न चुकविता देती भक्तवरा ।
जरी ते न आवडे त्यांच्या अंतरा ।
तरी सर्व समाधानार्थ घेती त्या ।।१५।।
त्यातून सर्वात पहिली । अति महत्वाची एक गोळी ।
ती घ्यायची अगदी सकाळी । चुकवू नये म्हणती डॉक्टर ।।१६।।
ती घेईस्तोवर । एकादशीचा पडला विसर ।
ऐसे भासविती गुरुवर । मग विचारिती भक्तांस ।।१७।।
कधीची एकादशी विचारिती । आजच आहे भक्त म्हणती ।
मग औषध वगैरे नको निश्चिती । आज उपवास आमचा ।।१८।।
कटाक्ष असे महाराजांचा । एकादशीस फराळ गोळ्यांचा ।
नको परी समाधान डॉक्टरांचा । करीती पहिली घेऊन गोळी ।।१९।।
हे डॉक्टर अतिशय भाविक । सोडून कामे सकळिक ।
आधी तपासण्यास बनून सेवक । येती नित्य नेमाने ।।२०।।
येणाऱ्या सर्व भक्तांप्रत । श्री रेणुका निवासात ।
चहा-दूध वगैरे देत । प्रसाद म्हणून सेवक ।।२१।।
परंतु या डॉक्टरांस । रोज कॉफी देण्यास ।
सांगती महाराज, मग त्यांस । वाटे आश्चर्य यावरी ।।२२।।
डॉक्टरांस मनापासून । कॉफी आवडे म्हणून ।
कैसे कळले महाराजां लागुन । आनंद वाटे डॉक्टरांना ।।२३।।
तब्येतीबद्दल भूमिका । त्रयस्था प्रमाणे असे का ।
कारण सांगती सकळिका । डॉक्टरांसी महाराज ।।२४।।
औषध देता आपण । आपले शास्त्र म्हणून ।
आप्तांचे ही होते समाधान । परंतु भोगही असतातच ।।२५।।
काही वेळा औषधांनी । विपरीत क्रिया होऊनी ।
आजार नवीन उद्भवोनी । त्रास वाढतो खचित ।।२६।।

म्हणून तब्येत न सुधारत । दोष त्यांचा भोगांप्रत ।
असे डॉक्टरांसच समजावित । प्रेमभरे महाराज ।।२७।।
इतर स्नेही भक्त । डॉक्टरांस दीक्षा घेण्यास म्हणत ।
परी त्यांचा व्यवसाय अतिव्यस्त । नियम वगैरे पाळावे कैसे ।।२८।।
त्यांस याची वाटे खंत । मग सौ.ताईमहाराज दिलासा देत ।
''तुमच्यावर कृपा आहेच''म्हणत ।
एकदा धीर करून श्रींस सांगती ।।२९।।
आवडे आध्यात्मिक साधन । परी उसंतच नसून ।
काही करू शकलो नाही म्हणून । खंत वाटे मजसी हो ।।३०।।
यावर त्यांस निरोपिती । सद्गुरु वात्सल्यमूर्ति ।
साधने दोन तऱ्हेची असती । व्यष्टिची आणि समष्टिची ।।३१।।
आमची पद्धत एकांतात । साधन ते व्यक्तिगत ।
सर्वांमधे परमात्म भावात परिणत । होते ती शेवटी ।।३२।।
डॉक्टर म्हणून रुग्णसेवा । ती समजून ईशसेवा ।
ठेवून सर्वेश्वर भावा । फलप्राप्ती तीच होय ।।३३।।
एक सोपी पद्धत । दुसरी ती कष्टप्रद ।
परि पुढे कधी एकांतात । साधने लवकर मिळेल सिद्धि ।।३४।।
असे आश्वासून । डॉक्टरांचे केले समाधान ।
रुग्णसेवा हे सर्वेश्वर सेवन । असे उद्बोधन केले त्यांनी ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकसष्टावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ६२

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

आधि व्याधि उपाधि सर्व ।
टळे स्मरणमात्रथी शर्व ।।
मूठचोट ना लागे जाण ।
पामे नर स्मरणे निर्वाण ।।१।।
(श्री दत्तबावनी-श्री रंगावधूतम.)

पूर्व कर्मप्रारब्धानुसार । भोग भोगिती सर्व नर ।
परी काकुळती येता सत्वर । यातून तारिती श्रीगुरु ।।१।।
भक्त त्यांचे कष्टता । आधि-व्याधिने पीडिता ।
दया येई गुरुनाथा । धांवा करिता आर्तपणे ।।२।।
या सर्व संकटांवर । भौतिक उपायांबरोबर ।
दैवी उपायही करणेवर । भर असे जयांचा ।।३।।
शरीर ही नौका असे । भवसिंधूतून तारीतसे ।
स्वस्थ राहता ते तसे । उपासना मग घडताती ।।४।।
व्याधिग्रस्त अनेक भक्त । कोणाची शस्त्रक्रिया होत ।
कोणाचे बाळ हो आजारे त्रस्त । कोणास दुर्धर रोग होई ।।५।।
या सर्वांचे संकट निवारण । करण्या करिती सांत्वन ।
अघोरकष्टोद्धरण स्तोत्र पठण।कोणास विष्णुसहस्त्रनाम सांगती ।।६।।
सप्तशतीचे पाठ कोणास । सांगती कुलदेवाची उपासना करण्यास ।
कोणास जपानुष्ठान औषधास । ऐसे उपाय सांगती ।।७।।
याप्रमाणे करिता आचरण । रोग बरा होई पूर्ण ।
कोणाची शस्त्रक्रिया छान होऊन । सुखरूप प्रसूत होई कोणी ।।८।।
कोणास मोठ्या रोगाची संभावना । परी श्री निरोपित उपासना ।
निदानात मोठा रोग निघेना । ऐसे ही घडतसे ।।९।।

या सर्व घटना । चमत्कार वाटे डॉक्टरांना ।
जे कधीच पाहिलेना । ऐसे घडती आश्चर्य ॥१०॥
एक भक्ताचे वडील । कॅन्सरने ग्रस्त केवळ ।
मुंबईचे एक इस्पितळ । त्यात भरती होते ते ॥११॥
भक्तास कळे वर्तमान । महाराज आले मुंबई लागुन ।
त्यास वाटे दवाखान्यात येऊन । दर्शन द्यावे वडिलांस ॥१२॥
भक्त विनवी महाराजांना । एकदा येऊन वडिलांना ।
कृपादृष्टीने पहा ना । गाडी त्यासाठी योजितो ॥१३॥
दौऱ्याचे पूर्ण नियोजन । करणाऱ्या एका भक्तानं ।
सांगितले दवाखान्यात येणं । शक्य नाही अजीबात ॥१४॥
निराश होई तो भक्त । परी मनोमन प्रार्थना करित ।
दुसरे दिनी सकाळी अकस्मात। गाडी थांबे दवाखान्यासमोर ॥१५॥
महाराज त्यातून उतरले । आजारी वडिलांस भेटले ।
विचारपूस करून सांत्वन केले । गेले निघून आले तैसे ॥१६॥
प्रत्यक्षात होते घडलेले । घटनाक्रमच वेगळे ।
आधल्या रात्रीच महाराज परतले । होते मुंबईतून श्रोते हो ॥१७॥
असो, एक भगिनी गेली माहेरी । तिथे येऊन अचानक घेरी ।
बेशुद्ध पडे धरणीवरी । न ये शुद्धिवर लवकर ॥१८॥
येई जरी शुद्ध तिला । काहीच न कळे जिवाला ।
नेऊ दवाखान्यात हिला । आप्तेष्ट म्हणती तयेवेळी ॥१९॥
होती सकाळची वेळ ती । चिकित्सकीय सुविधा तिये प्रति ।
मिळेल का नाही वेळेवरती । काळजी वाटे सर्वांस ॥२०॥
एक जवळ इस्पितळ । नांव 'साँई हॉस्पीटल' ।
तिथे नेऊन कंपाउंडर जवळ । जाती नातलग नांव देण्या ॥२१॥
नांव हिचे सांगता । कंपाउंडर म्हणे अकस्माता ।
नांव तुमचेच नोंदवले आता । सुविधा ही देण्यास सांगितली ॥२२॥
सर्वांस आश्चर्य फार । संपर्क न करता अगोदर ।
कोणी कसे रजिस्टर वर । नांव नोंदविले भगिनीचे ॥२३॥

विचारता ते महाशय वदले । एक वृध्द गृहस्थ येऊन गेले ।
धोतर उपरणे घातलेले । कपाळी गंध असे त्यांच्या ।।२४।।
या भगिनीचे नांव सांगून । वैद्यकीय सहाय्य लवकर द्या म्हणून ।
सूचना करिती आम्हा लागुन । नांव त्यांचे विचारले ।।२५।।
त्यावरुते 'कवीश्वर' । ऐसे दिले उत्तर ।
ऐसे ऐकता सर्व आप्तवर । आश्चर्ये नेत्र विस्फारिती ।।२६।।
असेच एक भगिनीस डॉक्टर । म्हणती संभाविते कॅन्सर ।
तपास करण्या त्यावर । सांगितले तयांनी ।।२७।।
हे कुटुंब सर्वही । श्रींचे असती अनुयायी ।
करिता तपास त्याही । कळे कॅन्सर असे म्हणून ।।२८।।
दुसरी स्नेही भक्त भगिनी । हे कळवी महाराजांलागुनी ।
नमुने असतील बदलले म्हणोनी ।
पुन्हा तपास करण्यास सांगती ।।२९।।
जरी त्या दिनी नमुना एकच । तपास होई या भगिनीचाच ।
नमुना त्या प्रयोगकक्षी, परी श्रींचाच। निरोप मान्य करिती ते ।।३०।।
पुन्हा तपास करिता । नाही काही रोग हे कळता ।
महाराजांची कृपाच ही तत्वतां । नमुने बदलणे नव्हतेच शक्य ।।३१।।
याच भगिनीस पुढे । क्षयाचा विकार जडे ।
दत्तस्तव स्तोत्राचे पाठ एवढे । त्यातील श्लोकाचा जप सांगती ।।३२।।
ऐसे भावे आचरित । रोग तिचा जाई समस्त ।
अशी कृपा अगणितांवर करत । भक्तवत्सल श्रीगुरु ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
बासष्टावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ६३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक प्रेमळ भक्त । लांब पुण्यापासुन रहात ।
प्रकृति आईसाहेबांची ठीक नसत । घटना ही त्या काळची ॥१॥
बरे वाटावे आईसाहेबांसी । ऐसा भाव ठेवून मानसी ।
घोरात् कष्टात् १०८ पाठांसी । करिता झाला पहाटेसच ॥२॥
श्री महाराजांचा पत्रव्यवहार । होई याचेशी वरचेवर ।
काही पाठविता मनीऑर्डर ।
पत्रोत्तरांत मिळण्याचा उल्लेख करिती ॥३॥
पाठ केला तेच दिनी । मिळे श्रींचे पत्र येऊनी ।
सौ. आईसाहेबांस बरे म्हणोनी । लिहिती त्यांत श्रीगुरु ॥४॥
विशेष म्हणजे या पत्रास । लिहिले त्याच तारखेस ।
त्याच दिवशी पुण्याहून भक्तास । मिळे पत्र हे आश्चर्य ॥५॥
अतर्क्य असे त्यांची लीला । न कळे सामान्य बुद्धिला ।
शतशः प्रणाम गुरुवराला । असो, अशीच घटना पुढील ॥६॥
मुंबईहून काही भक्त मंडळी । पुण्याला दर्शनास निघाली ।
कागदपत्र विशेष त्यांजवळी । श्रींच्या सहीस चालविली ॥७॥
त्यांवर सही झाल्यावर । पुण्यातील जे घर ।
बांधकामास त्याच्या गति येणार । म्हणूनी जाती मिळून सर्व ॥८॥
स्वतःची गाडी असून । सगळ्यांच्या घरी फिरून ।
घेई सर्वांसि गोळा करून । याप्रमाणे आले पांचव्या घरी ॥९॥
त्या दारातच तेथिल गृहिणी । सांगे सर्वांलागुनी ।
महाराजांचे पत्र आले म्हणोनी । आश्चर्य वाटे सर्वांना ॥१०॥
एक दिवस आधी लिहिलेले पत्र । खर्डा ग्रामाहून ते येत ।
महाराजांचा दौरा सुरु असत । पुण्यास येऊ दो एक दिनी ॥११॥

तेव्हा आजचे दिनी । न यावे पुण्यालागुनी ।
हे पत्र महाराजांचे वाचुनी । आश्चर्य सर्वांसि वाटले ।।१२।।
ते पुण्यास भेटतील म्हणून । होते सर्व गृहित धरून ।
कोणीही न कळविता कळून । कैसे आले हे महाराजांसी ।।१३।।
विशेष म्हणजे आदले दिनी । पोस्ट केलेले पत्र लांबुनी ।
मुंबईस दुसरेच दिनी मिळोनी । फेरी वाचे सर्वांची ।।१४।।
यासाठी खटपट केवढी । भक्तवत्सलता आभाळा एवढी ।
सर्व भक्तांवर ती चौघडी । घातली असे प्रेमाने ।।१५।।
असेच जालन्यास एकदा । महाराजांचा मुक्काम होता ।
काही पत्रे लिहून भक्ता । सांगती पोस्ट पेटीत टाकण्या ।।१६।।
निरोपिती त्यास गुरुवर । पेटी आहे घरासमोर ।
त्यात या टाकून हे पत्र, बरं । म्हणोनी घेई तो भक्त ।।१७।।
हे जाणून गृहस्वामिनी । सांगे भक्तालागुनी ।
कधी कधी चार दिनी । न उघडतात ही पेटी ।।१८।।
द्याजी ती पत्रं मला । मी देते ती सेवकाला ।
मुख्य पोस्टात देऊन भला । येईल तो म्हणोन ।।१९।।
भक्तास नसे कल्पना । महाराजांच्या आज्ञापालना ।
काय महत्व, त्याचे मना । पटे गृहिणीचे भाषण ।।२०।।
त्याप्रमाणे ती पत्र । तो गृहिणीस देत ।
नंतर महाराज भक्ताप्रत । पुसते झाले पत्रांचे ।।२१।।
यावर घडलेली हकीगत । सांगे महाराजांस तो भक्त ।
श्री किंचित नाराज होत । म्हणती त्या भक्तासी ।।२२।।
मागे याच पेटीत । टाकिली पत्रे समस्त ।
ती सर्वांसि वेळेवर मिळत । मग काय असे ते केले हो ।।२३।।
यावर समजे भक्तास । श्रींचे शब्द असती खास ।
पाळावे ते समयास । हे पटवून दिधलेसे ।।२४।।

यावरून श्रींचे प्रवचन । पटे मनालागुन ।
न रहावे जास्त गुरु सन्निधान ।
योग्य दृष्टी नसे गुरुदर्शनी आपली ।।२५।।
गुरुविषयी जर । नसे प्रेम अपरंपार ।
गुणग्राहकता नसेल तर । सामान्य वाटती ते आपणास ।।२६।।
मग चार चौघा सारखे दोष । दिसती त्यांमधे विशेष ।
पेक्षा लांबून स्मरण करिता पाश । कुबुद्धिचा तुटतसे ।।२७।।
'अतिपरिचयादवज्ञा' म्हणून । श्री चरणी लावून मन ।
भाव नसता ही निशि दिन । स्मरण करता फळ मिळे ।।२८।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्रेसष्टावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ६४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

काय मागावे गुरुजवळी । काय न मागावे केवळी ।
त्यांचे शब्द जाणून वेळी । आचरण करावे कैसे ते ॥१॥
हे पुढील घटने वरून । येई आपणांस समजून ।
पूर्ण विचार आधी करून । मग बोलावे श्रीं जवळी ॥२॥
एक दंपती रेणुका निवासाप्रत । स्वकन्येस घेऊन येत ।
ती असे विवाहित । सासरी फार त्रास असे ॥३॥
म्हणती महाराजांस माता-पितर । हीस सासरी कष्ट फार ।
ही जीव वाचवून गाठे माहेर । तरी घटस्फोट मिळावा हिला ॥४॥
या साठी आशिर्वचन । मिळावे तुमचे म्हणून ।
आलो घेण्यास दर्शन । यावर बोलती श्रीगुरु ॥५॥
आम्ही गुरुमहाराजांजवळी । प्रार्थना करू ये वेळी ।
नीट वागवतील सासर मंडळी । संसार सुखाचा होवो अशी ॥६॥
हळुवारपणे अनेक वार । सांगती परी माता-पितांचा निर्धार ।
घटस्फोटच व्हावा यावर । भर असे त्यांचा बहुत ॥७॥
यावर शेवटी निरोपित । आमचे कडे नाही मिळत ।
असा आशीर्वाद, चला म्हणत । मंगलाशिर्वचनच मिळेल ॥८॥
असेच सद्गृहस्थ एक । भक्त दत्ताचा भाविक ।
बांधावे देऊळ आणिक । मूर्ति स्थापनेची ईषा असे ॥९॥
वरचेवर महाराज यास । सांगती या समयास ।
चोख व्यवस्था देवांस । ठेवणे कठिण जाहले ॥१०॥
जरी स्थापिले दैवत । परी त्यांचे पूजन यथास्थित ।
सोवळे वगैरे पाळणे प्राप्त । होईल तुम्हाकडुनी काय ॥११॥
मोठ्या महाराजांसी दत्तमूर्ती । स्वतः बोलून मार्गदर्शन करिती ।
त्यांचे उदाहरण या भक्ताप्रति । देऊन समजाविती श्रीगुरु ॥१२॥
परी हे न समजे भक्त । न सोडी हेका खचित ।
हट्टाने मंदिर बांधत । स्थापनेचा मुहूर्त गुरुंस विचारी ॥१३॥
पुनः महाराज भक्तास । समजाविती करून सायास ।
जर व्यवस्थित न केले देवांस । सर्वनाश ओढवेल ॥१४॥

तरीही तो हट्टास । न सोडी त्या समयास ।
हे उचित कां भक्तांस । गुरु सांगती तरी न ऐके ।।१५।।
कधी आवाज चढवून । न सांगती रागवून ।
सौम्यपणे समजावून । सांगती गोष्ट प्रत्येक ।।१६।।
त्यामुळे जे निरोपिती । त्याप्रमाणे जे आचरिती ।
त्यांचे सांगणे ऐकती । उध्दरिती हे निश्चित ।।१७।।
त्यांनी सांगितलेली उपासना । जप वगैरे लावून मना ।
करावी अधिकाधिक सेवा-पूजन । मग त्रास त्यांचा वाचेल ।।१८।।
आपलेही तेणेकरून । लवकर गति मिळून ।
ऐहिक पारमार्थिक उन्नति होऊन । सुफळ मिळेल निश्चये ।।१९।।
एक भक्त त्यांच्या सहवासात । राहता त्यास समजत ।
रात्रभर महाराज राहती कण्हत । झोप न त्यांसी नीट लागे ।।२०।।
हे जाणून हो दुःखित । सांगे हे ताईमहाराजांप्रत ।
तेव्हा त्या भक्तास म्हणत । तुम्हास हे समजणे हितकर ।।२१।।
सर्व शिष्यांची दुःख समस्त । ते स्वतःच भोगतात ।
नामस्मरण वाढवणे फक्त । प्रार्थना करणे त्यांच्यासाठी ।।२२।।
इलाज हाच यावर । सेवा आपली होई कमतर ।
अर्थ हाच खरोखर । या महाराजांच्या दुःखाचा ।।२३।।
यावरून सर्वांनी । घ्यावे हे जाणोनी ।
अधिकाधिक उपासना करूनी । जास्तीत जास्त करावा जप ।।२४।।
आपल्या अडीअडचणी । दुःखे आपली त्यांलागुनी ।
सांगतो, तयावर दया करूनी । त्याचे दुःख स्वतः घेती ।।२५।।
यामागे दयाबुध्दि महान । सन्मार्गी लागावा भक्त म्हणून ।
स्वतः कर्मबंधातून मुक्त असून । भोग भोगती भक्तांचे ।।२६।।
धन्य हे संत सज्जन । दुःखाचे ऊन सोसून ।
सुखाची साउली देऊन । प्रपंच पांथस्थास आसरा देती ।।२७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौसष्टावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ६५

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

एका भक्ताची कथा सुरस। स्मर्तृगामी दत्तात्रेयां परिस ।
अहेतुकी कृपेचा पाऊस । वर्षविती दयाघन महाराज ।।१।।
भक्त जरी असे दूर । भावनेने स्मरता सत्वर ।
देती भक्तास साक्षात्कार । समीपता गुरूंची जाणवे ।।२।।
गुरुचरित्राचे आकर्षण । वाटे पत्नीस ही ऐकावे म्हणोन ।
परी दोघे नोकरदार, ओढ ताणून । वेळ सांभिळीती वाचनाची ।।३।।
नियम सर्व पाळून । केले सद्ग्रंथाचे वाचन ।
पत्नीने ही भावे श्रवण । केले असे साचार ।।४।।
ग्रंथवाचन होता पूर्ण । करावे ग्रंथरुपी गुरूंचे पूजन ।
वाटे दंपतीस म्हणून । सामग्री सर्व जमविती ।।५।।
बेल, तुळशी घेऊन । सुगंधित पुष्प वाहून ।
केले गुरुचरित्राचे पूजन । भावपूर्ण अंत:करणे ।।६।।
तव उभयतांस दर्शन । झाले तेथे विलक्षण ।
गुळवणी महाराज होते बसून । समोर होते दत्तमहाराज ।।७।।
महाराजांच्या मांडीवर । ताजे बेल तुळसीदल रूचिर ।
सुमने वाहिलेली होती गोचर । पावली पूजा प्रचिती दिली ।।८।।
असेच एक भगिनी । एक भजन आळवून म्हणी ।
मीराताईंचे पद म्हणोनी । तेथे मोठा फोटो श्रींचा ।।९।।
"पवित्र ही गंगा । तुझ्या पायापाशी ।
कशाला मी जाऊ । तीर्थक्षेत्र काशी" ।।१०।।
असे म्हणता लक्ष वळे । श्रींच्या फोटोत पाया जवळे ।
छोटे बिंदु दिसे जले । आश्चर्य वाटे भगिनीस ।।११।।

श्रींच्या फोटोवर त्याही । जल उडण्याचे कारण काही ।
नव्हते, पाणी तेथून नेले नाही । मग कैसे हे आले येथ ॥१२॥
फोटो वस्त्राने पुसून । पुन: कामात गुंगून ।
त्याच पंक्ति गुणगुणून । राही ती भगिनी तेव्हा ॥१३॥
पुनश्च श्रींच्या फोटोवर । चरणांपाशी जलबिंदु गोचर ।
होता, लक्षात ये सत्वर । पदातील प्रचीती गुरु देती ॥१४॥
पवित्र ते गंगाजळ । दिसे श्रींच्या चरणाजवळ ।
कृपा त्यांची ही केवळ । गंगादर्शने मन आनंदे ॥१५॥
विविध दर्शनि अनुभव देऊन । समाधानिती भक्तांचे मन ।
याची काही उदाहरण । ऐकावी श्रोते समस्त ही ॥१६॥
एक भक्त । अर्थसल्लागार असत ।
गुंतवणूकित लाभ वांछित । मिळावा कैसा आणिक ॥१७॥
कर आकारणीत सवलत । कशी मिळावी या विषयात ।
समन्वय करून सांगत । तज्ञ मार्गदर्शक तो असे ॥१८॥
हा त्याचा व्यवसाय तर । असे करकरीत व्यवहार ।
उपासनादिकांपासून फार दूर ।
अशिलांस वागवी व्यावसायिकपणे ॥१९॥
अशा स्थितीत अनवधाने । या व्यावसायिक दृष्टीकोने ।
भक्ताची हानी न होणे । काळजी याची महाराजांस ॥२०॥
एके रात्री स्वप्नांत । महाराजांचे दर्शन होत ।
सांगती गुरु त्याप्रत । अमुक नांवे तुझ्याकडे ॥२१॥
कोणी येईल एक माणुस । नित्य व्यावसायिक कामास ।
पूज्य टेंबे स्वामींच्या भक्त परंपरेस । आहे तो जाण निश्चये ॥२२॥
दुसरे दिवशी खरोखर । त्या नांवाचा माणूस दूरध्वनिवर ।
बोले तेव्हा हा भक्तवर । करी आश्चर्य मनोमन ॥२३॥
व्यावसायिक काम काही । होते व्यक्तिस त्याही ।
ठरल्या वेळेप्रमाणे भेट होई । व्यावहारिक बोलणे होई सर्व ॥२४॥

भक्त मग विचारी त्यास । संबंध आपला श्री दत्तसंप्रदायास ।
आहे काही उपासना विशेष । सांगा विस्तारे मजसी ते ॥२५॥
तो अशिल करी आश्चर्य । काय विचारिती हे तज्ञवर्य ।
तो सांगे आमचे कुलगुरुवर्य । श्री प.प.वासुदेवानंद सरस्वती ॥२६॥
गोवा प्रांतात पूर्वी एक । श्री दत्तस्वरूप साठे महाराजनामक ।
मोठ्या महाराजांचे शिष्य भाविक । झाले त्यांचा वंशज मी ॥२७॥
या परिचयातून । उत्कर्ष काही होईल म्हणून ।
मार्गदर्शन स्वप्नातून । केले श्रद्धा ही भक्ताची ॥२८॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
पासष्टावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ६६

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

भक्तकामकल्पद्रुम । हे सद्गुरुंचे नाम ।
पूर्ण करी भक्त काम । अशी कथा ही असे ।।१।।
कल्पवृक्षास मागता । मग होई पूर्तता ।
गुरु त्याहून श्रेष्ठ तत्वतां । न मागताच मिळे सर्व ।।२।।
वडील या भक्त भगिनीचे । भाविक अनुयायी महाराजांचे ।
अनेकदा गृही ही यांचे । जाती श्री दत्तमहाराज ।।३।।
वडीलधारे आदरणीय । वाटती, त्यांचे अनाकलनीय ।
न समजे अधिकार तो काय । शक्तिसंपन्न सद्गुरुंचा ।।४।।
नित्य वासुदेव निवासी । सेवा या भगिनीसी ।
एकदा माध्यान्ह समयासी । आली आश्रमालागुन ।।५।।
वेळ भोजनाची असत । सोवळ्यातली होती पंगत ।
ही भगिनी देवदर्शन घेत । सहज येई मनी तिच्या ।।६।।
पंक्तिलाभ महाराजांचा । कधी आपणांस होईल साचा ।
शक्य काय हे, उगाचचा । मनी धरी विचार ।।७।।
पुढे औदुंबर दर्शन । घेई सावकाश करून ।
निघण्यापूर्वी देवासमोर येऊन । नमस्कारी पुनश्च इतुक्यात ।।८।।
एक सेवक घाईने येत । या भगिनीस सांगत ।
श्री जेवायचे थांबले आहेत । चला आंत बोलाविले ।।९।।
आश्चर्य वाटे फार हिला । थोडा संभ्रम पडे तिला ।
खरेच बोलावले का मला । का कुणा दुसऱ्यास हो ।।१०।।
सेवक म्हणे निश्चितच । बोलाविले तुम्हासच ।
वेळ दवडू नका उगाच । सत्वर चला म्हणतसे ।।११।।
आत जाई भगिनी । शेजारीच पान ठेवोनी ।
थांबले महाराज हे पाहोनी । आनंदाश्रू येती तियेस ।।१२।।

ही भक्त भगिनी । रेणुका निवासास ही जावोनी ।
सद्‌गुरु दर्शन घेवोनी । येई ती वरचेवर ॥१३॥
कुळधर्म कुळाचारास । प्रसाद भोजनास ।
असे रेणुका निवासास । हिच्या मनांतही एकदा येई ॥१४॥
कुळधर्म प्रसाद भोजनास । मिळेल का कधी आपणास ।
एकदा जाता दर्शनास । महाराज विचारिती हीस काय ॥१५॥
अमुक दिनास काय । सुट्टी तुम्हास होय ।
नाही असे कार्यालय । असे म्हणे ही भगिनी ॥१६॥
होवून इतर विषय । भगिनी घरी जाय ।
हे संभाषण ही विसरून जाय । तो एक दिनी अकस्मात ॥१७॥
एक गुरुभक्त येऊन । देई चार खणांचा टिफिन ।
आला तो रेणुका निवासाहून । निरोप ही दिधला महाराजांचा ॥१८॥
ताईंस त्या म्हणावे । आम्ही भोजन करण्यापूर्वे ।
भरले हे पदार्थ बरवे । खावे कार्यालयातून आल्यावर ॥१९॥
नोकरीमुळे भगीनीस । न साधे प्रसाद वेळेस ।
म्हणोन ही योजना सरस । केली भक्तवत्सल सद्‌गुरुंनी ॥२०॥
कळे या प्रसंगांवरून । भक्तकामकल्पद्रुम म्हणून ।
जे देवाचे बिरुद ते पूर्ण । करिती सद्‌गुरु कृपाने ॥२१॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
सहासष्टावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ६७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

श्रीक्षेत्र हरिहरेश्वर । तेथे जाती गुरुवर ।
गुरुचरित्र सप्ताह रुचिर । होई एका भक्तगृही ।।१।।
अंगणात मोठ्या मंडपात । श्रींचे आसन तेथे मांडत ।
एक संन्यासी होते महाराजांसोबत ।
औदुंबरतळी त्यांचे आसन केले ।।२।।
येती महाराज मंडपात । परी तयार आसनावर न बसत ।
पाट घेऊन भिंतीस टेकत । बैसले श्रीगुरु आपण ।।३।।
याचे कळे ना कारण । एका भक्तास ये समजून ।
संन्यस्ताहून किंचित उच्च आसन । म्हणोन नाही बैसले ।।४।।
सर्वोच्च मानाचा अधिकारी । संन्यासी पुरुष निज परंपरी ।
शास्त्रयुक्त आचरण निर्धारी । सतत भान त्याचे असे ।।५।।
असेच सहस्त्रचंद्रदर्शन शांतीस । श्री वासुदेव निवासास ।
येई एक संन्यासी त्यास । साष्टांग वंदन करते झाले ।।६।।
कर्नाटकातील ते संन्यासी । षोडशवर्षीय तरुण वयासी ।
धार्मिक शंका समाधानासी । आले होते श्रींकडे ।।७।।
करण्या लोकशिक्षण । करिती ऐसे आचरण ।
एका व्यक्तिस वाटे नूतन । हे वागणे महाराजांचे ।।८।।
त्यास वाटे यांचा अधिकार । नसे, यांस न्यूनगंड फार ।
म्हणोन गुरुमहाराजांच्या आसनावर । तसेच खोलीत न बैसती ।।९।।
पुढची मजल गाठून । हा करी प्रत्यक्ष प्रश्न ।
जरी उत्तराधिकारी आपण । तरी त्यांचे आसनी न बैसती ।।१०।।
मंद स्मित करून । महाराज म्हणती आपण ।
गुरुमहाराजांच्या समोर जाण । कधीच बसलो नाही ते ।।११।।
आज आमचे सद्गुरु नाही । ऐसे आम्ही मानत नाही ।
मग आसनी त्यांच्या आम्ही । बसावे कैसे ते सांगा ।।१२।।

गुरुनिष्ठा त्यांची उत्तुंग । दाखवी हा प्रसंग ।
थोरपण त्यांचे अव्यंग । प्रकटे सानपण घेऊन ।।१३।।
असो, क्षेत्र कुरवपुरात । सप्ताहे श्री भागवत ।
परी थंडी कडाक्याची तेथ असत। न मानवे सामान्य भक्तांसी ।।१४।।
तेव्हा एक भगिनी । म्हणे स्वेटर देते गुरुंलागुनी ।
महाराज सांगती नको मज, शिवूनी । द्या गोपाळकृष्णासी ।।१५।।
त्याप्रमाणे भक्त भगिनी । कृष्णास देई स्वेटर विणुनी ।
तर सप्ताहपूर्वी सर्व थंडी जाऊनी ।
कोणासही त्रास न होई सप्ताहात ।।१६।।
जाणवे सर्वांसि हा बदल । परि त्याचे कारण केवळ ।
न कळे कोणास उपाय विमळ। केला दयाळू महाराजांनी ।।१७।।
येथीलच प्रसंग हा जाण । कुरवपूर बेट असे म्हणून ।
जावे लागे चालत पाण्यातून । किंवा नौकेतून जावे लागे ।।१८।।
श्री निघाले परत जाण्या । ओहोटी पडे कृष्णेच्या पाण्या ।
नाव अशक्य किनाऱ्यास येण्या ।चिखलातून ही जाणे न शक्य ।।१९।।
तेव्हा आता करावे काय । संयोजक शोधिती उपाय ।
सहज पाही उभा, अंतराय । एक भक्त मुंबईकर ।।२०।।
श्रींच्या चरण स्पर्शासि । हळू हळू भरती येई कृष्णेस ।
तो हे सांगे संयोजकांस । तेव्हा नाव किनाऱ्यासी लागे ।।२१।।
श्रीगुरु नावेत बैसले । नावेसह कृष्णेने ही प्रयाण केले ।
प्रवाह पूर्ववत जाहले । नाव जाता श्रीगुरुंची ।।२२।।
जेथे असे निष्ठा देवावर । त्यावरीच घातला भार ।
तो स्वत:च मग लावी पार । प्रत्यय या प्रसंगातून येई ।।२३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सद्दुसष्टावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ६८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एका मोठ्या शहरात । राही एक ब्राम्हण भक्त ।
वेदविद्या निपुण असत । अनुग्रहित महाराजांचा ॥१॥
परिस्थिती सामान्यच त्याची । इच्छा बहुत मनात साची ।
गृही आपल्या भागवत सप्ताहाची । सांगता व्हावी श्रीमुखे ॥२॥
कळता म्हणती श्रीगुरु । तुमच्या शहरांत लवकरू ।
सप्ताह आहे त्याच सुमारू। तुमचेकडे ही करू एक ॥३॥
मोठा श्रीमंत प्रतिष्ठित । परंतु भाविक सद्गृहस्थ भक्त ।
त्याकडे श्रींचा सप्ताह होत । तेथे सेवेस ब्राम्हण राहे ॥४॥
अलोट गर्दी श्रवणास । अमित होई अन्नदानास ।
दोन दिवसांनी द्विजगृहास । ठेविती पुढील सप्ताह ॥५॥
सर्व दर्शनार्थी भक्तांसी । सांगती स्वत: सप्ताहासी ।
योजिले पुढील, तरी येण्यासी । महाराज त्यांसी निरोपिती ॥६॥
मनी विचार करी ब्राम्हण । यथाशक्ति तयारी केली आपण ।
परी एवढ्या मोठ्या प्रमाण । अन्नदानादि होईल कैसे ॥७॥
इकडे भक्त श्रीमंत । नमस्कारी महाराजांप्रत ।
आपुल्याकृपे यथोक्त । कार्यक्रम पार पडे सर्वही ॥८॥
परंतु धान्यादि सकल सामग्री । जमविली होती सप्ताहार्थ बरी ।
अर्ध्याधिक सर्व ती उरी । काय करावे त्याचे हो ॥९॥
देउळांत द्यावे नेऊन । किंवा टाकावे वाटून ।
गोरगरिबालागुन । सांगावे मज श्रीगुरु ॥१०॥
महाराज म्हणती हासून । द्यावे पुढील सप्ताहालागुन ।
दान सत्पात्री ब्राम्हण । दो सप्ताहाचे पुण्य घडे ॥११॥
आनंदे दे सर्व सामान । दोन बैलगाड्या भरून ।
नेई द्विजगृहालागून । साश्चर्य आनंद त्यासी होई ॥१२॥

प्रेमाश्रू वाहे नेत्रातून । महाराजांस गृही आणी ब्राम्हण ।
चोहीकडे पाहती फिरून । महाराज गोठ्याकडे ही जाती ।।१३।।
मोठी एक गौ माता । उभी तिच्याकडे पाहता ।
घरचाच असेल दूधदुभतां । विचारती गुरु ब्राम्हणासी ।।१४।।
तो भक्त म्हणे हीचे झाले वय । तरी ही सुफलित न होय ।
अशी ही वांझ असे गाय । श्रीगुरु जाती तियेजवळी ।।१५।।
कृपार्द्र दृष्टीने पाहून । कपाळी, पाठीवर हात फिरवून ।
होईल सुफलित धेनू म्हणून । आशिर्वचन देते झाले ।।१६।।
तत्कृपे सप्ताह भागवत । होई धूमधडाक्यांत ।
काही तेथे कमी न पडत । अन्नदान ही विपुल होई ।।१७।।
कार्यक्रम झालिया संपन्न । वांझ धेनू सुफलित होऊन ।
कालवड एक जन्मून । दूध दुभते विपुल होय ।।१८।।
स्पर्श जिथे महाराजांचा । तिथे वास लक्ष्मीचा ।
लेश न राही कमतरतेचा । आठवण पुढील अशीच असे ।।१९।।
देऊळगांवी कार्यक्रम असे । दत्तशास्त्री तरुण तसे ।
भोजनांस पांच पन्नासे । येतील म्हणून संयोजक ।।२०।।
पाक त्याप्रमाणे सिद्ध करिती । परि प्रसादे लोटे बहुत गर्दी ।
संयोजक चिंता करिती चित्ती । सरस्वती आईंस हे कळे ।।२१।।
सामर्थ्य अपुल्या बाळाचे । ठाऊक त्यांस असती साचे ।
बोलावून त्यांस वदती वाचे । "नैवेद्य दाखीव बाळदत्ता" ।।२२।।
त्वरेने नैवेद्य दाखवून । स्वयंपाकगृही जाऊन ।
केले अन्नावर प्रोक्षण । प्रसाद भोजन सुरू होई ।।२३।।
तेवढ्याच अन्नात । जेविती जन सहस्त्र ।
भंडारा मोठा निश्चित । होई ते दिनी देऊळगांवी ।।२४।।
स्वमुदेऽभवन्नवृद्धिकृत्सुवशाया अपि वंशवृद्धिकृत् ।
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परावरा गतिः ।।२५।।
वंदून नरसिंह सरस्वती । गाई महती वासुदेव यति ।
योग्य येथ याच पंक्ति । वंदन अमित या गुरुपरंपरेस ।।२६।।

जैसी लीला गुरुचरित्रात । तैसीच पुनः या अवतारात ।
दाविती करून सहज त्यात । भक्ताधीनत्व दिसतसे ॥२७॥
म्हणून मनापासून । करू गुरुवरांसी वंदन ।
गुरुचरित्र हे अगाध म्हणून । कणभर तरी समजून यावे ॥२८॥
अशी करून प्रार्थना । अध्याय हा गुरुचरणा ।
अर्पून पुढील कथा भाग श्रवणा । सावध व्हावे श्रोते हो ॥२९॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
अडसष्टावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ६१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एका गावी दत्तयाग । योजिती भक्त महाभाग ।
दत्तमहाराजांस यज्ञ समयास भाग । येण्यास निमंत्रिती भावे ते ॥१॥
दत्तमहाराज असती दौऱ्यावर । काही भक्तांकडे होते जाणार ।
तेथून यागग्रामी येणार । कळविती ते भक्तांस ॥२॥
परंतु अचानक प्रकृतित । महाराजांच्या बिघाड पडत ।
सर्व पडले काळजीत । जाणे होते पुढील गावी ॥३॥
त्या गांवचे भाविक भक्त । श्रींस भेटण्या येती धांवत ।
बघून त्यांस श्री म्हणत । स्वतः हे आम्हास नेण्या आले ॥४॥
तेव्हा जाणे असे प्राप्त । आश्चर्य करिती भक्त ।
जाती पुढील गावात । सौ.आई,सौ.ताई समवेत ॥५॥
तेथे मुक्काम एक दिनी । विश्रांती पूर्ण घेवोनी ।
म्हणती त्या भक्तालागुनी । दत्तयाग जो योजिला ॥६॥
बोलाविले तेथ आम्हास । तेथ न जाता उपवास ।
घडेल हो देवांस । म्हणून उशीर ही न करावा ॥७॥
आजच तातडीने । आम्हांस तेथे जाणे ।
म्हणून प्रस्थान ठेवणे । हे उचित आम्हासी ॥८॥
जो स्वतः देव असे । त्याचे देवांवर प्रेम कैसे ।
त्याचे काही प्रसंग सुरसे । दिधले येथे श्रोते हो ॥९॥
निर्गुणात मन निमग्न । परि सगुणी भक्तिपूर्ण ।
हे पाहण्या कौतुक म्हणून । प्रसंग येथे हे दिधले ॥१०॥
असे श्रध्दा दृढतर । कर्तव्यात न करिती कसूर ।
अतिशय प्रेम वाडीवर । देवांवर ही असे त्यांचे ॥११॥
वाडीक्षेत्री श्रीं समोर । कोणास करू न देती नमस्कार ।
ऐसी त्यांची श्रध्दा थोर । स्वामींवर होती निश्चये ॥१२॥

श्री गुळवणी महाराज स्वत: । कृष्णेत स्नानास उतरत ।
इतर जे भक्त समवेत । तीर्थजल प्रोक्षिती त्यांवरी ॥१३॥
त्याप्रमाणे काही भक्त । दत्तमहाराजांस विनवित ।
स्नानाची परवानगी मागत । त्यांसमवेत कृष्णेमधे ॥१४॥
महाराज स्पष्ट नकार । देती यावर ।
श्री नारायण स्वामींची कथा थोर । सांगती ते भक्तांसी ॥१५॥
कुष्ठरोग्याचे कुष्ठ जाण्यास । श्री देती दृष्टांत त्यास ।
त्याप्रमाणे सह नारायणस्वामींस। स्नान करण्यास उद्युक्त होई ॥१६॥
परंतु त्यास पादुकांसमोर । कृष्णामाईत स्नान कर ।
असे सांगून कुष्ठ दूर । करिती न घेती मोठेपण स्वत:स ॥१७॥
हा कथा भाग सांगून । परावृत्त केले भक्तांचे मन ।
स्वमाहात्म्य रहावे झाकून । महिमान देवाचे वाढावे ॥१८॥
हीच त्यांची इच्छा असे । देवांवर निरतिशय प्रेमविलसे ।
वाडीवर निष्ठा कैसी दृढसे । त्याचे उदाहरण ऐका हो ॥१९॥
जरी कोणी उंची वस्त्र । महाराजांस अर्पण करित ।
त्यांस वाडीची आठवण होत । देवास द्यावे म्हणताती ॥२०॥
वाडीला गेल्यावर । समोर जो अमरेश्वर ।
पायी जाऊन नमस्कार । करण्याचा प्रघात होता त्यांचा ॥२१॥
अमरेश्वरी पायी जाण्याचा । भाग समजती गुरुसेवेचा ।
हा भाव न समजून साचा । एक भक्त हट्ट करी ॥२२॥
आज अमरेश्वरालागून । चलावे आमच्या गाडीतून ।
सांगितले परोपरीने समजावून । तरी नायके तो तेव्हा ॥२३॥
नाइलाजे गाडीतून । जाती मनाविरुध्द आपण ।
आज गुरुदर्शनाचे पुण्य । लाधले म्हणे गाडीस तुमच्या ॥२४॥
प्राचीन या वाडी क्षेत्रावर । जिव्हाळा जो अपरंपार ।
वडिल मंडळींची आठवण सुंदर । मनांत दाटून येई त्यांच्या ॥२५॥
एका गुरुद्वादशीच्या उत्सवास । मुक्काम होता वाडीस ।
नेहेमीच्या उपाध्यायांच्या घरास । मागे जुना प्रचंड पिंपळ असे ॥२६॥

त्याकडे बोट दावून । सांगती पिताजींची आठवण ।
या झाडावरचे पक्षी ज्याप्रमाणे । पहाट झाली की उडोन जाती ॥२७॥
शोधितात चारापाणी । कुठे कुठे जाऊनी ।
परी सायंकाळी येऊनी । घेती यावरच विसावा मग ॥२८॥
तशीच आपण माणसं । जरी आपापल्या उद्योगांस ।
जातो इतर स्थानास । शेवटी रहावयास येथेच येऊ ॥२९॥
असे धुंडिराज महाराज । सांगती ते गूज ।
बोलती ओघाने सहज । श्री दत्तमहाराज ॥३०॥
असेच नेहेमी प्रमाणे जाता वाडीस । तेथे श्वसन त्रास ।
होई त्यांस एक दिवस । घाबरे बरोबरची मग व्यक्ति ॥३१॥
दूरध्वनिवरून । सिलेंडर व डॉक्टर बोलावून ।
घेण्याचे ठरवून । ती व्यक्ति राही मग ॥३२॥
परवाचे दिवशी प्रसाद घेऊन । गुरू म्हणती परत जाऊ आपण ।
न कळवावे गडबड करून । उगाच कोणास तरी तो नायके ॥३३॥
फोन वरून कळवता । वैद्यकीय मदत मिळे तत्वतां ।
परि भाविकांस वार्ता कळता।गर्दी महाराजांस भेटण्यास करिती ॥३४॥
देवा ऐवजी आपले । महत्व वाढून चालले ।
ऐसे होता हलविले । प्रस्थान आपले तेथून ॥३५॥
पुढील वर्षी वाडीस जाता । तोच गृहस्थ सोबत असता ।
अगोदरच सिलेंडर बरोबर झाला घेता।धांवपळ वेळेवर न होवो ॥३६॥
महाराज म्हणती त्यावर । आम्ही जातो वाडीस तर ।
नाही या सिलेंडरच्या भरवशावर । श्रीच तरणोपाय आम्हासी ॥३७॥
दृढ महाराजांची निष्ठा किती । यावरून ये दिसून ती ।
देवच सांभाळणार म्हणती । शिकावे हे त्यांकडून ॥३८॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणसत्तरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय – ७०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

कुठलीही गोष्ट हळुवारपणे । भक्तास अपुल्या समजाविणे ।
कधीच त्यावर न रागावणे । वापरणे नाही कठोर शब्द ॥१॥
ही महाराजांची थोरवी । पद्धत त्यांची ही बरवी ।
याची प्रचिती करवी । पुढील घटना काही त्या ॥२॥
एका यागाच्या निमित्ताने । तयारी करता राहणे ।
महिनाभरापासून होणे । एका भक्ताचे जाहले ॥३॥
कार्यक्रम संपन्न होता । वाटे यांस परतावे आता ।
इतरही सर्व भक्त आता । स्वये महाराज ही मुक्काम हलवणार ॥४॥
तेव्हा निरोपाचा नमस्कार । करण्या जाई भक्त तर ।
त्या पाहताच गुरुवर । प्रश्न करिती अनपेक्षित ॥५॥
काय हो मुक्काम ना? । यावर उलट उत्तर देण्या।
ऐवजी, भक्त म्हणे "आहे ना" । सहजपणे महाराजांस ॥६॥
यांवर म्हणती हांसून । हां, खरी कामे मागाहून ।
असती अनेक बिले वगैरे देणं । हिशेब करणे वगैरे ही ॥७॥
तेव्हा मुक्काम असता । चांगले, असे म्हणता ।
हळुवारपणे शिकविता । सार सेवाकार्याचे ॥८॥
स्वतःच्या बोलण्यातून । सहज सांगती समजावून ।
न दुखविती कोणाचे मन । चूक दाखविती भक्तांची ॥९॥
पुढील प्रसंगातून । ये आपणास कळून ।
सहज बोलण्यातून । समजाविले कैसे ते ॥१०॥
श्रींच्या सेवेत । जे असती भक्त ।
श्रींची ते काळजी घेत । त्रास न व्हावा महाराजांना ॥११॥
न व्हावा संतांस उपद्रव । अशी काळजी अतीव ।
घेती तेव्हा इतर महानुभाव । दुखावले जाती कधीतरी ॥१२॥

असाच दुखावलेला भक्त । महाराजांसमवेत ।
रांजणगांवी दर्शनास जात । तेथे देखोन उंदिर ।।१३।।
महाराजांस म्हणे तो उंदिर पाहिला । श्रीपुढे राहून कसा माजला ।
शांतपणे गणेश दर्शनाला । घेती न बोलती महाराज काही ।।१४।।
पुढे पुढील प्रवासात । बैसले असता गाडीत ।
या भक्तास संबोधित । गेला होतात का सज्जनगढी ।।१५।।
हो गेलो होतो खचित । भक्त प्रौढीत वदत ।
मग महाराज विचारित । तिथला रांजण पाहिला कां ।।१६।।
अहो एवढा मोठा रांजण । भरून जल गांवातून ।
नेती गडालागुन । कल्याणस्वामी खांद्यावरी ।।१७।।
हळुवारपणे तयाप्रत । चूक त्याची दाखवित ।
जरी सेवक माजलेला भासत । तरी सेवा ही तो तशीच करे ।।१८।।
प्रसंगोपात भक्तांस । मनःपूर्वक अनुमोदनास ।
देऊन साधिती कार्यासि । पुढील कथेतून हे कळे ।।१९।।
श्री दत्ताश्रमाच्या बांधकामात । कुठलाही निर्णय घेण्याबाबत ।
भक्तास पाठवी पुण्याप्रत । ताई भगवती वरचे वरी ।।२०।।
असे होता एके दिनी । सांगती गुरु भक्तालागुनी ।
निर्णय घेण्याची वेळ येवोनी । घ्या तुम्हास योग्य तो ।।२१।।
पुढे जर कां काही । कमी जास्त होई ।
जबाबदारी त्याही । घेऊ आम्ही सर्वस्वे ।।२२।।
एवढे आश्वासन देती । मग होईलच कां कमी जास्ती ।
त्यांचीच प्रेरणा निश्चिती । कार्यामागे असतसे ।।२३।।
संकल्पिता श्रीवामन निवास । योजिले भाविक भक्तास ।
पाहण्या बांधकामास । तज्ञ मुंबईकर तो असे ।।२४।।
तो येता वासुदेव निवासी । काढिले अधिकार पत्रकासी ।
घेणे कोणत्याही निर्णयासी । अधिकार दिले सर्वही ।।२५।।
जमलेल्या निधीतून । अतिशय कष्ट घेवून ।
बांधकाम पाही भक्त मनापासून । महाराज ही करिती कौतुक ।।२६।।

असता स्लॅबचा दिवस । स्वत:च त्या समयास ।
जाऊन बघती बांधकामास । पाठबळ देती भक्तास ।।२७।।
परन्तु इतर विश्वस्तांकडून । त्रास यास होऊन ।
केले अपमान म्हणून । खेद वाटे महाराजांसी ।।२८।।
यासाठी सद्गतीत । होऊनी म्हणती भक्ताप्रत ।
उगाच आले या कामांत । खेद करिती श्रीगुरू ।।२९।।
भक्त ही मग महाराजांस । म्हणे इतर कोण्याही स्थानास ।
न मिळे त्या आनंदास । भोगितो आम्ही तव संगतीने ।।३०।।
या भक्ताच्या खाण्यापिण्यास । प्रत्येकच समयास ।
महाराज जातीने खास । लक्ष पुरविती त्याकडे ।।३१।।
भक्तवत्सल भक्ताभिमानी । ही बिरूदावली मिरवोनी ।
जो राही भक्तांवर प्रेम करोनी । तो आमचा श्रीगुरू ।।३२।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरूचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एकदा श्रींचे चिरंजीव । अशोक त्यांचे नांव ।
काही तरी कारणास्तव । रागावले अपुल्या मातेवरी ॥१॥
बाळास आपण समजाऊ । नकोस तू रागवू ।
काय हवे ते सांग पाहू । खाऊ देऊ तयासी ॥२॥
मध्यम वयातील मुलास । विचारू कारण रागास ।
साम किंवा दण्ड नीतीस । अनसरून वळवू तयासी ॥३॥
अशा किशोर मुलाला । न धरिता वरील पंथाला ।
हळुवार सांगितले त्याला । पिताजींनी त्याच्या काय ॥४॥
कोठून आलो आपण । कोठे जावयाचे म्हणून ।
न जाणित आपले मन । अल्पकाळासी एकत्र आलो ॥५॥
प्रवासी सर्वही आपण । करतो प्रवास एकत्र म्हणून ।
येता आपापले स्थान । उतरावे लागेल आपणासी ॥६॥
मग ऐसे रागावून । हा प्रवास दुःखी करून ।
का घ्यावा, ऐसे बोलून । समजाविती बालकासी ॥७॥
किती उच्च भूमिका ही । उपदेश योग्य हा सर्वाही ।
तत्वज्ञाचे साधे शब्द ही । बोध कसे करतात ॥८॥
अजात शत्रुत्व तयांचे । अनेक प्रसंगी दिसे साचे ।
अनेक वेळा दुःख संकटांचे । आयुष्यांत पसरे सावट ॥९॥
इतरांस करी मार्गदर्शन । समदृष्टी ठेऊन ।
तो सद्गुरु या प्रसंगांतून । प्रत्यक्ष शिकवण देतसे ॥१०॥
नुसतेच नाही मौखिक ज्ञान । त्यांचे सर्वच आचरण ।
उघडे विद्यापीठ त्यातून । घ्यावे तितुके कमीच असे ॥११॥
यासाठी प्रसंग काही । घेतले या चरित्रातही ।
डोळसपणे पाहता त्याही । मार्गदर्शन होतसे ॥१२॥
पुण्यांत घेतले घर । नेटका कराया संसार ।
गरजू माणसास प्रार्थनेवर । दिले दयादृष्टीने श्रीगुरुंनी ॥१३॥

निराश्रितासी दिला आश्रय । तो बघे आपली सोय ।
कार्याकार्य विचार काय । तो नर न समजे ते ।।१४।।
कृतघ्नपणे त्या नरे । बळकाविले त्या घरे ।
कोर्ट कचेरीत सारे । प्रकरण ते अडकले ।।१५।।
सौम्यपणे सांगून । न सोडी तो म्हणून ।
काही भक्तांनी पुढाकार घेऊन । सांगितले त्यासी कठोरपणे ।।१६।।
परी तो नायके तेव्हा । इतर मार्ग अवलंबिणे हा ।
न पटे व्यवहार केव्हा । महाराजांस सर्व ही ।।१७।।
म्हणती मग आईसाहेबांना । घर आपले घेतले त्यांना ।
चवथा लेक अपुला माना । मग वाईट न वाटेल ।।१८।।
सर्व क्लेश मग जाईल । पुत्र राहिला ऐसे होईल ।
त्रास ही न वाटेल । म्हणती ऐसे श्रीगुरु ।।१९।।
उदार चरिताचे दर्शन । होई या वाक्यावरून ।
बुद्धि आपली तिथे मौन । नमन करी चरणांवर ।।२०।।
भजती त्याते उद्धरिसी । न भजती त्याही कृपा करिसी ।
आरती गावी ऐसी । पुढे मजल एक अजून ।।२१।।
भजकाभजक सोडून । जे राहती शत्रुत्व धरून ।
जे पीडिती द्वेष करून । त्यांविषयी ही दया असे ।।२२।।
सौजन्य केवढे हे असे । इतरांस जे जमत नसे ।
ते संतांठाई सहज विलसे । ही लीला अवर्णनीय ।।२३।।
जे जे भेटिजे भूत । ते ते मानिजे भगवंत ।
हेच त्यांच्या मनी सतत । सर्वांसि मानिती परमेश्वर ।।२४।।
एक भाविक भक्त । दर्शन घेता भावनेने वदत ।
तुम्हीच आमचे ईश्वर आहात । तवरूपी आम्हां देव दिसे ।।२५।।
यावर लीनतेने म्हणती । तुम्हां सर्वांत ही दिसती ।
परमेश्वर स्वरूप आम्हाप्रती । अशी त्यांची भूमिका असे ।।२६।।
म्हणतात स्वतः आपण अनुभवावी । ज्ञानेश्वरीतील एक तरी ओवी ।
इथे ज्ञानेश्वरीच मुरली स्वभावी । दुजा न ऐसा त्यांसम ।।२७।।
धुंडामहाराज देगलूरकर । कीर्तनांत भावपर ।
काढिती ऐसे उच्चार । दत्तमहाराजांच्या उपस्थितीत ।।२८।।

एकनाथ महाराज कैसे होते । तर जैसे दत्तमहाराज गुरुसत्ते ।
दोन तीन वेळेस झाले काढते । ऐसे उद्‌गार तेधवा ।।२९।।
समारोपांत संक्षिप्त । दत्तमहाराज बोलत ।
नित्याचा भाव विनीत । दावून तयेवेळी ।।३०।।
सत्पुरुष कैसे असतात । तर जे स्वतः अंगी गुण असतात ।
ते दुसऱ्यास लावून तयाप्रत । मोठे करण्याचा प्रयत्न करिती ।।३१।।
हेच श्री धुंडामहाराजांनी । गुण दाविले या कीर्तनी ।
असे विनम्रपणे बोलोनी । मान देती इतरांस ।।३२।।
त्यांच्या प्रत्येक गुणदर्शनातून । चरित्रातील प्रत्येक घटनेतून ।
ब्रम्हसौन्दर्य येई प्रगटून । आनंदमानंद करं प्रसन्न ते ।।३३।।
श्रींचा धुंडामहाराजांविषयी । जिव्हाळा जो काही ।
त्याची साक्ष सहज देई । पुढील प्रसंग श्रोते हो ।।३४।।
श्रींची ज्येष्ठ कन्या पुण्याहून । पतीसह निघे माहेराहून ।
जाण्या वैराग लागून । तेव्हा त्यांचे सोबत ।।३५।।
धुंडामहाराजांसाठी प्रेमानं । आहेर पाठविती नेमानं ।
तो जाताच घेऊन । धुंडामहाराज हर्षिती ।।३६।।
पत्नीस आपल्या संबोधिती । 'पाहिलेस कां गं' म्हणती ।
श्रीकृष्णाकडून आहेर येती । भाग्य हे आपले जाणावे ।।३७।।
असे उद्‌गार काढून । आहेरास वंदन करून ।
प्रेमे त्यास स्वीकारून । श्रींच्या कन्या जामातासी वंदिती ।।३८।।
या नमस्काराचे कारण । दत्तमहाराजांकडून आलात आपण ।
असे बोलती नम्र वचन । धन्य संतपण संतांचे ।।३९।।
संतांचे कैसे बोलणे । संतांचे कैसे चालणे ।
उचित हे आपल्यास जाणणे । म्हणोन वर्णिले यथार्थे ।।४०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकाहत्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७२

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम : ।।

एकदा महाराजांचे कांही भक्त । कुरवपुरास मिळून जात ।
कांही विशेष उपासनेचा बेत । म्हणोन मुक्काम केला तेथे ।।१।।
श्रीपाद श्रीवल्लभांचे मंदिर । तेथून काही मैलांवर ।
एका मोठ्या खडकावर । स्थान मनोहर एक असे ।।२।।
श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर । जेव्हा घालिती सूर्यनमस्कार ।
शरीर व त्रिशूळाचे ठसे भूमिवर । उमटलेले ते दिसे आजही ।।३।।
तेथे जाऊन आपण । अघोर कष्टोद्धरण स्तोत्राचे पठण ।
करावे असे तिघे भक्तगण । चिंतून जाती त्या स्थानी ।।४।।
कुरुगड्डी हे बेट असे । अनेक धारांनी वेढले असे ।
कृष्णामाई बाजूने वहातसे । प्रवाहात असती शिळा खडक ।।५।।
नाव न चाले म्हणून । जावे लागे पाण्यातून ।
तसे हे पायी जाऊन । करिती पाठ स्तोत्राचे ।।६।।
दुपारचे समयास । जाती त्या स्थानास ।
अंधार पडे सायंकाळास । येती भानावर भक्त मग ।।७।।
अपेक्षित संख्येपर्यंत । पाठ त्यांचे पूर्ण ही होत ।
परतण्यास जेव्हा निघत । वाट न सापडे तयांस ।।८।।
चहुकडे पाणी भरले । खडक सारे पाण्यात बुडले ।
एवढे पाणी कोठून आले । विस्मय करिती सर्वही ।।९।।
लांबवर शिखर मंदिराचा । दिसे उजेड दिव्याचा ।
परी मार्ग न सापडे जायाचा । काय करावे म्हणती ते ।।१०।।
कसे तरी पाण्यातून । जाती हळू हळू चालून ।
पाण्याची खोली न समजून । जाती खोल पाण्यात कधी ।।११।।
कधी पाण्यातील खडक । न दिसता बसे धडक ।
गुडघ्यांस लागे आणिक । भांबावले सगळेही ।।१२।।
पाण्याचा खळखळाट । इतर सर्वही शुकशुकाट ।
नीट जाता न सापडे वाट । बिकट भासे परिस्थिती ।।१३।।

कसे तरी पुढे जाती । येई दिसोन तयांप्रती ।
मंदिरा जवळील किनाऱ्यावरती । उभे श्रीपाद भटजी तेथील ।।१४।।
कुरवपूरचे श्रीपाद पुजारी । लांबवर उभे किनाऱ्यावरी ।
मंद त्यांचा येई आवाज तरी । मार्ग दाखवितात हे कळले ।।१५।।
कोणत्या बाजूने पाण्यातून । यावे हे भक्तांलागून ।
सांगती त्याप्रमाणे जाऊन । किनाऱ्यावर आले भक्त सर्व ।।१६।।
मंदिराच्या द्वाराप्रत । श्रीपाद भटजी यांस सोडत ।
पुन: स्वकार्यासि निघून जात । यांत वावगे भक्तांस न वाटे ।।१७।।
हे जाता गुरुबंधू इतर । धावोन येती समोर ।
कैसे आले येथवर । सांगा म्हणती आम्हासी ।।१८।।
श्रीपाद भटजींनी मार्ग दाविला । त्याप्रमाणे आलो स्थानाला ।
हे ऐकता विस्मय जाहला । विलक्षण वाटे सर्वही ।।१९।।
जे गुरुबंधू मंदिरी राहिले । तिन्हीसांज होता भक्त परत न आले ।
हे पाहता भटजींच्या मागे लागले ।
परत आणण्यास जावे म्हणती ।।२०।।
श्रीपाद भटजी न उठती खोलीतून । जरी हे गुरुबंधू बोलती रागावून ।
म्हणे काळजी करता कां म्हणून । आणतील तयांसी श्रीपाद ।।२१।।
आता सर्वांसि समजले । बोलणे त्यांचे खरे झाले ।
वाट दावावया स्वत: आले । महाराज, भक्त संकटी पडता ।।२२।।
समजले त्यांस मागाहून । वरच्या बाजूस असे धरण ।
ते अचानक सोडता पाणी वाढून । येई कृष्णामाईचे ।।२३।।
भक्ताचे संकटमोचन । विनासायास करून ।
सोडविती याचे उदाहरण । एक बोलके पुढे असे ।।२४।।
उपभोक्ता सहकारी संस्था एक । मुंबई नगरीत स्थायिक ।
गैरव्यवहार पैशांचे अनेक । करी, प्रमुख तिथला जो ।।२५।।
अनेक घोटाळे करून । पैसे खाई हा सज्जन? ।
एक मुलगी नोकरी करून । राही त्या संस्थेत ।।२६।।
हिची परिस्थिती असे कठिण । घरास हातभार लागावा म्हणून ।
अल्प पगारे नोकरी करून । कष्टे भरी पोट ती ।।२७।।

संस्थेचा प्रमुख इयेस । म्हणे या गैरव्यवहारास ।
तुझ्या नांवे खपवीन खास । न ऐकता नोकरी जाईल तुझी ।।२८।।
वार्षिक सभा संस्थेची भरता । आरोप या मुलीवरता ।
ठेवील म्हणे हा मालक तत्वतां । घाबरे कन्या तयेवेळी ।।२९।।
महाराजांचे भाविक भक्त । या कन्येचे परिचित ।
महाराजांच्या दर्शनास नेत । इजला स्वत:समवेत ।।३०।।
सारी कथा-व्यथा सांगून । रडे कन्या श्री सन्मुख बसून ।
महाराज विचारती कटाक्ष टाकून । खाल्ले कां पैसे बोला ।।३१।।
म्हणे सत्य सांगते गुरू । काम ऐसे कसे करू ।
पैशांचा गैरव्यवहारू । केला नाही जाणावा ।।३२।।
महाराज म्हणती द्या कागद । तिये जवळ एशियाडचे तिकिट ।
त्यापाठी स्वहस्ते नीट । मंत्र लिहिती श्रीगुरू ।।३३।।
निरोपिती त्या कन्येस । वासुदेव निवासातील वरच्या खोलीस ।
गुरुमहाराजांसमोर वेळ एकवीस । म्हणा हा मंत्र भक्तिपूर्वक ।।३४।।
पुनश्च घरी जाऊन । रोज या मंत्राचे पठण ।
करावे ऐसे निरोपून । पाठविले या मुलीस ।।३५।।
वार्षिक सभा संस्थेची भरे । कोणास वाटेल काय खरे ।
एजेंडा प्रथम क्रमांकावरे । या मुलीस शिक्षा करण्याचा ।।३६।।
संपूर्ण मीटिंग होई पूर्ण । परि हा प्रथम एजेंडा कार्यवाहीतून ।
आलाच नाही विचारार्थ म्हणून। कोणीच हाताळले नाही त्यासी ।।३७।।
एका स्थळी पाचशे नर । भुरळ पडे सर्वांवर ।
महाराजांस काय दुर्निवार । शरणागतोद्धार श्रीगुरू ।।३८।।
चरणी लागते श्रीगुरू । भक्तकाम कल्पतरू ।
भवसागर हा दुस्तरू । तारू तूची आम्हासी ।।३९।।
म्हणोनी धरिले चरण । या अध्यायाचे करिता पठण ।
करी संकट निवारण । विघ्न विनाशक विघ्नहर्ता ।।४०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
बाहत्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

दत्तमहाराजांचे स्तवन । केले एका भक्ताने कवन ।
सुंदर ते गुणवर्णन । ऐकावे पुढील श्रोते हो ॥१॥

एका भक्ताने केलेले कवन

॥ श्री राम ॥

कृष्णेच्या तटी वाडी क्षेत्री जन्मे हा सरस्वतीचा सुत ।
कर्नाटक प्रांती धारवाडी पढीला न्यायासहित वेदांत ॥
पुण्यपत्तने राहून ज्याने गृहस्थाश्रम पाळीला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ॥१॥

वेदोनित्यमधीयतां उक्ती सरिसे अध्यापिले सज्जना ।
नेको ब्रह्मसभात किर्ती मिळवे आनंदिले गुरुजना ॥
आचार्याकिडुनि भूषणादि वस्त्रे जो श्रेष्ठ सन्मानिला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ॥२॥

श्री नृसिंहसरस्वती गुरु जये अमरापुरी दिक्षीले ।
तद्वाक्ये जेणे अखंड जन्मी भागवत अनुष्ठानिले ॥
ज्याच्या भक्तिगुणे, स्वधर्मानुचरणे श्रीवामनु तोषला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ॥३॥

कुंडलिनी पीठावर शंकर, लोकनाथ हे यती ।
ब्रह्मचारी श्रीवामन पुढती परंपरा सांगती ॥
एकच गुरु हा गृहस्थ असुनी अध्वर्यु शोभला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ॥४॥

वैराग्यी तुळता समर्थ भासे द्वितीयाश्रमी नाथ हा ।
दशदर्शनि निपुणता दावी आचार्यांसम हा ।।
भक्तिरसाचा सागर ज्याने अंतरात ठेविला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ।।५।।

संसारी फिरता समस्त आर्ता योग्य मार्गदर्शिलि ।
विपुल वाङ्मयतपे जयाच्या पारमार्थिक श्रांतले ।।
ताईंकरवी जन विश्रामे 'दत्ताश्रम' उभविला ।
तो हा सद्गुरुराज दत्त मजला दत्तकृपे लाभला ।।६।।

अशा सद्गुरु लाभे भरतो ऊर मिळे धन्यता ।
आराध्य गुरु मज आणिक ताई भगवती या देवता ।।
अपराधांच्या राशी माझ्या तू पोटी घेई ।
अन म्हणे दास गुरुआई मजला हृदयी ठाव देई ।।७।।

।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

******

शाब्देपरेच निष्णात । सद्गुरु भेटणे कठिण असत ।
दत्तमहाराजांच्या रूपाने भेटत । आपणांस दिव्य विभूती ।।१।।
परंतु प्रारब्ध वशात। राहून अज्ञान वेष्टित।
ओळख न त्यांची पटत । परि सद्बुद्धि नंतर देती तेच ।।२।।
असाच एक भक्त । मंत्रदीक्षा घेण्याची संधि मिळत ।
यास तरुण वयात । परि अज्ञान आड येई ।।३।।
मागे आपल्या बहुत व्याप । तरी गुरुमंत्राचा जप ।
न होईल आपणाकडून ही छाप । बुद्धिवर पडे त्याचेनी ।।४।।
म्हणून संधि दवडली । मंत्र दीक्षा नाकारली ।
यानंतर चौदा वर्षे गेली । जाहली विचारांची खळबळ ।।५।।

वाटे आपण ही घ्यावी । मंत्रदीक्षा गुरुंकडून बरवी ।
वृत्ती स्थिर होता आघवी । स्वप्नी देखे मंगल एक ।।६।।
रांगोळीने सजले अंगण । घरांत आनंदाचे वातावरण ।
ठेविली पूजेची तयारी करून । हार-पेढे-फुले दिसली ।।७।।
अंगावर शाल घेतलेली । व्यक्ति खुर्चीवर बसलेली ।
दिसती पाउले जुळलेली । पण कोण ते न होई ओळख ।।८।।
या स्वप्नावरून आठवले । सुवर्णसंधीस दवडले ।
सद्‌गुरु मंत्रदीक्षा देती भले । नाकारले आपणच ।।९।।
श्री दत्तमहाराज पुण्यात । हा राहे दूर प्रांतात ।
प्रतिकूलता व्यवसायात । प्रापंचिक ताण फार असे ।।१०।।
दूर देशी राहसी भगवान । दुर्मिळ झाले दर्शन ।
भेटीस तळमळे माझे मन । कृपा करावी स्वामिया ।।११।।
अधिकच वाटे तळमळ । कधी दिसतील चरणकमळ ।
अपराधी मी केवळ । खंत फार वाटे त्यासी ।।१२।।
अशी मन:स्थिती वेगळी । फिरण्यास जाई सायंकाळी ।
एक परिचित तयेवेळी । अचानकपणे भेटला ।।१३।।
म्हणे तो ओघात । दत्तमहाराज आले गावात ।
अमुक ठिकाणी मुक्काम असत । सांगे आनंद वार्ता ही ।।१४।।
दयाळू किती म्हणे श्रीगुरु । घेतला माझा कैवारु ।
असमर्थ जाण्यास दूरवरु । आले स्वत:च दर्शन देण्या ।।१५।।
लगबगीने सपरिवार । तत्काळ गाठी ते घर ।
दर्शनास असे गर्दी फार । थांबे बाहेरच्या बाजूस ।।१६।।
यजमान म्हणती त्याला । श्रींनी घेतले फराळा ।
गेलेत आताच विश्रांतीला । दर्शन होणार नाही म्हणे ।।१७।।
काकुळतीने करी विनवणी । यजमानांची मनधरणी ।
उद्या येण्यास फार अडचणी । द्रवले मन त्या गृहस्थाचे ।।१८।।
श्रीगुरु वाचत बैसले । त्यांचे दार किंचित उघडलेले ।
फटीतून दर्शन भले । घ्या तुम्ही म्हणे तो ।।१९।।

फटीतून करिती नमस्कार । त्याच क्षणी दृष्टी वर ।
करून पाहती गुरुवर । आत येण्यास खुणावती ।।२०।।
अत्यानंदाच्या भरात । नमस्कारासी जाई आत ।
वदे वाचे अकस्मांत । मंत्रदीक्षा मजसी द्यावीजी ।।२१।।
"आता आलात तर" हा भाव । हसती किंचित गुरुराव ।
कृपाळू कनवाळू स्वभाव । उद्याच देऊ निरोपिले ।।२१।।
दुसरे दिनी प्रात:काळी । साडेसहाच्या वेळी ।
बोलावी गुरुमाऊली । भक्तास मंत्रानुग्रह देण्यास ।।२२।।
आनंदाच्या तरंगांत । झोप न त्यासी लागत ।
पहाटेच स्नानादि करून जात । मंत्र दिधला गुरुंनी ।।२३।।
त्यावेळी प्रचंड तेजस्वी । दिसती गुरु जसा रवी ।
परंतु शीतलता पसरे बरवी । त्या दिव्य तेजातून ।।२४।।
मार्तंड जे तापहीन । येई भक्तास दिसून ।
आनंद फार मिळून । जप नित्य होई आपोआप ।।२५।।
व्यवहारातील प्रतिकूल । खंत न वाटे बिलकूल ।
गुरुकृपेची ख्याति विमल । अनुभवी तो सश्रद्ध ।।२६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्र्याहत्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७४

॥ श्री गणेशदत्तगुरूभ्योनमः ॥

धवल वस्त्रे परिधानोन । ब्रह्मानंदी तू निमग्न ।
संन्यासी मी असे जाण । आश्रम भेद हा असे ॥१॥
गुरू वासुदेवानंद वदले । भेद जरी हे भासले ।
तुझे माझे स्वरूप भले । अभिन्न असे वक्रतुण्डा ॥२॥
हा अभेद दाखविण्यास । अनुभव देई भक्तास ।
दर्शनि घेण्या पुण्यास । जाई भक्त एकदा ॥३॥
करी गुरूंस निवेदन । जातो वाडी लागून ।
तिथे यावे दक्षिणद्वार घडून । परिवारासह आम्हासी ॥४॥
म्हणती महाराज हासून । होईल घडेल म्हणून ।
घेऊन त्यांचे आशिर्वचन । जाई भक्त वाडीस ॥५॥
तेथे असे महापूर । गांवात गेले देववर ।
झाले होते दक्षिण द्वार । मोठ्या महाराजांच्या पादुका स्थानी ॥६॥
हळू हळू उतरून । जाती भक्त करण्या स्नान ।
एका पुजाऱ्यांसी विनवून । दक्षिण द्वारासी पातले ॥७॥
कृष्णामाईत करिता स्नान । होई तन मन पावन ।
एक अपूर्व दर्शन । त्या स्थानी मिळे भक्तासी ॥८॥
पादुकांच्या स्थानावर । स्वये वासुदेव यतीश्वर ।
वदनी सुहास्य मधुर । दिसती भक्तासी तयेवेळी ॥९॥
सात्विक भाव येऊन । अश्रुपूर्ण झाले लोचन ।
दिसे प्रत्यक्ष निधान । आनंद अतिशय जाहला ॥१०॥
असे करून स्नान । मनांत आनंद घेऊन ।
पातले ग्रामा लागून । स्वारी ज्या घरी ठेविली ॥११॥
तेथे जाता दर्शनास । होते ठेविले फोटोस ।
श्री वासुदेवानंद यतीश । "स्वारी" संनिध विराजले ॥१२॥

जसे पादुका स्थानी दर्शन । तंतोतंत तसेच रुप बघून ।
येई भक्ताचा ऊर भरून । म्हणे हेचि रुप दाविले मज ।।१३।।
वाटे या भक्तास । पादुका असाव्या पूजेस ।
काष्ठ पादुका घेऊन गुरुंस । वदे ह्या स्वीकारून द्याव्या ।।१४।।
आपला होता चरण स्पर्श । ठेवीन ह्या पूजेस ।
हातात घेती पादुकांस । वदती त्यास श्रीगुरु ।।१५।।
या मोठ्या महाराजांच्या । म्हणून ठेवाव्या साच्या ।
नित्य पूजन करूनी त्यांच्या । सेवेसी राहावे रत ।।१६।।
या भक्ताची वास्तू होता । पादुका पूजेत ठेविता ।
नांव वासुदेव निवास ठेविता । झाला अपुल्या सदनासी ।।१७।।
वास गुरुंचा प्रत्यक्ष । अनेक वेळ याची साक्ष ।
देती भक्तवरां समक्ष । सद्गुरु योगीराज ।।१८।।
या भक्ताच्या कथेवरून । वासुदेव यतिराज नि आपण ।
तसेच नरसिंहयति भगवान । अभिन्न हे सत्य दाविले ।।१९।।
सद्गुरु परंपरा महान । कलीयुगी यांचे महिमान ।
मौक्तिक हे सारे समान । परब्रम्ह कंठीच्या अवतार माळेत ।।२०।।
श्रीवासुदेव यतिमहाराज । आणि दत्तमहाराज ।
एकास संन्यास धर्माचा साज । दुजा राहे गृहस्थाश्रमी ।।२१।।
दत्तात्रेयांचे दोन अवतार । एक संन्यस्त धर्माचे काटेकोर ।
पालन करून उदाहरण ठेवी आपणासमोर ।
या उच्चाश्रमी वागावे कैसे ।।२२।।
दत्तमहाराज आपण । गृहस्थाश्रम स्वीकारून ।
त्याचे सुंदर उदाहरण । ठेविती आपल्यापुढे ।।२३।।
गृहस्थाश्रमात राहून । वृत्ती संन्यासी असे जाण ।
प्रत्यक्ष संस्कार झाल्यावीण । गृही असून परमहंस ।।२४।।
शक्तिपात पीठाचे अधिकारी । संन्यासी किंवा ब्रम्हचारी ।
एकमेव हे उत्तराधिकारी । गृहस्थ धर्म चालविती ।।२५।।

अनासक्त राहून संसारात । धर्म या कलीयुगात ।
आचरावा कसा हे आपणांप्रत । शिकविले या योगज्ञाने ॥२६॥
करद्वय जोडून । नित्य तयांसी वंदन ।
सोडवा भवबंधनातून । विनवणी हेचि गुरुराया ॥२७॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौऱ्याहत्तरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ७५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक डॉक्टर भक्त । श्री चरणीरत सतत ।
त्यांचे अनुभव रसभरित । ऐका श्रोते एकचित्ते ॥१॥
पदोपदी मार्गदर्शन । देती हळुवार भाषणातून ।
करिती मनः समाधान । वत्सल श्रीदत्तमहाराज ॥२॥
यांच्या ज्येष्ठ चिरंजीवांचे । कॉलेज प्रवेश होते व्हावयाचे ।
सर्वही चिकित्सा महाविद्यालयांचे । प्रवेश अर्ज भरले त्याने ॥३॥
प्रवेशाच्या अंतिम तिथीस । राहिले दोनच दिवस ।
कुठून ही न मिळे उत्तरास । उदास झाले मन त्यांचे ॥४॥
वाटे घ्यावे दर्शन । दत्तमहाराजांचे म्हणून ।
जाती पुण्यालागुन । प्रेमे बोलती सद्गुरु ॥५॥
अगोदर करून स्नान । जावे वासुदेव निवासालागुन ।
घ्यावे गुरुमहाराजांचे दर्शन । सांगावे त्यांस सर्वही ॥६॥
याप्रमाणे जाती । रांगेत उभे राहती ।
गुरुमहाराज पाहून बोलाविती । कधी आलासी म्हणती ते ॥७॥
बैसविती स्वसन्निध । वात्सल्य वर्षे अगाध ।
सर्वांचे दर्शन झाल्यावर, वेध । मनीचा घेऊन बोलती ॥८॥
काय रे काळजी करतोस । नको करू काळजीस ।
न विचारता समाधानास । पावले गुरु दर्शने ॥९॥
मना वाटे या प्रश्नापुरती । नव्हे, तर सर्व प्रश्नांवरती ।
कृपा हेच उत्तर निश्चिती । पाठिशी गुरुमहाराज आहेत ॥१०॥
आश्रमातून श्रींचे घरी परत येऊन । श्रींस सांगितले सर्व वर्तमान ।
मनातले ही भाव कथन । केले, न विचारताच आलो म्हणे ॥११॥
यावरी वाटे समाधान । हसले महाराज आपण ।
परत घरी जाता कळून । येई डॉक्टरांसी वार्ता एक ॥१२॥

एका महाविद्यालयातून । पुत्रासाठी पत्र येई मिळून ।
ताबडतोब फी भरून । प्रवेश घ्या म्हणताती ।।१३।।
श्रीकृपेचे हे उदाहरण । तसेच व्यावहारिक मार्गदर्शन ।
पुढील अनुभवावरून । ये कळोन आपणासी।।१४।।
श्रींचे कार्यक्रम अनेक होती । न जाता येई प्रत्येका प्रती ।
मंडळींस मग पाठविती । जाती काहींस स्वये ही ।।१५।।
एकदा देऊळगावास । योजिले दत्तयागास ।
ठरविती जाण्याचे त्यास । श्रींस ही कळविले ।।१६।।
जाण्याच्या वेळी अकस्मात । मामांचे मिळे पत्र ।
सोबत पत्रिका असत । नातवाच्या लग्नाची ।।१७।।
हे मामा पालक डॉक्टरांचे । वडील निवर्तले बालक, सहा महिन्यांचे ।
तेव्हा पासून सांभाळिले,यांचे । ऋण फार डॉक्टरांवरी ।।१८।।
होई मनाची घालमेल । न सुचे काहीच एकवेळ ।
दोन्ही कार्यक्रमांची एक वेळ । नेमके जावे कुठे म्हणती ।।१९।।
शेवटी ठरवीति डॉक्टर । ठरविले जाण्या अध्वर ।
कळविले ही महाराजांस तर । जावे आता देऊळगांवी ।।२०।।
जाऊन होता एक दिन । कळले श्रींस वर्तमान ।
लग्न समारंभ सोडून । येथे पातले म्हणून हे ।।२१।।
मग श्रीगुरु निरोपिती । तुमचे कर्तव्यच ते निश्चिती ।
जावे त्या लग्नाप्रति । उपयोग न येथे राहून ।।२२।।
येथे जरी राहून । तिकडे लागे तुमचे मन ।
पेक्षा तिकडे जाऊन । मन ठेवावे येथेचि ।।२३।।
सर्व पातळीवर समाधान । करिती योग्य मार्गदर्शन ।
एकदा बार्शीलागुन । येती महाराज यांचे घरी ।।२४।।
असे असता एके दिनी । बैसले जपास म्हणूनी ।
एक रुग्ण चिकित्सेलागुनी । येई त्यास थांबविती ।।२५।।
एवढा जप पूर्ण करून । मगच पाहावे रुग्णास म्हणून ।
न उठती जपातून । हळुवार सांगती श्रीगुरु ।।२६।।

रुग्णास त्या तपासण्याचे । कर्तव्य प्रथमते तुमचे ।
ते झाल्यावर उर्वरित जपाचे । अनुष्ठान करता येईल ।।२७।।
एकदा एका रुग्णाचे । बिल थकले अनेक दिवसांचे ।
जरा कडक शब्दात त्याचे । विषयी बोलती डॉक्टर ।।२८।।
महाराज आतील खोलीत । ऐकिती ते समस्त ।
बोलती डॉक्टरांप्रत । या विषयी तयेवेळी ।।२९।।
येत राहतील पैसे सावकाश । उपचार करणे रुग्णास ।
हे प्रथम कर्तव्य तुम्हास । हळुवार सांगती प्रेमाने ।।३०।।
यांस वाटे महाराजांची । पाद्यपूजा करावी साची ।
याविषयी श्री महाराजांची । विनवणी केली अनेक वेळ ।।३१।।
महाराज सांगती थांबण्यास । कारण न कळे काही त्यास ।
चित्त होई उदास । न होता पाद्यपूजा अपुले घरी ।।३२।।
महाराजांची अगाध करणी । योग आणला जुळवोनी ।
त्रयमूर्ती पाद्यपूजेलागुनी । येती एकाच समयास ।।३३।।
श्री गुळवणी महाराज । सद्गुरु धुंडीराज महाराज ।
स्वये श्री दत्तमहाराज । तिघांची पाद्यपूजा होय एकच दिनी ।।३४।।
आनंदाचा पर्जन्य । वाटे मनास धन्य धन्य ।
गुरुवीण न कोणी अन्य । भक्तकल्पद्रुम श्रीगुरु ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंचाहत्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७६

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

आद्यशंकराचार्यसिम । ज्ञानोत्तरभक्ति ज्यांची उत्तम ।
सगुण भक्ति निष्काम । करिती दत्तमहाराज ।।१।।
कुळधर्म कुळाचार । देवपूजा साचार ।
वडिलोपार्जित निष्ठा देवांवर । अन्यत्र न दिसे तैसी ती ।।२।।
यथा देहे तथा देवे । असे वागणे बरवे ।
आचरण त्यांचे आघवे । भक्ति मार्गासी धरून ।।३।।
राहती सतत दौऱ्यावर । जवळ येता कुळाचार ।
पत्र पाठवून सविस्तर । सांगती तयारी ठेवण्यास ।।४।।
पूजन नैवेद्यादिक करून । घालती ब्राम्हण सुवासिनी भोजन ।
स्वतः विडा दक्षिणादि ठेवून । प्रेमे आग्रह करिती ।।५।।
येता अश्विन, नवरात्रोत्सवे । तयांस वाटे आनंदोत्सवे ।
प्रत्यक्ष रेणुका हितगूज त्यांसवे । करी या नवरात्रात ।।६।।
रामकृष्ण परमहंसाशी देवी । बोलत होती कलकत्यात जेवी ।
हे दुसरे रामकृष्ण तेवी । पुण्य नगरीतील महात्मन ।।७।।
एके वर्षी नवरात्रात । नैवेद्य स्वतः दाखवीत ।
पुढे बसता भोजनाप्रत । चूक लक्षात येई त्यांच्या ।।८।।
खीर न वाढिली नैवेद्यावर । अत्यंत दुःखी होई अंतर ।
वर्षभर त्यानंतर । खीर न त्यांनी प्राशन केली ।।९।।
अतिशय खंत वाटून । अशा अपराधाचे प्रायाश्चित म्हणून ।
पाठ वगैरे करून । क्षमा प्रार्थिली देवीसी ।।१०।।
जाती काशीलागून । देवांस घडविण्या गंगास्नान ।
जाती बरोबर घेऊन । प्रवासात तयेवेळी ।।११।।
स्लोगाडी निवडून । स्टेशनवर स्नान आन्हिक करून ।
करून देव पूजन । मग काही फराळ घेती ।।१२।।
धुंडीराज महाराज तेव्हा श्रींस । पत्र पाठविती काशीस ।
सांगती देवांना सांभाळण्यास । देवांवर निष्ठा अद्वितीय त्यांची ।।१३।।

देवांस केले अलंकार । इतुकेच नव्हे तर भांड्यांवर ।
देवांचे नांव घातले, थोर । पिताजींची देवभक्ति ।।१४।।
परतीच्या प्रवासात । जबलपूरहून गाडी लेट ।
पुढे एका थांब्यात । बारा तासांनी थांबिली ।।१५।।
तोवर झाली सायंकाळ । पाणीही न घेतले इतुके वेळ ।
स्टेशनवर स्नान संध्या होता फराळ । केला काही थोडासा ।।१६।।
खंत पावून म्हणती, काही । प्रारब्ध आड आले त्याही ।
देवपूजा घडली नाही । देव तैसेच राहिले ।।१७।।
याचे दु:ख अत्यंत । आपणा सारख्यांस काही न वाटत ।
देवांच्या व्यवस्थेची चिंता करीत ।
म्हणे यांची व्यवस्था होता बरे ।।१८।।
देवांप्रमाणे गुरुभक्ति । अत्यंत श्रेष्ठ निश्चिती ।
एका भक्ताच्या मनांत विकल्प येती । दाखवी बोलून श्रीगुरुंस ।।१९।।
आपण गुरुमहाराजांहून । आहात काही न्यून ।
ऐसा न्यूनगंड म्हणून । त्यांच्या आसनावर बसत नाही ।।२०।।
श्री महाराज म्हणती हासून । श्रीगुरुमहाराजांसमोर आपण ।
कधी बसलो सुध्दा नाही त्याहून । एक असे मानसी अमुच्या ।।२१।।
श्री गुरुमहाराज नाहीत । असे न आम्ही मानत ।
मग त्यांच्या आसनाप्रत । कसे बसावे सांगा हो ।।२२।।
गणेश त्यांचे कुळदैवत । मनी गणेशभक्ति अत्यंत ।
त्यांचे स्थान येता प्रवासात । आवर्जून जात दर्शनासी ।।२३।।
राजूर क्षेत्री वरचेवर । जाती दर्शनास प्रेमभर ।
नेत्रात दैवी भाव रुचिर । तेज:पुंज दिसती तेव्हा ।।२४।।
पूर्णपणे तल्लीन । होऊन घेती दर्शन ।
वेगळेच तेज दिसून । येई त्यांच्या चर्येवर ।।२५।।
कर्नाटक प्रांतात । *हत्तरवाट महान क्षेत्र ।
श्री गुरुचरित्रातील सायंदेव भक्त । त्याचे चिरंजीव नागनाथ ।।२६।।

*स्थानाचे नांव

तुझ्या कुळात माझी भक्ति । परंपरेने होईल निश्चिती ।
ऐसे श्रीगुरु सायंदेवाप्रति । श्रीगुरुचरित्रात देती आशिर्वचन ।।२७।।
पुढे होती नागनाथ स्वामी । सद्गुरुंचे वचन पूर्णकामी ।
म्हणून महात्मा होऊन या क्षेत्रोत्तमी । घेती समाधी स्वेच्छेने ।।२८।।
येथील कुलकर्णी भक्त । श्री महाराजांस पाचारित ।
जाती हत्तरवाट प्रत । अनन्य भावे दर्शन घेती ।।२९।।
तस्मिन् तज्जने भेदाभावात् । असे म्हणती प्रवचनात ।
त्याप्रमाणे प्रत्यक्ष यतिराजांची भेट ।
होण्याचा आनंद होई त्यांस ।।३०।।
कडक उन्हे वरून । माशा त्रस्त करिती मधून ।
परी याची काहीच दखल न घेऊन ।
शांत चित्ते समाधी दर्शन घेती ।।३१।।
तद्रूपी लीन होऊन । तदाकार वृत्तीने उभे राहून ।
स्वगत हितगूज करून । शांत उभे राहती ।।३२।।
ब्रह्मरुप अंतर्वृत्तितून । केले ब्रह्मानंदाचे सेवन ।
सामान्य देह धरून । भक्ति केली सगुणाची ।।३३।।
ही कशी असे लीला । त्याचे ते ठाऊक त्याला ।
स्मरणे तोडी भवबंधाला । अशी प्रार्थना आपण करू ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
शहात्तरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ७७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

ऋषि दोन प्रकारचे असतात । एक जे घडणार ते बोलत ।
दुसरे जे बोलती तेचि घडत । सत्य संकल्प त्यांचा असे ।।१।।
एकदा श्रीमहाराज प्रवचनात । सत्यवाणी विषयी सांगत ।
सत्य बोलण्याचा अभ्यास सतत । केला जर नियमे ।।२।।
मग चित्तात जे प्रगट होई । ते ही सत्य होऊन जाई ।
एक अनुभव या विषयी । कथन केला भक्तांनी ।।३।।
आले काही मुंबईकर पुण्यात । दर्शन घेण्या रेणुका निवासात ।
लगेच पुढे हे समस्त । जालन्यास होते जाणार ।।४।।
सायंकाळी आठचे सुमारास । घेण्या श्रींच्या दर्शनास ।
पातले रेणुका निवासास । समस्त भक्त मंडळी ।।५।।
रांगेत उभे राहून । श्रीगुरुंस नमस्कारुन ।
क्षेमादि विचारपूस होऊन । श्रीगुरु विचारती प्रश्न ।।६।।
अंबड गाडी रात्रीची । साडे अकराची वेळ तिची ।
भक्त म्हणती नाही अकराची । असे गाडीची वेळ ती ।।७।।
पुनश्च पुढच्या भक्ताप्रत । तोच प्रश्न विचारित ।
साडे अकराची गाडी वाटत । परत भक्ताचे उत्तर तेच ।।८।।
असे होई तीन वेळेस । यांत काही विशेष ।
न वाटे भक्तांस । जाती बसस्थानाकावर सर्वही ।।९।।
वेळेवर अंबड गाडी । स्थानकावर येऊन खडी ।
चढण्याची चढाओढी । सर्व झाले स्थानापन्न ।।१०।।
अकरा वाजता बरोबर । गाडी सुरु करी ड्रायव्हर ।
इंजिनची काही वेळ घरघर । होऊन थांबली तयेवेळी ।।११।।
मागाहून हे कळले । दिवे बसचे न सुरू झाले ।
कर्मचाऱ्यास पाचारिले । दुरुस्त केले दिवे तेव्हा ।।१२।।

सर्व काम होऊन । गेला अर्धा तास निघून ।
साडे अकरा वाजता सुरू होऊन । प्रवास पुढे करी बस ॥१३॥
जे काही घडून आले । या मुंबईकरांस कळले ।
गुरूंचे वाक्य सत्य झाले । पुढे एक गंमत होई ॥१४॥
या बसची वेळ काळांतरे । साडे अकराचीच ठरे ।
श्रींचा सत्य संकल्प यांत नुरे । तीळमात्र शंका ती ॥१५॥
दुसऱ्याने सांगितले म्हणून । किंवा दुसऱ्याने केले म्हणून ।
तसेच आचरावे आपण । ही गोष्ट चुकीची होय ॥१६॥
मनापासून प्रेमभावे । जे श्रीगुरूंस अर्पावे ।
ते त्यांस स्वीकार्य बरवे । ते पत्रपुष्पादि का असेना ॥१७॥
दुसऱ्याची अक्कल । किंवा दुसऱ्याची नक्कल ।
न करता शक्कल । स्वत:ची लढवावी परमार्थात ॥१८॥
भावनेचा ओलावा । वेष्टित करून घ्यावा ।
प्रिय भेट ती गुरुरावा । याचे उदाहरण एक असे ॥१९॥
एका भक्ताचा सुहृद त्यास । सांगे जाशी गुरुदर्शनास ।
तेव्हा मस्तक ठेवून चरणांस ।
अंगावरून हात फिरवण्यास सांगी ॥२०॥
याप्रमाणे दर्शनास जाता । गुरूंस जाहला विनविता ।
डोके अपुल्या चरणावरूता । ठेऊ द्यावे मज श्रीगुरु ॥२१॥
किंचित रोषाने बघून । गुरु म्हणती डोके ठेऊन ।
पायावर, कां सर्व कामे होती पूर्ण ।
शेवटी लांबूनच नमस्कार करी ॥२२॥
असेच एकदा हा भक्त । जाई दर्शनांस आश्रमाप्रत ।
दुसरा एक भक्त श्रीमंत । पूजन करी महाराजांचे ॥२३॥
गंध पुष्पादिके करून । हार करी अर्पण ।
चरणांस अत्तर लावून । नमन करी मनोभावे ॥२४॥
यास वाटे आपण । आलो रिकाम्या हातानं ।
थोडे अत्तर तरी लावावे म्हणून । श्रीमंत भक्तास मागे उर्वरित ॥२५॥

ते घेऊन रंगेत । उभा राहता दर्शन होत ।
विनवी गुरुंस भक्त । अत्तर लावू का म्हणे ॥२६॥
सरोष याकडे पाहुनी । वदे सद्गुरु वाणी ।
आत्ताच तर लाविले त्यांनी । न लावू देती त्यास ॥२७॥
श्रींच्या रोषाचे कारण । न कळे भक्ता लागून ।
विचार करी सघन । विचारान्ती त्यास कळे ॥२८॥
दुसऱ्याच्या वचनास भुलून । दुसऱ्याचे बघून आचरण ।
तैसे करू गेलो आपण । मान्य नसे ते श्रीगुरुंसी ॥२९॥
पुढे मनोभावाने । स्वर्णमुद्रिका केली अर्पणे ।
वापरलेली तरी गुरुरायाने । स्वीकार केला तियेचा ॥३०॥
या विषयी न व्हावा अहंकार । म्हणोन सावध करिती गुरुवर ।
आनंदे मग भक्तवर । काहीतरी हो सेवा ती ॥३१॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्त्याहत्तरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ७८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

देवाच्या सेवेत । हिशोब न ठेवावा ऐसे म्हणत ।
त्याच प्रमाणे आचरित । देव सेवेस जाती गावोगावी ॥१॥
ज्या विविध क्षेत्रात । श्रीगुरु यात्रेस जात ।
प्रवचनादिक करीत । तेथे अनुभव अनेक येती ॥२॥
त्यांची ही गुंफून माला । अर्पावी श्रींचे चरणकमळा ।
लेखन प्रपंच ये वेळा । केलासे त्यासाठीच ॥३॥
एक ग्राम कळमनुरी । मोठ्या महाराजांचे या स्थानावरी ।
मुक्काम चातुर्मासांतरी । पूर्वी एकदा झालासे ॥४॥
या स्थानी श्रीगुरुंचा । सप्ताह होई भागवताचा ।
तेथील भक्त वदती वाचा । स्वये स्वामी परत आले वाटे ॥५॥
तेथे विपुल अन्नदान । बहुत होई अनुदिन ।
हजार पाने समापन । होई तेथे प्रसाद ॥६॥
आचारी जे स्वयंपाक करीत । ते फार सेवाभावी असत ।
संपूर्ण सप्ताह काळात । केलेल्या कामाचा न घेती मोबदला ॥७॥
ते श्रींच्या हस्ते फक्त । नारळ प्रसाद स्वीकारत ।
श्रींना फार कौतुक वाटत । सर्वांस सांगती हे वृत्त ॥८॥
पत्रात ही काहीस । कळविले या वार्तेस ।
कौतुक परगुणांचे खास । गुण हेचि महाराजांचे ॥९॥
एकदा उन्हाळ्यात । श्रीक्षेत्र काशीत ।
सांगवेद विद्यालयात । आयोजित मंत्रजागर केलासे ॥१०॥
विद्वान ब्राम्हण समस्त । मोठ्या संख्येने उपस्थित ।
एक विद्वत सभा आयोजित । केली असे तयेवेळी ॥११॥
चर्चेच्या विषयाचे प्रतिपादन । महाराज करिती आपण ।
काशीत मरता मुक्ति मिळे म्हणून । विद्वद्जन मते मांडिती ॥१२॥

ज्यांस मृत्यु येई काशीत । त्यांस तारकमंत्र उपदेशित ।
स्वये सदाशिव अवधूत । मुक्त होती ते जीव ॥१३॥
सर्व पक्षाचे मत मांडून । होता शेवटी समारोपातून ।
निरुत्तर सर्वांस करून । वदती काय श्रीगुरु ॥१४॥
काश्यां तु मरणान् मुक्तिः । हे वचन सत्य निश्चिती ।
काशी म्हणजे आत्मा असती । आत्म्याचा अर्थ असे प्रकाश ॥१५॥
या प्रकाशाकडे लक्ष लावून । विकार-विषय रहित होऊन ।
अनन्य चित्ते अनुष्ठान । काशीत करता मोक्ष मिळे ॥१६॥
एकदा दौंडवाडीत । समापनास पंक्ति भोजन होत ।
त्यावेळी अकस्मात । पावसाचे चिन्ह दिसून येती ॥१७॥
भक्त करिती धावा । महाराजांचा तेधवा ।
नैवेद्य वरूणदेवा । दाखविण्यास सांगती ॥१८॥
करिता नैवेद्य अर्पण । पंक्ति होती निर्विघ्न ।
सर्व करिती प्रसाद ग्रहण । त्या स्थानास फक्त वगळून ॥१९॥
इतरत्र जोरदार । पर्जन्य वृष्टी होई फार ।
येथील पंक्ति आटोपल्यावर । मगच पाऊस पडे तेथे ॥२०॥
एकदा मोठ्या दौऱ्यातून । जाती गोंदवल्या लागून ।
तेथील व्यवस्थापक गण । प्रवचन श्रींचे ठेविती ॥२१॥
त्यावेळी प्रवासात । घशाचा त्रास श्रींस होत ।
घसा बसून अकस्मात । बोलण्याचा त्रास होऊ लागे ॥२२॥
सवे जे होते भक्त । ते म्हणती प्रवचन रद्द ।
करू, यावर श्री म्हणत । पाहू देवाच्या इच्छेने काय होते ॥२३॥
तेथे पोचता देवस्थानांत । झाले भव्य स्वागत ।
व्यवस्थापक माहिती देत । प्रवचनास होई खूप गर्दी ॥२४॥
भक्तांस पडे प्रश्न । कसे होई प्रवचन ।
देवाचे घेऊन दर्शन । व्यासपीठावर बैसती श्रीगुरु ॥२५॥
नेहमीच्या आवाजात । जवळ-जवळ एक तासात ।
अत्यंत प्रासादिक प्रवचन सांगत । आश्चर्य वाटे भक्तांस तेव्हा ॥२६॥

गोंदवल्याहून परत येता । आवाज परत झाला बसता ।
त्यांच्या लीलेची ही कथा । काय वर्णावि वर्णविना ॥२७॥
एकदा भक्त भगिनी । प्रेमाने श्रींस बोलोनी ।
म्हणे रात्रीचे प्रवचनी । आनंद फार वाटला ॥२८॥
यावर श्रीगुरु हासून । म्हणती जरी प्रेमानं ।
पोहे दिले तरी ते गोड लागून । आनंद देती जीवास ॥२९॥
म्हणजे तुमच्या प्रेमामुळे । अमुचे सामान्य बोले ।
आनंद वाटे तुम्हास भले । काय म्हणावे यासी हो ॥३०॥
जेव्हा जाती नागपुरास । अनेक प्रदक्षिणा दत्तास ।
घालिती, सवे म्हणती स्तोत्रांस । भक्त पुसे तयेवेळी ॥३१॥
म्हणे इतुक्या प्रदक्षिणा । घालिता काय कारणा ।
यांवर म्हणे श्रीगुरुराणा । प्रदक्षिणेने पाप जाय ॥३२॥
कळत नकळत आपणाकडून । जे पाप होतात घडून ।
हे पाप करण्या क्षालन । प्रदक्षिणेसम न अन्य असे ॥३३॥
भक्त म्हणे तुम्ही अपाप । तुम्हांस आले कैचे पाप ।
यावर सहज म्हणती निकोप । मनुष्य जन्म आपणास मिळे ॥३४॥
तो पुण्य असल्या कारणे । तसेच पापही असल्या कारणे ।
काया-वाचा-मनाने । एकरूप होऊन प्रदक्षिणा करावी ॥३५॥
तसेच करावे नमन । एकाग्रचित्त होऊन ।
कोटि ब्रम्हहत्या हरे हे वचन । दंडवतास म्हणती जेवी ॥३६॥
सामान्य आचरणावरून । सांगती मोठे साधन ।
सामान्य जना लागुन । बोधपर होई ते॥३७॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्याहत्तरावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ७९

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

कोणत्या जीवाचे कल्याण । मार्ग कुठला धरून ।
करील ईश्वर आपण । हे सांगू न शके कोणी ।।१।।
प.प.वासुदेवानंद । त्यांचे चरित्र हर्षद ।
त्यात एक ब्रम्हसमंध । आणावकरांकडे संचरित होई ।।२।।
विविध विषयांवरून । तो करी मार्गदर्शन ।
मूळ चरित्र वाचून । समजून येई ती कथा ।।३।।
निरपेक्ष सात्विक जे नर । अनन्य भावनेने भक्तिपर ।
उपासनादिक करिती त्यांस ईश्वर । निवडतो या कार्यासि ।।४।।
देव अथवा इतर योनीतील । जीवांचा यांच्या शरीरातील ।
संचार हा मार्ग दाखवील । संकटग्रस्त जीवांस ।।५।।
परंतु नाटक त्याचे करून । भाबड्या लोकांस फसवून ।
भोंदुगीरी करिती अनेक जण । सावध त्यांपासून निश्चित रहावे ।।६।।
मोठ्या महाराजांच्या चरित्राप्रमाणं । एका व्यक्तिच्या संचारातून ।
एका भक्तास श्रींची कृपा मिळून । येई ही कथा पुढे असे ।।७।।
अतीव संकटात सापडून । कंठी आपत्तीचे दिन ।
दोघे पती पत्नी पदवीधर असून । नोकरी नसे तयांला ।।८।।
वरिष्ठ अधिकाऱ्याने । या भक्तास सूडबुध्दिने ।
नोकरीतून कमी करणे । प्रकार असा घडलासे ।।९।।
निर्दोष भक्त केवळ । कोर्टात दावा दाखल ।
करी पण नसे बळ । हतबल झालासे म्हणोनी ।।१०।।
दोन वर्षे परिस्थिती । अशीच असे मूळग्रामाप्रति ।
येऊन राहती उभयता ती । नोकरीचे गांव सोडून ।।११।।
वाईट यांची मन:स्थिती । कसेतरी दिवस कंठिती ।
मोठी बहिण शिक्षिका असे ती । या भक्ताची त्या गांवी ।।१२।।
तिचे सहशिक्षक । असती फार सात्विक ।
संचार त्यांचे ठाई आणिक । होत असे देवतेचा ।।१३।।

या भक्तास मार्गदर्शन । करी देवता संचरून ।
भावाच्या शेतालागून । जी विहीर तिथे माझा वास म्हणे ।।१४।।
याच्याकडून जर काही । सेवा माझी तेथे होई ।
तेणे याचे संकट जाई । प्रदक्षिणा करी म्हणे तियेस ।।१५।।
नित्य नैवेद्य दाखवून । गुरुवारी करी उपोषण ।
माधुकरी त्या दिवशी आणून । करी नैवेद्य म्हणे देवता ।।१६।।
कुत्र्याच्या माध्यमातून । तुझा नैवेद्य स्वीकारीन ।
एक वर्ष अशी सेवा करून । राही ऐसे निरोपिले ।।१७।।
असे करिता आचरण । दत्तप्रभूंचे होई दर्शन ।
गाणगापुरास येऊन । दर्शन घे असे दृष्टांत होई ।।१८।।
जाता गाणागापुरास । अनेक दिव्य दर्शनास ।
होई या भक्तास । श्री मंछिंद्रनाथ कानिफ नाथादिकांचे ।।१९।।
होता एक वर्ष पूर्ण । पुन: संचार होऊन ।
आम्ही शास्त्रीबुवा असून । आज्ञेवरून श्रींच्या आलो ।।२०।।
या भक्तास आमच्या स्वाधीन । श्रींनी केले म्हणून ।
पुण्यास पत्र पाठवून । अनुग्रह घेऊन राही म्हणे ।।२१।।
असा निरोप पाहून । शांत होई भक्ताचे मन ।
सर्व सत्य परिस्थिती लिहून । कळवी तयेवेळी महाराजांसी ।।२२।।
या भक्ताच्या पत्रावरून । आपणांस ये कळून ।
कुठल्या देशांत कोण होऊन । कसा येई श्रींकडे ।।२३।।
संकटग्रस्त भक्तास । कुठल्यातरी माध्यमास ।
धरून आणी सावलीस । मार्ग दाखवी कल्याणाचा ।।२४।।
या पत्रात भक्त म्हणे । फार कठिण माझे जिणे ।
कृपांकित मजला करणे । तुम्हावीण मज नसे कोणी ।।२५।।
सर्वही हकीकत । लिहे पत्रात साद्यंत ।
श्रींचा वरदहस्त । लाभता दैन्य राहिल कैचे ।।२६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥१॥
संतांच्या या उक्तिप्रमाण । दिसे अंगी देवपण ।
भक्त वात्सल्याची खूण। ठाई ठाई दिसतसे ॥२॥
एक भक्त बँकेत । असे कुठल्या कार्यरत ।
सहज बोलता विषय निघत । कामकाजातील म्हणोन ॥३॥
म्हणे एका व्यक्तिचे । राहिले बँकेचे कर्ज फेडायचे ।
अमुक अमुक नांव त्याचे । कार्यवाही होईल त्याचे वरी ॥४॥
श्रीगुरु नांव ऐकता म्हणत । हे गृहस्थ अनुग्रहित ।
स्वत: जवळील रक्कम त्वरित । काढून देती तयेवेळी ॥५॥
हे घ्या म्हणती धन । ऋण घ्या त्यांचे फेडून ।
भक्त आश्चर्य पावून । विस्फारित लोचन बघत राही ॥६॥
हाच भक्त एके दिनी । श्रीगुरुंस प्रार्थना करूनी ।
म्हणे जवळ आपल्या राहुनी । वाटते सेवा करावी जी ॥७॥
महाराज सांगती समजावून । गृहस्थ आहात आपण ।
इष्ट कर्तव्य नोकरी करून । पोषण करणे परिवाराचे ॥८॥
इमानेइतबारे नोकरी । आपली करणे ही सेवा खरी ।
ती ही पावते आम्हास तरी । कर्तव्य करणे प्रथम तुमचे ॥९॥
भक्तवत्सल आपण । अतिशय योग्य मार्गदर्शन ।
भक्तांचे सांभाळून मन । सर्वांसच ग्राह्य उपदेश हा ॥१०॥
मनांत करून स्मरण । ईमानाने अभिष्ट कर्माचरण ।
करता ती सेवाच जाण । मोलाची शिकवण ही बरवी ॥११॥
एक दंपती भक्तगण । जाती पुण्यालागून ।
स्वपुत्राचे होते लग्न । निमंत्रण त्याचे श्रींस करण्या ॥१२॥

आपल्या ऐपती प्रमाण । वस्त्रे काही घेऊन ।
जाती गुरुगृहालागून । मनांत भक्ताच्या काय येई ॥१३॥
वदे आपल्या पत्नीस । घेतले या वस्त्रांस ।
साध्या धोतर–साडीस । आईसाहेब महाराजांस योग्य का ती ॥१४॥
इतकी साधी वस्त्रे त्यांस । देता लाज वाटेल मनांस ।
पत्नी विचार करून पतीस । म्हणे ऐसे न चिंतावे ॥१५॥
फार विशाल त्यांची मने । शंका न घेणे या कारणे ।
सांभाळून घेतील म्हणे । उभयतां ते आपणासी ॥१६॥
गुरुंचे घेऊन दर्शन । करिती मनोगत निवेदन ।
अक्षातादि देऊन । धोतर उपरणे भावे देती ॥१७॥
लक्ष्मीआईंस साडी । नसे जरी महागडी ।
भावनेची जरी–काठी थोडी । संकोचून देती गुरु मातेस ॥१८॥
संतोषून देती आशिर्वचन । कार्य होईल निर्विघ्न ।
पुढे एका लग्नसमारंभातून । जाती भक्त पती–पत्नी ॥१९॥
ते यजमानही महाराजांचे भक्त । तेथे जाता ऐकू येत ।
आईसाहेब हाक देत । आहेत आपणासी म्हणोन ॥२०॥
जाती उभयता त्यांचे जवळी । नमस्कार करिती चरणकमळी ।
साडीचा पदर दावून तयेवेळी । आईसाहेब म्हणती हासून ॥२१॥
ही तुमच्या कडची बरे कां । सांगती हर्षून सेवका ।
छान आहे म्हणून कौतुका । करिता पाणावती डोळे भक्तांचे ॥२२॥
असे मोठे माउलीचे मन । भावनेस मानिती म्हणोन ।
भक्तांचे केले समाधान । नमन त्यांस मनोभावे ॥२३॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
ऐंशीवा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ८१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

कुठल्याही शंकेचे समाधान । अतिशय सोप्या शब्दातून ।
पूर्णतः योग्य करून । दाविती मार्ग भक्तांप्रति ॥१॥
एकदा सहज बोलता । भक्त झाला विचारता ।
पुस्तक पॉल ब्रंटनचे आत्ता । वाचले म्या महाराज ॥२॥
त्यात हा लेखक । लिहितो विचित्र एक।
झालो अनेकांसी प्रार्थक । मेहेरबाबां पाशी ही गेलो ॥३॥
परंतु जे हवे ते । न देती मजसी ते ।
संत म्हणविण्यास योग्य न ते । असे लिहिले पुस्तकात ॥४॥
महाराज हे का असे उचित । यातून लोकांची गैरसमजूत ।
मेहेरबाबांविषयी होईल निश्चित । यावर म्हणती श्रीगुरु ॥५॥
कोणी कोणास दीक्षा द्यावी । हे घडे ईश्वराकरवी ।
बुद्धि आपली अल्प बरवी । ईश्वरी कार्य जाणू न शके ॥६॥
ईश्वरी कार्याचे स्वरूप । आहे अचाट अमाप ।
काय कळेल बुद्धिस अल्प । म्हणोन संतचरित्र अभ्यासावे ॥७॥
श्री गोंदवलेकर महाराज म्हणून । जे महापुरुष प्रसिद्ध असून ।
ते गुरुशोधनार्थ भटकून । गेले अनेक संतांजवळी ॥८॥
अक्कलकोटचे स्वामींस । विनवले माणिक प्रभूंस ।
प्रार्थिले साईबाबांस । हे सर्व एकच सांगती ॥९॥
आम्ही नाही तुमचे गुरु । तो ठरवतो ईश्वरु ।
तुमचे गुरु भेटल्यावरु। दीक्षा तुम्हास मिळेल खचित ॥१०॥
शेवटी येहळे गांवात । तुकाईंची भेट होत ।
परीक्षा यांची पाहत । मग अनुग्रह देती ते ॥११॥
काय कळे यावरून । कोणी द्यावे अनुग्रह कोणास म्हणून ।
हे ईश्वराने ठरविलेले असून । होते त्याप्रमाणेच सर्व ॥१२॥

मग काय इतर संताही । म्हणावे तयांत अर्थ नाही ।
नसे उचित गोष्ट ही । उगाच निंदावे कोणास काय ॥१३॥
हे न जाणी पॉल ब्रंटन । रमण महर्षी कडून ।
दीक्षा त्यास व्हायची म्हणून । ठरलेले होते आधीच ॥१४॥
एकदा तीर्थयात्रेस जात । काही भक्तांसमवेत ।
मुलांच्या परीक्षा त्या वेळांत । होत्या या कारणास्तव ॥१५॥
सर्व भक्त स्त्रियांस । वाटे जावे तीर्थयात्रेस ।
न जमे याची खंत मनास । स्त्रीभक्त वर्गासि वाटे ॥१६॥
तीर्थयात्रेवरून परत येता । दर्शनास महाराजांच्या जाता ।
वदती नारी समस्ता । नव्हते भाग्यात येणे अमुच्या ॥१७॥
यावर म्हणती हासून । आम्ही देहाने केले तीर्थाटन ।
तुम्ही मात्र केले स्मरण । या तीर्थक्षेत्रांचे ॥१८॥
करणे तीर्थक्षेत्राचे स्मरण । हे प्रत्यक्ष तीर्थाटन ।
करण्या इतकेच पुण्यप्रद म्हणून । न मानावी खंत त्याची ॥१९॥
एकदा एका भक्तास । सांगती जाता क्षेत्रास ।
देव सांभाळितो आपणास । तेथे जाता रहावे कैसे ॥२०॥
निजण्या जेवण्याची वेळ सोडून । तनमनधने सतत ईश सेवन ।
सतत ईश्वराचे स्मरण । करून रहावे तीर्थस्थानी ॥२१॥
हा उपदेश असे महान । कसे असावे आचरण ।
जाता तीर्थक्षेत्रालागून । हे सांगती गुरु स्वतः ॥२२॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एक्याऐंशीवा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ८२

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

तत्वचिंतक ज्ञानियाने । सतत धीरगंभीर रहाणे ।
गंभीरपणे सदैव बोलणे । हे नसे महाराजांचे बाबतीत ॥१॥
हसणे हसविणे विनोद करणे । प्रसन्न वृत्तिने बोलणे ।
याची अनेक उदाहरणे । दिसती त्यांच्या चरित्रात ॥२॥
अष्टपैलू व्यक्तिमत्व सुभग । त्याचा हा एक भाग ।
म्हणोन काही असे प्रसंग । कथिले ऐका श्रोते हो ॥३॥
एकदा घरी पूजा सांगितली । सौ.आईसाहेबांनी केली ।
त्यानंतर गुरुमाय वदली । एका नातवास विनोदाने ॥४॥
ते नवीन गुरुजी आलेत । त्यांना ही दक्षिणा दे त्वरित ।
असे म्हणून दहा रुपये देत । हातावरी नातवाच्या ॥५॥
नातू जाऊन वदे आजोबांस । ही दक्षिणा दिली तुम्हांस ।
काय बोले आजी ते सहास । सांगे सर्व सविस्तर ॥६॥
दक्षिणा घेतली ठेऊन । मग म्हणती श्री आपण ।
सांगा दक्षिणा मिळाली पण । आजकाल एवढ्यात भागते कां?॥७॥
एवढ्या कमी दक्षिणेत । हल्ली पूजा कोणी न सांगत ।
असे म्हणोन हासत । सद्‌गुरुमूर्ति विनोदाने ॥८॥
प्रसंगानेच लक्ष्मीआई । नमस्कार करी त्यांही ।
एका भक्तास वाटे रोजही । नमस्कारावे त्यांनी महाराजांस ॥९॥
त्यासाठी करी गंमत । एके दिनी रेणुका निवासात ।
हार पेढे घेऊन येत । हार घाली महाराजांस ॥१०॥
पेढे पुष्कळ असत । ते काढून पात्रात ।
महाराजांपुढे ठेवित । आणी मंडळींस बोलावून ॥११॥
घरातील सर्वही सुनामुलांस । बोलावून सांगितले त्यांस ।
करून महाराजांना नमस्कारास । पेढे प्रसादाचे घ्या म्हणे ॥१२॥

महाराज हेतू जाणून । मिष्किलपणे हसून ।
नमस्कारी त्यास पेढा देऊन । करती एक कौतुक ।।१३।।
सर्वांत शेवटी लक्ष्मीआई । नमस्कारास जेव्हा येई ।
नेमके तेव्हाच संपून जाई । पेढे पात्रातील सर्वही ।।१४।।
महाराज म्हणती हासून । पेढे तर संपलेत म्हणून ।
पहा आता विचार करून । नमस्कार करावा किंवा नाही ।।१५।।
आश्चर्य वाटे भक्तास । केवळ घरची मंडळी खास ।
पेढे भरपूर असता या समयास । कैसे संपले म्हणोनी ।।१६।।
मग काही विनोदी बोलून । शेवटी महाराजांस नमस्कारून ।
आईसाहेब जाती हासून । प्रसंग हसवी सर्वांसि हा ।।१७।।
आईसाहेबांसह काशीस । जाऊन केले वेणीदानास ।
परत येता पुण्यास । काही तीर्थयात्रा पुढील ठरे ।।१८।।
भक्त विचारती त्यांस । नेणार कां आईसाहेबांस ।
वदती यावर करून स्मितहास । तेथे काही वेणीदान नसे ।।१९।।
गोपाळ बुवा महाराजांचे बंधुसमान । मोकळेपणी सर्व वर्तमान ।
त्यांस सांगती महाराज आपण । एकदा म्हणती त्यांस काय ।।२०।।
आमच्या मंडळीस आपणे । करून दिले दोन दागिने ।
यावर विचारती उत्सुकपणे । ती कोणती म्हणोन ।।२१।।
गुरु म्हणती तयेवेळी । एक चश्मा आणि दुसरी कवळी ।
असे विनोद वेळोवेळी । करीत असती महाराज ।।२२।।
देऊळगांव राजाचे ब्राम्हण । काही कार्यक्रम म्हणोन ।
करण्या येती निमंत्रण । रेणुका निवासात एकदा ।।२३।।
चालू असता संभाषण । आग्रह करिती ब्राम्हण ।
आईसाहेबांस ही आणावे म्हणून । यावर वदती महाराज ।।२४।।
त्यांची प्रकृती बरी नसे जी । म्हणोन त्यांच्या ऐवजी ।
शेजारी सुपारी कार्यक्रमामाजी । ठेविली तर चालेल कां हो ।।२५।।
यावर हसती सर्वजण । अनुषंगाने वदे एक ब्राम्हण ।
आमच्या मंडळींस एक इंजेक्शन । रोज द्यावे लागते जी ।।२६।।

यावर म्हणती महाराज । आमच्या मंडळींस रोज ।
दोन इंजेक्शनांचे काज । पडे आता वदावे काय ।।२७।।
मग म्हणती सहजच हासून । ठेविली तिकिटे दोन काढून ।
पहिले सुटते कोणते विमान । हे पाहायचे आता म्हणे ।।२८।।
आयुष्याकडे आपणे । निर्लेप होऊन पाहणे ।
त्यातून हे विनोद घडणे । असे सहज स्वभावातून ।।२९।।
व्यावहारिक सांसारिक । जबाबदाऱ्या पूर्ण होता ऐहिक ।
त्यांच्या मनांत असे एक । मंडळींसह राहावे वाडीस ।।३०।।
श्रींचे सान्निध्यांत । पवित्र त्या वातावरणात ।
घालवावे आयुष्य उर्वरित । म्हणोन कधीतरी बोलती ।।३१।।
आग्रहपूर्वक न सांगत । हळुवारपणे स्वपक्ष मांडत ।
तसेच होई याबाबत । प्रसंगाने सांगती श्रीगुरु ।।३२।।
एकदा परिवारासमवेत । सुपुत्र विडियो फिल्म दाखवित ।
वाडीच्या श्रीपादुका दिसत । तत्काळ हात जोडिती गुरु ।।३३।।
नदीचे पात्र-घाट दिसता । आईसाहेबांस अनुलक्षून तत्वता ।
विनोदबुद्धिने जाहले कथिता । येथे जावे राहण्यास ।।३४।।
राहता नदीच्या काठावरी । होईल घाटाची चढउतारी ।
व्यायाम आपोआप होईल तरी । पाय होतील बरे म्हणे ।।३५।।
नळाचे पाणी पिता । व्याधी होती शरीरास समस्ता ।
तीर्थाच्या पाण्याची पवित्रता । रोग नाशन करितसे ।।३६।।
डॉक्टरांस ही मग तयेवेळी । सांगायची न ये पाळी ।
आपणांस वेळोवेळी । हे नका ते नका खाऊ वगैरे ।।३७।।
असो, पुढे फिल्म संपूर्ण पाहता । रात्री उशीर होऊ लागता ।
हासून म्हणती वत्साप्रता । उद्या रविवार नसे आम्हां ।।३८।।
तुमचे प्रमाणे आम्हास । सुट्टी नाही उद्यास ।
सकाळी लवकर आश्रमास । यागाकारणे जाणे असे ।।३९।।
एक नातू संगणक नवीन । घेई त्याचे उद्‌घाटन ।
आजोबांच्या हस्ते व्हावे म्हणून । आणी तो श्रींस तेथे ।।४०।।

एक बटन दाबून । नातवाचे केले समाधान ।
सोबत असलेले भक्त म्हणती संपूर्ण । बटणे ही आपण दाबावी ।।४१।।
यावर म्हणती हासून । दाबण्यासाठी सगळीच बटन ।
पंचेचाळीस हजारांचा कोर्स करून । ज्ञान करून घ्यावे लागते ।।४२।।
डोळ्यांचे होते ऑपरेशन । पराधीनता थोडी येईल म्हणून ।
वाईट वाटे वत्सालागून । बोली तो वडिलांस ही तैसे ।।४३।।
यावर श्री विचारती । बाजारात वस्तुंची गॅरेंटी किती ।
देतात, तर सुत उत्तर दे यावरती । सहा महिने ते वर्ष पर्यंत ।।४४।।
महाराज म्हणती यावर । सदुसष्ट वर्षे तो ईश्वर ।
डोळ्यांची गॅरेंटी देई याउपर । अजून अपेक्षा करणे काय ।।४५।।
इतुके वर्षपर्यंत । दृष्टि निर्मळ ठेवित ।
कृपाळू असा तो भगवंत । अशी जमेची बाजू धरिती ।।४६।।
हलके फुलके बोलून । स्वचित्ताप्रमाणे इतरांचे मन ।
करिती उल्लसित आणि प्रसन्न । प्राजक्त सुमन सुगंधू जेवी ।।४७।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
ब्याऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – ८३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

एक भक्त भगिनी । गुरुभाव असे फार मनी ।
हृद्‌य तिच्या आठवणी । या अध्यायामाजी ऐकाव्या ॥१॥
सौभाग्यावती लक्ष्मीआई । सखी म्हणती या बाई ।
नित्य सेवा करणे होई । रेणुका निवासात येऊन ॥२॥
कसबा गणपती स्थानात । श्रींचे प्रवचन होत ।
आईसाहेबांच्या मनांत । वाटे जावे ऐकण्यासी ॥३॥
सर्व कामे आवरून । निवडणादि पूर्ण करून ।
सखी समवेत जाऊन । बैसती प्रवचना माजी ॥४॥
या वेळेपर्यंत जाती दमून । प्रवचन स्थानी बसून ।
डुकल्या घेऊ लागून । झोक जाती तयांचे ॥५॥
इतुक्यांत निरूपणात । महाराज भक्तांस सांगत ।
किर्तन श्रवणी जाता तिथं । विघ्न अनेक येताती ॥६॥
श्रवणास जाती भक्त । विचार संसाराचे करीत ।
किंवा श्रवणाचे अवधान सोडित । चर्चा विषयांतरी करिती ॥७॥
तिसरे विघ्न म्हणजे निद्रा । सोडावी लोकांनी भद्रा ।
नाहीतर लागून तंद्रा । श्रवणावधान सुटतसे ॥८॥
प्रवचनी झोपू नये कधी । भक्तास विघ्न हे बाधी।
शेजारच्याने आधी । उठवावे त्या झोपलेल्यास ॥९॥
सखी हाताने हलवून । म्हणे आईसाहेब उठा म्हणून ।
नंतर सांगे हासून । प्रसंग सर्व तयांसी तो ॥१०॥
एकदा गंठण नवीन । करण्यास दिले सोनारालागून ।
आणायला जायचे म्हणून । सांगती आईसाहेबांस ॥११॥
आईसाहेब हातास धरून । सांगती बसा म्हणून ।
आज बंद असेल दुकान । नका जाऊ म्हणताती ॥१२॥
दुसऱ्या भगिनी समवेत । जायचे होते दुकानात ।
ती खुणावे यांस सतत । जाऊ म्हणोनी आपण ॥१३॥

शेवटी काही गप्पा होऊन । निघाली सखी तेथून ।
दुसरीच्या आग्रहात फसून । सोनाराकडे जाई ती ।।१४।।
त्या दिवशी दुकान । नसता काही कारण ।
आढळले बंद म्हणून । परत फिरती दोघीही ।।१५।।
आईसाहेब म्हणती त्यांस । सांगितले होते तुम्हास ।
नका जाऊ खास । नाही ऐकिले तरी तुम्ही ।।१६।।
मग दुसरे दिनी । जाती आईसाहेबांस विचारूनी ।
मंगळसूत्र नवीन घेऊनी । येती रेणुका निवासास ।।१७।।
दोन्ही वाट्यात स्वहस्तान । हळदीकुंकू दिले भरून ।
आईसाहेब सखीस कुंकू लाऊन । देती हातात गंठण ।।१८।।
मग म्हणती हासून । महाराजांस या दाखवून ।
महाराजांनीही हातात घेऊन । न्याहाळिले ते कौतुके ।।१९।।
वा छान झाले म्हणती । घालण्यास हातात देती ।
अशी कृपा असे सखीवरती । उभयतांचीही प्रेमभर ।।२०।।
या भगिनीचे कन्यारत्न । येई श्रींचे दर्शनाप्रत ।
बोबडे बोल बोलित । महाराज तिचे कौतुक करिती ।।२१।।
काय घातली ही का काकणे । बांगड्या श्रींस दाखविणे ।
कौतुके मांडीवर बसविणे । प्रसाद देती हातावर ।।२२।।
महाराजांची ही लाडकी लेक । आईसाहेब ही करिती कौतुक ।
उभयतांच्या सान्निध्ये सकळिक । संस्कार घेऊन मोठी होई ।।२३।।
महाराज आईसाहेब स्वतःहून । स्थळ एक थोर योजून ।
स्वभगिनीचे सुपुत्र पाहून । लग्न ठरविती कन्येचे ।।२४।।
साखरपुडा वामननिवासात । सांगती या भगिनीप्रत ।
काही कारणे बदलत । तारीख साखरपुड्याची अचानक ।।२५।।
हे सांगण्यास म्हणून । निघे भगिनी घरातून ।
आधी वासुदेव निवासा लागून । दर्शनास जाई ही भगिनी ।।२६।।
सर्व निवेदन करून । प्रार्थिती हात जोडून ।
तेथे गुरुबंधू भेटून । बोलती या भगिनीस ।।२७।।
जमले कन्येचे छान । आनंद झाला आम्हास पण ।
काही मदत लागता सांगा म्हणून । म्हणती ते गुरुबंधू ।।२८।।

आपुलकीचे भाषण । ऐकून चित्त ये गहिवरोन ।
परिस्थिती आपली साधारण । आठवून डोळ्यांत ये पाणी ।।२९।।
पुढे जाती रेणुका निवासात । जाताच आईसाहेब बोलत ।
रोष करून सखीप्रत । आलात कां रडून त्यांपुढे ।।३०।।
मनांत वाटे खंत । तशीच बसे शांत ।
विसर पडे तियेप्रत । आलो आपण कशांसाठी ।।३१।।
मग अचानक आठवून । म्हणे तारीख बदलून ।
अमुक दिवशी साखरपुडा आहे म्हणून ।
सांगण्यास आले सर्वांसी ।।३२।।
आईसाहेब म्हणती रागावून । आधी नाही सांगितले म्हणून ।
असे वेळवर सांगे कां कोण । असे पुष्कळ बोलती ।।३३।।
सौ.ताई यांस खुणाविती । जा सांगा महाराजांप्रती ।
जाऊन निवेदन सर्व करिती । पुन: येती गुरुमाते जवळ ।।३४।।
आईसाहेबांचे म्हणणे ऐकून । म्हणती भगिनी रुसून ।
वारा फिरतो तसे फिरून । जाता तुम्ही काय हो ।।३५।।
आजवर म्हणीत होता । मुलीकडचे आम्ही, आता ।
आज असे काय बदलता । बाजू तुमची अचानक ।।३६।।
इतुक्यात काठी घेऊन । हळू हळू महाराज येऊन ।
बोलती भगिनी लागून । स्नेहभरे आपुलकीने ।।३७।।
ही सर्व मंडळी जरी । मुलाकडची झाली तरी ।
खेद न करावा अंतरी । आम्ही तुमच्या कडूनच आहोत ।।३८।।
ऐसे म्हणून सप्रेम कर । पाठीवरून फिरविता ऊर ।
भरून येई भगिनीचा सत्वर । समाधान वाटे चित्तास ।।३९।।
इतर भगिनी तियेसी । म्हणती हे विशेषी ।
सेना देऊन दुसऱ्या पक्षासी । पांडवपक्षी जेवी राही कृष्ण ।।४०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्र्याऐंशीवा अध्याय गोड हो ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

मागील अध्यायीचे वृत्त । पुढे ऐका श्रोते समस्त ।
लग्न जाहले थाटात । उपस्थितीत गुरुमाउलीच्या ॥१॥
महाराज म्हणती वधुमातेस । काळजी वाटते का मनांस ।
लांब दिले म्हणून लेकीस । तर नसावी चिंता त्या विषयी ॥२॥
घर लेकीचे किती छान । सर्व सोई आहेत म्हणून ।
त्या गौळणींस किती लांबून । आणावे लागे भरून पाणी ॥३॥
तेथे नळ असती ठाई-ठाई । थोर घराणे असे त्याही ।
कमतरता कुठलीच नाही । म्हणोन समजाविती स्वतःच ॥४॥
या भगिनीचे हाताने । फराळादिक सर्व घेणे ।
विशेष आवडे त्या कारणे । श्री घेती स्वतः मागून ॥५॥
समज नसे त्यावेळी । कसे वागावे गुरुंजवळी ।
परंतु गुरुमाउली सांभाळी । प्रसंग त्यातील विशेष एक ॥६॥
जाती महाराजांचे दर्शनास । पैसे जे असतील कनवटीस ।
ते काढून दक्षिणेस । ठेविती पुढे महाराजांच्या ॥७॥
असेच पांच रुपये दक्षिणा । ठेविली करून नमना ।
महाराजांनी तत्क्षणा । स्वतः जवळील काढली पावली ॥८॥
ती पावली वर ठेऊन । म्हणाले गुरु हासून ।
कधीही सवाईनं । द्यावी गुरुंस दक्षिणा ॥९॥
कधीच नसे नुसता उपदेश । त्याप्रमाणे वर्तन हे विशेष ।
न्यून न पडावे दक्षिणेस । म्हणून सांभाळीती स्वतः ते ॥१०॥
असे सद्गुरु स्नेहाळू । मातेपरी कनवाळू ।
भक्तजनांसाठी केवळू । अवतार दयाळू दत्तांचा ॥११॥
या भगिनीच्या चिरंजीवांस । समवेत अनेक मंडळींस ।
जाती गुरु कुण्डणपुरास । तेथे दत्तमूर्ति स्थापना असे ॥१२॥

कार्यक्रम होई यथास्थित । सायंकाळ होता निघती समस्त ।
आपापल्या वाहनांत । भगिनीसुत मागे राही ॥१३॥
सर्वही असे जंगल । वाहन तेथे दुर्मिळ ।
जावे एकले कैसे केवळ । चिंती भक्त मनामधे ॥१४॥
महाराजांच्या गाडीत । जागा नसे यत्किंचित ।
इतुक्यांत बोलावित । महाराज या भक्तासी ॥१५॥
कैसे जाणार तुम्ही आता । आम्हा समवेतच निश्चिता ।
चलावे गाडीतून असे बोलता । भक्त म्हणे जागा नसे ॥१६॥
अहो! म्हणती महाराज । चिंतेचे काय काज ।
स्टूल छोटा गाडीत आज । आहे बसा त्यावर ॥१७॥
असे म्हणून गाडीतून । आणिले पुण्यालागून ।
असो, काही कारण म्हणून । एक वर्षी नापास होई भक्त ॥१८॥
वाईट वाटे चित्तास । सर्वही रागावती त्यास ।
जाई महाराजांचे दर्शनास । हळूवार बोलती श्रीगुरु ॥१९॥
नसे हरकत यात काही । नापास होता त्या विषयाही ।
अभ्यास पक्का होवून राही । खंत नको त्याची आता ॥२०॥
सर्वही विद्यार्थ्यांसि । म्हणती झटून करा अभ्यास ।
ईश्वरप्रार्थना जोडीस । करत चला असे सांगती ॥२१॥
अभ्यास शिकवणी सोडून । महाराजांचे दर्शन उपदेश श्रवण ।
करणे हे न आवडे त्यांस म्हणून । म्हणती पहिले अभ्यास करा ॥२२॥
असो, पुढे या भक्तास । पूर्ण होऊन शिक्षणास ।
लागे एका नोकरीस । सोलापुरास बदली होई ॥२३॥
न मिळे जागा राहण्यास । फारच पडती सायास ।
अचानक मिळे पत्र त्यांस । महाराजांनी पाठविले ॥२४॥
जागा मिळेल राहण्यास । न करावे काळजीस ।
आश्चर्य म्हणजे दुसऱ्याच दिनास । घरमालक एक देई घर ॥२५॥
अगोदर जो नाही म्हणे । त्याने स्वत:च जागा देणे ।
भाड्याने राहण्याकारणे । आश्चर्य वाटे भक्तास ॥२६॥

अनेक वर्षे तेथ राहता । वाटे बदली व्हावी आता ।
शीण वाटे ती न मिळता । सांगते झाले महाराजांसी ।।२७।।
अहो! चांगले काम करणाऱ्यांची । न होय बदली लवकर साची ।
शीतल दिलासेवार वाणीची । फुंकर मनास शांत करी ।।२८।।
पुढे राहे बारामतीस । रजा असता येई पुण्यास ।
येताच धावे दर्शनास । आश्रमांत जातसे भक्त हा ।।२९।।
एकदा असेच निघताना । उशीर होई येताना ।
सायंकाळ होई, उतरताना । वाटे आज दर्शन न होईल ।।३०।।
वाटे तरी जाऊन पाहावे । भक्ताचे चित्त घरी न राहे ।
गुरुही तिकडे वाट पाहे । तळमळ जाणे शिष्याची ।।३१।।
इतर सेवक म्हणती । आज उशीर झाला तुम्हाप्रती ।
तरी आता निघावे गुरुमूर्ती । थांबती परंतु महाराज ।।३२।।
एक सधन भक्ताचे नांव सांगून । ते येतील म्हणून राहिलो थांबून ।
असे सेवकांस सांगती आपण । इतुक्यांत हा भक्त येई ।।३३।।
महाराजांचे घेऊन दर्शन । चित्त होई त्याचे प्रसन्न ।
कांही विचारपूस करून । म्हणती आता निघावे हो ।।३४।।
ते सधन गृहस्थ । यायचेत म्हणती सेवक समस्त ।
महाराज म्हणती उशीर आता होत । झाली वेळ चला निघू ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौऱ्यांऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

अशी ही भाविक भगिनी । एकदा जपास माळ आणी ।
आईसाहेबांच्या आग्रहावरूनी । जाई दाखवाया महाराजांसी ॥१॥
माळ हातात घेऊन । द्या परत स्पर्श करून ।
असे गुरूंस विनवून । नमन करून उभी राही ॥२॥
महाराजांनी माळ दिली । ती हाती घेऊन भली ।
प्रार्थना महाराजांसी केली । जप मजकडून करून घ्या ॥३॥
"जप करून घ्या" म्हणजे काय । "केला पाहिजे ना" वदे गुरुराय ।
अर्थात् स्वप्रयत्ने पुढे पाय । ठेविता गुरु सहाय्य करी ॥४॥
असो, एक भक्त । छायाचित्रकार असत ।
त्याची आवडी ही जाणत । सेवा त्यासी देती गुरु ॥५॥
या भक्तांचे पूज्य पिता । महाराजांसमवेत काशीस जाता ।
तेथील विस्मयकारक वृतांता । ऐका श्रोते एक चित्ते ॥६॥
होते या मंडळीं समवेत । श्रीगजानन आश्रम स्वामी संन्यस्त ।
एका थांब्यावर गाडी थांबत । उतरले यति संन्यासी ॥७॥
बराच वेळ असा जाता । यती परत न येता ।
काळजी वाटे तत्वता । उतरले पाहण्या भक्ताचे वडील ॥८॥
भेटले यती तयांस । परत येता गाडीस ।
असता काही अंतरास । गाडी निघून चालली ॥९॥
मनांत होई खळबळ । जरी लवकर टाकती पाउलं ।
सत्तरीच्या पुढे वय झालं । उभयता वृध्द मंडळी ॥१०॥
अचानक उचलले जाऊन । गाडीत आले चढून ।
अदृश्य शक्तिचे कार्य ये दिसून । पुढे प्रवास सुखरुप होई ॥११॥
वाटे हेच उभयतांस । चढणे अशक्य गाडीस ।
श्री शक्तिचे काजास । नमन त्यांनी केलेसे ॥१२॥

वाटे या भक्तास । जावे वारी पंढरीस ।
कार्ये व्यस्त असता न जमे जाण्यास ।
म्हणून गुरूंस सांगे मनोगत ॥१३॥
होईल पुढे म्हणती गुरू । भक्तकाम कल्पतरू।
सत्यवचन या अवसरू । दिसून येई तयांचे ॥१४॥
सेवानिवृत्त होता भक्त । जाई पायी वारीत ।
श्री कृपेनेच होत । वर्षानुवर्षे ही सेवा ॥१५॥
ऐसा या भक्ताचा भाव । सर्व संत एक म्हणती गुरुराव ।
भावनेचे फळ अभिनव । कुठला ही मार्ग पावे देवासी ॥१६॥
आवडे छायाचित्रण । विनवी गुरूंस आपण ।
न करिती अनुमान । फोटो काढून घेती गुरू ॥१७॥
सहज स्थितीत बैसुता । कधी गंभीर राहता ।
कधी प्रसन्नपणे हसता । असे फोटो अनेक काढले ॥१८॥
स्थान गाणगापुरातून । शाल प्रसाद मिळे गुरूंलागून ।
हिरव्या रंगाची ती असून । अत्यंत प्रिय असे त्यांसी ॥१९॥
वाटे सर्वही भक्तांस । पांघरून या शालीस ।
काढावे एखादे फोटोस । या भक्तास म्हणती सर्वही ॥२०॥
विनविता असे महाराज । चला म्हणती सहज ।
भक्त मनीचे काज । पूर्ण करण्या उभे ठाकती ॥२१॥
प्रसन्नपणे यांसी । करिती अनुमोदनासी ।
नैपुण्य नसता विशेषी । एकाहून एक छायाचित्र येती सुंदर ॥२२॥
एकदा भक्तास संकट । पातले समोर विकट ।
नोटीस पाठवी घरमालक खाष्ट । घर रिकामे करा म्हणोनी ॥२३॥
थोडीच दिली मुदत । कुठे घर शोधावे शहरात ।
प्रश्न उद्भवला अकस्मात । धांव घेतली गुरुचरणी ॥२४॥
महाराज शांतपणे वदत । पन्नास वर्षे तुम्ही राहात ।
असे न ते काढू शकत । वकील पहा चांगला ॥२५॥

चांगल्या वकीलाकडून । उत्तर द्या पाठवून ।
जास्त न करता प्रयत्न । श्रींचे ऐकता काम झाले ।।२६।।
भक्तास आनंद एक । महाराजांस भेटण्या सकळीक ।
सर्व पीठांचे शंकराचार्यादिक । महान मंडळी सर्व ही येती ।।२७।।
छायाचित्रणाच्या निमित्ताने । झाली या सर्वांची दर्शने ।
संतांची मांदियाळी बघणे । घडले केवळ श्रीं मुळे ।।२८।।
रेणुका निवासात । भगवती ताई येत ।
एकदा त्यांच्या नकळत । फोटो त्यांचा काढला ।।२९।।
छान तयार करून । फोटो आणला परी मनातून ।
वाटे संकोच ताईं लागून । कैसे द्यावे फोटोसी ।।३०।।
न आवडे त्यांस फोटो काढणे । आता मग कैसे करणे ।
महाराजांजवळ या कारणे । दिधला फोटो भक्तानी ।।३१।।
उघडून गुरु पाहती । छान आलाय असे म्हणती ।
स्वत: जवळ ठेऊन घेती । फोटो त्यावेळी महाराज ।।३२।।
जालन्यास काही दिवसांनी । निघाल्या ताई म्हणोनी ।
बांधलेला तो फोटो देऊनी । म्हणती भक्तास महाराज ।।३३।।
नेऊन द्या ताईंसी । सांगा आमचा निरोप त्यांसी ।
आश्रमात लावा या फोटोसी । केले तैसेच भक्ताने ।।३४।।
ताईंस वाटले देवाचा । दिला असेल फोटो साचा ।
निरोप असे श्रीगुरुंचा । म्हणून उघडून पाहती ।।३५।।
मनांत नसे तरी । आज्ञापालन सर्वोपरी ।
म्हणोन विसावला आश्रमा भीतरी । फोटो तो ताईंचा ।।३६।।
यावेळी एक प्रसंग । सांगून हा कथा भाग ।
पुरा करणे हेचि योग्य । ताईंचे मनी एक असे ।।३७।।
श्री धुंडीराज महाराजांसमवेत । श्री काजळकार महाराज असत ।
तेथे असावे दत्तमहाराजांचे चित्र । जालन्याच्या आश्रमी ।।३८।।
त्यासाठी पुण्यास । पाठविले काही भक्तांस ।
आणण्या श्रींचे फोटोस । जाती भक्त त्याप्रमाणे ।।३९।।

एक सुंदर फोटो पाहून । घेती भक्त न्यावे म्हणून ।
इतुक्यांत निरोप मिळून । जाती श्रींचे दर्शना ।।४०।।
किंचित रोष मुद्रेवरी । जाता दिसे गुरु चर्येवरी ।
बसा म्हणती जाता भीतरी । पुढे बोलती श्रीगुरु ।।४१।।
'सामान्य मर्त्य' आम्ही आहोत । आमची प्रतिमा त्या देवांत ।
ठेवायची नाही खचित । असे बोलती श्रीगुरु ।।४२।।
असे अमानित्व थोर । भूषण त्यांचे मनोहर ।
कलीयुगीचे हे अवतार । नमस्कार त्यांचे चरणी असो ।।४३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंच्याऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक दंपती पुण्यात । महाराजांचे भक्त ।
पत्रिका पाहून सांगत । एक स्त्री तयांसी ॥१॥
तुम्ही श्री टेंबे स्वामींच्या संप्रदायात । जा म्हणजे होईल कार्य समस्त ।
म्हणून शोधिती शहरात । वामन निवासात मित्रामार्फत येती ॥२॥
गुरुजी तेथील सांगत । उद्या पाद्यपूजा आहे येथ ।
प्रसाद घेण्या बोलावीत । दर्शन होई महाराजांचे ॥३॥
अनुग्रह देण्यास विनविती । यथावकाश श्रीगुरु देती ।
अनुग्रह या उभयतांप्रती । जाती दर्शनासी नियमित ॥४॥
एकदा या भगिनीस । स्वप्न पडे पहाटेस ।
गुरुमहाराज-दत्तमहाराज इयेस । बोलती त्या स्वप्नामाजी ॥५॥
घाण तुमच्या पोटात । फार आहे ती काढा समस्त ।
असे दिसून आश्चर्यचकित । होई ही भगिनी ॥६॥
पतीस आपल्या सांगून । जाती दवाखान्या लागून ।
स्वप्न पडले म्हणून । घ्यावे तपासून म्हणोनी ॥७॥
डॉक्टर सांगती तपासण्यात । एक किडनी कमकुवत ।
कार्य नीट न करीत । ॲटमबॉम्ब तो असे ॥८॥
कधी फुटेल याचा नाही नेम । काढून टाकणे हे उत्तम ।
होई त्यांचे हे काम । मार्गदर्शने अशोक महाराजांच्या ॥९॥
पुढे विश्रांती घेऊन । बऱ्या होती या पूर्ण ।
परी जास्त वेळ बसून । काम कुठले न होई ॥१०॥
श्री दत्तमाहात्म्याची पारायणे। तीन दिवसांची करणे ।
एकदा तिसऱ्या दिवशीचे वाचणे । दुखण्यामुळे अपुरे राहिले ॥११॥
जाऊ दे, पाच दिवसात । वाचन पूर्ण करावे निश्चित ।
असे म्हणून हो निद्रिस्त । तो आवाज कानात येई ॥१२॥

जाग येऊन ऐके भगिनी । श्रींचा आवाज ये कानी ।
तीन दिवसाचे करावे म्हणूनी । ठरविले तुम्ही पारायण ॥१३॥
आता न वाचता । निवांत तुम्ही झोपता ।
चला उठून वाचा आता । बैसल्या भगिनी वाचावयास ॥१४॥
आश्चर्य म्हणजे झोप न ये । शीण न वाटे काये ।
पहाटेच्या समये । वाचन पूर्ण जाहले ॥१५॥
याप्रमाणे वाचना । श्री गुरुचरित्रास प्रदक्षिणा ।
सायंकाळी त्रिपदी गायना । करिती या मनोभावे ॥१६॥
त्रिपदी म्हणताना । दत्तमहाराज दिसती फिरताना ।
दिसती कुंड्यांजवळून जाताना । तो एक घडे आश्चर्य ॥१७॥
त्या कुंडीत औदुंबर । आपोआप येऊन वाढे सुंदर ।
त्याचे पूजन नित्यनेमवर । करित्या जाहल्या मनोभावे ॥१८॥
एके दिनी वरच्या मजल्यावरी । कपडे वाळविले कोणीतरी ।
पाणी झिरपले कुंडीवरी । वाळून गेले औदुंबर ॥१९॥
वाईट वाटे भगिनीस । तो दुसऱ्या एका कुंडीस ।
आले रोप औदुंबर त्यास । पुढे जपून ठेविले ॥२०॥
एकदा एकाच समयास । स्वप्न दिसे दोघांस ।
दत्तमहाराज दिसती पतींस । स्पर्श अनुग्रहाची प्रार्थना करिती ॥२१॥
पत्नीस दिसती नरसिंह यती । घरी यांच्या स्वये येती ।
बोलावी पतींस दर्शनाप्रती । दिसले ऐसे स्वप्नांत ॥२२॥
उभयता जागे होऊन । एकमेकालागून ।
स्वप्न सांगती हर्षून । आश्चर्य वाटे तयांसी ॥२३॥
या भगिनी समवेत । अजून एक स्त्री भक्त ।
असे सेवा करण्या समस्त । लग्न तिच्या मुलीचे जमले ॥२४॥
सर्व ही झाले निश्चित । तयारी करिती जोरात ।
एके दिनी अकस्मात । भगिनीचे कानात आवाज येई ॥२५॥
थांबवा तुमच्या प्रदक्षिणा । जा त्या सखीस भेटण्या ।
असे सांगती गुरुराणा । तोच दूरध्वनी वाजला ॥२६॥

सांगे सखी गहिवरोन । लग्न मोडल्याचे दिसे लक्षण ।
काही न सुचे मजसी म्हणून । तुजसी म्यां पाचारिले ॥२७॥
कळे या भगिनीस । इच्याकडे जाण्यास ।
कां सांगती श्री आपणांस । गेली गृही सखीच्या ॥२८॥
दोघी जाती वासुदेव निवासी । दर्शन घेऊन त्या समयासी ।
आल्या रेणुका निवासासी । दर्शन होई ताईंचे ॥२९॥
सव्वा लक्ष जप करा । सांगती श्रीगुरुंस स्मरा ।
जप होता तेवढा पुरा । लग्न सुरळित जाहले ॥३०॥
पुत्रादिक पावून । ती कन्या राहे सुखाने ।
असे गुरुंचे लीला वर्णन । करण्या अपुरे शब्द पडती ॥३१॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
शहाऐंशीवा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - ८७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

मागील अध्यायीची भगिनी । तिचे अनुभव ऐकोनी ।
तृप्त व्हावे कानी मनी । व्हावे श्रोते सावधान ।।१।।
कोण्या एका आप्तानी । आणुन दिली इये लागुनी ।
श्री श्रीधरस्वामींची पोथी आणि । म्हणे तुम्ही वाचाल कां हो ।।२।।
एक अध्याय तीत । श्री दत्तमहाराजांवर असत ।
नसे काही हरकत । म्हणे आपल्या गुरुंचे ही यांत नाम ।।३।।
करी नित्य वाचन । मनोभावे करून ।
या संतांचा संबंध अन्योन्य । काय कळे आपण अज्ञांसी ।।४।।
महाराजांचे एक भक्त । श्रीधरस्वामीं जवळ असत ।
जेव्हा महासमाधी घेत । सज्जन गडावरी स्वामी ।।५।।
हा भक्त पाही नयनी । स्वामींच्या शरीरातुनी ।
ज्योती तेजस्वी निघोनी । औदुंबर वृक्षाकडे जाय ।।६।।
त्या औदुंबर तटी स्वतः । दत्तमहाराज विलसत ।
ज्योती जाऊन लीन होत । दत्तमहाराजांच्या हृदयामाजी ।।७।।
दत्तमहाराजांसी शक्तिपात । जाहला सज्जनगडाप्रत ।
हे वृत्त सर्वांसि विदित । असो पुढील कथा ऐकू ।।८।।
भगिनी एके दिनी नवरात्रात । श्रीधर स्वामींची पोथी वाचत।
माहुर गडासी स्वामी जात । बैसती जगदंबे सन्निध ।।९।।
अत्यंत प्रीती करून । वात्सल्य मातेचे मिळून ।
पावती मनी समाधान । बैसती तीन दिवस तेथे ।।१०।।
अश्रु पाझरे तिसरे दिनी । येती नयन भरोनी ।
देवी पुसे स्वामी लागुनी । कां रोदन करिताती ।।११।।
म्हणे संन्यासी आपण । कोठे ही राहावे तीन दिन ।
मग गाठावे अन्य स्थान । नियम आमुचा कठिण हा ।।१२।।

होईल तुझा वियोग म्हणून । माते भरती आमचे नयन ।
शेवटी हृदय करून कठिण । निघाले गडावरून खाली ॥१३॥
तेथील पुजारी पाहती । पैंजणांचा आवाज येई तयांप्रती ।
स्वामी चालती, मागुती । उमटताती चरण जगदंबेचे ॥१४॥
हळदी कुंकवाची पाऊले । उमटवून आई चाले ।
स्वामी जेथ चालले । तेथवर जाई जगज्जनी ॥१५॥
हा प्रसंग वाचून । महाराज आणि ताईंचे स्मरण ।
या भगिनीस होऊन । म्हणे जगदंबाच ताई असती ॥१६॥
असे म्हणून मनोमन । वंदन उभयतांस करून ।
सर्व कामे आटोपून । रेणुका निवासी दर्शनास जाई ॥१७॥
महाराजांचे घेऊन दर्शन । ताई भगवतींसी नमन ।
मनोभावे करून । बैसली सन्निध तयांच्या ॥१८॥
ताई म्हणती हासून । हे करंडे घ्या तुम्हालागून ।
हळदी कुंकूवाचे करंडे दोन । दिधले भगिनीस ताईंनी ॥१९॥
सकाळी मनी जो उमटे भाव । त्याची ही प्रचीती अभिनव ।
एक तत्व गुरुराव । रुपे भिन्न दिसताती ॥२०॥
नित्य त्या करंड्यातून । कुंकू लावी भगिनी आपण ।
यत्किंचितही न हो न्यून । कुंकू त्या करंड्यातील ॥२१॥
रेणुकानिवासी नवरात्रात । प्रसाद मिळे द्रोणांत।
दुसरे दिनी मेहुण सांगत । उभयतांसी महाराज ॥२२॥
रात्री भूक नसे म्हणून । न खाता राहती निजून ।
सकाळी पतीराजांस भूक लागून । म्हणे खावे काहीतरी ॥२३॥
प्रसादास जायचे आपुल्याला । मग काय द्यावे यावेळेला ।
साबुदाणा भिजविला । खिचडी करून दिधलीसे ॥२४॥
यथावकाश प्रसादास । जाती रेणुका निवासास ।
ताई भगवतीं समोरच जेवावयास । बसती उभयता आणिक ॥२५॥
वाढणाऱ्या भक्तास । म्हणती ताई पाकपुऱ्या वाढा यांस ।
यांनी आज केले फराळास । आश्चर्य वाटे दोघांसही ॥२६॥

चुटपुट वाटे मनास । पुसते जाहले गुरुजींस ।
म्हणे देवीनी क्षमा केली तुम्हास । साबुदाणा खाऊ नये ।।२७।।
पोहे-उप्पीट काही असे । खावयास चालतसे ।
सर्वज्ञत्व यावरून दिसतसे । माउलीचे प्रसंगाने ।।२८।।
श्रींचे महानिर्वाणाचे वेळेस । मन दाटून येई आधी आठ दिवस ।
कारण न कळे इयेस । स्वप्न देखे ते समयी ।।२९।।
पूर्व दिशेहून । महाराज आले आपण ।
सदन करून पावन । बसले आसनी श्रीगुरु ।।३०।।
उभयता करिती नमस्कार । श्रीगुरु पाहती हास्य मधुर ।
पोथी वाचता जी नित्य तर । आणा श्रीधरस्वामींची ।।३१।।
पोथी हातात घेऊन । पाहिली सर्व उलगडून ।
'चांगले आहे चालू द्या वाचन ' । असे म्हणून उठले ते ।।३२।।
''बराय येतो आम्ही'' असे । श्रीगुरु वदता तसे ।
वाईट यांस वाटतसे । सावकाश निघती महाराज ।।३३।।
श्री अशोक महाराज इतुक्यात । मंडळीं समवेत ।
येती यांच्या गृहाप्रत । असे दिसे स्वप्नामाजी ।।३४।।
नित्य गुरुकृपेत न्हावून । रमती गुरुभक्तित अनुदिन ।
नित्य जालन्यास जाऊन । करिती भक्ति मनोभावे ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्याऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८८

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक कुटुंब भाविक भक्त । महाराजांचे अनुग्रहित ।
यांवर महाराजांची कृपा दिसत । अनेकविध प्रसंगातुनी ॥१॥
एकच मुलगा असून । त्याचे मौंजीबंधन ।
शिक्षणादिक संपूर्ण । मार्गदर्शने करविले ॥२॥
दर वर्षी वाडीस । जावे गुरुद्वादशीस ।
करावे महापूजेस । चिरंजीवांचे होईपर्यंत शिक्षण ॥३॥
असे निरोपिले महाराजांनी । ते नियमे पूर्ण करोनी ।
महाविद्यालयी प्रवेशाकारणी । औरंगाबादी जाहले जाणे ॥४॥
तेथे जालन्यास येऊन । सांगितले सर्व वर्तमान ।
उदयिक प्रवेश घेऊन । पुढे मुंबईस जाऊ म्हणे ॥५॥
ताईंनी निरोपिले त्यांसी । उद्या प्रवेश मिळता यासी।
येऊन सांगावे या स्थानासी । होईल सर्व व्यवस्थित ॥६॥
मुलाचे शिक्षण-नोकरी । सर्व व्यवस्थित होई तरी ।
श्रीकृपेने योग्य कन्येस वरी । करी गृहस्थाश्रम सुखाचा तो ॥७॥
मुले असता शाळेत । प्रसंग दुःखाचे अकस्मात ।
येती वियोग काही आप्तांचा होत । भगिनी दुःख करे अति ॥८॥
कसेबसे रोजचे आवरून । रडत राहे बसून ।
एके दिनी कानी स्वन । ऐके स्वर महाराजांचा ॥९॥
"उठा बसू नका असे" । काही तरी वाचन विशेषे ।
करा असे सुचवितसे । ध्वनी तो कानातील ॥१०॥
अनेक वेळ हे ऐकून । करी सद्ग्रंथ वाचन ।
चरित्रादिक मनन करून । मन शांत हो तियेचे ॥११॥
परिस्थिती असे बेताची । ओढ असे परमार्थाची ।
महाराजांच्या सहवासाची । गोडी वाटे उभयतांस ॥१२॥
महाराज जाता काशीस । बोलाविती उभयतांस ।
जाती तेथे दोन दिवस । मनास आनंद वाटतसे ॥१३॥

असेच वाटे उभयतांस । जावे आपण कुरवपुरास ।
महाराजांच्या भागवत सप्ताहास । परी अडचण एक असे ॥१४॥
मुले असती लहान । शाळा त्यांची म्हणोन ।
त्यांची सोय काय करून । जावे हा विचार असे ॥१५॥
मुले म्हणती आम्ही राहू । आमचे ते आम्ही पाहू ।
महाराजांच्या मिळण्या स्नेहू । जा तुम्ही निर्धास्तपणे ॥१६॥
ठरविले जाण्याचे ते दिनी । आई-वडिल अचानकपणी ।
येती तयांस पाहुनी । आनंद वाटे उभयतांस ॥१७॥
सोय मुलांची झाली । कुरवपूरची यात्रा केली ।
तेथे बरीच सेवा घडली । स्वयंपाकादि सर्वही ॥१८॥
एकदा वाढले महाराजांस । होता पूर्ण भोजनास ।
महाराज म्हणती सहास । हात पुढे धरोनी ॥१९॥
घ्या तुम्ही घाला पाणी । आम्ही घेतो हात धुवूनी ।
आनंद वाटे बहुत मनी । स्वत: ऐसी सेवा देता ॥२०॥
करिती महाराजांस प्रार्थना । जावे कां गाणगापुरी दर्शना ।
संमती मिळता कुरवपुराहून गमना । करते झाले दंपती ॥२१॥
सर्व तीर्थांचे स्नान करून । घेतले निर्गुण पादुकांचे दर्शन ।
पुजारीजींस म्हणती विनवून । आम्हास पूजा मिळेल काय ॥२२॥
रात्रौ येऊन सांगती । पुजारी या उभयतांप्रती ।
उद्या पहाटेसच मंदिराप्रति । जावे लागेल तुम्हास ॥२३॥
पुजाऱ्यांनी वाळविलेले । घातले उभयतांनी सोवळे ।
ब्राम्हमुहूर्तावर भले । घेतले जाऊन दर्शन ॥२४॥
भक्तास बोलावून आत । सांगती पूजा करण्या समस्त ।
जाळीच्या बाहेर बसत । भगिनी वाचे सप्तशती ॥२५॥
होता अध्याय पन्नास । बोलाविले आत यांस ।
सांगितले वाहण्या फुलांस । आनंद मनात फार होई ॥२६॥
सुगंध येई अलौकिक । जगाचे विचार सकळिक ।
जाऊन सौख्य अनामिक । मिळे या उभयतांसी ॥२७॥
करून अन्न संतर्पण । अलभ्य लाभ हा मिळून ।
श्रीकृपेने रेल्वेत स्थान । मिळून मुंबईत पातले ॥२८॥

पुढे मुंबईस परत येता । यांचे घरी कार्यक्रम होता ।
आनंद वाटे बहुत चित्ता । शनिवारचे होता नामसंकीर्तन ।।२९।।
तयेवेळी या भगिनीप्रत । एका भक्ता समवेत ।
ताई भगवती साडी पाठवित । प्रसाद मिळून हर्ष होय ।।३०।।
नित्य ही जालन्यास । जाती अनेक उत्सवास ।
एकदा सांगती उभयांस । ताई स्वत: पुढील महिन्यात येण्या ।।३१।।
भगिनीस वाटे जावे आपण । रजा घेऊन दोघेजण ।
जावे यागाच्या अगोदर पासून ।
ऐकिले मी त्यांनी बोलाविले स्वत: ।।३२।।
सुटी नाही मिळत । एकटीच तू जा म्हणत ।
मी येईन पूर्णाहुती प्रत । भक्त ऐसे बोलिला ।।३३।।
याच सुमारास । पाही एका स्वप्नास ।
दत्तमहाराज येती घरास । बैसवून वंदन केलेसे ।।३४।।
मागून ताई भगवती । घरामाजी सावकाश येती ।
वंदन त्यांच्या चरणांप्रती । केले मनोभावाने ।।३५।।
महाराज म्हणती आहे कर्मभोग । प्रारब्धाचा हा भाग ।
असे ऐकून येई जाग । न हो उलगडा स्वप्नाचा ।।३६।।
पुढे एकल्याच जाती । जालन्याच्या आश्रमाप्रती ।
अशोक महाराज ओटीवरती । बैसले बोलाविती यांसी तेव्हा ।।३७।।
त्यांच्या बोलण्यावरून । येई भगिनीस कळून ।
पंचकुण्डात्मक यज्ञात यजमान म्हणून ।
बैसविणार होते उभयतांसी ।।३८।।
उद्वेग होई मनास । उपयोग काय पण त्या समयास ।
घालविले सुअवसरास । म्हणोन सर्वांनी जाणावे ।।३९।।
गुरु जे बोलती शब्द । ते झेलावे अलगद ।
नाहीतर पुढे खेद । करण्याची पाळी येतसे ।।४०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्याऐंशीवा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ८९

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

एका लहान शहरात । राही एक भाविक भक्त ।
दोन कन्या यासी असत । हुशार आणि अभ्यासू ।।१।।
धाकटीस वाटे संगणक ज्ञान । घेण्या जावे पुण्यालागुन ।
स्नातकोत्तर पदवी घ्यावी म्हणून । राहावे तेथेचि पुण्यात ।।२।।
आजी आधी नाही म्हणे । वडिलांनी अनुमति दिल्याकारणे ।
अजून तीन मुलींसह जाणे । प्रवेश घेणे आदि ठरलेसे ।।३।।
वडील पैसे बँकेतून । आणती मग काढून ।
ठरला कार्यक्रम पूर्ण । उदयीक निघायचे आता असे ।।४।।
ते दिनी पहाटेस । पडे स्वप्न कन्येस ।
विराजले महाराज आसनास । बोलती शांत भावाने ।।५।।
पुण्यास जायचे म्हणता परी । अपव्यय पैशांचा होईल तरी ।
नका जाऊ इतुक्या लांबवरी । 'बघा' असे बोलले ।।६।।
सकाळी आपल्या वडिलांस । सांगितले स्वप्नास ।
करीत होते पूजेस । नयनी जल पाझरले ।।७।।
पाहून फिरत्या मनूंस । शिकविले नाही मुलींस ।
न व्हावे ऐसे म्हणून परवानगीस । दिधले, न्हवते माझ्याही मनी ते ।।८।।
रहित केले पुण्यास जाणे । अकोल्यास काकांकडे राहाणे ।
महाविद्यालयी प्रवेश घेणे । ऐसे कन्येने योजिले ।।९।।
पुढे ऐसे वर्तता । प्रसंगी महाराज घरी येता ।
सर्व परिवार दर्शन घेता । बोलती कन्येस विशेष करून ।।१०।।
बरे झाले तुम्ही येथ । प्रवेश घेतला महाविद्यालयात ।
शिक्षणही पूर्ण होत । समज ही येई व्यावहारिक ।।११।।
येऊन स्वप्नी सांगितले । ते कन्येने ऐकिले ।
त्याचे अनुमोदन केले । प्रत्यक्षात भेटता महाराजांनी ।।१२।।

पुढे येई समजून । जाता पुण्यास इयेस गाढून ।
मुलाची पत्रिका बदलवून । फसवावे इयेस लग्नासी ॥१३॥
असा काही लोकांचा । बेत होता हो साचा ।
गुरुंचे ऐकता कल्याण हे त्रिवाचा । सत्य असे जाणावे ॥१४॥
या उभय कन्यांसी । आईसाहेब पाहती मुलांसी ।
विशेष नेम दोघींसी । सांगितले स्वत: होवून ॥१५॥
जावे सायंकाळी मारुतीसी । घेऊन खडीसाखरेसी ।
घालावे अकरा प्रदक्षिणेसी । प्रत्येकी एक खडा ठेवून ॥१६॥
"खडा-खडी गुण दे" अशी । प्रार्थना करावी मारुतीरायासी ।
प्रत्येक वेळी प्रदक्षिणेसी । करावे ऐसे नेमाने ॥१७॥
गजानन विजय वाचावे । रुक्मिणी स्वयंवर ही मनोभावे ।
स्थळ मिळेल तुम्हास बरवे । सांगती त्यांसी लक्ष्मीआई ॥१८॥
म्हणती तुम्हा बहिणींचे । बरोबरच व्हावे लग्न साचे ।
निश्चिंत मन आईवडिलांचे । तेणेकरून होईल ॥१९॥
आईंचे आशिर्वचन । लगेच खरे होऊन ।
दोन-तीन महिन्यांत लग्न जमून । सोहळा उत्तम जाहला ॥२०॥
लग्न जाहले धाकटीचे । पतीस पगार बेताचे ।
येता अधिक महिना इयेचे । मनी एक येई हो ॥२१॥
वदे आपल्या भरतारास । पाठवावे काही दानास ।
अधिक महिना म्हणून महाराजांस । पतीही मानी वचन तियेचे ॥२२॥
आपल्या शक्तिप्रमाण । लहानसे संध्यापात्र आणून ।
दीपक वगैरे वाण ठेवून । पाठविले ते महाराजांसी ॥२३॥
सासरे कन्येचे रागावती । ही काय तुमची मती ।
येवढेसे का वाण देतात कधी । वाईट इच्या चित्तास वाटे ॥२४॥
त्या दिवशी स्वप्नात । दिसे आपण वाडीत ।
मोठ्या महाराजांच्या मंदिराप्रत । उभे आहोत ऐसे दिसे ॥२५॥
महाराज घाट चढून । उभे राहती पुढे येऊन ।
बोलती कन्ये लागून । ओवाळा आता आम्हासी ॥२६॥

हातात असे तेच वाण । सद्गुरुंस ओवाळून ।
हाती देई अधिकाचे वाण । उचंबळून मन हर्ष होई ॥२७॥
पुढे कन्येचे श्वशुर । म्हणती इयेसी नोकरी धर ।
एके स्थानी वशिल्यावर । पाठविती मुलाखतीसाठी ॥२८॥
अगोदरच ठरविले असत । नोकरी हिला द्यावी निश्चित ।
न सुचे काय करावे पुसत । आपल्या पतीस तयेवेळी ॥२९॥
पती म्हणे जर श्रींच्या मनात । नसे तर तुला न घेतील नोकरीत ।
ते आपल्या कामासी जात । बसे देवाजवळ ही कन्या ॥३०॥
म्हणे तुमच्या मनी काय । न समजे मजसी गुरुराय ।
तुमच्या अनुमतीची खूण काय । समजावी मी स्वामी हो ॥३१॥
जर मी जायचे वेळी । पाऊस पडून धरणी भिजेल जळी ।
मग मी समजेन तयेवेळी । तुमची इच्छा नसे नोकरी करण्याची ॥३२॥
असे बोलून सर्व कामे । आटोपून निघे कन्या उद्गिमे ।
घेऊन निघे सद्गुरु नामे । कडकडीत उन्हे पडलेसे ॥३३॥
कुलूप लावून निघे कन्या । पुढील रस्त्यावर ही न पोहोचे धन्या ।
तो अकस्मात् भारी पर्जन्या । पडून चिंब भिजलीसे ॥३४॥
गुरुंची इच्छा नाही म्हणून । खूण इयेसी पटून ।
न जाई मुलाखती लागून । जरी नंतर श्वशुर रागे भरती ॥३५॥
गुरुकृपेचे महिमान । न होई तिचे आकलन ।
भक्ताचे जाणी अंत:करण । भक्ताभिमानी श्रीगुरु ॥३६॥
भार टाकिता त्यांवर । मार्ग दाविती बरोबर ।
व्यापिले ज्याने चराचर । त्यास कठिण नोहे काही ॥३७॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकोणनव्वदावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक वृध्द भक्त भगिनी । करी सद्गुरु गुण वर्णनी ।
यजमान यांचे गुरुचरणी । लीन असती सर्वदा ॥१॥
गुळवणी महाराजांबरोबर । तुळजापुर, गाणगापुर ।
यात्रा जाहल्या सुंदर । संतोष मनी दाटला ॥२॥
दत्तमहाराजांसमवेत । पुढे राहती सतत ।
यात्रेस नेती समस्त । उभयतांस श्री ॥३॥
त्याचा वृत्तांत सविस्तर । कथिला भगिनीने सुंदर ।
वाडी यात्रेस निघता गुरुवर । म्हणती चलावे यजमानांसी ॥४॥
तोवर या भगिनीनं । घेतले नव्हते वाडी दर्शन ।
वाटे जावे आपण । यजमानांच्या बरोबर ॥५॥
पती म्हणती न आत्ता । दिवाळीस नेऊ तत्वतां ।
वाद उभयतांचा यावरुता । होई तोच निरोप येई ॥६॥
महाराजांनी बोलाविले । उभयता सन्निध गेले ।
महाराज पुसती काय झाले । वदे मनातले मग भगिनी ॥७॥
तुमची काय असे हरकत । आम्हा सोबत त्यांस येऊ देत ।
असे यजमानांसी वदत । वाडीची घडत यात्रा मग ॥८॥
महापूजा तेथे जाहली । जेवावयास अनेक मंडळी ।
वाढण्याची धांदल झाली । जाणिले महाराजांनी सर्वही ॥९॥
स्वतः उठून येती । वाढण्यास पुढे होती ।
भाताची परात घेऊन हाती । भराभर वाढती श्रीगुरु ॥१०॥
नंतर म्हणती यांस । तुम्हामुळे आम्हास ।
लवकर मिळे जेवावयास । नाहीतर उशीर खास होतो येथे ॥११॥
म्हणून राहावे अजून । उभयताही काही दिन ।
राहविले असे बोलून । आनंद वाटे यांसी तेव्हा ॥१२॥

असेच एकदा यांसी । विचारती महाराज गुणराशी ।
पाहिले कां हो भगवंतासी । तुम्ही कधी ते सांगावे ।।१३।।
या म्हणती आम्हास । न घडले जी दर्शनास ।
ऐसे वर्तता यात्रेस । नेती यांना बरोबर ।।१४।।
तुळजापूर, सोलापुर । वैरागला जाती गुरुवर ।
कन्या म्हणे मुक्कामावर । राहावे पिताजी आज हो ।।१५।।
महाराज म्हणती मुक्कामास । न राहाता येई, दर्शनास ।
जावे बार्शीचे भगवंतास । म्हणून लगेच निघती ते ।।१६।।
श्रीक्षेत्र माहुरी । ताईंचे ज्येष्ठ चिरंजीवांचे मांडीवरी ।
जावळे नातवाची काढली तरी । उभयतांसी नेले याही ।।१७।।
श्रींचे मुळे तीर्थयात्रा । घडल्या आपणासी समस्ता ।
प्रेम ही यांचेवर तत्वता । होते तितुकेच महाराजांचे ।।१८।।
एके वर्षी यजमानांचे । दात काढले तेव्हाचे ।
निमित्त काही उत्सवाचे । चर्चा करिती मंडळी ।।१९।।
लाडू करावे म्हणून । बोलती सर्वजन ।
श्री म्हणती त्यांचे दांत काढले म्हणून । बेत करा श्रीखंडाचा ।।२०।।
आमचे बरोबर या म्हणून । सांगती महाराज स्वतः होवून ।
पुढे आईसाहेबांसमवेत यात्रेतून । राहती या भगिनी नेहेमीच ।।२१।।
वय अधिक होता श्रींचे । प्रवास बंद करिती त्यांचे ।
त्यावेळी या बाईंचे । विनोदाने मन फुलविती ।।२२।।
आमचा आता प्रवास । बंद झाला आहे खास ।
'तुमचे ही आता पहा काय', हे सहास । बोलते झाले श्रीगुरु ।।२३।।
विनोदाने हे सुचविले । आईसाहेबांचे ही भले ।
प्रवास बंद जाहले । अनुषंगाने यांचे ही ।।२४।।
थोर अथवा सान । पुरुष स्त्री किंवा बालक लहान ।
सर्वांवर माया समान । असे भक्तवत्सलाची ।।२५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
नव्वदावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - ११

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ॥

एक भाविक भक्त । महाराजांस वदत ।
एवढे ज्ञानी आपण आहात । मोठे विद्वान महापुरुष ॥१॥
परंतु अतिशय साधेपणानं । येता आमच्या घरी म्हणून ।
कळून न ये मोठेपण । क्षमा करावे गुरुराया ॥२॥
यावर हासून । बोलती महाराज आपण ।
एक श्री वासुदेव शास्त्री म्हणून । होते प्रकांड पंडित ॥३॥
त्यांचे आंडनांव अभ्यंकर । महामहोपाध्याय पदवी देऊन सत्कार ।
करण्या भरे सभा, गौरवपर । भाषणे विद्वान त्यात करिती ॥४॥
अभ्यंकर शास्त्र्यांनी सामोपचारे । दिधले काय उत्तरे ।
आपण सर्वांनी या अवसरे । गौरव करून कौतुक केले ॥५॥
हे असे आपले मोठेपण । माझी नसे योग्यता आन ।
खरोखरचे  जे विद्वान । गेलेत मंदिरात सरस्वतीच्या ॥६॥
जाताना ठेविली बाहेर पादत्राणे । माझे काम ती राखणे ।
असे वागावे नम्रपणे । शोभते विनयानेच विद्या ती ॥७॥
महाराजांनी दिलेल्या उदाहरणावरून । येई आपल्यास हे कळून ।
कोणत्या योग्यतेचे ते असून । साधेपणानं राहती ॥८॥
एका भक्तास बोलताना । विषय जेव्हा निघती नाना ।
सद्य: स्थिती वर विवेचना । करिती सद्गुरु अधिकाराने ॥९॥
भारताची काय स्थिती । कशी आहे राजनीति ।
परराष्ट्र धोरणं काय असती । चीन, अमेरिकादि देशांचे ॥१०॥
भक्त ऐकून हो स्तिमित । आत्मज्ञानी जो नर असत ।
त्यासी सर्वज्ञत्व मिळे निश्चित । खूण याची पटे त्यासी ॥११॥
संपूर्ण व्यावहारिक ज्ञान । होते त्यांसी म्हणून ।
करिती योग्य मार्गदर्शन । सर्व कार्यात भक्तांसी ॥१२॥

एक ट्रस्ट स्थापन केला । धर्मकार्यार्थ त्यांनी भला ।
परी कार्यप्रवण त्यात एकला । इतर ट्रस्टी त्यास सहकार न देती ।।१३।।
महाराजांनी हे जाणिले । गुरुनिष्ठास ते बोलिले ।
मिनिट्स रेकॉर्ड पाहिजे ठेविले । जरी सभा तुमच्या न होती ।।१४।।
करा एक वही त्यासी । लिहावे वेळोवेळी तियेसी ।
सभा आमची अमुक दिवशी । जाहली परी चर्चेस मुद्दा न्हवता ।।१५।।
आपणच माणसे नेमिली । रीतसर कार्ये त्यांनी न केली ।
याचा बाऊ न करता ते वेळी । मध्यम मार्ग सांगितला ।।१६।।
व्यावहारिक बाजूंचे ज्ञानपूर्ण । जाणती सर्व राजकरण ।
नुसते धर्मशास्त्रज्ञ नसून । सर्वही ज्ञान त्यांसी होते ।।१७।।
एकदा सहज चर्चेत । म्हणती आज वर्तमान पत्रात ।
आधुनिक विज्ञानाचे मत । मेंदू बद्दल दिले असे ।।१८।।
मेंदूची रचना कशी । कुठले कार्य कुठल्या देशी ।
करतो मेंदू संपूर्ण ऐशी । माहिती त्यात दिधलीसे ।।१९।।
चेतनाशक्ति न मानली । सर्व श्रेयता मेंदूस दिधली ।
जर मेंदूच कार्ये करतो सगळी । मग प्राणवायू जाता काय होय ।।२०।।
प्राणवायू पडतो बाहेरी । मग निष्प्राण का होतो शरीरी ।
मेंदू तर राहातो भीतरी । याचे उत्तर काय असे ।।२१।।
श्वसनी प्राणवायू बाहेर जाता । पुनश्च आंत का ये तत्वतां ।
काय होईल तो आंत न येता । बाहेरच राहता सांगावे ।।२२।।
प्राणापानास धरणारी । शक्ति आहे कुठलीतरी ।
हे मान्य करण्यास गत्यंतरी । नाही, म्हणून जाणावे ।।२३।।
जोपर्यंत आपण । ईश्वरीशक्ति न मानितो जाण ।
तोवर भौतिक संशोधन । निरुपयोगी ठरतात ।।२४।।
प्राचीन काळात । बुध्दिचा विकास समस्त ।
करून ज्ञान मिळवीत । त्याने सर्वच जाणता येई ।।२५।।
बुध्दिची शक्ति अपरिमित । परी ती करावी लागते विकसित ।
ध्यानादिक अभ्यासे निश्चित । मिळवित ज्ञान सर्वही ।।२६।।

ऋषि मुन्यादि मंडळींनी । वाचन मननाचे जोडीनी ।
ईश्वर भक्ति ध्यानादि करोनी । बुध्दि विकसित केली असे ।।२७।।
त्या संस्कारित बुध्दिने । सर्वही जाणून घेणे ।
सृष्टि रचना वगैरे शास्त्रपुराणे । रचिली त्यांनी सर्वही ।।२८।।
आपल्या भारतीय संस्कृतीत । धर्म, मोक्षाचा विचार करीत ।
इतर देशात फक्त अर्थकाम असत । तसे नसे आपणाकडे ।।२९।।
आपली परंपरा महान । आठ वर्षाच्या मुलालागून ।
गायत्रीचा उपदेश करून । ईश्वर तत्वाची जाण देतो ।।३०।।
अशी कुठल्याही देशात । उपासनेची नसे पद्धत ।
समृध्द भाषा संस्कृत । अगाध ज्ञान तीत असे ।।३१।।
आता आपणास दुर्दैवे । ज्ञानाचेच वैराग्य आघवे ।
जाहले हे नसे बरवे । बुध्दि विकास खुंटला ।।३२।।
तेही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर । संस्कृत अध्ययनावर ।
गदा आली हे दुर्दैव थोर । आपले असे जाणावे ।।३३।।
ज्ञान खरे ते मिळवून । कल्याण राष्ट्राचे व्हावे म्हणून ।
तळमळे श्रींचे मन । हे या वाक्यांतून दिसे ।।३४।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एक्याण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १२

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

महाराज म्हणती बुद्धिवाद । मानिती आपले प्राचीन विबुध ।
ज्ञान मिळविता येई अगाध । निर्दोष असावी संस्कारित बुद्धि ॥१॥
करावे अंतरंग साधन । असावे वैराग्यपूर्ण ।
साधनचतुष्टय संपन्न । निर्वासिन चित्त करणे ॥२॥
हे नसता नुसते वाचन । करिता ईश्वर कैसा जाणवे म्हणून ।
श्रद्धेने करिता मननध्यान । ज्ञान मिळविता येतसे ॥३॥
ईश्वर स्वरूपाप्रमाणे । सृष्टीची रचनादि सर्व जाणणे ।
पृथिव्यादि सर्व पाहू शकणे । घडे अशा बुद्धिने ॥४॥
एकदा वाडीक्षेत्रालागून । करीत असता निरूपण ।
सांगती पृथ्वीचे भूभाग संपूर्ण । अद्यापि न शोधिले गेलेसे ॥५॥
या निरूपणानंतर । काही जण भक्तवर ।
विनविती श्रीगुरुवर । काही शंका आम्हास असती ॥६॥
आधुनिक विज्ञानाप्रमाणं । आम्ही घेतले शिक्षण ।
आमच्या विचारांची दिशा भिन्न । म्हणून पुसतो आपणासी ॥७॥
करावी अपराधास क्षमा । प्राचीन मतांवर पूर्ण विश्वास तुम्हा ।
अविश्वसनीय ते वाटे आम्हा । पुराणाधारित भूगोल ॥८॥
आधुनिक शास्त्रज्ञांनी । विशेष अंतराळयानांनी ।
संपूर्ण पृथ्वीचे छायाचित्रणी । रचना जाणिली सर्व असे ॥९॥
आपण म्हणता पृथ्वीची रचना । अचाट तिचे भाग संपूर्णा ।
अजून न कळले मानवांना । ते कैसे ते सांगावे ॥१०॥
आमची भारतीय शास्त्रांवर । श्रध्दा असे म्हणून गुरुवर ।
पुसतो प्रश्न त्यावर । क्षमा करून समजवावे ॥११॥
भागवतादि पुराणांतरी । भूगोल कथिले सविस्तरी ।
जाणावे असे अंतरी । वाटे आम्हासी गुरुराया ॥१२॥
यावर महाराज हासून । सांगती सर्व समजावून ।
भक्तांस वाटे नकाशावरून । अजून आपणासी समजेल ॥१३॥

कैसे म्हणावे महाराजांसी । काढून सर्व चित्रांसी ।
सांगावे ते आम्हासी । तोच पातले एक वृध्द गृहस्थ ॥१४॥
येई या भक्तांच्या मनी । हे विघ्न आले कोठूनी ।
परंतु एक चमत्कार दावुनी । श्रींस करायची होती गम्मत ॥१५॥
या भक्तांच्या येई मनांत । गुरुमुखातून श्रवणात ।
हे विघ्न आले निश्चित । हातात भागवत त्या नराच्या असे ॥१६॥
त्यात एका कागदावर । लिहिला काही मजकूर ।
तो ठेविला ग्रंथाभीतर । त्यावरचा प्रश्न होता विचारायचा ॥१७॥
महाराजांस केले अभिवादन । त्यांस आदरे बसवून ।
महाराज करिती प्रश्न । त्यांनी सर्व सांगितले ॥१८॥
प्रश्नाचा कागद काढण्यासी । उघडिले भागवतासी ।
तो त्या पानावर परियेसी । नकाशा एक मोठा होता ॥१९॥
प्राचीन भौगोलिक मताप्रमाणं । नकाशा त्या पानावर जाण ।
आश्चर्य करिती भक्त पाहून । हासून गुरुग्रंथ हातात घेती ॥२०॥
हं, यांत दाखविल्या प्रमाणं । आहे सर्व रचना म्हणून ।
निरनिराळ्या ग्रंथातून । संदर्भ देऊन सांगितले ॥२१॥
पुनश्च करिता भक्ते प्रश्न । समजाविती नूतन मार्गानं ।
राग प्रश्नांचा न करून । सखोल समजवून सांगती ॥२२॥
काळ आपला प्राचीन । होती शास्त्रीय साधनं ।
योगाभ्यास करून । बुद्धिसामर्थ्य वाढवता येई ॥२३॥
हे सामर्थ्य आहे अमर्याद । अनाकलनीय न काही दुर्बोध ।
कोठे ही जाता येई अबाध । आसने बसूनच सर्व पाहता येई ॥२४॥
संपूर्ण विश्व ब्रम्हाण्ड । आहे फारच प्रचण्ड ।
प्राचीन विद्वान प्रकाण्ड । आपल्या समोर मांडिती ॥२५॥
संपूर्ण त्याची कल्पना । होणे ते अशक्य जाणा ।
आवश्यकते करून वर्णना । भूगोल शास्त्रात कथियेले ॥२६॥
प्रत्यक्ष ते अनुभवाने । कथिले प्रत्यक्षच प्रमाणाने ।
पूर्ण सत्यच ते जाणणे । नसे जे सांगती आधुनिक ॥२७॥
पदार्थाचे अंतरंग जाणण्यास । त्यावर केंद्रित करून लक्षास ।
ज्ञान होई संपूर्ण ऋषिंस । आधुनिकांस भंजन करावे लागे ॥२८॥

मर्यादित आजच्या मानवाची । बुद्धी शक्ति असे साची ।
रचना सप्तलोक सप्तपाताळांची । अशक्य त्यांसी जाणणे ।।२९।।
पूर्वी ज्याप्रमाणं । करिती ज्ञान दान ।
त्याचप्रमाणे परत काढून घेणं । ज्ञान, ते ही शक्य होते ।।३०।।
सध्या जयांसी आपण । चंद्र व इतर ग्रह मानितो जाण ।
ते आणि धर्मशास्त्रातील देवता भिन्न । वेगळ्याच त्या आहेत ।।३१।।
अजून मानवासी त्यांचा । शोध आहे लागायचा ।
कोलंबसास अमेरिके ऐवजी भारताचा ।
शोध लागला तद्वत हे असे ।।३२।।
प्राचीन काळात रसायन । तसेच भौतिकशास्त्र पूर्ण ।
विमान विद्या वातानुकूलन । आदि सर्व मुनिजन जाणती ।।३३।।
पुराण शास्त्र भागवत । हे सर्व खरे निश्चित ।
शास्त्रीय उपायांनी बुद्धि विकसित ।
करून पडताळा करता येतो ।।३४।।
हे करीत असता निरूपण । सर्वही एका ओवरीत बसून ।
चर्चा सर्व चाललेली असून । आनंदित भक्तजन होती ।।३५।।
पलीकडच्या ओवरीत । आईसाहेबांसमवेत ।
ताई महाराज असती आसनस्थ । त्यांच्या दर्शनास मग जाती ।।३६।।
भक्तांवर कटाक्ष टाकून । पुसती लक्ष्मीआई हासून ।
काय होते चालले तुमचे म्हणून । यावर भक्त बोलण्याआधी ।।३७।।
सर्वही घडलेला वृत्तांत । ताईंनी कथिला साद्यंत ।
श्रींनी जे सांगितले भक्तांप्रत । ते आईसाहेबांसी सांगितले ।।३८।।
ऐक्य दिसे यावरून । ताई व महाराजांचे पूर्ण ।
आपणा सारखा अर्जुन । द्वैत न मोडिता केला जेवी ।।३९।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
ब्याण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

श्रीदत्त महाराज नेहेमीच वदती । हे विज्ञान जावो पुढती ।
जशी होईल उत्तरोत्तर प्रगती । लागती संशोधन नवीन ते ॥१॥
तसे आपले सिद्धांत । मान्य होतील साद्यंत ।
वैदिक मतांचे सत्यत्व स्वतः । सिद्ध करीतील ते पुढे ॥२॥
भौतिकशास्त्रांमधील शोध । कार्य नव्हे ते साधं-सुधं ।
जेव्हा देहादिकांची शुद्ध । विसरून ध्यास धरिती नर ॥३॥
तेव्हा सहाय्य होई ईश्वर । अथांग ज्ञानातून बिंदुमात्र अक्षर ।
सापडे परी होई अहंकार । मी शोधले म्हणोनी ॥४॥
नेहेमी देती उदाहरण । ते सर आयझेक न्यूटन ।
शोधिले ज्यांनी गुरुत्वाकर्षण । घड्याळ चहात घातले त्यांनी ॥५॥
इतकी ध्येयाकारता होऊन । जेव्हा पार विसराल तन ।
त्या मनाच्या पलीकडे जाऊन । ज्ञान तेव्हा होईल ॥६॥
हे वाक्य वदे आईंस्टाइन । उपनिषद् वाक्य हे जाण ।
बुद्धिवादूयांस यावरून । पटेल ज्ञान प्राचीन हे ॥७॥
ईश्वरइच्छेशिवाय जेथे । पानही झाडाचे न हालते ।
प्रयोगांती प्राप्त होती सिद्धांते । नराच्या हाती कां असे हे ॥८॥
ईशेच्छा ही आदिशक्ति । जियेने जाहली सृष्टि निर्मिती ।
तियेचेच कार्य हे निश्चिती । अनुभव प्रत्यक्ष या भक्ताचा ॥९॥
रसायन शास्त्र शाखेत । विशेष प्राविण्य यासी प्राप्त ।
यावरून नोकरी मिळत । परंतु आय थोडीच असे ॥१०॥
यासी याच दरम्यान । स्वस्त उपलब्ध कच्च्या मालापासून ।
एक मौल्यवान उत्पादन । मिळविण्याची प्रक्रिया ज्ञात झाली ॥११॥
यश मिळे त्या प्रयोगात । श्रीगुळवणी महाराजांचे आज्ञे घेत ।
पेटंट या प्रक्रियेप्रत । स्व-व्यवसाय करा म्हणती गुरु ॥१२॥
अनेक प्रतिबंध येऊन । बरीच वर्षे जाती निघून ।
न जमे स्वतःचे उत्पादन । करून व्यवसाय करण्यास ॥१३॥

श्री गुळवणी महाराज ब्रम्हलीन । होती पुढे श्री दत्तमहाराजांचे दर्शन ।
वरचेवर घेई हा भक्त एक दिन ।श्री आपण होऊन वदले यासी ।।१४।।
काय, तुम्ही शोध काही नवीन । लावला हे वाटते तरी, उत्पादन ।
स्वतःचे करावे असे आज्ञापून । आश्चर्य वाटे भक्तास ।।१५।।
गुरुमहाराज जी सूचना करिती । तीच पुनः दत्तमहाराज बोलती ।
प्रयत्नास लागे निगुती । भक्त पुनश्च एकदा ।।१६।।
परन्तु आश्चर्य होई । जे प्रयोग करून पेटंट घेई ।
त्यातील एक टप्पा विसरून जाई । न होई प्रयोग यशस्वी तो ।।१७।।
पुढे जाता दर्शनास । निवेदन करी महाराजांस ।
प्रतिबंध असतील, पुनः प्रयत्नास । लागा म्हणती श्रीगुरु ।।१८।।
लगेच घरी जाऊन । प्रायमस स्टोव्ह वापरून ।
स्वयंपाक घरातच साहित्य जळवून । प्रयोग करून पाही तो ।।१९।।
श्री संकल्प होता म्हणून । यशस्वी होई प्रयोग पूर्ण ।
अनेक प्रकारे सहाय्य मिळून । श्रीकृपे कारखाना सुरु होई ।।२०।।
यावरून कळून येई । शक्ति सर्व नियामकाचे ठाई ।
निमित्त फक्त मनुष्य होई । कृपा त्याची जाहल्या ।।२१।।
काल प्रभाव म्हणून । विस्मृत केले हे ज्ञान ।
पाश्चिमात्य संस्कृतिचे गुणगान । करून स्वत्व विसरले ।।२२।।
तरी शेवटी मान्य होतील । आपलेच शास्त्र सकल ।
म्हणती अणु केन्द्रात अतिसूक्ष्म केवळ। इलेक्ट्रॉन जे फिरतात ।।२३।।
कोण देई धनऋणावेश । या सूक्ष्म कणांस ।
कोण फिरवी ऋणकणांस । धनकणांच्या भोवती ।।२४।।
सिद्ध होई यावरून । जड असो वा सचेतन ।
व्याप्त तयांत चैतन्य । उदाहरण हे साधे जाहले ।।२५।।
अशा अनेक उदाहरणांवरून । तो विश्वचालक नियामक म्हणून ।
सिद्ध होई, त्यातून । वेदप्रमाण, ही निश्चित ।।२६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
त्र्याण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १४

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक केरळी नर । झाला शिकून डॉक्टर ।
त्याची इच्छा असे फार । व्यवसाय प्रामाणिकपणे करावा ॥१॥
भ्रष्ट जग सध्याचे । याप्रमाणे कसे वागायचे ।
श्री शंकराचार्य कांचीकामकोटीचे। त्यांचेकडे जाऊन विचारी मग ॥२॥
नांव पत्तादि सांगून । पाठविती त्यास पुण्यालागून ।
करून घेण्या मार्गदर्शन । श्री दत्तमहाराजांच्या सान्निध्यात ॥३॥
त्याप्रमाणे तो येत । महाराजांपाशी पुण्यात ।
कथिला सर्व वृत्तांत । आश्चर्ये वदत श्रीगुरु ॥४॥
आम्ही काय सांगणार । काय मार्गदर्शन करणार ।
शंकराचार्यांपेक्षा अधिक काय समजणार। आम्हास असे बोलती ॥५॥
पुनश्च प्रार्थी डॉक्टर । बरे पाहू म्हणती गुरुवर ।
ग्रंथ ठेविलेला एक समोर । तो करी उचलला ॥६॥
एकदम ग्रंथ उघडिले । पानास त्या पाहिले ।
डॉक्टरांचे उत्तर सापडले । त्याच पानावर श्रोते हो ॥७॥
वेळोवेळी काही साधक । प्रश्न करिती सम्यक ।
श्रींनी त्यांचे मार्गदर्शक । समाधान केलेसे ॥८॥
आपणासही या सुसंवादातून । मिळावे योग्य मार्गदर्शन ।
म्हणून काही उदाहरण । ऐका समस्त श्रोते हो ॥९॥
एक विचारी भक्त प्रश्न । सांगा महाराज दयाघन ।
संन्यासास कशाचे बंधन । निरोपावे मजसी हो ॥१०॥
महाराज म्हणती हे मन । याचेच आहे बंधन ।
मनाच्या तयारीवर अवलंबून । आहे सर्व निश्चये ॥११॥
आग्रह चांगल्या कामाचा । नसावाच तो वाईटाचा ।
आग्रह नसणे कशाचा । समाधान नाव याचेच ॥१२॥

प्रश्न करे एक भक्त । मनाच्या रजोतमो वृत्ती समस्त ।
त्यांचा व्याधींशी संबंध काही असत । सांगावे ते गुरुराया ॥१३॥
गुरु वदती निश्चितच मनोवृत्तींचा । आणि स्थूल शरीराचा ।
संबंध असतो साचा । मनोविचारांचा होतोच परिणाम ॥१४॥
रक्तदाब मधुमेहादिक । रोग जे होती सकळिक ।
मनावरचा तणाव एक । कारण त्यांसी म्हणताती ॥१५॥
या करिताच मन । शक्य तेवढे शांत ठेऊन ।
करावे उचित साधन । योग्य, असे ते शरीरासही ॥१६॥
एकाच रोगाने पछाडले । रोगी दवाखान्यात आले ।
औषधोपचार दिधले । एकच सर्वांस डॉक्टरांनी ॥१७॥
एक रोगी या औषधाने । होई बरा पूर्णपणे ।
दुसऱ्या रोग्यास उपयोग न होणे। त्याच औषधाचा, कशापाई ॥१८॥
कारण यासी सांगावे काय । उपचारात दोष तो काय ।
यावरून प्रारब्ध कार्य । मानावे लागते आपणासी ॥१९॥
भक्त पुढे करी प्रश्न । समस्या जी अतिगहन ।
सर्वच साधकांचे मन । जे चिंती, ते विचारले ॥२०॥
व्यावहारिक उन्नतीकरता । प्रयत्न अधिक केले असता ।
साधनादिकांस वेळ न मिळता । कैसे करावे स्वामिया ॥२१॥
व्यावहारिक योग्यता । वाढविण्यास आता ।
वेळ द्यावा किंवा नाही ताता । हे आम्हासी सांगावे ॥२२॥
म्हणती श्री कोण ठरवील । कशास द्यावा किती वेळ ।
आपणच विचार करावा सकल । गरज आणी परिस्थितीचा ॥२३॥
वडीलधाऱ्या मंडळींचा । तसेच मित्रमंडळींचा ।
विचार घ्यावा यावर साचा । मग घ्यावा तो निर्णय ॥२४॥
कसे चालेल व्यवहार सोडून । मनाचा कल कुठे ये दिसून ।
आज बसलो परमार्थ करीत पूर्ण । उद्या बुद्धि बदलली तर ॥२५॥
इतरांची भरभराट पाहून । उद्या जर चिंती आपले मन ।
आपणही अशी उन्नती साधून । घेता बरे झाले असते जी ॥२६॥

नुसती साधना करण्याचे । प्रारब्ध आहे का आमचे ।
व्यवस्थित करून बाकीचे । मग साधनेस मिळेल वेळ ।।२७।।
परमार्थ आणि व्यवहाराची । आयुष्यात सांगड यांची ।
येईल तेवढी घालायची । कल्याणाची वाट हीच असे ।।२८।।
शिष्य म्हणे राग द्वेषादिक विकार । मधूनच होती अनिवार ।
स्वस्वभावाची लाज फार । वाटे मज स्वामिया ।।२९।।
न समजे करावे काय । कसे चुकेल अंतराय ।
यावर वदे गुरुमाय । सय येऊन भक्ताची ।।३०।।
मन शांत ठेवण्याचा । प्रयत्न आपण करावा साचा ।
टप्पा असे तो शेवटचा । मनाचा पूर्ण ताबा होई ।।३१।।
ती असे अंतिम अवस्था । तियेस म्हणती सिद्धावस्था ।
तोवर विकार अंतरस्था । बाध करितात मनासी ।।३२।।
सिद्धावस्था मिळेपर्यंत । हेच चालू राही सतत ।
त्यासाठी संत संगतीत । राहावे मुमुक्षू साधकाने ।।३३।।
कसे वागतात संत । यावरून मार्गदर्शन होत ।
ते जर अभ्यासिले सतत । शिक्षण आपोआप मिळे ।।३४।।
असे संतांचे महिमान । तारिती न लागता क्षण ।
दृढ श्रध्दा धरी मन । सद्‌गुरुंच्या, तू पायी ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
चौऱ्याण्णवावा अध्याय गोड हा ।।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १५

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

दत्तमहाराजांचा उपदेश । एक खजीना असे विशेष ।
करीतील आपणास कोट्याधीश । त्र्यधीश सद्गुरु आपले ।।१।।
अफाट धन सागरातून । काही अनमोल रत्न ।
टपोरेसे वेचून । रत्नमाला ओविली ।।२।।
मनी त्यांच्या तळमळ । सर्व कल्याणार्थ केवळ ।
ऐका रसना कानांची एकवेळ । करून भाविक श्रोते हो ।।३।।
म्हणती प्रभू पूर्णकाम । सर्वश्रेष्ठ ईश्वराचे प्रेम ।
अगाध आणि निस्सीम । काम धरावा त्याचाची ।।४।।
ईश्वर फार दयाळू । मनाचा मृदू केवळू ।
विष जी पाजी केवळू । स्तनातून पूतना राक्षसी ।।५।।
तिचा न केला अव्हेर । केला तिचा ही उध्दार ।
उपमातेचे पद सुंदर । दिले तियेसी म्हणती धात्री ।।६।।
हीच दया ईश्वराची । आपण संपादावी साची ।
प्रयत्ने त्यासाठीची । करावी जन समस्त हो ।।७।।
रागद्वेषाने ही जरी । स्मरला तो श्रीहरी ।
वैर करण्याऱ्यास ही तारी । असा दयाळू तो असे ।।८।।
भयंकर शत्रू अभिमान । जाचतो हा सर्वार्थानं ।
मुमुक्षूजन साधकानं । त्याग त्याचा करावा जी ।।९।।
प्रारब्ध वशात् जीवावर । आपत्ती जरी येती थोर ।
पिचत न बसता, त्यावर । शास्त्रीय उपाय योजावे ।।१०।।
करावे त्यासाठी शास्त्रीय प्रयत्न । पूर्वसूरींचा आशावादी दृष्टीकोन ।
उपासनेने स्थिर करता मन । धैर्य आपणासी मिळतसे ।।११।।
अशा सात्विक मनात । दुःखाने क्लेश न होत ।
श्रद्धेवर अवलंबून असत । प्रयत्नवाद हा सर्वथा ।।१२।।

बुद्धिचा निश्चय झाल्यावर । श्रद्धा उपजते थोर ।
श्रद्धावानास ज्ञान मिळेल तर । श्रद्धा महत्वाची जाणावी ।।१३।।
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । गुरुकृपे त्याचा ।
नाश आहे, या वचनांचा । करावा विचार पुनः पुनः ।।१४।।
गुरुदेव हे एक मानुनी भक्ति । तयांची करी त्या करी येई मुक्ति ।
सुयुक्ती अशी ही धरी नित्य चित्ता ।
त्वरे आदरे तू स्मरे नित्य दत्ता ।।१५।। – (स्तोत्रादिसंग्रह)
जग सत्य आहे असा । जन्मोजन्मी झाला दृढ अभ्यासा ।
तो न जाई सहसा । मिथ्यत्वाच्या अभ्यासा करावे दृढ ।।१६।।
यासाठी जावे गुरुंस शरण । स्मशान वैराग्याचे उपयोग न ।
पुढील ओवीचे पठण । करित महाराज विशेष भरे ।।१७।।
स्व–स्वरुपानुसंधान । व्हाया कीजे मनःशोधन ।
देवगुरु सेवन । सदाचरण अनासक्ते ।।१८।।
शास्त्रातील मूळ सिद्धांत । असावे आपणास विदित ।
त्याप्रमाणे आचरण सतत । शेवटपर्यंत करावे ।।१९।।
नास्तिकता धरून । दुःख न येती, असे नसून ।
राहे आस्तिक्य भावे ते सुसह्य होऊन ।
हेचि शास्त्रसंमत श्रेयस्कर ।।२०।।
हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।
हेचि मागावे केशवा । सतत स्मरोनी तयासी ।।२१।।
श्रेष्ठ पुरुषांच्या कृपेनेच मना । ज्ञान आणि साधना ।
सर्वही आणिक उपासना । मिळते हे जाणावे ।।२२।।
आपल्याकडून उपासना । न होईल ही नैराश्य भावना ।
ही एक प्रकारची वासना । ती गेली पाहिजे ।।२३।।
उपासना ही होईल । ही भावना बध्दमूल ।
व्हावी मनांत केवळ । प्रयत्न करावा त्यासाठी ।।२४।।
जसे व्यावहारिक बाबीत । यशापयशाचा विचार न करीत ।
निरनिराळे प्रयत्न करत । तसेच आध्यात्म मार्गात ही करावे ।।२५।।

नामस्मरणांत किती काळ । गेला, कैसे ते केले केवळ ।
विचार न करावा त्याचे फळ । मिळतसे निश्चयेसी ।।२६।।
साधकाची असावी भावना । अनंत काळ उपासना ।
करिता वाटे निमिषच झाला मना । अजून करावी साधना ती ।।२७।।
इतुके इतुके तास । आपण केला अभ्यास ।
जप केला इतुक्या माळांस । हे न खास चिंतावे ।।२८।।
गुरूंचे हे बोधामृत । मनी साठवावे निश्चित ।
ती सुधा सार्थक करीत । आहे जन्म आपुला ।।२९।।
धन्य गुरूंचा उपदेश । पाप जळतील निःशेष ।
वासनावनाचा नाश । करिती बोल अमृताचे ।।३०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
पंच्याण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

दत्तमहाराज करिती उपदेशन । मनाच्या वृत्तींस म्हणती ज्ञान ।
त्या वृत्तींना विषय असे पण । अद्वैताचे चिंतन वैराग्याने होई ॥१॥
जोवर दुःख असे । तोवर वैराग्य टिकतसे ।
दुःख कमी होई तसे । तळमळ वैराग्य ही कमी होय ॥२॥
हळू हळू कमी होई आठवण । सुख आपणास मिळताच जाण ।
स्वकर्तृत्वाची जाणीव होऊन । अहंकार प्रबळ होतसे ॥३॥
मी नाही केला व्यवहार । तर मग कोण करणार ।
असा मनात आला विचार । सरला जीव ज्ञानमार्गातुनी ॥४॥
बुद्धिने करितो आपण श्रवण । परंतु पुढे मनन ।
आणि होता निदिध्यासन । साक्षात्कार होतसे ॥५॥
संग्रह करणे हा नसे दोष । भोगबुद्धिने करणे विशेष ।
तो धन संग्रह असे सदोष । त्यागार्थ असावा संग्रह ॥६॥
धन साध्य नसे जाण । ते असे साधन ।
अमंगल बुद्धि जाण्यास दान । सांगितले पूर्वसूरींनी ॥७॥
परिग्रह कोणी करावा । मोह कोणी सोडावा ।
समाधान मनी बरवा । धरावा कोणी ते ठरलेले ॥८॥
विप्राने राहावे समाधानी । वैश्याने धन साठवणी ।
महिव्रताने जोडावी धरणी । त्या विषयी संतुष्ट न रहावे त्याने ॥९॥
प्रत्येकाचे धर्माचरण । स्थित्यानुसार असे भिन्न ।
अर्जुन म्हणे न करीन रण । अहिंसा धर्म परम म्हणे ॥१०॥
त्यावेळी हा मोह त्याचा । गीता सांगून स्ववाचा ।
संपूर्ण घालविला साचा । प्राप्त कर्तव्य हेचि धर्म ॥११॥
एकदा गुलाबराव महाराजांस । प्रश्न विचारी मनुष्य ।
कमी अधिक काही असता अन्नास ।
दोष तो सांगावा किंवा नाही ॥१२॥

महाराज म्हणती जो संन्यासी । त्याने चव न घेता अन्नासी ।
जेवावे न वदावे दोषांसी । जेवून पुढील गावी जावे ।।१३।।
जो असे गृहपती । न त्याचा हा धर्म निश्चिती ।
न सांगता सुधारणा स्वयंपाकाप्रती । कशी होईल सांगा हो ।।१४।।
म्हणून स्पष्टपणे । गृहस्थाने सांगणे ।
आज तिखट अधिक किंवा मीठ उणे । धर्म त्याचा तो असे ।।१५।।
स्पृहा नसे सुखात । उद्विग्नता नसे दु:खात ।
तो नर जीवनमुक्त । महापुरुष तो जाणावा ।।१६।।
असाच पुरुष इतरांस । देवू शकतो मुक्तिस ।
कसा देईल मोह मुक्तिस । जो देहत्रय पंचकोशात सापडला ।।१७।।
दीपच दुसरा दीप । लावून प्रकाशासमीप ।
नेई, जे अज्ञानांधकार अमाप । घालवी तो निश्चिये ।।१८।।
बहुमत बहुमत म्हणताती । योग्य आहे ते किती ।
दूध आणा गुरु म्हणती । वंध्या महिषी देई दूध ।।१९।।
वदली असती विप्र नारी । ही महिषी वंध्या खरी ।
बहुमत आहे यावरी । तर दूध मिळाले असते कां हो ।।२०।।
वदे तो संपाती । दिसे मज सीता ती ।
राक्षसी वेढलेली चिंतामूर्ति । अशोक वाटिकेत दिसे मज ।।२१।।
जर वदले असते हनुमान । न पाहती आमचे नयन ।
आमचे बहुमत आहे म्हणून । शोध सीतेचा लागला कां असता ।।२२।।
म्हणोन प्रत्यक्षदर्शी महात्म्यांस । शब्दे ठेवावा विश्वास ।
करावे अनुसंधानास । ईश्वरास पावावे ।।२३।।
संत असती ईश्वर । नसती केवळ सामान्य नर ।
सातशे वर्षे ज्ञानेश्वर । समाधी लावून बैसलेसे ।।२४।।
इतुक्या वर्षांत । वारी करिती नियमित ।
कृपानुभव होई तयांप्रत । हे न घडे नराचेनी ।।२५।।
राष्ट्रपतीच्या वटहुकुमाने तरी । इतुक्या वर्षांतरी ।
करतील का पायी वारी । काही वर्षे होईल फार तर ।।२६।।

लोकांचे करणे शुध्द मन । करू न शके शासन ।
संतच ते कार्य जाण । करू शकती निश्चये ।।२७।।
पसायदानाने ज्ञानेश्वर । म्हणती भूता परस्पर ।
मैत्र घडो हे राष्ट्रास हितकर । मागणे असे त्यांचेनी ।।२८।।
हेच खरे आचार्य । जिज्ञासे ज्ञान संपादिती आर्य ।
स्वाचरणाने शिकविण्याचे कार्य । शिरोधार्य त्यांनी केले ।।२९।।
जाणती ते ईश्वर देह कालातीत । स्वस्वरुपी नित्य जागृत ।
म्हणून चांगदेवांच्या कोऱ्या कागदाप्रत । उत्तर लिहिते जाहले ।।३०।।
चांगदेवांसी पडे प्रश्न । वय ज्ञानदेवांचे लहान ।
नमस्कार कसा लिहावा जाण ।
आशिर्वचन ही न, गुरु त्यांस करता ।।३१।।
काळाचा अधिक संबंध । मोठेपणा धरिती यावरून अबुध ।
त्यांस करावया बोध । स्वतिश्रीवटेषु लिहिले ।।३२।।
आत्मस्वरुप लपले । म्हणोन जगदाभास झाले ।
ते प्रगट होता भले । ग्रास अज्ञानाचा होई ।।३३।।
असे थोर संत । एकच सांगती हे समस्त ।
भाषा भिन्न निश्चित । तत्व भिन्न नसे त्यांचे ।।३४।।
भाष्यकारांस पुसतो वाट । लिहिती ज्ञानदेव सुभट ।
सर्व पारंब्यांसी एकच वट । वाट न भिन्न आचार्यांहून ।।३५।।
आद्य शंकराचार्ये कथिले । तेच सोप्या भाषेत भले ।
आपल्या पुढे मांडिले । माऊलीने ज्ञानेश्वरीत ।।३६।।
मूढ करिती विवंचना । भेद दाविती नाना ।
विसरून मतितार्थ, अज्ञाना । पाजलिती व्यर्थचि ।।३७।।
असो हे थोर ज्ञानी । लाभले आपणास म्हणोनी ।
ज्ञानाच्या ज्योती उजळोनी । मार्ग सुकर केलासे ।।३८।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
शहाण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

आत्मस्वरूप पारखी । दत्तगुरु हा भक्तांस राखी ।
म्हणे जो विकारी तो दु:खी । सुखी विचारी तो जाणावा ।।१।।
नोकरीच्या निमित्तानं । किंवा विशेष कार्ये कारण ।
न घडले नामस्मरण । खंड न तो धरला जाई ।।२।।
कारण ते ही कर्तव्य असे । ते सोडून न चालतसे ।
कृष्णार्पण करता परमार्थ न नासे ।
रात्रौ नित्य करावे ईश्वरार्पण ।।३।।
कर्माचरण हे बाह्यांग । अधिक महत्वाचे अंतरंग ।
अभिमान रहित अव्यंग । निस्संग ते असावे हो ।।४।।
समर्थांनी सांगितल्याप्रमाणं । बहुतांची अंतरे आपण ।
राखली पाहिजेत जाण । मन कोणाचे न दुखवावे कधी ।।५।।
एक भक्त म्हणे । जे करिती अभक्ष्य भक्षणे ।
त्यांच्या हातचे न खाणे । मग मी काय करावे स्वामिया ।।६।।
घरात आमच्या वहिनी । स्वयंपाक करिती म्हणोनी ।
कसे करावे धर्मचिनी । न समजोनी येई मज ।।७।।
गुरु म्हणती आहे माता । अन्न घ्यावे तिच्या हाता ।
वहिनी तुमच्या साठी स्वयंपाक करिता । ते चालते जेवावयास ।।८।।
आचार धर्माचा अतिरेक । न करावा धरावा विवेक ।
ज्या कुळी जन्मलो त्याचे सकळिक ।
संस्कार न टाकता येती एकदम ।।९।।
पेक्षा करावे अंतरंग साधन । कुणासही न दुखवता आपण ।
आपले उद्दिष्ट घ्यावे साधून । आईस दुखवून चालेल कसे ।।१०।।
आजच्या काळात । आचार ज्यांनी पाळावा सतत ।
त्यांकडूनही ते न होत । त्यासाठी अति आग्रह न धरावा ।।११।।

एक भक्त गुरुंस विचारी । नसता कुठले मार्गदर्शन तरी ।
स्वतःच एखाद्या ग्रंथावरी । अभ्यास तो करावा कैचा ॥१२॥
यावर श्री म्हणाले । एकलव्याने नाही का केले ।
गुरु प्रतिमेपाशी ज्ञान संपादिले ।
ते अर्जुनासही न आले मिळविता ॥१३॥
तसेच करावे आपण । सतत करावे वाचन ।
मग त्यावर चिंतन मनन । अर्थ समजून येई हळू हळू ॥१४॥
असे करता मार्गदर्शन । आपोआप ये मिळून ।
एखाद्यास लहान बालकाकडून । ही मार्गदर्शन होतसे ॥१५॥
म्हणती महाराज ईश्वर स्वरुपाचे । ज्ञान होण्यास अनेक जन्मांचे ।
साधन अभ्यास लागते साचे । आकाशाप्रमाणे तो आहे सर्वत्र ॥१६॥
अनेक जन्मांच्या पुण्याईनं । सद्गुरु प्राप्ती होऊन ।
त्यांच्या कृपेनेच प्रगती म्हणोन । अनन्य शरण असावे त्यांसी ॥१७॥
सतत घेता नाम । चित्तशुद्धि सुगम ।
काळ किती लागेल परम । यासी ते न सांगता येई ॥१८॥
साधकाने याचा विचार । न करिता निरंतर ।
गुरुंवर ठेवोन भार । उत्साहे अखंड साधन करावे ॥१९॥
ईश्वराचे स्वरुप । देश कालातीत अरुप ।
जग माया मिथ्या हे ज्ञान अमूप ।
प्राथमिक साधकावस्थेसाठी नाही ॥२०॥
गुरुंस असे माहित । कुणाची प्रगती कैसी साधत ।
आपल्या बळे जे न होत । अभिमान न धरावा त्याविषयी ॥२१॥
असावा एक ग्रंथ वाचनात । एकनाथी भागवत ।
किंवा ज्ञानेश्वरी, दासबोध सतत ।
वाचावे किंवा भावार्थ रामायण ॥२२॥
प्रिय जे आहे संसारात । आणि जे आहे हित ।
दोहोंचाही विचार निश्चित । करावा मानवे विवेकाने ॥२३॥
प्रत्यक्ष न घडली सेवा । तरी मनातला भक्तिभावा ।
पावतसे त्या देवा । भावभुकेला तो असे ॥२४॥

"मौनम् सर्वार्थ साधनम्" म्हणून । प्रतिकूलता जाई निघोन ।
अनुकूलता ही जाई मौनानं । अभ्यास त्याचा करावा हो ।।२५।।
इन्द्रिय मार्गांनी मन । जाई बाहेर तेथे विषय मिळून ।
पुनश्च त्यांच्या संगतीनं । चित्तात विषय येऊन राहती ।।२६।।
सनत्कुमारादिक पितयास । विचारती ब्रह्मदेवास ।
काय करावे उपायास । त्यांस ही न ते सांगता येई ।।२७।।
त्यांनी केले ईश्वरस्मरण । हंस रुपाने भगवान ।
स्वत: तेथे येऊन । करिती उपदेश ब्रह्मयासी ।।२८।।
मन आणि विषयांचा । या सर्वही पदार्थांचा ।
आधार कोण आहे साचा । उत्पन्न कोठे ते जाहले ।।२९।।
परमात्म्याचे करून ध्यान । या ध्यानाभ्यासे करून ।
वियोग होई ते जाण । विषय आणि मन यांचे ।।३०।।
दक्षिणामूर्ति स्तोत्रात । आचार्ये निरुपण केलेत ।
तीन रुपे ईश्वर वर्तत । देव-गुरु-आत्मरुपाने ।।३१।।
मंत्रद्रष्टा ऋषिंप्रमाण । "दिगंबरा" हा मंत्र जाणून ।
टेंबे स्वामींनी तो मंत्र शिकवून । आपणास तरणोपाय दिधलासे ।।३२।।
प्रथम जो दिगंबरा । प्रत्यग् ब्रह्म तो निर्धारा ।
आत्मस्वरुपची अवधारा । दिशे झाकिला अंबर ।।३३।।
दिगंबरा जो दुसरा । व्यापक तो अंबरा ।
सच्चितसुखघन ईश्वरा । प्रतीक त्याचे जाणावे ।।३४।।
जरी ईश्वर नाम रुपातीत । भक्त कार्यार्थ नामरुपे अवतरत ।
श्रीपाद श्रीवल्लभ तद्वत् । अवतार ईश्वराचा तो असे ।।३५।।
हाच चवथा दिगंबरा । गुरु रुपे ईश्वरा ।
तारितो भक्तवरा । म्हणोन त्यासी भजावे ।।३६।।
कामक्रोधादिकांनी । ग्रासलो आम्ही म्हणोनी ।
जसा अंबरीषादिकां लागुनी । लाभला तसा आम्हासही पाव ।।३७।।
लहान मुलांस हा अर्थ सांगता । तो सोपा करूनी तत्वतां ।
सांगती गुरु ऐका हो भक्ता । प्रथम दिगंबरा कशासाठी ।।३८।।

संकटातून आपणास । तोच तारी भगवंत त्यास ।
स्मरावे संकट काळास । द्रौपदीने कृष्णास स्मरिले जेवी ।।३९।।
अंबरीष राजा महान भक्त । दुर्वास ऋषिं द्वारा हो शापित ।
तो शाप घेई भगवंत । स्मरू त्यासी दुसऱ्या दिगंबराने ।।४०।।
तस्करांनी द्विजास । मारूनी हिराविले धनास ।
स्वये श्रीपाद त्या चोरांस । मारूनी जीवविती तेव्हा ।।४१।।
तिसरा जो दिगंबरा । याचा अर्थ विप्रप्राणद बरा ।
श्री ज्याचे चरणी निरंतरा । तोच वल्लभ सर्वांसी ।।४२।।
दत्तअवतार यतिराज । श्रीवासुदेवानंद महाराज ।
महान या मंत्राचे काज । करून मंत्रद्रष्टे ऋषि जाहले ।।४३।।

।। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
सत्याण्णवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १८

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम:।।

महाराज म्हणती या मनासी । थांबवायचे तर कष्ट असम साहसी ।
साधले जर या कठिण कार्यासी । काहीच मग न करावे लागेल ।।१।।
मनासी थांबवणे । म्हणजे वाईट विचार न करणे ।
चांगले ही न येऊ देणे । निर्विचारत्व जमले तर संपले मग ।।२।।
ईश्वराची आज्ञा म्हणजे धर्म । तो पाळणे हे प्रथम कर्म ।
फळाशेने न करणे हे त्याचे वर्म । धर्मराज जेवी होते ।।३।।
बंधू आणि पांचाली । पुसे धर्मसेवा तुम्ही केली ।
सुखशांती त्यातून काय लाभली । वनी भटकली बंधुता ।।४।।
धर्मराजाचे उत्तर । यावर असे सुंदर ।
सर्वांनी करावा विचार । असे असे ते निश्चिती ।।५।।
ईश्वरे झाले या देहाचे जनन । त्याची आज्ञा म्हणोन ।
करितो धर्म पालन । सुखार्थ न गे द्रौपदी ।।६।।
सुख मोबदल्यासाठी धर्माचरण । करणे वाणिज्य होईल म्हणून ।
व्यापार करण्याचा हेतू न । माझा सखे गे निश्चये ।।७।।
हा आहे आजचा प्रश्न । धर्माचा काय उपयोग म्हणून ।
ओरड होते चहूकडून । सवाल सभ्यजन करिताती ।।८।।
पाणी आणावयास गेले । चारही बंधू मरून पडले ।
अजून का नाही आले । बघती जाऊन धर्मराज ।।९।।
यक्ष म्हणे विचारीन प्रश्न । उत्तर दिल्यासच होईल जलप्राशन ।
तळ्याकाठी स्वबंधूंसमान । नातरी तूही मरण पावशील ।।१०।।
केवढी कठिण परिस्थिती । निर्जीव बंधू पडले क्षिती ।
असंमोह मनी निश्चिती । योग्य उत्तरे देती ते ।।११।।
यक्ष म्हणे झालो प्रसन्न । तू घे आता वरदान ।
या चारही बंधूं मधून । एकास जीवंत करितो मी ।।१२।।
सांग कोणास उठवावे । युधिष्ठिर म्हणे नकुलास देवे ।
त्वां जीवन द्यावे । हांसे यक्ष यावर ।।१३।।

तुजसी तेरा वर्षांउपरी । युध्द करायचे धुरंधरी ।
या बालकाचा उपयोग काय तरी । भीमार्जुन पैकी कोणासी माग ॥१४॥
वदे त्यासी धर्मराज । माता दोन आहेत मज ।
कुंतीचा पुत्र मी जिवंत आज । हा जिवंत होता संतोषेल माद्री ॥१५॥
आपण जिवंत माता पित्यासी । नेऊन ठेवितो वृध्दाश्रमासी ।
निवर्तलेल्या मातेसी । समाधान होणे ही धर्मनिष्ठा ॥१६॥
अशी बुध्दि होण्यास । ईश्वर कृपा लागते खास ।
शुध्द बुध्दि ही खरी कृपा आपणास । होय त्या भगवंताची ॥१७॥
जे नोकरी करणारे भक्त । लोकलने येरझाऱ्या करत ।
त्यांस महाराज सांगत । योगाभ्यास कठिण फार असे ॥१८॥
यम नियम आसनांची । पाळवणूक होत नाही साची ।
त्यापेक्षा भक्तिमार्गाची । कास धरावी हे बरे ॥१९॥
गाडीतून ही जाता येता । मनी नामस्मरण करता ।
महात्म्य आहे त्याचे तत्वता । कृतार्थता लाभेल त्याने ही ॥२०॥
ध्यान धारणेत । जाणणे शेवटी काय असत ।
आत्मचिंतने मी विकार रहित । निर्गुण निराकार तत्व मी असे ॥२१॥
कुठल्या ही कामास । शास्त्रीय उपाय भक्तांस ।
सांगती काही उपासनेस । कामपूर्तिस ही सांगती ॥२२॥
देवेन्द्राणि नमस्तुभ्यं । देवेन्द्रप्रिय भामिनी ।
विवाहं भाग्यमारोग्यं । पुत्र लाभं च देहि मे ॥२३॥
देहि मे तनयं कृष्णं । वासुदेव जगद्पते ।
देवकीसुत गोविन्दम् । त्वामहम् शरणागते ॥२४॥
हे श्लोक पठणार्थ । विवाह आणि पुत्र लाभार्थ ।
सांगती भक्तांचा अर्थ । पुरविण्यास समर्थ श्रीगुरु ॥२५॥
द्विजांस म्हणती संध्यावंदन । करावे नियमितपणं ।
गायत्री मंत्राचा जप करून । सर्व प्राप्त होई तुम्हा ॥२६॥
जो न करी संध्या वंदन । तो इहलोकी शूद्र होऊन ।
परलोकी होई श्वान । हे शास्त्रवाक्य जाणावे ॥२७॥
नित्य नियमे गायत्री जपास । करिता विप्र होई निर्दोष ।
निष्पाप ही होई हे विशेष । न त्यजावा धर्म आपला ॥२८॥

या सर्व उपदेशाचा सार । चार महावाक्ये सुंदर ।
सर्वांनी करावा विचार । आचार, या साठी पुढे दीधली ॥२९॥
१. सतत रहावे साधनारत । २. नाम स्मरावे जास्तीत जास्त ।
३. संत चरित्रे वाचा सतत । ४. ईश्वर प्रार्थनीरत रहा तळमळीने ॥३०॥
निज पुत्राच्या कवितेस । काव्यात लिहिले उत्तरास ।
कवीश्वरांच्या परंपरेस । साजे हे काव्य म्हणून ॥३१॥
तद्वाचनाचा आनंद । मिळोन मार्गे परमानंद ।
लागावे जन स्वच्छंद । म्हणोन वाचनार्थ दिधले येथे ॥३२॥

( प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी रचलेले काव्य )
॥ लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥

कोणी सुयत्नरत सज्जन देवभक्त ।
सौख्यात जीवन सदोदित कंठतात ॥
कोणी ही कास धरी संभ्रम मालिकेची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥१॥

कोठे सदैव विपुलान्न जले प्रशान्ति ।
कोठे सदैव तदलाभ भरे अशान्ति ॥
ऐशी दशा जगि दिसे नियति क्रमाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥२॥

की धर्ममार्ग बरवा जगदीश मान्य ।
की अर्थमार्ग बरवा व्यवहार मान्य ॥
ऐसी अभागि जनपध्दति संशयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥३॥

कां हे सुधर्म निरतासहि दृश्य दुःख ।
कां हे अधर्म निरतासचि दृश्यसौख्य ॥
सिध्दांत रीति विलसे जनसंभ्रमाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥४॥

माता पितास चिर पुत्र वियोग दुःख ।
बालास अल्पवयी मातृवियोग दुःख ।।
कोणास शक्ति जगि दुःख निवारणाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।।५।।

कोणी नियामक म्हणोनी जगात मान्य ।
कोणी नियम्य म्हणूनी अति दीन हीन ।।
ऐसी नियम्य नियति कधी जावयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।।६।।

गुण तेचि दोष दिसती जगि ती असूया ।
नाही जिला म्हणुनी तीच त्रिमूर्तिमाता ।।
झाली जगी सतत कीर्तीमयी हि साची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।।७।।

सत्कर्मशील दमशील सुदानशील ।
ईशानुरक्त गुरुभक्त परोपकारी ।।
पांथस्थ धर्मरत संभ्रम मुक्त तोचि ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।।८।।

लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।
लीला अमोघचि तया जगदीश्वराची ।।
लीला सुमंगला हितैषी जनार्दनाची ।
लीलाऽनुचिंतन करी सुखी नित्य तोचि ।।९।।

।। श्री गुरुदेव दत्त ।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
अठ्याणवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १९

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

सौभाग्यवती सुकुमार । धाकट्या कन्या सुंदर ।
पिताजीं विषयी अनुभव थोर । असती त्यांचे निश्चये ॥१॥
लहानपणा पासून । पाहिले संत महान ।
लोकसंग्रह कारभार संपूर्ण । पाहती जवळून मुले ही ॥२॥
पिताजी आपले संत महान । हे जरी कळे तरी गुरुपद देऊन ।
घ्यावे त्यांचे मार्गदर्शन । हे वेळ आल्यावरीच कळे ॥३॥
कन्यांस दादांचा लळा । फार असे वेळोवेळा ।
स्नेहे दाटून ये गळा । आठवण येता तयांची ॥४॥
बार्शीस कनिष्ठ कन्येचे लग्न । जमता कुंकवाचा कार्यक्रम म्हणून ।
लगबग असता घडून । ये घटना एक वेगळीच ॥५॥
खेडेगावातले असे घर । असती फार बुटकी दारं ।
आत शिरत असता डोक्यावर । जोरात कन्येच्या लागले ॥६॥
कळा जाऊन मस्तकात । तेथेच बसल्या अकस्मात ।
समोरच आसनाप्रत । महाराज होते बैसले ॥७॥
महाराज कन्येस म्हणती । लग्न होऊन सासरप्रती ।
जायचे, तेव्हा वाकून चालावे निश्चिती । शिकवण ती दारे देतात ॥८॥
लग्न होऊन थाटात । संसार होई व्यवस्थित ।
बदली होऊन नगर ग्रामी येत । रहावयास कालांतरे ॥९॥
अमेरिकेस जाती यजमान । त्याकाळचे हे संस्मरण ।
अधिक महिना पातला म्हणून । सख्यांसह काकडादि करिती ॥१०॥
सर्व पुरुषोत्तम मासांतरी । देवधर्म कितीतरी ।
करिती तेव्हा अंतरी । वाटे समाधान त्या विषयी ॥११॥
अधिक मास सरता । दुसरे दिनी प्रातः चहा करिता ।
विचार ये निज चित्ता । समाधानता देवभक्तित मिळे किती ॥१२॥

असेच आपल्याकडून । देवधर्म यावे घडून ।
यासाठी दादांस विचारून । घ्यावे असा विचार येई ।।१३।।
त्याच दिनी सायंकाळी । दिवे लागणीचे वेळी ।
गाडी थांबली फाटकाजवळी । स्वत: पुरूषोत्तम आले गाडीतून ।।१४।।
लक्ष्मी आईसह महाराज आले । ताई महाराजां समवेत भले ।
आनंदे मन भरून आले । सुचले न काय करावे आता ।।१५।।
चहा पाणी आदरातिथ्य करून । म्हणे कन्या रहावे मुक्काम करून ।
सासर मंडळीही महाराजांलागून । विनविती राहण्याविषयी ।।१६।।
महाराज म्हणती यावर । बरेच काळ पुण्याबाहेर ।
होतो उदयीक आश्रमाभीतर । कार्यक्रम वगैरे असताती ।।१७।।
तेव्हा जावयास हवे आम्हासी । वास्तूशांतीस एका भक्त गृहासी ।
तेथे जाऊन पुढील मार्गासी । निघावे म्हणती श्रीगुरू ।।१८।।
सर्व मंडळी गाडीतून । कन्या पुढे दुचाकीवरून ।
घर दाखवायचे म्हणून । निघाले जाण्यासाठी ।।१९।।
जाता काही अंतर । गाडीचे चाक पंक्चर ।
होऊन उभी राहे स्थिर । काय करावे म्हणताती ।।२०।।
जरी बदलले चाक । तरी दुरूस्तीस नेणे आवश्यक ।
तेव्हा स्त्री मंडळी सकळीक । परत आल्या घराप्रती ।।२१।।
महाराज भक्तासह वर्तमान । जाऊन वास्तूशांती लागून ।
परत येता उशीर होऊन । रात्र जाहली असे ती ।।२२।।
सासर मंडळी महाराजांस । विनविती नका जाऊ इतुक्या रात्रीस ।
वाटल्यास भल्या पहाटेस । निघावे हो श्रीगुरू ।।२३।।
महाराज म्हणती कन्येस । होते तुमच्या मनास ।
करावे आम्ही मुक्कामास । घडले सर्व तैसेची ।।२४।।
गाडी नादुरूस्त व्हावी ऐसे । चिंतीले न्हवते मी आन तैसे ।
कन्या म्हणे आपण रहावेसे । निश्चित वाटले मजसी ।।२५।।
सवे होती ज्येष्ठ भगिनी । रात्र तियेसह जागोनी ।
जालन्याविषयी गप्पा रंगोनी । आनंद भरे होई संतस्मरण ।।२६।।

पहाटेसच सर्वजण । चहापान करून ।
निघाले तेव्हा दादांचे चरण । वंदिती नमस्कारून कन्या ।।२७।।
त्यावेळी महाराज म्हणती । साँईनाथ आहेत तुमच्या घराप्रती ।
बोट दावून प्रतिमेस, बोलती । उपासना चालू द्या त्यांचीच ।।२८।।
सर्वही गडबडीत । दादांस विचारायचे जे ठरविलेत ।
विसरली कन्या तेव्हा स्वत: । सांगितले अंतर्यामी गुरुंनी ।।२९।।
तेव्हा येई भरून । कन्येचे अंत:करण ।
पुढे भडगांवी बदली होऊन । जाई कन्या तेथे राहण्या ।।३०।।
गुळवणी महाराजांच्या कार्यक्रमास । नेहेमीच जाती कुटुंब पुण्यास ।
या वेळी होता बदलीस । जाऊ न शके खंत वाटे त्याची ।।३१।।
पुढे त्याच वर्षात । गुरुमहाराजांची जन्मशताब्दी साजरी होत ।
जाई त्या उत्सवात । उद्‌घाटन वामन निवासाचे होते ।।३२।।
राहे उत्सवी चार दिवस । पाही मोठ्या प्रमाणास ।
सद्‌गुरुंच्या ऐश्वर्यासि । भावनेस देखोन भक्तांच्या ।।३३।।
येई तिच्या मनांत । काय भक्ति हे जन समस्त ।
उत्कटपणे करतांत । जमेल आपणांस कधी ती ।।३४।।
स्वगृही येता परतोन । हेच चिंती तिचे मन ।
कधी आपणांस भक्ति घडेल म्हणून । स्वप्न देखे एके दिनी ।।३५।।
पोस्ट कार्डवर पत्र । जसे महाराज लिहित ।
तसे पत्र आलेले दिसत । मजकूर न काही असे परी ।।३६।।
त्यावर मोठ्या अक्षरात । मध्यभागी नेमस्त ।
अक्षरे लिहिलेली दिसत । सौ.ताई महाराज ।।३७।।
जे मनी चिंतिले । उत्तर त्याचे पाठविले ।
हे कन्येस कळले । धन्य सद्‌गुरु महाराज ।।३८।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
नव्याणवावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १००

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एक भक्त गृहस्थ । असे लहान ग्रामस्थ ।
येता सद्गुरु कूटस्थ । त्याचे ग्रामी एकदा ॥१॥
स्वतः होऊन । सांगती भक्तालागून ।
तुमचेकडील पंचायतन । असे छान सर्वही ॥२॥
त्यातील श्रीगणेश मूर्ती । अकरा हातांची असे ती ।
शारदा विराजे मांडीवरती । ताम्रमूर्ती ती सुरेख असे ॥३॥
मनोभावे करून । तिचे करा पूजन ।
सेवा करता तिची संपूर्ण । कल्याण तुमचे होईल ॥४॥
आश्चर्य वाटे भक्तास । कधी न पाहिले देव्हाऱ्यास ।
आपल्या घरचे पंचायतनास । नेमके कैसे सांगितले ॥५॥
त्याच गावातील भक्तास । नोकरी लागता त्याच्या मनांस ।
आनंद होई विशेष । तेव्हा तो भक्त काय करी ॥६॥
रुपया दोन रुपये करूनी । दक्षिणा थोडी जमवूनी ।
द्यावी महाराजांस म्हणूनी । भावनेने ठेवी तो ॥७॥
येता सद्गुरु ग्रामात । विनवी यावे सदनांत ।
तसे श्रीगुरु निघता इतर भक्त । म्हणे उशीर झाला न जावे ॥८॥
तरीही महाराज त्याचे सदनी । प्रेमभरे जावोनी ।
कृपादृष्टीने आशिर्वचनी । संतोषिते जाहले ॥९॥
संकोचून दक्षिणा देत । गुरु ती स्वीकारित ।
झाले कां मनासारखे वदत । समाधान झाले का म्हणती ॥१०॥
यावर ये इतरांस कळून । याच्या गृहालागून ।
आले कां आवर्जून । भक्तवत्सल सद्गुरु ॥११॥
या गावातील एक भक्त । नोकरी साठी शहरात ।
जाई तेथेच रहात । परी शांतता नसे त्याचे चित्ती ॥१२॥

ही शिक्षकाची नोकरी । सोडून जावे ग्रामी तरी ।
असे ठरविता दारावरी । पत्र आले अचानक ।।१३।।
महाराजांचे पत्र । लिहिले न सोडावी नोकरी खचित ।
वाचावे ज्ञानेश्वरी भागवत । गीता वगैरे मनोभावे ।।१४।।
मनोभावे श्रवण करिता । झोप शांतपणे लागेल तत्वता ।
मनास वाटेल शांतता । नोकरी ती न सोडावी ।।१५।।
श्रींची आज्ञा मानून । राहे तो अनुदिन ।
नोकरी करी पूर्ण । पेंशनचा आधार उतारवयी होई ।।१६।।
या ग्रामातील एक भक्त। शास्त्रज्ञ ब्राम्हण असत ।
महाराजांस विचारित । न जमत मजसी संध्येतील मुद्रा ।।१७।।
सर्वही मुद्रा चोवीस । सांगितल्या भक्तास ।
गुरुकृपे प्राप्त झाल्या त्यास । कृतज्ञता वाटे त्यासी ।।१८।।

## श्लोक

सुमुखं संपुटं चैव विततं विस्तृतं तथा ।
द्विमुखं त्रिमुखं चैव चतुःपंचमुखं तथा ।।
षण्मुखाधोमुखं चैव व्यापकांजलिकं तथा ।
शकटं यमपाशं च ग्रंथितं चोल्मुकोल्मुकम् ।।
प्रलंबं मुष्टिकं चैव मत्स्यकूर्मो वराहकम् ।
सिंहाक्रांतम् महाक्रांतम् मुद्‍गरं पल्लवं तथा।।
एता मुद्रा न जानाति गायत्री निष्फलाभवेत् ।
एता मुद्रास्तु कर्तव्या गायत्री सुप्रतिष्ठिता ।।१९।।

– श्री गुरुचरित्र अध्याय ३६ –

## - ओवी -

मुद्राविणे गायत्री मंत्र । जप करिता सर्व व्यर्थ ।
या कारणे करावा पवित्र । मुद्रापूर्वक परियेसा ।।२०।।

- श्री गुरुचरित्र, अध्याय ३६ -

हा ब्राम्हण भक्त । कधी कधी पुण्यास जात ।
येता आनंद होत । महाराजांसी सर्वदा ।।२१।।
महाराज म्हणती आपण । जे भिक्षुक ब्राम्हण ।
ते पक्ष्याप्रमाणं । चोचीत येईल तेवढेच घेती ।।२२।।
अधिक संग्रह विप्र हे । न करिती त्यांच्या गेहे ।
संतोष वृत्तीने राहे । अशा द्विजास दक्षिणा द्यावी ।।२३।।
भिक्षुक विप्राकडून । न काही घ्यावे आपण ।
सुदामास सांभाळिती कृष्ण । तद्वत ब्राम्हणांसी सांभाळावे ।।२४।।
काठी टेकत जाऊन । म्हणती आईसाहेबांस आपण ।
ते द्विज आलेत म्हणून । वस्त्र दक्षिणादिक काढिली ।।२५।।
दाने विप्र संतुष्ट होती । म्हणून द्यावे म्हणतो तयाप्रती ।
असे विचारण्याचे कारण निश्चिती । धर्मशास्त्र जाणावे ।।२६।।
दान देताना दंपतीने । एकमेकांस विचारणे ।
उभयतांच्या संमतीने । दान करणे हे उचित ।।२७।।
पतीने पत्नीच्या पश्चात । किंवा न विचारता मालकाप्रत ।
पत्नीस ही दान करणे न उचित । म्हणोन विमर्ष हा असे ।।२८।।
आयुष्यभर दान धर्मादिक । केले उदंड सकळिक ।
परंतु धर्माप्रमाणे सपत्निक । होते हे सर्वही ।।२९।।
नुसता कोरा उपदेश । नसे त्यांचा विशेष ।
ते तंतोतंत पाळण्यामधे आयुष्य । घालविले समस्त तयांनी ।।३०।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
शंभरावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १०१

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

या अनेक अध्यायातून । अनेक भक्तांचे अनुभव ऐकून ।
श्रींचे भक्त वात्सल्यादिक गुण । स्मरण त्यांचे जाहले ॥१॥
परमात्म प्रेमे व्यापिले अंतःकरण । निर्वैर ते संत सज्जन ।
दीन हीनांची निष्काम सेवा जाण । प्रेमापोटी ते करिती ॥२॥
कुठलीच अपेक्षा न ठेवून । प्रेमपात्राचे इहपर कल्याण ।
साधण्यासाठी अहोरात्र प्रयत्न । करिती संत कनवाळू ॥३॥
परंतु मी करतो परोपकार । कणमात्र ही हा अहंकार ।
न शिवे त्यांचे अंतर । शिव पूर्ण जाहलेसे ॥४॥
हे जीव लेकरे ईश्वराची । यांची सेवा ही सेवा त्याची ।
अशी दृढ श्रद्धा संतांची । साची असते भूमिका ॥५॥
सेवा म्हणजे अन्न वस्त्रादिक । सुख समृद्धि लौकिक ।
पुरविणे हे नसून पारमार्थिक । उन्नति करणे हे असे ॥६॥
देहादिकांचे असत्यत्व पटवून । ईश्वराकडे वृत्ति वळवून ।
आधार पूर्णपणे देऊन । पारमार्थिक वाटचाल करविती ॥७॥
जे धरिती त्यांची संगती । जरी ते अज्ञानी असती ।
दयाळू संत निश्चिती । शिकविती त्याच्या चालीनेच ॥८॥
लहान मुलास चालणे । शिकवी माता त्याप्रमाणे ।
बोट धरून संथपणे । चालती गुरु शिष्यांसाठी ॥९॥
तुकाराम महाराजांचे पद पुढील । श्रींचे कनवाळूपण केवळ ।
दाखवी वर्णनि रसाळ । ऐका श्रोते एकचित्ते ॥१०॥
अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।
तैसे संत जगी । क्रिया करूनी दाविती अंगी ॥
बालकाचे चाली । माता जाणुनी पाऊल घाली ।
तुका म्हणे नाव । जनांसाठी उदकी ठाव ॥११॥

ज्यांच्या पाशी जाऊन । चित्तवृत्ति शांत होऊन ।
मनास होई समाधान । ऐसे संत महाराज॥१२॥
अशा संतांजवळ राहून । कसे वागावे आपण ।
काय शिकावे ते जाणून । घ्यावे नीट समजोनी ॥१३॥
कर्तव्यरूप सदाचरण । प्राप्त परिस्थितीत समाधान ।
अखंड ईश्वरानुसंधान । गोष्टी तीन या शिकाव्या संतांजवळी ॥१४॥
चुकविती चौऱ्यांशीची येरझार । नर नव्हे ते ईश्वर ।
या न्याये महाराज अवतार । स्वये असती जाणावे ॥१५॥
त्रिवाचा हे सत्य असे । साक्ष याची पटतसे ।
विश्वरूप दर्शन जसे । मुखात दाविले यशोदेस ॥१६॥
किंवा चतुर्भुज रूपातून । विश्वरूप दर्शन ।
अर्जुनासी देऊन । राहती तद्वत ॥१७॥
एक कन्या श्रींची सुंदर । रूप गुण संपन्न थोर ।
तियेस पिताजींचा सहवास फार । लाभला सहजतेने ॥१८॥
तियेसी श्रींचे मस्तकावर । विश्वरूप जे अपार ।
ते होई गोचर । अनंतब्रह्माण्डे तियेस दिसती ॥१९॥
जे असती श्रद्धधान । आणि खरोखर भाग्यवान ।
त्यांस असे दर्शन । ईशकृपेनेच होई ॥२०॥
अमानित्वे स्वस्वरूप । झाकिती परी आपोआप ।
प्रगटून येई ब्रह्मरूप । गुरूमहाराजांच्या इच्छेने ॥२१॥
ईश्वररूप सद्गुरूंना । नमन करावे पुनः पुनः ।
सद्बुद्धि देऊन मना । स्थिर करावे मागणे हेचि ॥२२॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे एकवा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरूचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १०२

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

महाराज कुशल व्यवस्थापन । सर्व असती जाणून ।
सर्व मुला नातवंडांस वळण । उत्तम त्यांनी लाविले ।।१।।
सांगती सुना मुलांस । सर्वांनी मिळून सायंकाळास ।
थोडा वेळ देव प्रार्थनेस । त्रिपदी आदिक म्हणावे ।।२।।
एक नातीस वडीले । रागे भरून हात उगारले ।
महाराज त्यांसी रागावले । मुलींस मारू नये कधी ।।३।।
त्या दुसऱ्यांच्या घरी जाणार । मुलांस वळण कसे लावणार ।
हे ठरवावे सविचार । आपले आपण समजून घ्यावे ।।४।।
एक नातू लहान असे जरी । भारीच खोड्या करी ।
आई त्याची संध्या कर म्हणे तरी । तो नायके तियेचे ।।५।।
हातास धरून त्याते नेई । खोलीत महाराजांचे ठाई ।
सांगून सर्व काही । आई म्हणे सांगा यासी ।।६।।
त्यास घेऊन जवळ । अहो! तुम्ही त्यांच्या आई केवळ ।
सांगा प्रेमाने त्यांस एक वेळ । बाळा! रोज संध्या करा बोलती ।।७।।
जो हळुवारपणा बोलण्यात । वात्सल्य जे अंत:करणांत ।
ते जाणवे मातेच्या हृदयाप्रत । असे होते महाराज ।।८।।
आईसाहेबांचे सांगणे वरून । दिले ताईत मंत्रवून ।
बंड नातवाचे गळ्यात बांधून । त्याचे गळ्यांत ते असे नेहेमी ।।९।।
लांब राहता ज्येष्ठ पुत्र । त्यांस पाठविती पत्र ।
नातीसाठी देती मंत्र । म्हणती वेगळी ती, सांभाळा ।।१०।।
मुले शाळकरी असताना । पत्र पाठविती दौऱ्यावरून त्यांना ।
कामे वाटून देती नाना । संस्कार करण्या त्यांवरी ।।११।।
एके करावे पूजन । एकाने द्यावे गंध उगाळून ।
एकाने फुले आणून । तयारी करून द्यावी नातीने ।।१२।।

देव नीट पुसून ठेवावे । पूजा करताना बरवे ।
आपटणार नाहीत, काळजीने घ्यावे । असे सर्व लिहिती ॥१३॥
राजसूय यज्ञात कृष्ण । प्रत्येकाच्या वृत्ती प्रमाणं ।
कामे देती वाटून । हे असे तद्वत ॥१४॥
मुले लहान असता । पाटीवर पत्र लिहीण्यास लावता ।
स्वत: ते वाचता । मग पोस्टकार्ड देती लिहिण्यास ॥१५॥
पत्र लिहिण्याची कला । यावरून ये विशेष कन्येला ।
सर्वजण म्हणती तिला । पत्र लिहिते सुंदर म्हणोन ॥१६॥
एका नातवास । गुण कमी पडती दहावीस ।
क्षेत्रातील माहितगार भक्तास ।
मार्गदर्शन त्यास करण्या सांगितले ॥१७॥
जे झाले ते उगाळत न बसता । पुढे काय करता येई आता ।
भर याच गोष्टीवरुता । अधिक त्यांचा होता जी ॥१८॥
सर्वही परिवारास सांगती । या 'ताई महाराज' माय भगवती ।
नमन करीत चला त्यांप्रती । घेत चला मार्गदर्शन त्यांचे ॥१९॥
असे मंडळींस सांगून । स्वत: ही दंडवत नमस्कारुन ।
ताईंस म्हणती भगवती आपण । श्री दत्तमहाराज ॥२०॥
कुटुंबीजन तैसेच भक्तजन । केले ताईंचे स्वाधीन ।
मातेपरी ताईही सांभाळून । वात्सल्य वर्षाव करितात ॥२१॥
शरण आम्ही भक्त तुम्हासी । भेद नसे आमच्या दृष्टीसी ।
रुपे वेगळाली आभासी । दोन रुपात आपण एक ॥२२॥
या गुरुतत्वासी नमस्कार । वाणी मनासी जो अगोचर ।
आपल्या रुपात हो गोचर । वंदन वारंवार मनोभावे ॥२३॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे दोनावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १०३

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

कवीश्वर कुळाची 'लक्ष्मी' । मनोरमा ती गृहलक्ष्मी ।
भक्तवत्सल जिचे स्वामी । जगद्‌धात्री जी असे ॥१॥
सर्वांग ज्यांचे सुंदर । अर्धांगी त्यांची 'सुंदर' ।
पुण्यशीला सती थोर । वैभवलक्ष्मी जी असे ॥२॥
जेवढे तेजस्वी आमचे श्री । तितुकीच तेजस्वी अर्धांगिनी श्री ।
तिच्या ठाई सर्व श्री । ऐश्वर्य श्री प्रत्यक्ष जी असे ॥३॥
तिचे करिता गुणवर्णन । सर्वही दोष जाऊन ।
मन होईल शुध्द पूर्ण । नमन तियेसी वारंवार ॥४॥
गुळवणी महाराजांची आवडती । सून आईसाहेब असती ।
आशिर्वादाची छाया तियेवरती । सदैव त्यांची होती म्हणून ॥५॥
संसाराची जबाबदारी । प्रचंड जरी होती तरी ।
पेलली समर्थ हे नारी । मानुषी न ती स्वतः लक्ष्मी असे ॥६॥
पतिव्रतेची स्तुती । स्वये शास्त्र पुराणे गाती।
कार्य वणवि अल्पमती । थोर पतिव्रता आईसाहेब ॥७॥
महापुरुषाचा संसार । देवावर टाकिला भार ।
तत्स्मरण करून निरंतर । कष्ट थोर उपसले ॥८॥
पहाटे ब्राह्म मुहूर्तासि । सुरु होई इचा दिवस ।
सामुग्री देऊन महाराजांस । गृहकार्यासि सुरुवात होई ॥९॥
लहान बाळ लेकरांस । उघडे झोपवून मृगचर्मासि ।
सोवळ्यातील नैवेद्यास । करे ही सती नारी ॥१०॥
मुले बाळे भरतार । त्यांसी वाढल्यावर ।
गृहकर्म देवधर्म आटोपल्यावर । मुले परतण्याची वेळ होई ॥११॥
घरीच होती भांडी-धुणी । सर्व ही वेळचे वेळी होऊनी ।
भक्त मंडळी सायंकाळी येऊनी । त्यांचे आतिथ्य सर्व करे ॥१२॥

वाटे तियेस मुले येतील । भूक तयांसी लागेल ।
पुनश्च आजी पोळ्या करून विपुल । झाकून ठेवी बाजूस ॥१३॥
मग उरले सुरले जे असे । आवरून सगळे ते जेवितसे ।
परंतु शीण कधीच न वाटतसे । कुठल्याही कामाचा ॥१४॥
सर्व कामे वेळच्या वेळी । होती यथास्थित सगळी ।
संगोपन मुलांचे ही त्याकाळी । व्यवस्थित सर्व केलेसे ॥१५॥
रात्री झोपण्यास होई उशीर । कामे करूनी दिवसभर ।
पडणे न होई क्षणभर । पुनश्च उठे पहाटेसी ॥१६॥
कडक सोवळे पाळून । इतुके सगळे करून ।
देवधर्मही करून । वाचनादिक ही करितसे ॥१७॥
एक दिवसात शिवलीलामृत । गजानन विजय तीन दिवसांत ।
नुसता चहा घेऊन वाचित । आटोपून सगळी कामे ॥१८॥
कुळधर्म कुळाचारास । सर्व जय्यत तयारीस ।
ठेविता, आधले दिवसास । महाराज दौऱ्याहून येती ॥१९॥
सर्व तयारी पाहून । संतोषे महाराजांचे मन ।
"त्यांनी सर्व सांभाळले" म्हणून ।
"सेवा आम्हास घडली" म्हणती ॥२०॥
विद्यार्थी असती शिकण्यास । त्यांचे ही गुरुमाते परिस ।
प्रेमाने करिती सेवेस । आनंद त्यात त्यांना वाटे ॥२१॥
सर्व भक्तांची गुरुमाता । प्रेम सर्वांवर करता ।
आकाशाहून विशाल हृदय तत्वता । दिसे सर्वांस त्यांचे ॥२२॥
जाती महाराज परगांवास । सर्व कामे करून पूजेस ।
करिता म्हणती या गणोबास । माझ्याच हातची आवडते पूजा ॥२३॥
सहज जे बोलती । ते खरे होती ।
एक भक्तास भाड्यावरती । घर कोठेच न मिळे ॥२४॥

कंटाळे तो हिंडून । म्हणती त्यास उद्देशून ।
या गणोबास काही कबूल कर म्हणून । तैसे करता काम होई ।।२५।।
एकदा दोन भक्त भगिनी । कुळधर्मासि सकाळपासून येवोनी ।
करिती सेवा पूर्ण भावानी । सायंकाळी त्या निघते वेळी ।।२६।।
महाराज पाचारिती आईसाहेबांस । जाणून त्यांचा उद्देश ।
अगोदरच या सुवासिनींस । गौरव करण्यास जी तयारी केली ।।२७।।
ओटी आदि जाऊन श्रींस दाखविले । श्रींचे मन संतोषले ।
सर्वही कारभारात उचित केले । स्वये महाराज असे म्हणती ।।२८।।
एकदा देऊळगांव राजास । असता काही उत्सवास ।
मुंबईकर मंडळींस । दुपारी अकरास जेवण करून वाढिले ।।२९।।
म्हणे भंडाऱ्याचे पंक्तिस । सहा वाजती सायंकाळास ।
तुम्हास न धरवेल धीरास । म्हणोन आत्ताच जेवा तुम्ही ।।३०।।
श्रीपाद श्रीवल्लभांच्या आईची । आठवण त्या सुमतीची ।
या भक्तांस येई साची । वात्सल्य आईचे पाहून ।।३१।।
'अतिथि देवो भव' म्हणून । भिक्षा वाढून दत्तात्रेयांचे मन ।
सुमतीने केले प्रसन्न । गुरुचरित्री ही कथा ।।३२।।
असो, धुंडीराज महाराज आईसाहेबांचे । गुरु असती त्यांचे ।
वर एक काव्य करून साचे । दृष्ट काव्यातून काढली ।।३३।।
एकदा चातुर्मासांतरी । श्रींचे चरणोदक घेतल्यावरी ।
जेवायचे असा नियम थोरी । केला आईसाहेबांनी ।।३४।।
हा नेम केल्यावर । माहेरचा असतो आहेर ।
त्यांना न्हवते माहेर । म्हणून एक काव्य केले ।।३५।।
कवीश्वरांच्या कुळात । आले, म्हणून त्यांच्या मनांत ।
कृतार्थता वाटे, या काव्यात । वर्णनि केले सुंदर ।।३६।।

।। श्री ।।

चरणतीर्थ घेतले, उपकृत जाहले ।
धुंडीराज सुत लाभले, सर्वस्व त्यांना अर्पिले ।।१।।
थोर कुळ कवीश्वरांचे, घराणे असे हे महंतांचे ।
पूर्वसुकृत असे साचे, म्हणुनी लाभले पाय त्यांचे ।।२।।
पूर्व संचिताचे फळ, लाभले हे संतकुळ ।
वाणी मध्ये द्यावे बळ, नाम घेता जाई वेळ ।।३।।
संतकुळी जन्मला तुम्ही थोर ।
पुत्ररूपी पाठीशी तीन शिलेदार ।।
कन्या तिन्हीही सांभाळिती संसार ।
बघुन त्यांचे सुयश, आनंद झाला फार ।।४।।
तुमचेची घेणे, तुम्हासी देणे ।
तुमच्यापाशी काय उणे?
सौ आईसाहेबांच काव्य ।
अल्प पाकळी स्वीकारणे ।।५।।

– सौ लक्ष्मीबाई –

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे तीनावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १०४

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

महाराज आपले गुणसूर्य । गुणवर्णन करता येईल काय ।
आनंद मिळावा म्हणून हे कार्य । थोडक्यात केलेसे ।।१।।
महाराजांच्या जीवनाचा । त्यांनी स्वीकारलेल्या तत्वांचा ।
त्यांच्या जीवन शैलीचा । किंचित आढावा घ्यावा म्हणून ।।२।।
कसे होते महाराज । हे अल्प मतीस मज ।
कशी पडेल उमज । परंतु जे थोर भक्त त्यांचे ।।३।।
ज्यांना घडला सहवास । त्यांना जे मिळाले पहावयास ।
त्यावरून केले वर्णनास । विचार थोडा करू श्रोते हो ।।४।।
वापीकूप तडागादि निर्माण । परोपकारार्थ धर्मशालादि स्थापन ।
हरीकथेचे निरुपण । समाराधन क्षेत्रांचे ।।५।।
क्षेत्रांचे जीर्णोद्धार । उपनयनादि संस्कार ।
श्राद्धादि संतर्पण साचार । सत्कर्मे निरंतर करणे ।।६।।
धन-ज्ञानाचे करून दान । सर्वही करणे ब्रम्हार्पण ।
हे सर्व महापुरुष लक्षण । होते श्रींचे जवळी ।।७।।
उपदेश करती सर्वांसी । सत्कर्मे घालवावे वयासी ।
त्यांचे आयुष्य याप्रमाणेसी । असे सत्कर्मी अर्पिलेले ।।८।।
अपरिमित केले दान । हस्ते परहस्ते करून ।
लोक कल्याणकारी म्हणून । कार्यासी सहाय्य जाहले ।।९।।
अनेक भक्तगण । देती सुवर्णवस्तू भेट म्हणून ।
त्या सर्व ठेविल्या जपून । दक्षिणादिक ही बहुतेक ।।१०।।
जाता काशी यात्रेस । सर्वही त्या वस्तूंस ।
वाराणसीतील सर्व देवांस । वाहिले मुक्त हस्ताने ।।११।।
परतीच्या प्रवासात । विचारती जे भक्त सोबत ।
काय किती राहिले आपणाप्रत । भक्त म्हणे जाण्यापुरते भाडे जी ।।१२।।

यावर प्रसन्नपणे हसून । म्हणती बरे झाले म्हणून ।
असे होते त्यांचे दान । सत्कर्मेरुची ही दिसतसे ॥१३॥
त्यांनी आपल्या आयुष्यात । अनुसरली चार सूत्र ।
चार या आधारांप्रत । थोर जीवन उभारले ॥१४॥
१. बुद्धेः फलमनाग्रहः । २. मत्तस्मृतिर्ज्ञानमपोहनंच ॥
३. विधिवशात् प्राप्तेन संतुष्यताम् ।
४. नात्मप्रियं प्रियं राज्ञां प्रजानांतु प्रियंप्रियं ॥१५॥
आग्रह कशाचा ही । नसावा म्हणती ते सदैव ही ।
सांगणे आपल्या परीने काही । हळुवारपणे समोरच्यास ॥१६॥
त्याने पाहिजे ऐकले । आग्रहें न त्याचे पडले ।
म्हणती सांगणे चांगले । परंतु आग्रह न धरावा ॥१७॥
आग्रहाने काय होते?। तळमळीनेच सर्व होते ।
पूर्वीचे काळी बाळाते । अनेक वस्तूंत सोडीती ॥१८॥
बाळ त्याच्या आवडीनं । जी वस्तू घे उचलून ।
त्याप्रमाणे त्याचे शिक्षण । त्या मार्गाने करीत होते ॥१९॥
आम्ही पुस्तक उचलले । म्हणून अध्ययनास पाठविले ।
साधेसे सूत्र भले । दुराग्रह नसावा कशाचाच ॥२०॥
विधिलिखिता प्रमाणं । येते सर्व घडून ।
आपले मत मांडून । पहावे, उगे रहावे न ऐकता ॥२१॥
आग्रह कुठलाही नसणे बुद्धित । हे ज्ञानाचे फळ असत ।
हीच सात्विक बुद्धि निश्चित । ती मागावी देवाजवळ ॥२२॥
सर्वही शास्त्रपुराण । ईश्वरापासून झाले उत्पन्न ।
गीतेत सांगती भगवान । आज्ञापन ते ईश्वराचे ॥२३॥
शिरोधार्य ते मानून । शास्त्राप्रमाणे आचरण ।
श्वासागणिक करून । मार्गदर्शन केले इतरांस ॥२४॥
स्मरण आणि ज्ञान । त्यांचा अभाव ही जाण ।
होई माझ्यापासून । भगवान ऐसे सांगती ॥२५॥
आचार प्रथमो धर्मः । तो त्यांसी प्रिय प्रथम ।
देवांवर आप्तेष्टांपेक्षा अधिक प्रेम । होते त्यांचे निश्चये ॥२६॥

कडाक्याची पडली थंडी । दत्तुबाळास शिवा बंडी ।
ही त्याची झलक थोडी । दिसते सांगण्यावरून ॥२७॥
प्रारब्धात जे असेल । तसेच होईल ।
हा निर्धार त्यांचा सकळ । संतुष्ट तयातच ते असती ॥२८॥
उपदेशात ही सांगत । "ठेविले अनंते" हे जाणावे निश्चित ।
आपल्याला रहावेच लागेल जसे त्याच्या मनांत ।
हे त्यांचे वाक्य असे ॥२९॥
रामरायाचे उदाहरण । देती प्रवचनातून ।
एकही मत विरुध्द न रहावे म्हणून । सीता त्यागिली प्राण प्रिया ॥३०॥
नेता कसा असावा । जनतेस प्रिय बरवा ।
स्वतःस प्रिय ते न प्रिय रावा । जनतेस प्रिय ते प्रिय असे ॥३१॥
स्वतःच्या आयुष्यात । शास्त्राधारे जे उचित ।
क्षणोक्षणी तसेच वागले सतत । आज कुणीही न म्हणू शके ॥३२॥
अरे! हे असे होते उचित । महाराजांनी केले विपरीत ।
आज एकही मनुष्य मनांत । असे कधीच न आणू शके ॥३३॥
भक्तांधीनत्व त्यांचे । भगवंताप्रमाणेच साचे ।
होते गुणविशेष, भक्तांचे । भावनेस नेहमी मान देती ॥३४॥
अकोल्याहून जाता पुण्यास । एका लहान मुलीने खास ।
महाराजांसाठी बनविले खव्यास । प्रवासास बरे खाण्यासाठी ॥३५॥
खव्यामुळे प्रवासात । तहानेचाही न त्रास होत ।
भावना जाणून ती त्वरित । स्वीकारले महाराजांनी ॥३६॥
मित भाषण त्यांचे असे । समोरच्याचे त्यांना दोष न दिसे ।
गुण जो समोरच्यात विलसे । तो उचलून धरती नेहमी ॥३७॥
लग्न स्वकन्येचे जमले । एक भक्तास आमंत्रण केले ।
त्यां भक्ताने तत्काळ सहाय केले । आर्थिक मदत देवोन ॥३८॥
असे हे पाहून । श्रींचे भरून आले नयन ।
जरी परत फेडिले धन संपूर्ण । आयुष्यभर कृतज्ञ राहिले ॥३९॥
घरी एखादे धार्मिक कार्यात । जर विप्र नीट कर्म न करत ।
उच्चारण वगैरे ही जर नीट न येत ।
स्वतः किंवा मुलांकरवी करविती ॥४०॥

परंतु दक्षिणा त्यांप्रत । ठरलेली देती समस्त ।
कर्म यथायोग्यच व्हावे निश्चित । कटाक्ष त्यांचा तो असे ॥४१॥
शीतोष्णादि करणे सहन । हे प्रमुख तप म्हणून ।
शरीर कष्टाकडे लक्ष न देऊन । तितीक्षेकडे लक्ष असे ॥४२॥
एक भक्त तयांसी । म्हणे त्रास फार भाड्याच्या घरासी ।
श्री म्हणती वर्तक वाड्यासी ।
तीन मजल्यांसी वर पाणी न्यावे लागे ॥४३॥
कन्या वदे त्यांची । बहीण भाऊ आम्ही भांडी पाण्याची ।
वर नेता दुसऱ्या मजल्यावरची ।
शिडी संपता श्री स्वतः उभे असत ॥४४॥
एक मजला स्वतः । वरती पाणी नेत ।
कष्टच असती संसारात । हे त्यांनी सुचविले ॥४५॥
पहाटे ब्राम्हमुहुर्तासि । उठून सर्व आन्हिकांस ।
करिती, पहाटे पाचला नवरात्रास । देवीस माळ घालुन होई ॥४६॥
जुनं ते सोनं । हे त्यांसी पटे म्हणून ।
देव्हाऱ्यातील डबी फोटो आदि बदलून ।
ठेविता पुनः जुनेच आणले ॥४७॥
भागवतात श्रीकृष्ण स्वतः । अहो भाग्यम्! अहो भाग्यम्! म्हणत ।
भेटले गोकुळवासी समस्त । तुम्हासारखे मज प्रेमी ॥४८॥
त्याप्रमाणे सहस्त्रचंद्रदर्शन शांतीसी । म्हणती श्री समस्त मंडळींसी ।
भेटले आपण सर्व आम्हासी । हे आमचे भाग्य निश्चित ॥४९॥
जर एका ओवीतून । करावे श्रींचे गुण कथन ।
नाथ महाराजां प्रमाणं । कर्मभक्ति ज्ञान समन्वय त्यांठाई असे ॥५०॥
अक्रोध वैराग्य जितेन्द्रियत्व । दया-क्षमा-शांति जनप्रियत्व ।
निर्लोभ दान मनोनिर्मलत्व । ज्ञानियाची चिन्हे लक्षणे दशही ॥५१॥

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे चारावा अध्याय गोड हा ।
॥ श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ॥

# अध्याय - १०५

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

एकदा वासुदेव निवासात । गुळवणी महाराज आणि एक भक्त ।
हे दोघेच बसले निवांत । इतुक्यात दार वाजविले कोणी ॥१॥
गुरुमहाराज म्हणती भक्तास । पहा हो या समयास ।
कोण ते आले खास । खिडकीस जाऊन भक्त पाही ॥२॥
सहज गेले ते बोलून । हं, ते दत्त कवीश्वर आलेत म्हणून ।
गुरुमहाराज म्हणती कोपून । काय बोलता आहात तुम्ही ॥३॥
वाडीला ज्यांच्या पादुका स्थापित । ते हे प्रत्यक्ष आहेत ।
सांभाळून जा बोलत । त्यांचे विषयी यापुढे ॥४॥
शंकरकाका आजेगांवकर । गुरुमहाराजांचे भक्त थोर ।
त्यांच्या आप्तास पिशाच्च संचार ।
होता पारायणे गुरुचरित्र सांगती ॥५॥
तसे करता तो पिशाच्च संचरून । गुरुमहाराजांस राहे मुक्ति मागून ।
पुनश्च सात पारायणं । गुरुमहाराजांचे सांगण्यावरून करिती ॥६॥
यावर पिशाच्च मुक्त होई । साधनेत शंकरकाका पाही ।
तो पिशाच्च मुक्त होऊन जाई । हे प्रसंग सांगण्याचे कारण ॥७॥
कन्या शंकरकाकांची । कथा सारखीच असे तिची ।
गुरुमहाराज दत्तमहाराज एक याची । प्रचीति देई ॥८॥
गुरुमहाराज असता । घरातील मंडळींस तत्वता ।
अगोदर दत्तमहाराजांप्रता । नमस्कार करण्यास लाविती ॥९॥
या कन्येचे यजमान । पडले रुग्ण होऊन ।
कॅन्सरचे निदान । पोटातल्या गोळ्यास करिती ॥१०॥
दत्तमहाराजांस केली प्रार्थना । स्तब्ध राहती काही क्षणा ।
सांगती, करवी सुयोग्य ब्राम्हणां ।
नित्य सप्तशतीचा पाठ करावा एक ॥११॥

काय संकल्प अगोदर । करायचा तो कागदावर ।
लिहून देती कवीश्वर । ऐसे करता 'तो' गोळा जिरून जाई ॥१२॥
आनंदाने जाऊन । सांगती महाराजां लागून ।
पाठ सतत चालू ठेवायचे म्हणून । सांगती दत्तमहाराज ॥१३॥
त्यावेळी या भगिनी । पुसती हो गुरु गुणखाणी।
चुकून शिवाशिव होता सदनी । विंचू वगैरे का निघतात ॥१४॥
इतरत्र जगात । न असे आढळत ।
म्हणती महाराज तुमची श्रध्दा असत ।
भाव असत म्हणून ऐसे होई ॥१५॥
विंचवाची भीती दाखवून । तुमच्याकडून धर्मपालन ।
देव घेतो करून । पालन न करणाऱ्यांस दोष लागे ॥१६॥
त्यातून नाही सुटका त्यांची । कोण्या रुपे शिक्षा या कर्माची ।
भोगावी लागतील त्याची । कल्पना आपल्यास काय येणार ॥१७॥
असो, या प्रसंगावरून । गुरुमहाराजांप्रमाणं ।
भक्त कुळाचे संकट निवारण । महाराज आपण करते झाले ॥१८॥
एकदा गुळवणी महाराज ज्योतिष्याप्रती । प्रश्न एक विचारिती ।
होईल कधी या देहाची समाप्ती । ती सांगावी म्हणताती ॥१९॥
तो ज्योतीषी न हो तयार । महाराज म्हणती ऐकायास तयार ।
आम्ही आहोत जर । भीती कासया तुम्हासी ॥२०॥
ज्योतीषी म्हणे एक देवीची मूर्ती । येईल जेव्हा तुमचे हाती ।
तेव्हा वेळ येईल निश्चिती । समाप्ती अवताराची करण्या ॥२१॥
पुढे एक भक्ताने । प्रतिष्ठे आधी आग्रहाने ।
देवीची मूर्ति गुरुमहाराजां हाती देणे ।
घडले मग जाहले ते दत्तरुप ॥२२॥
एका भक्ताने याच प्रमाणं । प्राण प्रतिष्ठेपूर्वी आणून ।
दत्तमूर्ति ती हातात घ्या म्हणून । हट्ट धरला दत्त महाराजांपाशी ॥२३॥

महाराज नाही म्हणती । परंतु ते भक्त न ऐकिती ।
शेवटी हाती घेऊन मूर्ती । परत दिधली भक्तास ।।२४।।
यानंतर अल्पकाळात । महाराजांचे महानिर्वाण होत ।
यावरून गुरु शिष्याचे एकत्व । सिध्द होई निश्चये ।।२५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे पाचावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय – १०६

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः॥

अत्यंत निर्वैर प्रकृति । दत्तमहाराजांची होती ।
अनेक जे द्वेष करिती । दयाच केली त्यांवर ॥१॥
कोणी फिर्याद नोंदवून । समन्स बजावून ।
कोर्टात नेले खेचून । शांत राहून सर्व पाहती ॥२॥
म्हणतात शहाण्याने । कोर्टाची पायरी न चढणे ।
ईश्वर इच्छेप्रमाणे । जे होईल ते पहावे बोलती ॥३॥
जातो सांगण्या भागवत । तसेच जाऊ कोर्टात ।
जो असे भगवंत । शांत तोच असा राहू शके ॥४॥
अनेकांने त्यांवर । केले प्रयोग अभिचार ।
कधी ही त्यांचा प्रतिकार । न केला शक्ति असता ही ॥५॥
असेच एका प्रयोगातून । प्रकृती त्यांची ढासळून ।
काही वर्षे आजारी होऊन । देह जीर्ण झालासे ॥६॥
भक्तांचे चिंती मन । करावे मंत्रानुष्ठान ।
थोर शिष्य ब्रह्मर्षि म्हणून । ते ही सांगती उपायांसी ॥७॥
मांत्रिक वैद्यांकडून उपाय । करण्यास सुचविती, गुरुराय ।
लाखोंचे पोशिंदे आपले पाय । काय-संरक्षण करावे जी ॥८॥
दीर्घायुष्यता मिळून । कृपाछत्र लाभून ।
दीर्घकाळ आनंदित होऊन । आम्हास राहु द्या म्हणती भक्त ॥९॥
दत्तमहाराज वदत । प्रामाणिक स्पष्ट आमचे मत ।
यापैकी न करावे काहीच निश्चित । असे बोलती श्रीगुरु ॥१०॥
जी ईश्वरी इच्छा असेल । त्याप्रमाणे होईल ।
जे प्रारब्धात लिहिलेलं । राहिलं न काही मनी आमच्या ॥११॥
पुन: असे उपाय करताना । त्या करणी करणाऱ्यांना ।
अपाय न व्हावा या कारणा । न योजावे काहीच ॥१२॥

आमच्यामुळे कोणास अपाय । न व्हावा असे बोलून सय ।
जिवावर उठलेल्यांचीच गुरुमाय । करी, जीवन दान दे त्यांसी ।।१३।।
गुरु त्यावेळी सांगती । द्रौपदी महान सती ।
किती करीत होती भगवद्भक्ति । तिलाही दु:ख लागले भोगणे ।।१४।।
शत्रूचा नाश करण्या ऐवजी । आहे त्याची दुर्बुद्धीजी ।
तिचा नाश होण्या गुरुराजी । प्रार्थना करावी म्हणती ।।१५।।
आयुष्य कमी करण्यास एक शक्ति । अहित करण्यास झटे ती ।
दुसरी मोठी सामुदायिक शक्ति ।
जीवित वाढविण्याचे करी प्रयत्न ।।१६।।
अनेक जण उपासना । करिती आम्हासाठी नाना ।
जे असेल ईश्वराच्या मना । होईल तैसेच निश्चये ।।१७।।
मांत्रिक भैरव बळी देण्यास । घेऊन जाई आचार्यांस ।
जर होई तुझे कल्याणास । तर शीर्ष देण्यास तयार आम्ही ।।१८।।
असे वदून शंकराचार्य जाती । हा देह मी नाही हे जाणती ।
देहाविषयी यत्किंचितही प्रीती । नसे त्यांना तद्वत ।।१९।।
आत्मस्वरूपाचे ज्ञान । होते त्यांना संपूर्ण ।
तसेच महाराजांचे उदाहरण । समत्व आचार्यांशी दिसून येई ।।२०।।
वाढत जाई आजारपण । चिंता करिती सर्वजण ।
असे पाहता एके दिन । लक्ष्मीआई निघाल्या त्यांकडे ।।२१।।
श्रींचे खोलीत जाऊन । कमरेवरी हात ठेवून ।
रखुमाई परी उभ्या राहून । ठसक्यात म्हणती पतिदेवांसी ।।२२।।
काय हो हे चालविले । तुम्हा अगोदर मजसी भले ।
जायचे हे तुम्हास कथिले । होते आम्ही अगोदर ।।२३।।
अखंड सौभाग्य राहून । अहेवपणी मजसी मरण ।
येणार हे आहे मी जाणून । म्हणती आईसाहेब ऐसे ।।२४।।
असे घडता वर्तमान । काही दिवसात महाराज बरे होऊन ।
आईसाहेब आजारी पडून । दवाखान्यांत न्यावे लागले ।।२५।।
महाराज म्हणती त्याते । नेऊ नका दवाखान्याते ।
काहीच न झाले त्यांस निश्चिते । घरीच ठेवा म्हणताती ।।२६।।

वाणीचा संकोच करून । इंद्रियलय करून ।
राहती शांत पडून । आईसाहेब तयेवेळी ।।२७।।
एक भगिनी म्हणे त्यांच्या जोडव्यांस । किती तेज असे खास ।
ताई भगवती म्हणती भगिनीस । प्रत्यक्ष वैभवलक्ष्मी आहेत त्या ।।२८।।
आईसाहेबांचे दुःख पाहून । वदे पुत्र पितयालागून ।
दुःख दूर करा त्यांचे म्हणून । महाराज वदती त्यावर काय ।।२९।।
त्यांनी आमचेच आजारपण घेतले । दुःख आम्हा वाटचे सोसले ।
पतिव्रतेचे थोर हे व्रत भले । नमन बालकांचे त्यांचे चरणी ।।३०।।
एक भक्त म्हणे गुरुवर । वाडीस श्री पादुकांवर ।
धरावी कां संतत धार । आईसाहेबांसाठी हो ।।३१।।
महाराज म्हणती प्रारब्ध आहे । ते भोगूनच राहे ।
जो साक्षीवृत्तीने पाहे । जीवनास त्याचेच वचन होती हे ।।३२।।
काहीच बोलत नसता एक दिनी । कन्येस आपल्या बोलावुनी ।
म्हणती घाल की गं त्यांच्या कानी । आता पुरे म्हणोनी सांग ।।३३।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे सहावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १०७

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनम: ।।

लागले उत्तरायण । अखंड मनी हरी स्मरण ।
गुळवणीप्रभूंची लाडकी सून म्हणून । त्यांचे पुण्यस्मरण दिवशी ।।१।।
स्वतेज गुरुमहाराजांचे चरणी । शांतपणे लीन करोनी ।
ब्रह्मपदवी अहेवपणी । साजणी घेती जाहली ।।२।।
पौष वद्य अष्टमीस । एकोणीसशे नव्याण्णव सालास ।
लीन झाली दत्तपदास । तारीख दहा जानेवारी ।।३।।
सर्व विधि पूर्ण होऊन । मंडळींस शांतवाणीनं ।
विचारती महाराज आपण । सर्व व्यवस्थित झाले नां ।।४।।
चौकशी सर्व करता । म्हणती त्यांचे संपता ।
नंबर आमचा आहे आता । असे बोलून जाती गुरु ।।५।।
एक भाविक भगिनीस । वाईट वाटे चित्तास ।
महाराज बघताच म्हणती त्यांस । काय! त्या गेल्या आता ।।६।।
या जन्मीचे ऋणानुबंध सरले । होते तेवढे आयुष्य मिळाले ।
आता ते संपले । चालत नाही तेथ कुणाचे काही ।।७।।
दुसरे दिनी आईसाहेबांचे । अस्थि मिळवताना त्यांचे ।
सापडले नथ, पाटल्या,वाट्या, मंगळसूत्राचे ।
जोडवी आदि जसेच्या तसे ।।८।।
सांगता हे महाराजांस । वदले शाब्बास ।
लक्ष्मीस्वरुप त्यांचे खास । ठेव म्हणून ठेविले मागे ।।९।।
एका भक्तास चौदावे दिनी । म्हणती न जावे रहावे येच स्थानी ।
काही कार्य आहे म्हणुनी । भक्त म्हणे जावे लागेल ।।१०।।
यावर म्हणती आपण । पुढील वेळी दर्शन ।
आमचे होईल म्हणून । सांगता काही येत नाही ।।११।।
दत्तरुप आई झाल्यानंतर । नित्याचे व्यवहार ।
दिनचर्यादिक गुरुवर । सहजपणे सुरु करती ।।१२।।

नेहेमीप्रमाणे खोलीत । आईसाहेबांच्या नित्य जाऊन येत ।
काही दिवसांनी बळावत । व्याधी देहाच्या ।।१३।।
आहार बोलणे कमी करून । राहती शांत पडून ।
तरी आन्हिक संध्यावंदन । करावे म्हणून त्यांसी वाटे ।।१४।।
देह झाले अशक्त बहुत । म्हणून पुत्रादिक विनवित ।
बरे नाही तुम्हाप्रत । स्नानादिकांचा हट्ट कासया ।।१५।।
म्हणती त्यांचा आग्रह पाहून । खोलीतच करा संध्यावंदन ।
आम्हास देवघरातच बसून । करायची संध्या म्हणती गुरू ।।१६।।
म्हणती एक आप्त । झालात फार अशक्त ।
सकाळची संध्या दुपारी केलीत ।
किंवा सायंकाळी तर होईल काय ।।१७।।
महाराज म्हणती किंचित कोपून । दोन्ही वेळचे जेवण ।
घेता का तुम्ही एकदाच खाऊन । निष्ठा होती ऐसी प्रबळ ।।१८।।
योगीपुरूष मुक्त होण्याचे वेळी । निरोध वाणीचा सकळी ।
करोन, शरीर कृश होत ये वेळी । असे गीतेत वर्णिले ।।१९।।
महानिर्वाणापूर्वी । आहार पूर्ण त्यजूनी ।
वाणीचा निरोध करूनी । शांत मग्न राहती ।।२०।।
डॉक्टरांस बुध्दी देऊन । औषधादिक सर्व बंद करून ।
आयुष्यभर केले मार्गदर्शन । म्हणून मौन धरिलेसे ।।२१।।
श्री वासुदेवानंद यतिदत्त । ग्रंथराज दत्तमाहात्म्यात ।
योगियाची मुक्ति वर्णितात । त्या ओव्या पुढील असती ।।२२।।
स्वस्वरूपी दृढ लक्ष धरी । इंद्रियांचा प्रत्याहार करी ।
तयां मनामधे लीन करी । मनाचा लय करी प्राणामधे ।।२३।।
तेजामधे प्राणलय । करी तेजाचा पर दैवतीलय ।
असा होवोनियां अद्वय । ब्रह्ममय तो झाला ।।२४।।
(श्री द.म.२१.६६,६७)
ताईंच्या सांगण्यावरून । ये आपणासी कळून ।
समस्त देव खोलीत येऊन । विनविती महाराजांसी ।।२५।।

आता आपण देवाधिदेव । चलावे स्वस्थानासी अवश्यमेव ।
अवतार कार्य स्वमेव । संपवूनी श्रीगुरु ।।२६।।
त्याप्रमाणे फाल्गुन पौर्णिमेस । प्रात:काळचे समयास ।
एक मार्च १९९९ सालास । दत्तस्वरुपास लीन झाले ।।२७।।
मुख अतिशय असे शांत । सतेज सुवर्णकांती दिसत ।
आजानुबाहू विलसत । शरीर त्यांचे तयेवेळी ।।२८।।
ताई भगवती सांगती । मंगल सर्व आहे निश्चिती ।
कोठेच अवकळा न भासे ती । प्रसन्न सर्व असे वातावरण ।।२९।।
असो, महाराज नेहमीच म्हणत होते । सुख दु:खादिक सर्व प्रसंगाते ।
नित्य स्मरावे मनोहर पादुकांते । नित्य रेणुका निवासात ।।३०।।
दोन किंवा तीन मिनिटानंतर । वाडीच्या पादुकांच्या फोटोवर ।
दृष्टी त्यांची वारंवार । जाई ही त्यांची उपासना होती ।।३१।।
कैसी निष्ठा वाडीवर होती । त्याची येथे ये प्रचीती ।
सर्वही जेव्हा ठरविती । अस्थि विसर्जन आळंदीस ।।३२।।
अकस्मात कनिष्ठ सुतास । आठवे एकदा उगारचे स्वामींस ।
श्री वदले होते वाडीस । अस्थि विसर्जन व्हावे इच्छा आमुची ।।३३।।
सर्व कार्यक्रम बदलून । वाडीस सूर्यबिंबा समोर नावेतून ।
कृष्णामाईत अस्थि विसर्जन । सर्व ही झाले असे ।।३४।।
थोर संतपरंपरेचा मुकुटमणी । थोर कार्ये सर्व करूनी ।
सगुणरुप राहे लपोनी । निर्गुणरुपी तो सतत आहे जवळ ।।३५।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे सातावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# अध्याय - १०८

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

विभूति श्री भीष्माचार्यप्रमाणं । श्रींचे होते इच्छामरण ।
इहलोकीचे प्रभूने दिले कार्य नेमून । ते पूर्ण करून राहिले ।।१।।
देह ज्यांनी निर्मिला । त्यांचे इच्छेनेच भला ।
त्यांचे चरणी अर्पिला । सहज लीला करूनिया ।।२।।
नारायण स्वामी यतिराजांस । म्हणती तुम्ही निर्माण केले या विश्वास।
समर्थ तुम्ही पालन करण्यास । आम्हास त्याचा न संबंध काही ।।३।।
टेंबे स्वामी महाराज । आज्ञा करी जेव्हा अज ।
सर्व परित्याग करून सहज । निघाले माणगावातून ।।४।।
ही परंपरानुगत सहजता । अनासक्ति साक्षीभूत शांतता ।
दिसे श्रींचे महानिर्वाणी तत्वता ।
चला म्हणता निरपेक्ष भावे निघाले ।।५।।
जरी सगुणरूप न ये दिसून । तरी अनेक प्रसंगांतून ।
भक्तांस देती आश्वासन । आहोत म्हणून आम्ही ते ।।६।।
अंत्यदर्शनाचे वेळी । रेणुका निवासी द्वाराजवळी ।
पांघरोन शाल निळी । दिसली शांत मूर्ति दंपतीस एका ।।७।।
काही भक्तांस । निर्वाणा नंतरच्या तारखांस ।
कळविले होते दीक्षेस । तद्वत होऊन त्यांस क्रिया होती ।।८।।
ज्येष्ठ चिरंजीवांस । निघण्यापूर्वी प्रवचनांस ।
विषय विचारावे पिताजींस । असा त्यांचा क्रम असे ।।९।।
नित्य सवयी प्रमाणं । देऊळगांवी करण्या प्रयाण ।
पूर्वी जाती श्रींचे खोली लागुन । विषय त्यांस विचारण्या ।।१०।।
अचानक आले लक्षात । अरे! विचारावे आता कोणाप्रत ।
तोच स्पष्ट ध्वनि ऐकू येत । "श्री एकनाथ महाराज" ।।११।।
हाच विषय घेऊन । केले यांनी प्रवचन ।
उत्कृष्ट निरुपण । होऊन समाधान वाटले ।।१२।।

एक भक्त भगिनी । पती तिचे ऑपरेशन होऊनी ।
पोस्ट ऑपरेटिव्ह केअर मधे असूनी । प्रकृती बिघडली अचानक ॥१३॥
आर्तपणे भगिनी । गुरुंचा धावा राहे करूनी ।
अचानक खोलीचे दार उघडोनी । आलेले दिसती महाराज ॥१४॥
काही काळजी करू नका बरे । यांस बरे वाटेल लवकरे ।
या शब्दांच्या उच्चारे । अदृष्य होई गुरुमूर्ति ॥१५॥
इतुक्यात अनोळखी डॉक्टर येऊन । देई एक इंजेक्शन ।
सर्व जाई संकट टळून । आरोग्यता पतींस लाभली ॥१६॥
२००५ सालची । घटना ही आहे साची ।
कृपा भक्तांवर अखंड त्यांची। साक्ष याची ही असे ॥१७॥
एक भक्त शेतात । विचार करी मनांत ।
औदुंबरा खाली चिंता करीत । श्रीं नंतर कोण तारी आम्हा ॥१८॥
पुढे अशाच स्थितीत । सायकल वरून जाण्यास उद्युक्त ।
तो त्याच्या शिरावरी अकस्मात । आग्या मोहोळ घोंघावी ॥१९॥
संकट भारी पाहून । धावा करी मनातून ।
महाराज! महाराज! म्हणून । काही क्षणांत थवा अदृष्य होई ॥२०॥
कळून आले तयासी । आज न जरी दिसती आपणासी ।
तरी सदैव जवळ गुरुमहाराजांसी । पावू आपण स्मरण करिता ॥२१॥
असेच एक भक्त । केदारनाथ बद्रीनाथ यात्रेस जात ।
परिवारा समवेत । मनी स्मरून महाराजांसी ॥२२॥
जाता केदारनाथासी । समस्त या परिवारासी ।
शिवलिंग न दिसे नेत्रांसी । दिसती बसलेले दत्तमहाराज ॥२३॥
महाराजांनी संकेत दिधला । समस्त क्षेत्र गुरुंचे चरणाला ।
कासया जावे तीर्थयात्रेला । गुरुचरणांला सोडून ॥२४॥
अंतिम समयात । महाराज आईसाहेबांस म्हणत ।
जायचे आपणांस जालन्याप्रत । तुम्हास अगोदर जायचे ॥२५॥
मग आम्ही येऊ जालन्यास । ऐकून या वचनांस ।
वाटे कनिष्ठ सुतास । इच्छा यांची पूर्ण होवो ॥२६॥

म्हणे पिताजी आपण । चलावे वाटल्यास हॅलीकॉप्टर मधून ।
आपण उभयतांस जालन्या लागून । नेऊ ऐसे विचारले ।।२७।।
महाराज म्हणती हासून । त्यासी बराच वेळ अजून ।
सत्य ठरले वचन । आले उभयता जालन्यासी ।।२८।।
कनिष्ठ सुताच्या इच्छेप्रमाण । त्या समवेत लक्ष्मी प्रतिमेच्या रुपानं ।
जाहल्या आईसाहेब विराजमान ।
मागाहून पादुका रुपांनी श्री आले ।।२९।।
ताई महाराजांच्या कृपेने । दत्त अनघा स्वरूपाने ।
दर्शनि आपण आम्हासी देणे । अनंतकाळ, हीच प्रार्थना ।।३०।।
शालीवाहन शके एकोणीसशे एकतीस । चैत्रमासी शुद्ध द्वितीयेस ।
विरोधी नाम संवत्सरास । पुण्यतिथी काजळकर महाराजांची ।।३१।।
हा सुदिन उत्तम । अध्याय ये दिनी अंतिम ।
पूर्ण होई सुगम । कृपेनेच महाराजांच्या ।।३२।।
वीतराग विषयं वा चित्तम् । हे श्रींचे उपदेश अनुपम ।
सकाम अथवा निष्काम । स्मरण करता त्याचे मिळेल फळ ।।३३।।
आशीर्वाद या ग्रंथासी । पू.ताई महाराजांचे आहेत विशेषी ।
त्यांनीच लिहविले परियेसी । निमित्त मजसी करून ।।३४।।
हा चरित्र ग्रंथ संपूर्ण । असो सद्गुरु चरणी अर्पण ।
'बुद्धि द्या' असे तुमचे चरण । वंदून प्रार्थना असे सतत ।।३५।।
क्लांत झाला सहस्त्रमुख शेष । वर्णन करिता न आले निःशेष ।
गुणसागरातून बिंदुमात्र हे ऋषिकेश ।
विशेष कृपा ग्रंथावरी असो ।।३६।।

इति श्री सुंदरदत्त चरिते
एकशे आठावा अध्याय गोड हा ।
।। श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

|| श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ||

श्रीगुरुपौर्णिमा, ७ जुलै २००९

# || श्री दत्तात्रेय कवीश्वरांची आरती ||

अमृत मधुरम् अमृत मधुरम् अमृत मधुरम् दर्शनम् ।
घन गंभीरम् घन गंभीरम् घन गंभीरम् तव वचनम् ।।
कूर्म दृष्टि वात्सल्ययुक्तं तेजोमयम् तव नेत्रम् ।
मम माता त्वं हिं, त्वं मम तातः, त्वं हि भवसागरतारकः ।।

जयदेव जयदेव वेदपारङ्ग, दत्तात्रेय कवीश्वर,
दत्तात्रेय कवीश्वर सरस्वती सुपुत्र ।धृ। ।।१।।

परब्रह्मलिङ्गम् त्रिगुणातीतम् जीवनमुक्त महापुरुषम् ।
दत्तावतारं करुणासागरम् भक्तोध्दारम् गुरुवरम् ।।
दत्तात्रेय लक्ष्मी शिवशक्तिरूपम् सगुणब्रह्ममनोहरम् ।
भक्तवत्सलम् कोमलहृदयम् मनमनोभ्रमर पङ्कजम् ।।
जयदेव -------।।२।।

कोटीभास्कर तेजःयुक्तं नीराजयामि दीपेन त्वां ।
मम प्राण ज्योतिः विवेक घृतम्, भक्ति भावं मम नीरांजनम् ।।
तव स्मरणम् इति महायज्ञम्, उद्धारं कुरु मम सत्वरम् ।
मातरं भगवतीं कवीश्वरगुरुम्, वंदयामि द्वैत रहितम् ।।
जयदेव ------।।३।।

|| श्री गुरुचरणारविंदार्पणमस्तु ||

# * आरती श्री सद्‌गुरु दत्तमहाराजांची *

आरती दत्तराजयाची। धुंडीराज सुपुत्राची ।।धृ।।
पुण्यग्रामी तूं वससी।
भक्ता पावन तूं करीशी।।
भजती त्याते उद्धरिसी।
न भजती त्यांहि कृपा करीशी ।।
पुरुषोत्तमा तूं अवतारा।(२)
शरण येऊन विनीत होवून धूलि घेईन।
श्री गुरु आपुल्या चरणांची।
किमया पावन करण्याची ।।१।। आरती दत्त ......

भागवतावरी तव प्रीती।
स्वकुळी गणेश दत्त भक्ती।।
ज्ञानी विद्यावाचस्पती।
अंकीत कुंडलीनी शक्ती।।
कवीश्वरा तूं ईश्वरा। (२)
जगती प्रगटून। लीला दावून । तरीहि लपवून ।
ठेविली ओळख स्वरुपाची ।
गाईन लीला कीर्तीची ।।२।। आरती दत्त ...

शुभ्र वस्त्र शुचिचे ल्याले।
वात्सल्या मूर्त रुप आले ।।
ज्ञाना विनये शोभविले ।
ब्रह्म साकारुनि आले।
भक्तवत्सला दयाघना । (२)
दृष्टीने करुण। मजला बघून। जवळी घेऊन ।
वर्षा करी बा ममतेची।
मागीन भीक्षा भक्तिची ।।३।। आरती दत्त .... (२)

# श्री सुंदरदत्तचरितम्– परिशिष्ट

| अध्याय | ओव्या | गीत/पाळणा/ पद | श्लोक | इतर | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३६ | – | – | – | ३६ | ३६ |
| २ | ३६ | ११+४ | – | – | ५१ | ८७ |
| ३ | ३७ | – | – | – | ३७ | १२४ |
| ४ | ३५ | – | – | – | ३५ | १५९ |
| ५ | ३३ | ९ | – | – | ४२ | २०१ |
| ६ | ३५ | – | – | – | ३५ | २३६ |
| ७ | ३३ | ३+५ | – | – | ४१ | २७७ |
| ८ | ३७ | – | – | – | ३७ | ३१४ |
| ९ | ३३ | – | – | – | ३३ | ३४७ |
| १० | ३३ | – | – | – | ३३ | ३८० |
| ११ | ४५ | – | – | – | ४५ | ४२५ |
| १२ | ३६ | ९ | – | – | ४५ | ४७० |
| १३ | ३४ | – | – | – | ३४ | ५०४ |
| १४ | ३६ | – | – | – | ३६ | ५४० |
| १५ | ३९ | – | – | – | ३९ | ५७९ |
| १६ | ३४ | – | – | – | ३४ | ६१३ |
| १७ | ३१ | – | – | – | ३१ | ६४४ |
| १८ | ३३ | ८ | – | – | ४१ | ६८५ |
| १९ | ३३ | – | – | – | ३३ | ७१८ |
| २० | ३४ | – | – | – | ३४ | ७५२ |
| २१ | ३३ | – | – | – | ३३ | ७८५ |
| २२ | ३३ | – | – | – | ३३ | ८१८ |
| २३ | ३४ | – | – | – | ३४ | ८५२ |
| २४ | ३१ | – | – | – | ३१ | ८८३ |
| २५ | ३३ | – | – | – | ३३ | ९१६ |
| २६ | ३१ | ११ | – | – | ४२ | ९५८ |
| २७ | ३४ | – | – | – | ३४ | ९९२ |
| २८ | ३१ | – | – | – | ३१ | १०२३ |
| २९ | ३३ | – | – | – | ३३ | १०५६ |
| ३० | २६ | – | – | – | २६ | १०८२ |

| अध्याय | ओव्या | गीत/पाळणा/ पद | श्लोक | इतर | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ६३ | २८ | – | – | – | २८ | २२६७ |
| ६४ | २७ | – | – | – | २७ | २२९४ |
| ६५ | २८ | – | – | – | २८ | २३२२ |
| ६६ | २१ | – | – | – | २१ | २३४३ |
| ६७ | २३ | – | – | – | २३ | २३६६ |
| ६८ | २९ | – | – | – | २९ | २३९५ |
| ६९ | ३८ | – | – | – | ३८ | २४३३ |
| ७० | ३२ | – | – | – | ३२ | २४६५ |
| ७१ | ४० | – | – | – | ४० | २५०५ |
| ७२ | ४० | – | – | – | ४० | २५४५ |
| ७३ | २६ | १ + ७ | – | – | ३४ | २५७९ |
| ७४ | २७ | – | – | – | २७ | २६०६ |
| ७५ | ३५ | – | – | – | ३५ | २६४१ |
| ७६ | ३४ | – | – | – | ३४ | २६७५ |
| ७७ | ३१ | – | – | – | ३१ | २७०६ |
| ७८ | ३७ | – | – | – | ३७ | २७४३ |
| ७९ | २६ | – | – | – | २६ | २७६९ |
| ८० | २३ | – | – | – | २३ | २७९२ |
| ८१ | २२ | – | – | – | २२ | २८१४ |
| ८२ | ४७ | – | – | – | ४७ | २८६१ |
| ८३ | ४० | – | – | – | ४० | २९०१ |
| ८४ | ३५ | – | – | – | ३५ | २९३६ |
| ८५ | ४३ | – | – | – | ४३ | २९७९ |
| ८६ | ३१ | – | – | – | ३१ | ३०१० |
| ८७ | ३५ | – | – | – | ३५ | ३०४५ |
| ८८ | ४० | – | – | – | ४० | ३०८५ |
| ८९ | ३७ | – | – | – | ३७ | ३१२२ |
| ९० | २५ | – | – | – | २५ | ३१४७ |
| ९१ | ३४ | – | – | – | ३४ | ३१८१ |
| ९२ | ३९ | – | – | – | ३९ | ३२२० |
| ९३ | २६ | – | – | – | २६ | ३२४६ |
| ९४ | ३५ | – | – | – | ३५ | ३२८१ |

| अध्याय | ओव्या | गीत/पाळणा/पद | श्लोक | इतर | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | ३३ | – | – | – | ३३ | १११५ |
| ३२ | ३४ | – | – | – | ३४ | ११४९ |
| ३३ | ३३ | – | – | – | ३३ | ११८२ |
| ३४ | ३६ | – | – | – | ३६ | १२१८ |
| ३५ | ३६ | – | – | – | ३६ | १२५४ |
| ३६ | ३४ | – | – | – | ३४ | १२८८ |
| ३७ | ३२ | – | – | – | ३२ | १३२० |
| ३८ | ३५ | – | – | – | ३५ | १३५५ |
| ३९ | ३० | – | – | – | ३० | १३८५ |
| ४० | ३६ | – | – | – | ३६ | १४२१ |
| ४१ | २४ | – | – | – | २४ | १४४५ |
| ४२ | ५० | १० | – | – | ६० | १५०५ |
| ४३ | ५४ | – | – | – | ५४ | १५५९ |
| ४४ | ४० | – | – | – | ४० | १५९९ |
| ४५ | २४ | – | – | – | २४ | १६२३ |
| ४६ | ३४ | – | – | – | ३४ | १६५७ |
| ४७ | ३३ | – | – | – | ३३ | १६९० |
| ४८ | ३७ | – | – | – | ३७ | १७२७ |
| ४९ | ३५ | – | – | – | ३५ | १७६२ |
| ५० | ३७ | – | – | – | ३७ | १७९९ |
| ५१ | ४८ | – | – | – | ४८ | १८४७ |
| ५२ | ३९ | – | – | – | ३९ | १८८६ |
| ५३ | ४१ | – | – | – | ४१ | १९२७ |
| ५४ | ४७ | – | – | – | ४७ | १९७४ |
| ५५ | ३८ | – | – | – | ३८ | २०१२ |
| ५६ | ३३ | – | – | – | ३३ | २०४५ |
| ५७ | २९ | – | – | – | २९ | २०७४ |
| ५८ | ३० | – | – | – | ३० | २१०४ |
| ५९ | ३३ | – | – | – | ३३ | २१३७ |
| ६० | २९ | ४ | – | – | ३३ | २१७० |
| ६१ | ३५ | – | – | – | ३५ | २२०५ |
| ६२ | ३३ | १ | – | – | ३४ | २२३९ |

| अध्याय | ओव्या | गीत/पाळणा/ पद | श्लोक | इतर | एकूण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ९५ | ३० | – | – | – | ३० | ३३११ |
| ९६ | ३८ | – | – | – | ३८ | ३३४९ |
| ९७ | ४३ | – | – | – | ४३ | ३३९२ |
| ९८ | ३२ | – | ९ | – | ४१ | ३४३३ |
| ९९ | ३८ | – | – | – | ३८ | ३४७१ |
| १०० | ३० | – | – | – | ३० | ३५०१ |
| १०१ | २२ | – | – | – | २२ | ३५२३ |
| १०२ | २३ | – | – | – | २३ | ३५४६ |
| १०३ | ३६ | – | ५ | – | ४१ | ३५८७ |
| १०४ | ५१ | – | – | – | ५१ | ३६३८ |
| १०५ | २५ | – | – | – | २५ | ३६६३ |
| १०६ | ३३ | – | – | – | ३३ | ३६९६ |
| १०७ | ३५ | – | – | – | ३५ | ३७३१ |
| १०८ | ३६ | – | – | – | ३६ | ३७६७ |

एकूण अध्याय = १०८, एकूण ओव्या + श्लोक संख्या = ३७६७

## श्रीसुंदरदत्तचरितम् या ग्रंथांचे पारायणासाठी क्रम

**३ दिवसांचे पारायण करणेसाठी :**

| | | |
|---|---|---|
| १ ले दिवशी | अध्याय १ ते ३५ | १२५४ ओव्या |
| २ रे दिवशी | अध्याय ३६ ते ७१ | १२५१ ओव्या |
| ३ रे दिवशी | अध्याय ७२ ते १०८ | १२६२ ओव्या |
| | एकूण | ३७६७ ओव्या |

**७ दिवसांचे सप्ताह पारायणासाठी**

| | | |
|---|---|---|
| १ ले दिवशी | अध्याय १ ते १४ | ५४० ओव्या |
| २ रे दिवशी | अध्याय १५ ते ३० | ५४२ ओव्या |
| ३ रे दिवशी | अध्याय ३१ ते ४५ | ५४१ ओव्या |
| ४ थे दिवशी | अध्याय ४६ ते ६० | ५४७ ओव्या |
| ५ वे दिवशी | अध्याय ६१ ते ७७ | ५३६ ओव्या |
| ६ वे दिवशी | अध्याय ७८ ते ९३ | ५४० ओव्या |
| ७ वे दिवशी | अध्याय ९४ ते १०८ | ५२१ ओव्या |
| | एकूण | ३७६७ ओव्या |